प्रशासक यांचा कार्यकाळ
प्रस्ताव व ठराव
दि.३०.०९.२०२१ ते दि. ३१-०३-२०२२

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## (मा.प्रशासक यांचा कार्यकाळ दि.३०.०९.२०२१ ते दि.३१.०३.२०२२ पर्यंत)

मा.प्रशासक, यांच्या कार्यकाळातील घेण्यात आलेले प्रस्ताव व ठराव क्र.२०४ ते ३३९ चे इतिवृत्त

**प्रस्ताव क्रमांक २०४/२०२१:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.३०.०९.२०२१)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पुर्व मंजुर मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक-२४९ दि.०९.०२.२०१८ नुसार सातारा-देवळाई या मनपा हद्दीतील शासन अधिसुचना सन-२०१६ नुसार समाविष्ट भागासाठी जलनि:स्सारण वाहिन्यांचे जाळे तयार करणे, सिवेज पंपींग स्टेशन बांधणे व इतर संलग्न कामे करणे या कामासाठी जानेवारी-२०१९ मध्ये मा.संचालक, नगर परिषद प्रशासन, संचालनालय, वरळी मुंबई-४०००३० यांना त्या वेळेच्या दरसुची नुसार रु.१८०.३६ कोटीचा विस्तृत प्रकल्प अहवाल (Detail Project Report) सादर करण्यात आला होता. याबाबत शासन निर्णय संकीर्ण/२०१२/प्र.क्र.२४/नवि-१६ दि.२७ जुन २०१२ मध्ये नमुद नुसार महानगरपालिका/नगरपरिषदा यांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात नागरी सोयी-सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य हे ८०:२० या आकृतीबंध अनुदेय करण्यात आलेले आहे.

आता शासन नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांच्या सुचनेनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या औरंगाबाद परिक्षेत्राच्या दरसुची सन २०२१-२०२२ नुसार सुधारित प्रकल्प अहवाल रु.२२३.८१ कोटीचा नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार श्री.यश इनोव्हेटीव्ह सोल्युशन LLP यांनी या कार्यालयास सादर केला आहे. या प्रकल्प अहवालास नोडल एजन्सी स्वरुपाने मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे.

नव्याने सादर प्रकल्प अहवालानुसार सध्याची या भागातील लोकसंख्या व लोकसंख्या वाढ गृहीत धरुन विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून यामध्ये २०० मी.मी. ते १२०० मी.मी.व्यासाचे पाईप टाकणे, सिवेज पंपींग स्टेशन बांधणे (६ द.ल.लि. व ०.६ द.ल.लि.) सुमारे १०००० मेनहोल चेंबर व ३५००० मिळकती करीता इन्स्पेक्शन चेंबर बांधणे, अस्तित्वातील सोयी-सुविधा आवश्यकतेनुसार स्थलांतरीत करणे (Utility Shifting), रस्ते ना-दुरुस्त झाल्यास त्याची पुर्नबांधणी करणे, जेटींग कम व्हॅक्युम मशीन खरेदी करणे व योजना पुर्ण झाल्यानंतर योजनेची प्रायोगिक तत्वावर (Trial Run) चाचणी घेणे, ई.बाबींचा समावेश आहे. या भागातील जलनि:स्सारण वाहिनी टाकण्याचे काम पुर्ण झाल्यानंतर त्याची जोडणी औरंगाबाद शहर भुमीगत गटार योजनेअंतर्गत पुर्वी टाकण्यात आलेल्या १४०० मी.मी. मल-जलवाहिनीला करण्यात येणार आहे. या जलनि:स्सारण वाहिनीद्वारे सातारा-देवळाई भागातील निर्मित मल-जल कांचनवाडी STP ला पोहचणार आहे. सद्यस्थितीतील जलनि:स्सारण वाहिनी निर्गत होणार मल-जल हे अस्तित्वातील जलनि:स्सारण वाहिनीची वहन करण्याची क्षमता असल्याने या भागासाठी वेगळा STP तुर्त बांधण्याची आवश्यकता नाही.

दिनांक २७ जुलै २०१२ च्या शासन निर्णयात नमुद प्रमाणे या योजनेसाठी मनपा हिश्श्याची २०% र.रु.४४.७६ कोटीची आर्थिक तरतुद सन २०२१-२०२२ च्या अर्थसंकल्पात केली जाणार आहे. तरी पुर्वी पारीत ठराव क्रमांक-२४९ दि.०९.०२.२०२१८ मधील नमुद पुर्व तरतुदी कायम ठेवण्यात येऊन

सुधारित प्रकल्प अहवाल रु.२२३.८१ कोटी यास मंजुरी देणे व यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याचे अधिकार मा.प्रशासक/आयुक्त यांना प्रदान करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक २०४/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सुधारित प्रकल्प अहवाल रु.२२३.८१ कोटी यास पुर्व मंजुरी ठराव क्रमांक-२४९ दि.०९.०२.२०१८ मधील नमुद तरतुदी कायम ठेवण्यात येऊन सातारा देवळाई भागा करीताच्या सुधारित प्रकल्प अहवालास मनपा हिस्स्याची २०% र.रु.४४.७६ कोटी आर्थिक वर्ष सन २०२१-२०२२ अर्थसंकल्पात आर्थिक तरतुद करण्याचे तसेच यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याचे अधिकार मा.प्रशासक/आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक २०५/२०२१:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.११-१०-२०२१)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिक्षण विभागांतर्गत एकुण ८३ बालवाड्या मध्ये कार्यरत असलेल्या एकुण १३४ बालवाडी शिक्षिका व १३ बालवाडी सेविका यांना मा. स्थायी समिती मंजुर ठराव क्र.६७ दि.१३/०२/२०२० नुसार जा.क्र.मनपा/शिक्षण/६१३/२०२०,दि.२३/१०/२०२० रोजीच्या आदेशान्वये दि.३१/०३/२०२१ पर्यंत नियुक्तीस तात्पुरती मुदतवाढ देण्यात आलेली होती.

सद्यस्थितीत खालील एकुण १३४ बालवाडी शिक्षिका व/१३ बालवाडी सेविका त्यांच्या नावासमोर दाखविलेल्या शाळेत दिनांक १४/०६/२०२१ पासुन कार्यरत आहेत.

सदरील नियुक्तीस मा.स्थायी समितीची मान्यता मिळाल्यानंतर मुदतवाढ देण्यात येते. परंतु शासन निर्णय क्र.महाराष्ट्र शासन निर्णय क्र.औमपा-२०१९/प्र.क्र.१०२/नवि २४, दि.०१/०८/२०१९ नुसार मा.आयुक्त यांना प्रशासक म्हणून पूर्ण अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे त्यामुळे सदरील १३४ बालवाडी शिक्षिका व १३ बालवाडी सेविका त्यांच्या नावासमोर दाखविलेल्या शाळेत दि.१४/०६/२०२१ ते दि.१४/१२/२०२१ (दिवाळीच्या सुट्टयावगळून) पर्यंत नियुक्तीस मुदतवाढ देण्यासाठी प्रस्ताव सादर.

| अ.क्र. | बालवाडीचे नाव | बालवाडी शिक्षिकेचे नाव |
|---|---|---|
| १. | के.प्रा.शा. बेगमपुरा | श्रीमती वाघ प्रभा वामनराव |
| २. | प्रा.शा. भावसिंगपुरा | श्रीमती मंगला फलके |
| ३. | के.प्रा.शा.बेगमपुरा | श्रीमती मृनाल पंडीत |
| ४. | प्रा.शा.गरमपाणी बालवाडी | श्रीमती निलीमा कुलकर्णी |
| ५. | प्रा.शा. बडीगीरणी (उर्दु) | श्रीमती फरजाना बेगम शेख बशीर |
| ६. | प्रा.शा. भावसिंगपुरा | श्रीमती कल्पना धनबीज |
| ७. | प्रा.शा. भावसिंगपुरा | श्रीमती नंदा नलावडे |
| ८. | प्रा.शा. पडेगाव | श्रीमती जावळे निता डी. |
| ९. | प्रा.शा. पडेगाव | श्रीमती जगताप छाया.यु. |
| १०. | पडेगाव कॉलनी | श्रीमती वाणी एस.डी. |
| ११. | पडेगाव कॉलनी | श्रीमती सिमा एकलेरे/बाराबोटे |
| १२. | प्रा.शा. मिटमिटा | श्रीमती ब्राम्हणकर गिता हिरालाल |
| १३. | प्रा.शा. मिटमिटा | श्रीमती भगत एस.डी |
| १४. | प्रा.शा. मिटमिटा | श्रीमती वंदना गायकवाड |

प्रशासकीय ठराव कार्यालय
प्रस्ताव व ठराव
दि.१८.०१.२०२१ ते दि. ३१ . ३ . २०२१

| | | |
|---|---|---|
| १५. | प्रा.शा. आरेफ कॉलनी | श्रीमती शाहीन बेगम (उर्दू) |
| १६. | आप्पावाडी बालवाडी | श्रीमती जाधव पी.एस. |
| केंद्र क्र. २ | | |
| १७. | **प्रा.शा. ज्युबलीपार्क** | श्रीमती उर्मिला मातावले |
| १८. | प्रा.शा. ज्युबलीपार्क (उर्दू) | श्रीमती हाश्मी तहुरा सय्यद मसूद |
| १९. | प्रा.शा. मंजुरपुरा | श्रीमती असाफिया बेगम |
| २०. | प्रा.शा. बडीगिरणी | श्रीमती मथुरा जैस्वाल |
| २१. | प्रा.शा. जुनाबाजार (उर्दू) | श्रीमती शेख तरन्नुम |
| २२. | प्रा.शा. पोलिस हेडक्वार्टर | श्रीमती संगीता दादाराव देवरे/जगताप |
| २३. | प्रा.शा. जुनाबाजार | श्रीमती दया पांगारकर |
| २४. | प्रा.शा. जुनाबाजार | श्रीमती संध्या मैद |
| २५. | प्रा.शा. नागेश्वरवाडी | श्रीमती शोभा घंटे |
| २६. | प्रा.शा. गरमपाणी | श्रीमती शिला काळे |
| २७. | प्रा.शा. वसंतभुवन | श्रीमती माधुरी बिडवई |
| केंद्र क्र.३ | | |
| २८. | **प्रा.शा. किराडपुरा नं.१** | श्रीमती सोफिया बानो सै. अब्बास |
| २९. | प्रा.शा. किराडपुरा नं.१ | श्रीमती मेहरुन्निसा बेगम |
| ३०. | प्रा.शा. किराडपुरा नं.१ | श्रीमती नुसरत बेगम मनसूर खान |
| ३१. | प्रा.शा. किराडपुरा नं.२ | श्रीमती एकबाल सीमी |
| ३२. | प्रा.शा. किराडपुरा नं.२ | श्रीमती रुबीना बेगम |
| ३३. | प्रा.शा. किराडपुरा नं.३ | श्रीमती अफरोज जहाँ |
| ३४. | प्रा.शा. किराडपुरा नं.३ | श्रीमती सुनिता शेजवळ |
| ३५. | प्रा.शा. शाहबाजार | श्रीमती नाजेमा बेगम |
| ३६. | प्रा.शा. शाहबाजार | श्रीमती कौसर बेगम |
| ३७. | प्रा.शा. चेलीपुरा | श्रीमती मुबीना आफरीन |
| ३८. | प्रा.शा. यशोधरा कॉलनी मराठी | श्रीमती छाया राऊत |
| ३९. | प्रा.शा. यशोधरा कॉलनी मराठी | श्रीमती संगीता बोर्से |
| ४०. | प्रा.शा. यशोधरा कॉलनी उर्दू | श्रीमती सीमा यासमीन जबीन |
| ४१. | प्रा.शा. यशोधरा कॉलनी उर्दू | श्रीमती समीना परवीन |
| ४२. | प्रा.शा. यशोधरा कॉलनी मराठी | श्रीमती पुष्पा पंडितराव गायकवाड |
| केंद्र क्र. ४ | | |
| ४३. | **के.प्रा.शा. सिडको एन-१२** | श्रीमती विधोतेकर सुवर्णा |
| ४४. | प्रा.शा. सिडको एन-११ | श्रीमती कुलकर्णी अंजली नंदकिशोर |
| ४५. | प्रा.शा. सिडको एन-९ | श्रीमती पोतदार मंजुषा |
| ४६. | प्रा.शा. रोजाबाग | श्रीमती नुरजहाँ बेगम |
| ४७. | प्रा.शा. रोजाबाग (मराठी) | श्रीमती कुंबेकर अनिता जनार्दन |

| | | |
|---|---|---|
| ४८. | प्रा.शा. मिसारवाडी | श्रीमती मंगला जगन्नाथ काळे |
| ४९. | प्रा.शा. मिसारवाडी | श्रीमती स्वाती चंद्रशेखर बीडवई |
| ५०. | प्रा.शा. मिसारवाडी | श्रीमती नंदनी साकुबा सुरडकर |
| ५१. | प्रा.शा. शताब्दीनगर | श्रीमती दुसाने अनिता सुधाकर |
| ५२. | प्रा.शा. शताब्दीनगर | श्रीमती शेळके सुशिला |
| ५३. | प्रा.शा. शताब्दीनगर | श्रीमती शेख हाजरा फातेमा |
| केंद्र क्र.५ | | |
| ५४. | के.प्रा.शा. सिडको एन-७ | श्रीमती शिला मगरे |
| ५५. | के.प्रा.शा. सिडको एन-७ | श्रीमती पुष्पा आसाराम दाभाडे |
| ५६. | प्रा. व मा. नारेगाव (मराठी) | श्रीमती स्वाती भास्कर गोंड |
| ५७. | प्रा. व मा. नारेगाव (मराठी) | श्रीमती रत्नाप्रभा पंडीतराव खैरनार |
| ५८. | प्रा. व मा. नारेगाव (मराठी) | श्रीमती सुरेखा भिमसेन दाभाडे |
| ५९. | प्रा.शा. नारेगाव (उर्दु) | श्रीमती परविन कौसर शेख बशिरोद्दीन |
| ६०. | प्रा.शा. नारेगाव प्रकल्प | श्रीमती सुरेखा गोतीलाल परभणकर |
| ६१. | प्रा.शा. अशोकनगर | श्रीमती ज्योती संपत जाधव |
| ६२. | प्रा.शा. अशोकनगर | श्रीमती माधुरी व्यंकट ताठे |
| ६३. | प्रा.शा. ब्रिजवाडी | श्रीमती अनिता शिवाजी साळवे |
| ६४. | प्राशा. नारेगाव | श्रीमती शकीला बेगम शे. इब्राहीम |
| ६५. | आंबेडकरनगर बालवाडी | श्रीमती कुलकर्णी एस.के. |
| ६६. | आंबेडकरनगर बालवाडी | श्रीमती पंडीत पी.के. |
| ६७. | फुलेनगर बालवाडी | श्रीमती सदावर्ते एस.एन. |
| ६८. | आरतीनगर बालवाडी | श्रीमती सुनिता सुरेश साठे |
| ६९. | आरतीनगर बालवाडी | श्रीमती रंजिता दादाराव आठवले |
| ७०. | फुलेनगर बालवाडी | श्रीमती तोंबरे ए.व्ही. |
| ७१. | गौतमनगर बालवाडी | श्रीमती बिऱ्हाडे एस.पी (पंडीत) |
| ७२. | गौतमनगर बालवाडी | श्रीमती वंदना महाजन |
| ७३. | सिध्दार्थनगर बालवाडी | श्रीमती पवार डी.एस. |
| ७४. | कादरीया कॉलनी बालवाडी. | श्रीमती स्वाती संदिप काटे |
| ७५. | कादरीया कॉलनी बालवाडी | श्रीमती गिता वसंतराव पवार |
| केंद्र क्र.६ | | |
| ७६. | के.प्रा.शा. मुकुंदवाडी | श्रीमती शेख रेहाना शेख शहानूर |
| ७७. | के.प्रा.शा. मुकुंदवाडी | श्रीमती मंदा विठ्ठलराव निसाळ |
| ७८. | के.प्रा.शा. मुकुंदवाडी | श्रीमती संगिता केशवराव शीलवंत |
| ७९. | प्रा.शा. चिकलठाणा | श्रीमती सविता भिकन पाणी |
| ८०. | प्रा.शा. चिकलठाणा | श्रीमती नलिनी मनोज पाटील |
| ८१. | प्रा.शा. विश्रांतीनगर | श्रीमती प्रतिभा विठ्ठलराव मांटे |

प्रशासक भाषा कार्यवाह
प्रस्ताव व ठराव
दि.१०.०९.२०२१ ते दि. ३१ . ३ .२०२२

| | | |
|---|---|---|
| ८२. | प्रा.शा. विश्रांतीनगर | श्रीमती दुर्गा वसंतराव खराटे |
| ८३. | प्रा.शा. विठ्ठलनगर | श्रीमती मिना अनंतराव देशमुख |
| ८४. | प्रा.शा. विश्रांतीनगर | श्रीमती सुजाता विठ्ठलराव मांटे |
| ८५. | प्रा.शा. हनुमाननगर | श्रीमती निलीमा राजेश्वर कवठेकर |
| ८६. | प्रा.शा. संजयनगर | श्रीमती विद्या नेमीनाथ कानडे |
| ८७. | प्रा.शा. भारतनगर नं.२ | श्रीमती देशमुख माधुरी विठ्ठलराव |
| ८८. | संजयनगर प्रकल्प | श्रीमती आशा शेंधगावकर |
| ८९. | संजयनगर प्रकल्प | श्रीमती मंगला नाडे |
| ९०. | प्रा.शा. गारखेडा (मराठी) | श्रीमती आशा घायतिलक |
| ९१. | प्रा.शा. विष्णुनगर | श्रीमती प्रमिला तायडे |
| ९२. | प्रा.शा. भारतनगर नं.१ | श्रीमती पिंगळे शकुंतला बाबुराव |
| ९३. | प्रा.शा. जयकर कॉलनी | श्रीमती आशा केणेकर |
| केंद्र क्र.७ | | |
| ९४. | **प्रा.शा. प्रियदर्शनी इंदिरानगर नं. १** | श्रीमती रेखा धोटे |
| ९५. | प्रा.शा. प्रियदर्शनी इंदिरानगर नं. २ | श्रीमती मंजुषा अमेशचंद्र वांदेकर |
| ९६. | धावधवडी देवळाई म्हाडा | श्रीमती कामिनी फोरपडे |
| ९७. | प्रा.शा. गारखेडा उर्दु | श्रीमती समीना तडवी |
| ९८. | के.प्रा.शा. प्रियदर्शनी इंदिरानगर | श्रीमती मीरा गणेश मोरे |
| केंद्र क्र. ८ | | |
| ९९. | **के.प्रा.शा. बन्सीलालनगर** | श्रीमती शालुबाई कांबळे |
| १००. | प्रा.शा. पदमपुरा | श्रीमती उज्वला किसन वंसीले |
| १०१. | प्रा.शा. एकनाथनगर | श्रीमती शेख आत्मा परवीन |
| १०२. | रमानगर बालवाडी | श्रीमती वानखेडे छाया |
| १०३. | प्रा.शा. शहानुरवाडी | श्रीमती अरुणा सुधीर नाईक |
| १०४. | प्रा.शा. रमिलानगर | श्रीमती सुरैय्या बानो |
| केंद्र क्र. ९ | | |
| १०५. | **के.प्रा.शा. इंदिरानगर बायजीपुरा** | श्रीमती कमल त्रांबू सोनवणे |
| १०६. | के.प्रा.शा. इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती छाया व्यंकटराव चाकोलिकर |
| १०७. | प्रा.शा. जिन्सी (मराठी) | श्रीमती विमल बाबुराव काथार |
| १०८. | प्रा.शा. रेंगटीपुरा (उर्दु) | श्रीमती नाजिया नसरीन जहिरोद्दीन |
| १०९. | प्रा.शा. जिन्सी / रेंगटीपुरा | श्रीमती बशीर फातेमा |
| ११०. | प्रा.शा. कैलासनगर | श्रीमती स्मिता सुरेश पुरी |
| १११. | प्रा.शा. कैलासनगर | श्रीमती संगीता माणीकलाल शुक्ला |
| ११२. | प्रा.शा. कैलासनगर | श्रीमती सुनिता लिंबाजीराव कोल्हे |
| ११३. | प्रा.शा. रोहिदासपुरा | श्रीमती लक्ष्मी छगनराव बुरकुले |
| ११४. | प्रा.शा. खोकडपुरा | श्रीमती मंगला नारायण वाहुळे |

[illegible]
[illegible]
दि ३०.०९.२०२१ ते दि. 31 . 3 .२०२२

| | | |
|---|---|---|
| ११५. | प्रा.शा. पैठणगेट (उर्दू) | श्रीमती शबाना बेगम शेख बाबर |
| ११६. | प्रा.शा. समतानगर | श्रीमती नाजनीन बानो आंनेस खान |
| ११७. | प्रा.शा. नुतन कॉलनी | श्रीमती दिक्षीत संध्या |
| | केंद्र क्र. १० | |
| ११८. | **के.प्रा.शा. हर्सुल गाव** | श्रीमती चंद्रकला गणपत बकले |
| ११९. | के.प्रा.शा. हर्सुल गाव | श्रीमती पुनाबाई धारसिंग हरणे |
| १२०. | प्रकल्प फुलेनगर बालवाडी | श्रीमती रमा टेकचंद दुबे |
| १२१. | प्रा.शा. हर्सुल वसाहत | श्रीमती छाया छगन बकले |
| १२२. | प्रा.शा. हर्सुल वसाहत | श्रीमती सुर्यकला बालचंद पखलोरे |
| १२३. | प्रा.शा. सेंट्रल जेल | श्रीमती साधना भिकनसिंग गवळी |
| १२४. | प्रा.शा. सेंट्रल जेल | श्रीमती सुरेखा कैलास काळे |
| १२५. | प्रा.शा. सेंट्रल जेल | श्रीमती जुफिशान अझ्रा हकीम फैज करीम |
| १२६. | प्रकल्प फुलेनगर बालवाडी | श्रीमती महानंदा श्रीरंग काळे |
| १२७. | प्रा.शा. मुजफ्फरनगर | श्रीमती फरीदा बेगम शेख मुस्तफा |
| | केंद्र क. ११ | |
| १२८. | **के.प्रा.शा. बनेवाडी राहुलनगर प्रकल्प** | श्रीमती गहिरे के.एम. |
| १२९. | **के.प्रा.शा. बनेवाडी** | श्रीमती कुसुम रेशमा जाधव |
| १३०. | प्रा.शा. कांचनवाडी | श्रीमती संगिता मैंद |
| १३१. | प्रा.शा. चिटखेडा | श्रीमती सविता त्र्यंबकराव शिरसाळे |
| १३२. | प्रा.शा. नक्षत्रवाडी | श्रीमती तानगाडगे निर्मला |
| १३३. | प्रा.शा. चिटखेडा | श्रीमती गायकवाड कविता |
| १३४. | प्रा.शा. वाल्मी | श्रीमती जाधव लता कडुबा |

**बालवाडी सेविकाचे नाव**

| | | |
|---|---|---|
| १ | मनपा शाळा एकनाथनगर | श्रीमती हुसनाबी सय्यद युसुफ |
| २ | मनपा शाळा संजयनगर (म) | श्रीमती शोभा तुळशीराम |
| ३ | मनपा शाळा संजयनगर (म) | श्रीमती अंबिका तुकाराम गायकवाड |
| ४ | भिमनगर भावसिंगपुरा (गाव) | श्रीमती कुसुम अशोक अमृतफळे |
| ५ | मनपा शाळा चंडीगोरणी | श्रीमती परीगाबाई दाभाडे |
| ६ | मनपा शाळा रोजाबाग (प्रकल्प) | श्रीमती अनिसा बेगम अजगर खाँ |
| ७ | मनपा शाळा प्रियदर्शनी इंदिरानगर नं.२ | श्रीमती मिनाबाई बालकिशन पताडिले |
| ८ | मनपा शाळा संजयनगर (जिन्सी) | श्रीमती संगिता कर्नल |
| ९ | आंबेडकरनगर (फुलेनगर सिडको एन-१२) | श्रीमती लक्ष्मी सत्यविजय काळे |
| १० | मनपा शाळा नारेगाव | श्रीमती बेबी मदनलाल वांगरे |
| ११ | मनपा शाळा मुलींची उस्मानपुरा | श्रीमती बबीता इंगळे |
| १२ | मनपा शाळा शहानुरवाडी | श्रीमती कल्याणी सुनिल गायकवाड |

टिप :- श्रीमती निकम इ. आर. यांचे माहे मार्च २०२१ मध्ये निधन झालेले आहे व श्रीमती आम्रपाली इंगळे यांनी राजीनामा दिल्यामुळे यांचे नाव प्रस्तावामधून वगळण्यात आले आहे.

करिता उपरोक्त १३४ बालवाडी शिक्षिका व १२ बालवाडी सेविका यांना सन २०२१-२२ च्या शैक्षणिक वर्षासाठी दि.१४/०६/२०२१ ते दि.१४/१२/२०२१ (दिवाळीच्या सुट्टया वगळून) पर्यंत तात्पुरती नियुक्ती/मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येतो.

<u>ठराव क्रमांक २०५/२०२१:-</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, १३४ बालवाडी शिक्षिका व १२ बालवाडी सेविका यांना सन २०२१-२२ च्या शैक्षणिक वर्षासाठी त्यांच्या नावासमोर दाखविलेल्या शाळेत दि.१४.०६.२०२१ ते दि.१४.१२.२०२१ (दिवाळीच्या सुट्टया वगळून) पर्यंत तात्पुरती नियुक्ती/मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>प्रस्ताव क्रमांक २०६/२०२१:-</u> (प्रशासकीय प्रस्ताव दि. १३.१०.२०२१)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराच्या औद्योगिकरणामुळे मोठ्या प्रमाणात वाढ होत असून अनुपाताने वाहनांची संख्या सुध्दा वाढत आहे. पैठणगेट ते गुलमंडी या शहरातील जुना भाग मोठी बाजारपेठ असून त्या ठिकाणी पार्किंगची पुरेशी व्यवस्था नसल्यामुळे रस्त्यावरील वाहतूक नेहमी व्यस्त झालेली आहे. सध्या पैठणगेट येथे महानगरपालिकेची दोन चाकी व चार चाकी वाहनाकरीता वाहनतळ (Parking) व्यवस्था आहे. परंतु ती पुरेशी नाही. त्याकरीता त्या जागेवर बी.ओ.टी.तत्वावर यांत्रिक बहुमजली वाहनतळ (Mechanical Multistoried Parking) व्यवस्था निर्माण करण्याचे हाती घ्यावयाचे आहे. त्या अनुषंगाने प्रस्तावीत बी.ओ.टी. तत्वावरील यांत्रिक बहुमजली वाहनतळासाठीचा (Mechanical Multistoried Parking) विकास नियंत्रण नियमावलीनुसार संबंधीत आराखडा तयार करणे संबंधीत आराखडा मान्यतेसाठी दाखल करणे. संबंधीत आराखडा मान्यतेनंतर प्रस्तावीत बहुमजली वाहनतळाचे सविस्तर अंदाजपत्रकासह सविस्तार प्रकल्प अहवाल (DPR) तयार करून सादर करणे. प्रकल्प अहवाल मान्यतेनंतर प्रस्तावीत प्रकल्प क्षेत्र बी.ओ.टी.तत्वावर विकसीत करण्यासाठी निविदा पूर्व व निविदा पश्चात सर्व कामे त्यामध्ये प्रकल्पाचे तांत्रिक/आर्थिक निकषा आधारे छाननी करणे फिजीबीलीटी अहवाल तयार करणे प्रकल्पाचे विकासाचे टप्प्यावर काम सुरु असतांना प्रत्यक्ष पाहणी / निगराणी करणे व प्रकल्पाचे काम विकासकाकडून अटी व शर्ती तहत नियमानुसार पुर्ण करून घेणे व वेळोवेळी प्रकल्पाच्या सद्यस्थिती अहवाल महानगरपालिकेस सादर करणे करीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांची नियुक्ती करीता निविदा मागविण्यात आली असता, प्रथम वेळेस एक व द्वितीय वेळेस एकही निविदा प्राप्त झालेली नाही. तिसऱ्या वेळेस मे.आरंग असोसिएटस् यांची प्रकल्प किंमतीच्या २% दराची एकमेव दर प्राप्त निविदेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

<u>ठराव क्रमांक २०६/२०२१:-</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पैठणगेट येथे बी.ओ.टी.तत्वावर यांत्रिक बहुमजली वाहनतळ (Mechanical Multistoried Parking) प्रकल्पासाठी विकास नियंत्रण नियमावलीनुसार संबंधीत आराखडा तयार करणे, संबंधीत आराखडा मान्यतेसाठी दाखल करणे, संबंधीत आराखडा मान्यतेनंतर प्रस्तावीत बहुमजली वाहतळाचे सविस्तर अंदाजपत्रकासह सविस्तर (DPR) तयार करून सादर करणे. प्रकल्प अहवाल मान्यतेनंतर प्रस्तावीत प्रकल्प क्षेत्र बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करण्यासाठी निविदा पूर्व व निविदा पश्चात सर्व कामे त्यामध्ये प्रकल्पाचे तांत्रिक/आर्थिक निकषाआधारे छाननी करणे, फिजीबीलीटी अहवाल तयार करणे प्रकल्पाचे विकासाचे टप्प्यावर काम सुरु असतांना प्रत्यक्ष

पाहणी/निगराणी करणे व प्रकल्पाचे काम विकासकाकडून अटी व शर्ती तहत नियमानुसार पुर्ण करुन घेणे व वेळोवेळी प्रकल्पाचा सद्यस्थिती अहवाल महानगरपालिकेत सादर करणे करीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांचे नियुक्ती करीता निविदा मागविण्यात आली असता प्रथम वेळेस एक व द्वितीय वेळेस एकही निविदा प्राप्त झालेली नाही. तिसऱ्या वेळेस मे.आरंभ असोसिएटस् यांची प्रकल्प किंमतीच्या २% दराची एकमेव दर प्राप्त निविदेच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक २०७/२०२१:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि-१३.१०.२०२१)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, १५व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार औरंगाबाद महानगरपालिकेचा समावेश Million Plus Cities मध्ये असल्याने सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील वातावरणातील हवेची गुणवत्ता (Air Quality) सुधारण्यासाठी बंधनकारक अनुदानातील पहिला हप्ता महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक एफएफसी-२०२०/प्र.क्र.८६/नवि-४ मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक ०९.११.२०२० अन्वये रुपये १६,००,००,०००/- महानगरपालिकेस वितरीत करण्यात आले आहेत.

तसेच वातावरणातील हवेची गुणवत्ता (Air Quality) सुधारण्यासाठी बंधनकारक अनुदानातील दुसरा हप्ता महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक एफएफसी-२०२०/प्र.क्र.३४/नवि-४ मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक १२.०४.२०२१ अन्वये रुपये १६,००,००,०००/- महानगरपालिकेस वितरीत करण्यात आले आहेत.

१५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार औरंगाबाद महानगरपालिकेचा समावेश Million Plus Cities मध्ये असल्याने सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील पाणी पुरवठा व व्यवस्थापनात सुधारणा व प्रभावी घनकचरा व्यवस्थापन (For Improving conservation, supply and management of water and efficient solid waste management) साठी बंधनकारक अनुदानातील पहिला हप्ता महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक एफएफसी-२०२०/प्र.क्र.८९/नवि-४ मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक १०.११.२०२० अन्वये रुपये १५,७५,७९,३१७/- महानगरपालिकेस वितरीत करण्यात आले आहेत.

तसेच पाणी पुरवठा व व्यवस्थापनात सुधारणा व प्रभावी घनकचरा व्यवस्थापन (For Improving conservation, supply and management of water and efficient solid waste management) साठी बंधनकारक अनुदानातील दुसरा हप्ता महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक एफएफसी-२०२१/प्र.क्र.३५/नवि-४ मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक १२.०४.२०२१ अन्वये रुपये १५,७५,७९,३१७/- महानगरपालिकेस वितरीत करण्यात आले आहेत.
वरील नमुद केल्यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेस एकूण रुपये ६३,५१,५८,६३४/- इतका निधी प्राप्त झालेला आहे.

उपरोक्त १५व्या वित्त आयोगात प्राप्त एकत्रित निधी रुपये ६३,५१,५८,६३४/- मधून आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका औरंगाबाद यांनी खालील कामांचे नियोजन मा.ना.श्री सुभाष देसाई, मंत्री, उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा तथा पालकमंत्री, औरंगाबाद यांचे समक्ष सादर केले होते. या सर्व कामांमुळे शहराचा पाणी पुरवठा, ड्रेनेज व्यवस्था आणि शहरातील हवेची गुणवत्ता यात मोठ्या प्रमाणात सकारात्मक परिणाम दिसून येतील आणि नागरिकांचे जिवनमान उंचावण्यासाठी या कामांचा हातभार लागेल असा विश्वास व्यक्त करत ना.पालकमंत्री, औरंगाबाद यांनी सदर कामास सहमती दर्शविली.

मा.ना.श्री आदित्यजी ठाकरे, मंत्री, पर्यावरण, पर्यटन आणि राजशिष्टाचार, महाराष्ट्र राज्य यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सींग द्वारे घेतलेल्या बैठकीत विद्युत प्रणालीवर चालणारे वाहन (EV) खरेदी करण्याची बाब १५व्या वित्त आयोगातील समाविष्ठ करण्यात आलेल्या कामात अंतर्भूत करावी अशा

सूचना दिलेल्या होत्या. त्यानुसार १५व्या वित्त आयोगातील प्राप्त निधीत खालील कामांचा समावेश करण्यात आला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| | (अ) घनकचरा व्यवस्थापन : | | |
| १. | रमानगर, रोजाबाग व शिवाजीनगर ट्रान्सफर स्टेशन उभारणे. | :- | १०३८०००००.०० |
| २. | बायो मायनिंग मशिन | :- | २०६५००००.०० |
| ३. | पडेगांव, चिकलठाणा येथील Leachate Treatment साठी Soil biotechnology वर आधारीत प्रक्रिया केंद्र उभारणे. | :- | १२००००००.०० |
| एकुण रक्कम (अ) | | | १३६४५००००.०० |
| | (ब) ड्रेनेज : | | |
| | सुखनानदी, खामनदी, शहरातुन वाहणाऱ्या मुख्य नाल्यांमधुन वाहत असलेल्या मुख्य जलनिःसारण वाहिन्यांना ड्रेनेजचे क्रॉस कनेक्शन करणे बाबत. | :- | ८१७५४८५७.०० |
| एकुण रक्कम (ब) | | | ८१७५४८५७.०० |
| | (क) पाणी पुरवठा (यांत्रिकी) : | | |
| १. | औरंगाबाद शहर पाणी पुरवठा सुधारणा करण्यासाठी खरेदी करावयाचे पंपींग मशिनरी. | | |
| | a) ढोरकीन पंपगृह येथे १५० अ.श. क्षमतेचा एक नवीन व्ही.टी.पंप बसविणे. | :- | ३१५३१९७.०० |
| | b) फारोळा रिसायकलिंग पंपगृह येथे दोन नवीन २५ अ.श. क्षमतेचे सबमर्शिबल मड पंप बसविणे. | :- | १४६०४२६.०० |
| | c) ज्युबलीपार्क पंपगृह येथे हनुमान टेकडी येथील संप भरण्यासाठी एक नवीन १०० अ.श. क्षमतेचा व्ही.टी.पंप बसविणे. | :- | ४५०३८३७.०० |
| | d) नारेगाव (एस.एफ.एस.) येथील ७.५ लक्ष लि. क्षमतेच्या संप येथे दोन नवीन १५० अ.श. व्ही.टी. पंप बसविणे. | :- | ५७४२३६९.०० |
| | e) जुना फारोळा (५६ द.ल.ली.) पंपगृह येथील ४७५ अ.श.पंप तीन नग रेट्रोफिटींग करणे व नविन मोटर व स्टार्टर बसविणे. | :- | २२४९१६६०.०० |
| एकुण रक्कम (क) | | | ४०९६१४९६.०० |
| | (ड) पाणी पुरवठा (स्थापत्य) : | | |
| १. | क्रांती चौक येथील अस्तित्वातील ११ लक्ष लि. क्षमतेच्या संपची दुरुस्ती करणे व २० लक्ष लि. क्षमतेचा उंचावरील जलकुंभ भरण्यासाठी व्यवस्था करणे | :- | ३८७३८८४१.०० |
| २. | नारेगाव येथे ७.५ लक्ष लि. क्षमतेचा संप बांधणे | :- | ६४०३९४३.०० |
| ३. | वितरण प्रणालीतील विविध जलकुंभांच्या झडपा बदलण्याकरीता झडपांचा पुरवठा देणे. | :- | १३१६२८६०.०० |
| ४. | गजानन मंदिर चौक ते सुतगिरणी चौक पर्यंत ४०० मि.मी. व्यासाची डी.आय.के. जलवाहिनी टाकणे. | :- | ८७०१५८२.०० |
| ५. | ७०० मीमी व्यासाच्या जलवाहीनीवर सेक्शनींग करीता व्हॉल्व टाकणे व स्कावर व्हॉल्व बसविणे | :- | ४९४३९०२.०० |
| ६. | ७०० व १४०० मीमी व्यासाच्या जलवाहीनीवर टॅपर प्रुफ एअर व्हॉल्व व व्हॉल्वलेस स्लुस व्हॉल्व बसविणे. | :- | ३१४०२८१.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथील गाळणी हौदांच्या फिल्टर मेडीयाची दुरुस्ती करुन वाळूच्या थरांची उंची वाढविणे. | :- | ९८८८७३५.०० |
| एकुण रक्कम (ड) | | | ५०११७१४४.०० |
| | (इ) सभोवतालच्या हवेची गुणवत्ता : | | |
| १. | शहरातील उड्डाणपुलाखाली व प्रमुख पुलांवर व्हर्टीकल गार्डनची उभारणी करणे. | :- | ९९९५८१६.०० |
| २. | मनपाच्या प्रमुख उद्यानातील कारंजाचे नुतनीकरण करुन तीन वर्षे देखभाल दुरुस्ती करणे. | :- | ११९६५६२५.०० |
| ३. | शहरातील मुख्य चौकांमध्ये नविन कारंजाची उभारणी करुन तीन वर्षे देखभाल दुरुस्ती करणे. | :- | ९९९९१०००.०० |
| ४. | औरंगाबाद शहरातील विविध मुख्य रस्त्यावर रस्ता दुभाजक, फुटपाथ बांधणे व दुभाजकांत झाडे लावणे. (३१.६० कि.मी.) | :- | १९९९९६०७९.०० |
| ५. | नाला सफाई साठी आवश्यक मशिनरी खरेदी करणे. | | |
| | a) पोकलेन-१३० (२ नग) | :- | ९६०००००.०० |
| | b) पोकलेन-२० (१ नग) | :- | २३०४०००.०० |
| | c) बॅकहो लोडर (४ नग) | :- | १४६८००००.०० |
| | d) टिप्पर-८.५ घमी क्षमता (३ नग) | :- | ८८२५०००.०० |
| | e) टिप्पर-१४ घमी क्षमता (७ नग) | :- | २४९९००००.०० |
| ६. | रोड स्वीपींग मशिन (दाहा नग). | :- | १९६५००००.०० |
| ७. | विद्युत प्रणालीवर चालणारे वाहन (EV) खरेदी करणे. | :- | १००००००००.०० |
| | एकुण रक्कम (इ) | | २४९८०५८६०.०० |
| एकुण रक्कम (अ,ब,क,ड,इ) | | | ६५९०८७९५७.०० |

१५व्या वित्त आयोगातुन महानगरपालिकेस रुपये ६३,५१,५८,८३४/- इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तथापी उक्त नमुद केलेल्या कामांसाठी रुपये ६५,९०,८७,९५७/- इतक्या निधीची आवश्यकता आहे. म्हणजेच उक्त प्रमाणे सर्व कामे पूर्ण करण्यासाठी रुपये २,३९,२९,१२३/- इतका निधी कमी पडतो. तसेच मा.सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्रमांक एफएफसी-२०२१/प्र.क्र.३४/नवि-०४ दिनांक १४.०७.२०२१ च्या पत्रान्वये हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी (Air Quality Improvement) च्या घटकाकरीता प्राप्त झालेल्या अनुदानातील रु. ४८,४१,२६६/- इतकी रक्कम औरंगाबाद छावणी मंडळास वितरीत करण्याबाबत नमुद करण्यात आलेले आहे. म्हणजेच या रक्कमेसह २,८७,७०,३८९/- इतकी रक्कम कमी पडते. तरीच सदर कामे पूर्ण करण्यासाठी कमी पडणारा निधी रुपये २,८७,७०,३८९/- ची तरतुद महानगरपालिकेच्या आगामी अर्थसंकल्पात करण्यात येईल. प्रस्तावात नमुद कामांच्या निविदा रु. ६५,९०,८७,९५७/- च्या काढण्यात येतील. तथापी प्रत्यक्ष कामाचे कार्यादेश रु. ६३,५१,५८,८३४/- च्या १५व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीच्या मर्यादेत देण्यात येईल. तसेच विद्युत प्रणालीवर चालणारे वाहन खरेदीसाठी स्वतंत्र सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) करण्यात येईल व याबाबी वरील कामांच्या रक्कमेत बचत झाल्यास या बचती मधून सदर वाहन खरेदीचा खर्च भागविण्यात येईल. करीता रुपये ६५,९०,८७,९५७/- च्या कामांना प्रशासकीय मान्यता व निविदा कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

ठराव क्रमांक २०७/२०२१:-

प्रस्तावना नमुद प्रमाणे १५व्या वित्त आयोगातुन वातावरणातील हवेची गुणवत्ता (Air Quality) सुधारण्यासाठी केंद्रशासनाच्या अनुदानातील पहिला व दुसरा हप्ता तसेच व्याज मुद्दला व

व्यवस्थापनात सुधारणा व प्रभावी घनकचरा व्यवस्थापन (For improving conservation, supply and management of water and efficient solid waste management) साठी बंधनकारक अनुदानातील पहिला व दुसरा हप्त्याद्वारे प्राप्त एकत्रित निधी रुपये ६३,७१,७८,८३४/- अंतर्गत प्रस्तावीत रुपये ६४,९०,८७,९६७/- च्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात येते. तसेच सदर कामे पूर्ण करण्यासाठी कमी पडणारा निधी रुपये २,८०,००,२८९/- ची तरतुद महानगरपालिकेच्या आगामी अर्थसंकल्पात करण्यात यावी. प्रस्तावात नमुद कामांच्या निविदा काढण्यात याव्यात, तथापी प्रत्यक्ष कामाचे कार्यादेश रु.६३,७१,७८,८३४/- च्या १५व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीच्या मर्यादेत देण्यात यावेत. विद्युत प्रणालीवर चालणारे वाहन खरेदीसाठी स्वतंत्र सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) करण्यात यावा व यासाठी वरील कामांच्या खर्चात बचत झाल्यास या बचती मधुन सदर वाहन खरेदीचा खर्च भागविण्यात यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक २०८/२०२१:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.१३.१०.२०२१)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेचे कांचनवाडी, गट क्र.०८ येथील कर्मचाऱ्यांसाठी १० निवासस्थाने आहेत. सदरची निवासस्थाने जिर्ण झालेली आहेत व महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी या जागेवर महानगरपालिकेच्या व नागरिकांच्या वाहनांसाठी पेट्रोल व डिझेलचे आऊटलेट पंप उभारणीसाठी या जागेची आवश्यकता आहे.

करीता, या ठिकाणी असलेली निवासस्थाने निष्काषीत करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे नियम ७९(क) नुसार प्रशासकीय प्रस्ताव मंजुरीस्तव सादर. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक २०८/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेचे कांचनवाडी, गट क्र.०८ येथील कर्मचाऱ्यांसाठी १० निवासस्थाने आहेत. सदरची निवासस्थाने जिर्ण झालेली आहेत व महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी या जागेवर महानगरपालिकेच्या व नागरिकांच्या वाहनांसाठी पेट्रोल व डिझेलचे आऊटलेट पंप उभारणीसाठी या जागेची आवश्यकता आहे.

करीता, या ठिकाणी असलेली निवासस्थाने निष्काषीत करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे नियम ७९(क) नुसार प्रशासकीय प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक २०९/२०२१:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.२०.१०.२०२१)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६५, सेव्हनहिल कॉलनी अंतर्गत रस्त्याचे व्हाईटटॉपिंग काँक्रीटीकरण करणे या कामाचे ठेकेदार श्री.प्रभाकर मोहिते यांच्याकडून अंदाजपत्रकीय २१.०१ टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.२३,५८,८३१/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणे बाबत. (टेंडर आयडी क्र.2021-AMCA-703185-1दि.०७.०७.२०२१)

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नाव | कार्यकारी अभियंता (रस्ते) |
| २ | कामाचे स्वरुप | वॉर्ड क्र.६५, सेव्हनहिल कॉलनी अंतर्गत रस्त्याचे व्हाईटटॉपिंग काँक्रीटीकरण करणे |
| ३ | अंदाजपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव | मा.स्थायी समिती सभा विषय क्र.१६८/२०२१ दि.०७.०७.२०२१ र.रु. २९,८६,२५०/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स/निविदा मागविण्यात आली | ₹.२९,८६,२४९.९० |

| | | |
|---|---|---|
| ४ | ज्या धृतपत्रांत निविदेची जाहिरात देण्यात आली होती. त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | महा-ई टेंडर |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | ०९.०७.२०२१ ते २३.०७.२०२१ |
| | ब) टेंडर्स उघडण्याचा दिनांक | २६.०७.२०२१ |
| | क) निविदेची कितवी वेळ होती? | पाच |
| ६ | एकुण किती टेंडर्स आली? | मा.स्थायी समिती मान्यता ठराव क्र.१६८/२०२१ दि.०७.०७.२०२१ र.रु.२९,८६,२५०/- |

(त्यापैकी पात्र टेंडरदाराची माहिती खालीलप्रमाणे)

| अ.क्र. | टक्केवारी | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| १. | मे.अरबाज कन्स्ट्रक्शन | २९८६२४९.९० | २१.०१% कमी दराने |
| २. | श्री.प्रभाकर मोहिते | २९८६२४९.९० | १५.००% कमी दराने |
| ३. | श्री.संतोष रुपचंद्र चव्हाण | २९८६२४९.९० | ६.९९% कमी दराने |
| ४. | मे.गुदगे कन्स्ट्रक्शन | २९८६२४९.९० | ०.९९% कमी दराने |
| ५. | प्रियंका नांदेडर | २९८६२४९.९० | २.५०% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या निविदेची शिफारस करण्यात आली काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या निविदेची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावी. | नवीन कॉक्रीट रस्ते |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे ते नमुद करावे. | होय |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | नाही |
| ९ | सदरचे काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | ---- |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर पान क्रमांक द्यावा) | होय |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषश पत्राचा नमुना जोडला आहे? | होय |

तरी विषयांकीत प्रकरणी पाच निविदा प्राप्त असून त्यापैकी प्रथम निम्न देकार अटी व शर्तीची पुर्तता न केल्याने अपात्र ठरले आहे. द्वितीय निम्न देकार श्री.प्रभाकर मोहिते यांना १५ टक्के कमी दराने निविदा दाखल केली होती. वाटाघाटी अंती कंत्राटदार यांनी प्रथम निम्न देकाराच्या दराने म्हणजेच २१.०१ टक्के कमी दराने काम करण्यास सहमती दिली आहे. अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.०१ टक्के कमी म्हणजेच टेंडर र.७.२३,५८,८३१/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच स्टार रेट नुसार दरातील फरक काढून देयक अदा करणे व करार करणेस मा.स्थायी समिती मान्यता घेणे बाबत सादर.

<u>ठराव क्रमांक २०४/२०२१:-</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६५, रोशनहिल कॉलनी अंतर्गत रस्त्याचे व्हाईटटॉपिंग कॉक्रीटीकरण करणे या कामासाठी प्राप्त निविदा धारक ठेकेदार श्री.प्रभाकर मोहिते यांच्याशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.०१ टक्के कमी

म्हणजेच टेंडर र.रु.२३,५८,८३१/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक २१०/२०२१:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.२१.१०.२०२१)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नवनिर्मित जिल्हा रुग्णालय, चिकलठाणा औरंगाबाद या रुग्णालयास महानगरपालिकेमार्फत ५०० मीमी व्यासाच्या नळ जोडणीद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. संबंधीतांच्या पाण्याची मागणी जास्त असल्यामुळे एन-५ ते रुग्णालयापर्यंत १८०० मीटर लांबीची जलवाहीनी टाकण्याचे रु.१,८७,१६,९७०/- किंमतीचे अंदाजपत्रक सन २०१६-१७ च्या मजिप्रा दरसुचिनुसार तयार करुन सक्षम मान्यतेअंती संबंधीतांना देऊन निधी उपलब्धतेसाठी कळविण्यात आले होते. सदर कामासाठी कार्यकारी अभियंता जागतिक बँक प्रकल्प विभाग औरंगाबाद यांचे मार्फत रु.१,८६,००,०००/- इतका निधी महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे.

दरम्यान दरसुचिमध्ये झालेल्या बदलामुळे याच कामाचे सन २०१९-२० च्या मजिप्रा दरसुचिनुसार रु.२,११,३९,८५७/- ढोबळ किंमतीचे सुधारीत अंदाजपत्रक तयार केले आहे. अनुषंगाने महानगरपालिकेस प्राप्त निधी मधुनच काम करण्याचा प्रस्ताव व अंदाजपत्रक र.रु.२,११,३९,८५७/- मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक २१०/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नवनिर्मित जिल्हा रुग्णालय, चिकलठाणा औरंगाबाद या रुग्णालयास पाणी पुरवठा होण्यासाठी स्वतंत्र पाईप लाईन टाकणे करीता महानगरपालिकेस प्राप्त निधीमधूनच काम करण्याचा प्रस्ताव व अंदाजपत्रक र.रु.२,११,३९,८५७/- मंजुर करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक २११/२०२१:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.२१.१०.२०२१)

प्रशासकीय मान्यतेनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.कन्हैयालाल लक्ष्मण रोत्रे, मजुर, पाणी पुरवठा, झोन क्र.९, महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांच्या स्वतःच्या Covid-19 Positive (कोव्हीड-१९) या आजारावर शासन मान्य खाजगी रुग्णालय मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून एकुण र.रु.२,२७,४९७/- इतका खर्च केलेला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहित नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असून त्यांना Covid-19 Positive (कोव्हीड-१९) या आजारावर उपचारार्थ खालील प्रमाणे खर्च केलेला आहे. त्यानुसार देय नसलेली व शिल्लक रक्कमेचा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | एकुण खर्च | रु.२,२७,४९७/- |
| २. | (-) अनुज्ञेय नसलेली रक्कम | रु.६६,८७३/- |
| ३. | शिल्लक रक्कम (अ.क्र.१-२) | रु.१,६०,६२४/- |
| ४. | ९० टक्के देयक रक्कम (अ.क्र.३ वर) | रु.१,४४,५६१/- |
| ५. | मनपा फंडात ५ टक्के रक्कम (अ.क्र.१ च्या रक्कमेवर) | रु.११,३७४/- |
| ६. | संबंधीतास निव्वळ देय रक्कम (अ.क्र.४-५) | रु.१,३३,१८७/- |

वरील तक्त्याप्रमाणे संबंधीतास निव्वळ देय र.रु.१,३३,१८७/- अदा करावयाची आहे.

संबंधीताने उपचार घेतलेले रुग्णालय मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल, औरंगाबाद हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.२०११/प्र.क्र.३३/११/राकावि-२/मंत्रालय, मुंबई-३२ दि.१६.११.२०२१ अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालयाच्या अद्यावत यादी

दैनिक सभा कार्यालय
प्रस्ताव व ठराव
दि ३०.०९.२०२१ ते दि 31.3.२०२२

दि.१६.११.२०११ पर्यंत मधील प्रसिध्द रुग्णालय यादीत सदरील रुग्णालयाचे नाव समाविष्ट नाही. परंतु Covid-19 Mild to Moderate Illness या शासनमान्य आजारांमध्ये येतो. औरंगाबाद महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेचा विषय क्रमांक ६५/२०२० दि.१०.१२.२०२० च्या ठरावानुसार ठरावात नमुद मुद्दा क्र.२ नुसार उपरोक्त आजारास वैद्यकीय परतावा देता येतो. तसेच उपरोक्त रुग्णालय DCH या प्रकारच्या Facility मध्ये मान्यता प्राप्त यादीत नमुद आहे. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

**ठराव क्रमांक २११/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.कन्हैयालाल लक्ष्मण शेत्रे, मजुर, पाणी पुरवठा, झोन क्र.२, महानगरपालिका औरंगाबाद यांनी Covid-19 Positive (कोव्हीड-१९) या आजारावर केलेला खर्च व त्यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली शिल्लक रक्कम (अ.क्र.१-२) नुसार रु.१,६०,६२४/- च्या ९०% र.रु.१,४४,५६१/- (अक्षरी रु.एक लाख चौरेचाळीस हजार दोनशे अठोतीस मात्र) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक २१२/२०२१:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.२१.१०.२०२१)

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.सी.एम.अभंग, वॉर्ड अधिकारी (सेवानिवृत्त) यांचे स्वतःच्या आजारपणावर (Covid-19 with HRCT 6/25 with HT) घुत हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचारासाठी र.रु.३,११,४३५/- (अक्षरी रु.तीन लाख अकरा हजार चारशे पस्तीस फक्त) इतका खर्च झाला आहे.

महानगरपालिका वैद्यकीय परतावा विनियमामध्ये या आजाराचा आकस्मिक आजार म्हणून समावेश करण्यात आलेला आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय दि.१६.११.२०११ मध्ये परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयांची यादीमध्ये उक्त रुग्णालयाचे नाव समाविष्ट आहे. Covid-19 Mild to Moderate Illness या शासनमान्य आजारांमध्ये येतो. औरंगाबाद महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेच्या विषय क्रमांक ६५/२०२० दि.१०.१२.२०२० च्या अनुषंगाने झालेल्या ठरावानुसार सदर आजारास वैद्यकीय परतावा देता येतो. तसेच उक्त रुग्णालय DCH या प्रकारच्या Facility मध्ये मान्यता प्राप्त यादीत नमुद आहे.

श्री.सी.एन.अभंग, वॉर्ड अधिकारी (सेवानिवृत्त) यांना उक्त आजारापणावर उपचार घेण्यासाठी रु.२,५०,०००/- (अक्षरी रु.दोन लाख पन्नास हजार मात्र) अग्रीम मंजुर करण्यात आले असून सदर अग्रीम घुत हॉस्पीटल, औरंगाबाद यांना अदा करण्यात आलेली आहे.

संबंधीताच्या आजारपणावर रु.३,११,४३५/- एवढा वैद्यकीय खर्च झालेला आहे. त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.२,८३,९९१/- एवढी असून सदर रकमेच्या ९०% र.रु.२,५५,५९१/- (अक्षरी रु.दोन लाख पंचावन्न हजार पाचशे एक्याण्णव फक्त) पैकी ५% र.रु.१५,५७१/- (अक्षरी रु.पंधरा हजार पाचशे एकाहत्तर फक्त) (एकुण सादर केलेले देयक र.रु.३,११,४३५/- च्या ५% प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरित र.रु.२,४०,०२०/- (अक्षरी रु.दोन लाख चाळीस हजार वीस फक्त) रक्कम देय आहे.

करीता, श्री.सी.एम.अभंग, वॉर्ड अधिकारी (सेवानिवृत्त) यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.२,८३,९९१/- च्या ९०% र.रु.२,५५,५९१/- (अक्षरी रु.दोन लाख पंचावन्न हजार पाचशे एक्याण्णव

फक्त) या वैद्यकीय खर्चास मान्यता देऊन अग्रीम रकमेचे समायोजन करण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक २१२/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.सी.एम.अभंग, वॉर्ड अधिकारी (सेवानिवृत्त) यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.२,८३,९९०/- च्या ९०% र.रु.२,५५,५९१/- (अक्षरी रु.दोन लाख पंचावन्न हजार पाचशे एक्याण्णव फक्त) या वैद्यकीय खर्चास मान्यता देऊन अग्रीम रकमेचे समायोजन करण्याबाबत मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक २१३/२०२१:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.२८.१०.२०२१)

प्रशासकीय मान्यतेनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.दगडु गंगा पगारे, ड्रेसर आरोग्य केंद्र, चिकलठाणा, आरोग्य विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांनी स्वतःच्या Diabetes Mellitus Hypertentsion CKD च्या आजारावर उपचारासाठी खाजगी रुग्णालय, कमलनयन बजाज हॉस्पीटल, बीड बायपास रोड, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून र.रु.३,०५,०५०/- (तीन लाख पाच हजार पन्नास रुपये फक्त) इतका खर्च केला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहीत नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असून Diabetes Mellitus Hypertentsion CKD या आजारावर उपचारार्थ एकूण केलेला खर्च र.रु.३,०५,०५०/- इतका झाला असून त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.९०,३४१/- वजा जाता र.रु.२,१४,७०९/- शिल्लक राहते. शिल्लक रक्कमेच्या ९०% रु.१,९३,२३८/- इतकी होते. एकूण खर्चाच्या ५% र.रु.१५,२५२/- ही मनपा फंडात जमा करून मंजुर देय र.रु.१,७७,९८६/- संबंधीतास अदा करावयाची आहे.

संबंधीताने कमलनयन बजाज हॉस्पीटल, बीड बायपास रोड, येथे उपचार घेतलेले आहे. महाराष्ट्र शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.वैखप्र-२०११/प्र.क्र.३३/११/राकावि-२, मंत्रालय मुंबई-३२ दि.१६-११.२०११ नुसार परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या Diabetes Mellitus Hypertentsion CKD या आजारावर केलेल्या विशिष्ट खर्चापरील शासकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेली आहे. खाजगी रुग्णालयाची अद्यावत यादी दि.१६-११.२०११ पर्यंत नमील प्रसिध्द यादीमध्ये सदर रुग्णालयाचे नाव नमुद आहे. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करून वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

करीता, श्री.दगडु गंगा पगारे, ड्रेसर, आरोग्य केंद्र चिकलठाणा आरोग्य विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या रु.१,७७,९८६/- संबंधीताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव क्रमांक २१३/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.दगडु गंगा पगारे, ड्रेसर, आरोग्य विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांनी स्वतःच्या Diabetes Mellitus Hypertentsion CKD या आजारावर खाजगी रुग्णालय, कमलनयन बजाज हॉस्पीटल, बीड बायपास रोड, औरंगाबाद येथे उपचार घेतलेला आहे. नियमाप्रमाणे एकूण र.रु.१,७७,९८६/- खर्च अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. सदर रक्कम संबंधीतास अदा करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

प्रशासक यांचा कार्यकाळ
प्रस्ताव व ठराव
दि.१०.०१.२०२१ ते दि. 31 .3 २०२४

**प्रस्ताव क्रमांक २१४/२०२१:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.०९.११.२०२१)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाची अधिसूचना क्र.एमयुएम-२०१२/प्र.क्र.२०९/नवि १७. दि.२८.८.२०१४ नुसार औरंगाबाद जिल्ह्यातील सातारा-देवळाई या महसूली गावांची सातारा-देवळाई नगरपरिषद या नावाने नगरपरिषद स्थापन केली आहे.

तसेच महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांची अधिसुचना क्र.औमपा/२०१५/प्र.क्र.१२ नवि-२४,मुंबई ३२ दि.१४.०५.२०१५ व महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांची अधिसूचना क्र. एमयुएम-२०१५/प्र.क्र.३५५/नवि-१७,मंत्रालय,मुंबई-३२. दि.१८.०७.२०१६ नुसार औरंगाबाद महानगर पालिकेच्या हद्दीत वाढ करुन सातारा-देवळाई नगरपरिषदेच्या संपूर्ण स्थानिक क्षेत्राचा समावेश औरंगाबाद महानगरपालिकेत करण्यात आलेला आहे.

दि.१०.०८.२०१६ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.५४० नुसार सातारा-देवळाई ग्रामपंचायत पासून कार्यरत असलेल्या विविध संवर्गातील एकूण ४२ कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सामावून घेण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यामध्ये सध्या कार्यरत असलेल्या पदावर व मिळत असलेल्या वेतनावर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सामावून घेण्याबाबत ठराव पारीत करण्यात आला. (त्यात पुर्वाश्रमीच्या ग्रामपंचायत कालावधीतील ३४ कर्मचारी व ०८ रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.)

कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/२०१७/११८२ दि.०८.०५.२०१७ अन्वये सातारा-देवळाई ग्रामपंचायत कार्यालयातील विविध संवर्गातील एकूण ४२ पैकी ३४ कर्मचाऱ्यांना प्रचलित वेतनावर व ०८ कर्मचाऱ्यांना दैनिक वेतनावर औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर दि.२२.०७.२०१६ पासून सामावून घेण्यात आले.

तथापि,दि.१५.११.२०१७ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेतील झालेल्या निर्णयानुसार सदर कर्मचाऱ्यांच्या समावेशनाच्या प्रकरणात चौकशी समिती गठीत करुन चौकशी करण्याबाबत निर्णय झाला व त्यानुसार चौकशी समिती गठीत करण्यात आली होती.

चौकशी समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार सातारा-देवळाई ग्रामपंचायतीमधील पदे समाविष्ट करण्यापूर्वी महानगरपालिका औरंगाबाद भरतीचे नियम हे सातारा-देवळाईसाठीही लागू होतात, रितसर पदावर समाविष्ट करण्यापूर्वी शासनाची मंजूरी घेणे आवश्यक होती, ती मंजूरी घेण्यात आलेली नाही,असे नमूद केले आहे.

त्याअनुषंगाने कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०१९/३९८, दि.२२.०३.२०१९ अन्वये दि.०८.०५.२०१७ रोजीचे आदेश रद्द करुन संबंधित कर्मचाऱ्यांना दि.१०.०८.२०१६ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.५४० नुसार समावेशनाच्यावेळी मिळत असलेले वेतन अदा करण्यात यावे,असे आदेशित करण्यात आले.

सदर आदेशाच्याविरुध्द संबंधित कर्मचाऱ्यांनी मा.औद्योगिक न्यायालय, औरंगाबाद येथे Complaint ULP No.३९/२०१९ दाखल केली असता.मा.न्यायालयाने दि.२२.०३.२०१९ रोजीच्या आदेशास स्थगिती दिली आहे.

यापूर्वी दि.२०.०१.२०१५ व दि.३१.०३.२०१५ रोजीच्या पत्रान्वये मा.उपसंचालक,नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई यांनी मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांना तत्कालीन सातारा-देवळाई ग्रामपंचायत काळापासून सातत्याने कार्यरत असलेल्या (सेवा खंडीत न होता) कर्मचाऱ्यांचे सातारा-देवळाई नगरपरिषदेमध्ये समावेशन करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार दि.२७.०३.२०१५ व दि.०४.०४.२०१५ च्या पत्रान्वये तत्कालीन मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी कर्मचारी समावेशनाचा प्रस्ताव मा.उपसंचालक,नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडे सादर केला होता.

नगर विकास विभागाचे शासन निर्णय क्र.औमपा-२०१५/प्र.क्र.२१०/(भाग-१)/नवि-२४, दि.१५.०२.२०२१ अन्वये शासनाने औरंगाबाद महानगरपालिकेतील विभागांकरिता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या पदांच्या आकृतीबंधास मान्यता दिली आहे.

दि.१८/१/२०१६ पासून सातारा-देवळाई नगरपरिषदेचा औरंगाबाद महानगरपालिकेत झालेला समावेश,संबंधित कर्मचाऱ्यांनी केलेली विनंती व कर्मचाऱ्यांच्या समावेशनासंदर्भात शासनाची मान्यता घेणेबाबत चौकशी समितीने दिलेला अहवाल या सर्व बाबींचा विचार करता,सदर कर्मचाऱ्यांना औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सामावून घेणे आवश्यक आहे.
करिता सातारा-देवळाई नगरपरिषदेच्या उद्घोषणेपूर्वीच्या तत्कालीन ग्रामपंचायतमध्ये कार्यरत असलेल्या संबंधित कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार,आवश्यक त्याठिकाणी वयाची शिथिलता देऊन औरंगाबाद महानगरपालिका आस्थापनेवरील संबंधित पदाच्या प्रचलित वेतनावर दि.२२.०१.२०१६ पासून समावेशनास शासन मान्यता घेण्या बाबत तसेच शासन मान्यता मिळाल्यानंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५४(१) मधील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. यबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

<u>ठराव क्रमांक २१४/२०२१:-</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाची अधिसूचना क्र.एमयुएम-२०१३/प्र.क्र.२०९/नवि-१७, दि.२८.०८.२०१४ नुसार औरंगाबाद जिल्ह्यातील सातारा-देवळाई या महसुली गावांची सातारा-देवळाई नगरपरिषद या नावाने नगरपरिषद स्थापन केली आहे.

तसेच महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांची अधिसूचना क्र.औमपा/२०१५/प्र.क्र.१२ नवि-२४,मुंबई-३२ दि.१४.०७.२०१५ व महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांची अधिसूचना क्र. एमयुएम-२०१५/प्र.क्र.३५५/नवि-१७,मंत्रालय,मुंबई-३२. दि.१८.०१.२०१६ नुसार औरंगाबाद महानगर पालिकेच्या हद्दीत वाढ करून सातारा-देवळाई नगरपरिषदेच्या संपूर्ण स्थानिक क्षेत्राचा समावेश औरंगाबाद महानगरपालिकेत करण्यात आलेला आहे.

दि.१०.०८.२०१६ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.५४० नुसार सातारा-देवळाई ग्रामपंचायत पासून कार्यरत असलेल्या विविध संवर्गातील एकुण ४२ कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सामावून घेण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यामध्ये सध्या कार्यरत असलेल्या पदावर व सेत असलेल्या वेतनावर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सामावून घेण्याबाबत ठराव पारीत करण्यात आला. (त्यात पुर्वाश्रमीच्या ग्रामपंचायत काळातील ३४ कर्मचारी व ०८ रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.)

कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/२०१७/११८२, दि.०८.०९.२०१७ अन्वये सातारा-देवळाई ग्रामपंचायत कार्यालयतील विविध संवर्गातील एकुण ४२ पैकी ३४ कर्मचाऱ्यांना प्रचलित वेतनावर व ०८ कर्मचाऱ्यांना दैनिक वेतनावर औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर दि.२२.०१.२०१६ पासून सामावून घेण्यात आले.

तथापि,दि.१७.११.२०१७ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेतील झालेल्या निर्णयानुसार सदर कर्मचाऱ्यांच्या समावेशनाच्या प्रकरणात चौकशी समिती गठीत करून चौकशी करण्याबाबत निर्णय झाला व त्यानुसार चौकशी समिती गठीत करण्यात आली होती.

चौकशी समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार सातारा-देवळाई ग्रामपंचायती मधील पदे समाविष्ट करण्यापूर्वी महानगरपालिका औरंगाबाद भरतीचे नियम हे सातारा-देवळाईसाठीही लागू होतात, शिवाय पदावर समाविष्ट करण्यापूर्वी शासनाची मंजूरी घेणे आवश्यक होती, ती मंजूरी घेण्यात आलेली नाही,असे नमूद केले आहे.

त्याअनुषंगाने कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०१९/३९६, दि.२२.०३.२०१९ अन्वये दि.०८.०९.२०१७ रोजीचे आदेश रद्द करून संबंधित कर्मचाऱ्यांना दि.१०/८/२०१६ रोजी संपन्न झालेल्या

मा.सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.७४० नुसार समावेशनावेळी देय असलेले वेतन अदा करण्यात यावे,असे आदेशित करण्यात आले.

सदर आदेशाच्याविरुध्द संबंधित कर्मचाऱ्यांनी मा.औद्योगिक न्यायालय,औरंगाबाद येथे Complaint ULP No.३९/२०१९ दाखल केली असता,मा.न्यायालयाने दि.२२.०३.२०१९ रोजीच्या आदेशास स्थगिती दिली आहे.

तत्पूर्वी दि.२०.०१.२०१५ व दि.३१.०३.२०१५ रोजीच्या पत्रान्वये मा.उपसंचालक,नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई यांनी मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांना तत्कालीन सातारा-देवळाई ग्रामपंचायत काळापासून सातत्याने कार्यरत असलेल्या (सेवा खंडीत न होता) कर्मचाऱ्यांचे सातारा-देवळाई नगरपरिषदेमध्ये समावेशन करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार दि.२३.०३.२०१५ व दि.०४.०४.२०१५ च्या पत्रान्वये तत्कालीन मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी कर्मचारी समावेशनाचा प्रस्ताव मा.उपसंचालक,नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडे सादर केला होता.

नगर विकास विभागाचे शासन निर्णय क्र.औमपा-२०१५/प्र.क्र.२१०/(भाग-१)/नवि-२४, दि.१५.०२.२०२० अन्वये शासनाने औरंगाबाद महानगरपालिकेतील विभागांकरिता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या पदांच्या आकृतीबंधास मान्यता दिली आहे.

दि.२८.०१.२०१६ पासून सातारा-देवळाई नगरपरिषदेचा औरंगाबाद महानगरपालिकेत झालेला समावेश, संबंधित कर्मचाऱ्यांनी केलेली विनंती व कर्मचाऱ्यांच्या समावेशनासंदर्भात शासनाची मान्यता घेणेबाबत चौकशी समितीने दिलेला अहवाल या सर्व बाबींचा विचार करता,सदर कर्मचाऱ्यांना औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सामावून घेणे आवश्यक आहे.

करिता सातारा-देवळाई नगरपरिषदेच्या उद्घोषणेपूर्वीच्या तत्कालीन ग्रामपंचायतमध्ये कार्यरत असलेल्या संबंधित कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार,आवश्यक त्याठिकाणी त्याची शिथिलता देऊन औरंगाबाद महानगरपालिका आस्थापनेवरील संबंधित पदाच्या प्रचलित वेतनावर दि.२८/१/२०१६ पासून समावेशनास शासन मान्यता घेण्याबाबत मंजुरी देण्यात येते. शासन मान्यता मिळाल्यानंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७४(१) मधील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक २१५/२०२१:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि१५.११.२०२१)

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका औरंगाबादची स्थापना सन-१९८२ मध्ये झालेली आहे. स्थापना झाली त्यावेळेस औरंगाबाद शहराची लोकसंख्या ३,८६,००० एवढी होती. विद्यमान वर्षामध्ये औरंगाबाद शहराची लोकसंख्या अंदाजे १९ लक्ष आहे. त्याचप्रमाणे शहराचे मुळ कार्यक्षेत्र १३७ चौ.किलोमीटर होते. या क्षेत्रात वाढ होऊन १८७ चौ.किलोमीटर झालेले आहे. शासन निर्णय दि.१५ फेब्रुवारी २०१५ मधील निर्णयानुसार सुधारित आकृतीबंध मंजुर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये नगर रचनाकार ०१ पद मंजुर करण्यात आले आहे. दि.०१.०९.२०२१ रोजी औरंगाबाद महानगरपालिकेसाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या सेवाप्रवेश नियम शासन राजपत्रात नगर रचनाकार हे पद १००% प्रतिनियुक्तीने भरण्याची तरतुद आहे व सद्यस्थितीत सदर पद रिक्त आहे. नगर रचनाकार या रिक्त पदावर प्रतिनियुक्तीने अधिकारी पाठविणेबाबत शासनास दि.२१.०६.२०२१ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे.

महानगरपालिका अंतर्गत नगर रचना विभाग हा अत्यंत महत्त्वाचा व महानगरपालिकेसाठी मोठ्या प्रमाणावर महसुल उपलब्ध करुन देणारा विभाग असून या विभागास शासन मंजुर विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतुदीनुसार विकास परवानगी देणे ही तसेच तांत्रिक व कायदेशीर दृष्टीने महत्वाची भूसंपादनाची व विकास योजना अंमलबजावणीची कामे पार पाडत असल्याने नागरीकांच्या

तक्रारीचे निराकरण करणे इ.महत्त्वाची कामे या विभागाकडून राबविण्यात येतात. भारतीय राज्य घटनेतील अनुसूची १२ मध्ये नमुद स्थानिक स्वराज्य संस्था कार्यालयापैकी बहुतांशी कर्तव्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही नगर रचना विभागाची आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे महत्त्वपुर्ण आणि महत्त्वाकांक्षी प्रकल्प पुर्ण करण्यासाठी सक्षम तांत्रिक अधिकारी असणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत कामे पार पाडण्याची जबाबदारी उपलब्ध तांत्रिक कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त स्वरुपात पदभार सोपवून काम करुन घेण्यात येत आहे. पर्यायाने या अतिरिक्त पदभाराचा ताण संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांच्या वर निर्माण होत आहे.

तांत्रिक बाबीच्या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिकेअंतर्गत असलेल्या कामाचे स्वरुप पाहता उदा.:औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे विकास योजनेची जुनी हद्द व वाढीव हद्द यांच्या विकास योजना सुधारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामासाठी शासनाने विकास योजना विशेष घटकाची नेमणुक केली आहे. तसेच महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम-२००१ मध्ये सुधारणा होऊन गुंठेवारी सुधारणा अधिनियम-२०२१ अंमलात आला आहे. गुंठेवारी सुधारणा अधिनियमाचा मुळ प्रस्ताव औरंगाबाद महानगरपालिकेने शासनास सादर केला असून या प्रस्तावात मसूदा व कायदेशीर तसेच तांत्रिक बाबींचा समावेश आहे. सदर योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील जाणकार आणि अनुभवी तांत्रिक अधिकाऱ्यांची फळी अत्यंत आवश्यक आहे.

सद्यस्थितीत गुंठेवारी अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणी श्री.जयंत खरवडकर, नगर रचनाकार तथा प्र.उपसंचालक (नगर रचना) यांनी केली असून महानगरपालिकेच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. तसेच विकास योजनेसाठी विशेष घटकाला सहाय्य करण्यासाठी श्री.जयंत खरवडकर यांचा नगर रचना विभागातील कामाचा अनुभव प्रभावी ठरेल. श्री.जयंत खरवडकर यांची शैक्षणिक अर्हता डी.सी.ई., बी.टेक.(सिव्हील), ए.आय.ई.,एम.आर.सी.ई.(आय), एल.एल.बी. अशी आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (१) मध्ये पुढीलप्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे. महानगरपालिकेचा जो अधिकारी सहायक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे.- मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत-त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित असेल.

परंतु, आयुक्ताला (महानगरपालिकेचा सहायक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या) कर्जविषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्वमंजुरीने या अटींवर करता येतील की, आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करतांना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरीवाचून अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

तरी, उपरोक्त सर्व परिस्थिती पाहता, श्री.जयंत खरवडकर, नगर रचनाकार तथा प्र.उपसंचालक (नगर रचना) (सेवानिवृत्त) हे दि.३१.१०.२०२१ रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त झाल्याने त्यांना नगर रचनाकार या पदावर ०६ महिन्यांसाठी नेमणूक देणे आवश्यक आहे.

संबंधितांना दरमहा सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेले एकुण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकुण निवृत्ती वेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतन सह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल.

प्रशासक यांचा कार्यालय
प्रस्ताव व ठराव
दि.३० ०१.२०२१ ते दि. ३१ . ३ .२०२२.

करीता, श्री.जयंत खरवडकर, नगर रचनाकार तथा प्र.उपसंचालक (सेवानिवृत्त) यांना नगर रचनाकार या पदावर ०६ महिन्यांसाठी नेमणूक देणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

ठराव क्रमांक २१५/२०२१:-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका औरंगाबादची स्थापना सन-१९८२ मध्ये झालेली आहे. स्थापना झाली त्यावेळेस औरंगाबाद शहराची लोकसंख्या ३,८६,००० एवढी होती. विद्यमान वर्षामध्ये औरंगाबाद शहराची लोकसंख्या अंदाजे १९ लक्ष आहे. त्याचप्रमाणे शहराचे मुळ कार्यक्षेत्र ५७ चौ.किलोमीटर होते. या क्षेत्रात वाढ होऊन १८७ चौ.किलोमीटर झालेले आहे. शासन निर्णय दि.११ फेब्रुवारी २०२१ मधील निर्णयानुसार सुधारित आकृतीबंध मंजुर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये नगर रचनाकार ०१ पद मंजुर करण्यात आले आहे. दि.०१.०९.२०२१ रोजी औरंगाबाद महानगरपालिकेसाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या सेवाप्रवेश नियम शासन राजपत्रात नगर रचनाकार हे पद १००% प्रतिनियुक्तीने भरण्याची तरतुद आहे व सद्यस्थितील सदर पद रिक्त आहे. नगर रचनाकार या रिक्त पदावर प्रतिनियुक्तीने अधिकारी पाठविणेबाबत शासनास दि.२५.०६.२०२१ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे.

महानगरपालिका अंतर्गत नगर रचना विभाग हा अत्यंत महत्वाचा व महानगरपालिकेसाठी मोठ्या प्रमाणावर महसुल उपलब्ध करून देणारा विभाग असुन या विभागात शासन मंजुर विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतुदीनुसार विकास परवानगी देणे ही तसेच तांत्रिक व कायदेशीर दृष्टीने महत्वाची भुसंपादनाची व विकास योजना अंमलबजावणीची कामे पार पडत असल्याने नागरीकांच्या तक्रारीचे निराकरण करणे इ.महत्वाची कामे या विभागाकडून राबविण्यात येतात. भारतीय राज्य घटनेतील अनुसूची १२ मध्ये नमुद स्थानिक स्वराज्य संस्था कार्यालयापैकी बहुतांशी कर्तव्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही नगर रचना विभागाची आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे महत्वपुर्ण आणि महत्वाकांक्षी प्रकल्प पुर्ण करण्यासाठी सक्षम तांत्रिक अधिकारी असणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत कामे पार पाडण्याची जबाबदारी उपलब्ध तांत्रिक कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त स्वरुपात पदभार सोपवून काम करून घेण्यात येत आहे. पर्यायाने या अतिरिक्त पदभाराचा ताण संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांच्या वर निर्माण होत आहे.

तांत्रिक बाबीच्या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिके अंतर्गत असलेल्या कामचे स्वरुप पाहता उदा.:औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे विकास योजनेची जुनी हद्द व वाढीव हद्द यांच्या विकास योजना सुधारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामासाठी शासनाने विकास योजना विशेष घटकाची नेमणूक केली आहे. तसेच महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम-२००१ मध्ये सुधारणा होऊन गुंठेवारी सुधारणा अधिनियम-२०२१ अस्तित्वात आला आहे. गुंठेवारी सुधारणा अधिनियमाचा मुळ प्रस्ताव औरंगाबाद महानगरपालिकेने शासनास सादर केला असून या प्रस्तावात मसुदा व कायदेशीर तसेच तांत्रिक बाबींचा समावेश आहे. सदर योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील जाणकार आणि अनुभवी तांत्रिक अधिकाऱ्यांची फळी अत्यंत आवश्यक आहे.

सद्यस्थितीत गुंठेवारी अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणी श्री.जयंत खरवडकर, नगर रचनाकार तथा प्र.उपसंचालक (नगररचना) यांनी केली असून महानगरपालिकेच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. तसेच विकास योजनेसाठी विशेष घटकाला सहाय्य करण्यासाठी श्री.जयंत

खरवडकर यांचा नगर रचना विभागातील कामाचा अनुभव प्रभावी ठरेल. श्री.जयंत खरवडकर यांची शैक्षणिक अर्हता डी.सी.ई., बी.टेक.(सिव्हील), ए.आय.ई.,एम.आय.सी.ई.(आय), एल.एल.बी. अशी आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (१) मध्ये पुढीलप्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे- महानगरपालिकेचा जो अधिकारी सहायक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे.- मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत-त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित असेल.

परंतु, आयुक्ताला (महानगरपालिकेचा सहायक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या) कर्जविषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्वमंजुरीने या अटीवर करता येतील की, आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करतांना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरीवाचून अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

तरी. उपरोक्त सर्व परिस्थिती पाहता, श्री.जयंत खरवडकर, नगर रचनाकार तथा प्र.उपसंचालक (नगर रचना) (सेवानिवृत्त) हे दि.३१.१०.२०२१ रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त झाल्याने त्यांना नगर रचनाकार या पदावर ०६ महिन्यांसाठी नेमणूक देणे आवश्यक आहे.

संबंधीतांना दरमहा सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेल्या एकुण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता वरुन) त्यांना आता मिळत असलेले एकुण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्ती वेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल.

तसेच महानगरपालिका क्षेत्रातील नगर रचना विभागाशी संबंधीत कामे/महत्वाकांक्षी प्रकल्प पुर्ण करण्यासाठी अनुभवी अधिकाऱ्यांची उणीव भासु नये, याकरीता प्रस्तावात दर्शविलेल्या वेतनावर व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील उक्त कलम ५३(१) विचारात घेऊन श्री.जयंत खरवडकर, नगर रचनाकार तथा प्र.उपसंचालक नगर रचना (सेवानिवृत्त) यांना सहा महिन्यांसाठी नगर रचनाकार या पदावर नेमणुक देणेसाठी शासन मान्यतेच्या अधिन राहून मान्यता देण्यात येते. याबाबतचा प्रस्ताव शासनास मान्यतेस्तव पाठविण्यात यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

(प्रशासकीय प्रस्ताव दि.११.११.२०२१)

<u>प्रस्ताव क्रमांक २१६/२०२१:-</u>

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.संतोष पुंडलिक सुरे, कनिष्ठ लिपीक यांचा निलंबन काळ दि.२२.०९.२०१२ ते दि.२७.०९.२०१६ हा कार्यालयीन आदेश दि.२८.०६.२०१९ अन्वये विनापगारी रजा म्हणून धरण्यात आला होता. महाराष्ट्र नागरी सेवा(शिस्त व अपील) नियम १९७९ प्रकरण पाच मधील नियम १७(फ) मधील तरतुदीनुसार सदरच्या आदेशाविरुध्द मा.प्रशासक तथा मा.स्थायी समिती (अपिलीय प्राधिकारी) यांचेकडे अपिल सादर केले. मा.प्रशासक यांनी संबंधितांना अपील सादर करण्यास झालेला विलंब क्षमापित करुन अपील स्विकारलेले आहे.

संबंधितांनी सादर केलेल्या अपिलामध्ये नमुद केले की, ते त्र्यंबकेश्वर न्यायालयांतर्गत हर्सुल [illegible] येथे कार्यरत असतांना त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल झाल्याप्रकरणी दि.२८.०९.२०१२ रोजीच्या आदेशानुसार दि.२२.०९.२०१२ पासून निलंबीत करण्यात आले होते. या प्रकरणी मा.न्यायालयात खटला दाखल होऊन सेशन कोर्ट केस नं.२४९/२०१३ मध्ये दि.२४.११.२०१५ रोजी निर्दोष मुक्त केले. मा.न्यायालयाने निर्दोष मुक्त केल्यानंतर देखील प्रशासनाने सुमारे १० महिने उशिरा म्हणजेच दि.२७.०९.२०१६ रोजीच्या आदेशानुसार कामावर रुजू घेण्यात आले. कामावर रुजू झाल्यानंतर निलंबन

काळ हा सेवाकाळ गृहीत धरणेबाबत वेळोवेळी अर्ज सादर केले. निलंबन काळ हा दोन वर्षापेक्षा जास्त कालावधीचा असल्याने तत्कालीन मा.आयुक्तांनी सदर कालावधी सर्व प्रयोजनार्थ कर्तव्य कालावधी म्हणून गृहीत धरुन या कालावधीतील वेतन व भत्ते अदा करण्यास शासनाची मान्यता मिळावी म्हणून दि.१४.०९.२०१८ रोजी शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता. या अनुषंगाने शासनाचे पत्र दि.१५.०२.२०१९ नुसार मा.आयुक्तांच्या स्तरावर कार्यवाही करणेबाबत कळविले. शासनाने याप्रमाणे कळविल्यानंतर निलंबन काळ हा सेवाकाळ धरणे आवश्यक होते. परंतु दि.२८.०६.२०१९ रोजीच्या आदेशानुसार सदरचा निलंबन काळ हा विनापगारी रजा म्हणून ग्राह्य धरण्यात आलेला आहे. ही बाब अत्यंत अन्याय करणारी आहे. कारण प्रशासनानेच निलंबन काळ सर्व प्रयोजनार्थ कर्तव्य कालावधी म्हणून गृहीत धरुन या कालावधीतील वेतन व भत्ते अदा करण्यास शासनाची मान्यता मिळावी म्हणून शिफारस केली होती. सदर अन्यायकारक निर्णयामुळे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यांची मा.न्यायालयाने निर्दोष सुटका केलेली असल्याने अपील मान्य करण्यात येऊन निलंबन काळ दि.२२.०९.२०१२ ते दि.२७/०९/२०१६ हा सर्व प्रयोजनार्थ कर्तव्य कालावधी म्हणून गृहीत धरुन या कालावधीतील वेतन व भत्ते अदा करण्यास मान्यता देण्यात यावी, अशी विनंती अपिलाद्वारे केली आहे.

करीता श्री.संतोष पुंडलिक सुरे, कनिष्ठ लिपीक यांचा निलंबन काळ दि.२२.०९.२०१२ ते दि.२७.०९.२०१६ हा सर्व प्रयोजनार्थ कर्तव्य कालावधी म्हणून गृहीत धरुन या कालावधीतील वेतन व भत्ते अदा करणेस मान्यता देणेबाबत प्रस्ताव मा.प्रशासक यांचेकडे (स्थायी समिती) मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक २१६/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.संतोष पुंडलिक सुरे, कनिष्ठ लिपीक यांचे अपील मान्य करण्यात येत असून त्यांचा निलंबन काळ दि.२२.०९.२०१२ ते दि.२७.०९.२०१६ हा सर्व प्रयोजनार्थ कर्तव्य कालावधी म्हणून गृहीत धरुन या कालावधीतील वेतन व भत्ते अदा करणेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक २१७/२०२१:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.१६.११.२०२१)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/२०२१/६१३, दि.१९.०४.२०२१ अन्वये "औरंगाबाद महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्यान प्राणीसंग्रहालयातील वन्य प्राण्यांची निगा/देखभाल व औषधोपचार करण्यासाठी सल्लागार म्हणून काम करणे" या विवक्षित कामाकरीता डॉ.भागवत सोपानराव नाईकवाडे,मुख्य पशुसंवर्धन अधिकारी (सेवानिवृत्त) यांची सेवा विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रथमतः ०६ महिन्यांच्या कालावधीकरीता करार पध्दतीने,सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मूळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रकमेची कमाल मासिक मर्यादा रु.४०,०००/- (रुपये चाळीस हजार) इतक्या मर्यादित राहील,या अटीवर घेण्यात आलेली आहे.

तथापि उक्त आदेशानुसार सदरची मुदत ही दि.१८.१०.२०२१ रोजी संपत असून विभाग प्रमुख तथा उपआयुक्त यांनी पशुसंवर्धन व प्राणीसंग्रहालय विभाग यांनी प्राणीसंग्रहालयातील वन्यप्राण्यांची निगा,देखभाल व औषधोपचार इ. साठी डॉ.भागवत सोपानराव नाईकवाडे, मुख्य पशुसंवर्धन अधिकारी तथा संचालक,प्राणी संग्रहालय (सेवानिवृत्त) यांना ०६ महिन्याची मुदतवाढ मिळण्यासाठी अभिप्राय दिलेला असून त्यांच्या सेवेची कार्यालयास आवश्यकता आहे.

करिता डॉ.भागवत सोपानराव नाईकवाडे,मुख्य पशुसंवर्धन अधिकारी तथा संचालक,प्राणी संग्रहालय (सेवानिवृत्त) यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देवून दि.२२.१०.२०२१ पासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी दि.११.०४.२०२१ च्या आदेशात नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक २१७/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/२०२१/६१३, दि.१९.०४.२०२१ अन्वये ''औरंगाबाद महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्यान प्राणीसंग्रहालयातील वन्य प्राण्यांची निगा/देखभाल व औषधोपचार करण्यासाठी सल्लागार म्हणून काम करणे'' या विवक्षित कामाकरीता डॉ.भागवत सोपानराव नाईकवाडे,मुख्य पशुसंवर्धन अधिकारी (सेवानिवृत्त) यांची सेवा विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रथमतः०६ महिन्याच्या कालावधीकरीता करार पध्दतीने,सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मूळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकुण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रकमेची कमाल मासिक मर्यादा रु.४०,०००/- (रुपये चाळीस हजार) इतक्या मर्यादेत राहील,या अटीवर घेण्यात आलेली आहे.

तथापि उक्त आदेशानुसार सदरची मुदत ही दि.१८.१०.२०२१ रोजी संपत असून विभाग प्रमुख तथा उपआयुक्त यांनी पशुसंवर्धन व प्राणीसंग्रहालय विभाग यांनी प्राणीसंग्रहालयातील वन्यप्राण्यांची निगा,देखभाल व औषधोपचार इ. साठी डॉ.भागवत सोपानराव नाईकवाडे, मुख्य पशुसंवर्धन अधिकारी तथा संचालक,प्राणी संग्रहालय (सेवानिवृत्त) यांना ०६ महिन्याची मुदतवाढ मिळण्यासाठी अभिप्राय दिलेला असून त्यांच्या सेवेची कार्यालयास आवश्यकता आहे.

करिता डॉ.भागवत सोपानराव नाईकवाडे,मुख्य पशुसंवर्धन अधिकारी तथा संचालक,प्राणी संग्रहालय (सेवानिवृत्त) यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.२२.१०.२०२१ पासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी दि.११.०४.२०२१ च्या आदेशात नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक २१८/२०२१:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.१६.११.२०२१)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.यमाजी शिंदे, शांतीलाल शिंदे, हिरामण शिंदे आणि त्यांचे नोंदणीकृत आममुख्यत्यार व विकासक सिमर प्राईड व्हेंचर्स एल.एल.पी.तर्फे श्री.नितीन वेणुप्रसाद बगडिया, साई ट्रेड सेंटर, स्टेशन रोड, औरंगाबाद यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार गट क्र.७०८,मौ.चिकलठाणा येथील त्यांच्या जागेतून जाणाऱ्या महानगरपालिकेच्या २४ व १२ मीटर रुंद विकास योजना रस्त्याचा विकास स्वखर्चाने करणे बाबत मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.१३३१ दि.१६.१०.२०१७ अन्वये ठराव पारित झालेला आहे. पारीत झालेल्या ठरावानुसार विकास योजना रस्त्यातील खालील रस्ते राष्ट्रीय मानकानुसार विकसीत करणे, रस्त्याच्या दोन्ही बाजुला पादचारी फुटपाथ बांधणे रस्त्याच्या मध्यभागी रस्ता दुभाजक बांधणे, दुभाजकात पथदिवे उभारणे, आवश्यक ठिकाणी वाहतुक नियंत्रक उभारणे, आवश्यकतेनुसार विद्युत पोल उभरणे आवश्यकतेनुसार विद्युत खांब रस्त्याच्या भागात येत असल्यास ते हटवुन घेणे तसेच आवश्यक त्या संख्येने वृक्षारोपण करणे व त्याची निगा राखणे इ.कामाचा समावेश आहे.

| अ.क्र. | विवरण | लांबी (मी) | क्षेत्रफळ (चौ.मी) |
|---|---|---|---|
| ४. | २४ मी.रुंद विकास रस्ता (उत्तर-दक्षिण) | ३००.०० | ७१९८.६४ |
| ५. | १२ मी.रुंद विकास रस्ता (पुर्व-पश्चिम) | ३०१.१७ | ३६४४.५४ |
| ६. | १२ मी.रुंद विकास रस्ता (उत्तर-दक्षिण) | ११५.५७ | १३८६.८६ |
| | एकुण | ७१६.७४ मी. | १२२३०.०४ चौ.मी. |

सदर ठिकाणचा प्रकल्प स्वयंविकास (Self Development) धर्तीवर असून या मध्ये या रस्ता विकासाच्या कामावर विकासकाचा येणारा त्यांच्या प्रस्तावानुसार संपुर्ण खर्च जमीन विकास शुल्क (LDC), शहर विकास निधी (CDC) आणि देय चटईक्षेत्र निर्देशांक (FSI) किंवा हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) करीता लागणारे शुल्क. विकास खर्च (Betterment Charges) स्वरुपात तसेच प्रकल्पाच्या इतर अनुषंगीक खर्चात समायोजीत करण्यास अटी/शर्तीच्या अधिन राहून मा.सर्वसाधारण सभेने मान्यता प्रदान केलेली आहे. प्राप्त मान्यतेनुसार संबंधीत विकासकासोबत नोंदणीकृत दस्तऐवज द्वारे "परस्पर सामजस्य करार" (Memorandum of Understanding) दि २६.१२.२०१७ रोजी करण्यात आलेला आहे.

समंजस्य करारानुसार वरील विकास योजना रस्त्यांचे तसेच रेखाकन अंतर्गत विकास कामांच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली असून सदर अंदाजपत्रकानुसार त्याची एकुण र.रु.१०,७४,३१,२१०/- (रुपये दहा कोटी चौऱ्याहत्तर लक्ष एकतीस हजार दोनशे दहा मात्र) एवढी असून हा खर्च उक्त नगद बाबीसाठी समायोजीत करण्यात येणार आहे

मा.सर्वसाधारण सभेचा ठराव आणि "परस्पर सामंजस्य करार" (Memorandum of Understanding) नुसार संबंधीत विकासकास कार्यादेश देण्यात आलेला आहे. तसेच संबंधीतांनी केलेल्या मागणीनुसार व कोव्हीड पार्श्वभुमी विचारात घेता, जा.क्र.मनपा/श.अ./२०२०/१८२ दि.११.०८.२०२० व जा.क्र.मनपा/२०२१/४४१ दि.०५.०३.२०२१ अन्वये संबंधीत विकासकास मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच मंजुर रेखांकन अंतर्गत उभारावयाच्या सिवेज ट्रीटमेंट प्लांटच्या कामास No.AMC/C.E./2021/58 Date 12.05.2021 अन्वये तांत्रिक मान्यता देण्यात आलेली आहे.

उक्त विकास कामांना कार्यालयाने जा.क्र.मनपा/श.अ./२०२१/१४८ दि.२४.०६.२०२१ अन्वये भागशः काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र दिले आहे. तसेच नगर रचना विभागाने जा.क्र./मनपा/नरवी/भागश/भो.प्र./१९९/१७/२०२१-२२ दि.०१.१०.२०२१ अन्वये प्रकल्पास भागशः भोगवटा प्रमाणपत्र दिलेले आहे.

सदर प्रकल्पांअंतर्गत जमा होणार पावसाचे पाण्याचा निचरा करण्यासाठी ४५० मी.मी.व्यासाच्या आर.सी.सी.वाहिनी टाकण्यास जा.क्र./मनपा/उपअभियंता/झोन क्र.०६/२७५/२०२० दि.१२.१०.२०२० अन्वये परवानगी देण्यात आलेली आहे. सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रु.६६,९३,३९७/- इतकी होती. तथापि, विकासक यांनी त्यांच्या मंजुर रेखांकनामधून तसेच बाजुला असलेल्या चार सोसायटी मधून कासलीवाल रेसिडेन्सी पर्यंत व तेथुन पुढे चौधरी कॉलनी येथील महानगरपालिकेच्या मुख्य जलनिःस्सारण वाहिनीला जोडण्यासाठी ४५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.जलनिःस्सारण वाहिनी टाकण्यासाठी वाढीव अंदाजपत्रक र.रु.३९,३८,४५६/- चे तयार केले आहे. यानुसार या एकत्रित प्रस्तावित रु.१,०६,३१,८५३/- इतका खर्च उपेक्षीत असून आर.सी.सी.जलनिःस्सारण वाहीनी टाकण्यासाठी केलेल्या खोदकामावर सिमेंट कॉंक्रीट करुन रस्ता पुर्ववत करण्यासाठी या प्रस्तावात समाविष्ट करण्यात आलेला आहे.

करीता, उक्त नमुद ४५० मी.मी.व्यासाच्या आर.सी.सी.जलनि:स्सारण वाहिनी टाकण्याच्या एकत्रित र.रु.१,०६,३१,८५३/- च्या अंदाजपत्रकास मान्यता होणे, सदर काम विकासकामार्फत करून घेणे आणि यापुर्वी मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.१३३१ दि.१६.१०.२०१७ अन्वये पारित झालेल्या ठरावातील अटी/शर्तीस अधीन राहून या कामासाठी येणारा खर्च रु.१,०६,३०,८५३/- हा जमीन विकास शुल्क (LDC), शहर विकास निधी (CDC) आणि देय चटईक्षेत्र निर्देशांक (FSI) किंवा हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) करीता लागणारे शुल्क, विकास खर्च (Betterment Charges) स्वरुपात तसेच प्रकल्पाच्या इतर अनुषंगीक खर्चात समायोजीत करण्यास मान्यता होणे करीताचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

ठराव क्रमांक २१८/२०२१:-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गट क्र.७०८ मौ.चिकलठाणा येथून महानगरपालिकेच्या मुख्य जलनि:स्सारण वाहिनी पर्यंत ४५० मी.मी.व्यासाच्या आर.सी.सी.जलनि:स्सारण वाहिनी टाकण्याच्या एकत्रित र.रु.१,०६,३१,८५३/- च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. सदर काम विकासकामार्फत करून घेणे आणि यापुर्वी मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.१३३१ दि.१६.१०.२०१७ अन्वये पारित झालेल्या ठरावातील अटी/शर्तीस अधिन राहून सामंजस्य करार तत्वावर मान्यता प्रदान करण्यात येते. या कामासाठी येणारा खर्च रु.१,०६,३१,८५३/- हा जमीन विकास शुल्क (LDC), शहर विकास निधी (CDC) आणि देय चटईक्षेत्र निर्देशांक (FSI) किंवा हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) करीता लागणारे शुल्क, विकास खर्च (Betterment Charges) स्वरुपात तसेच प्रकल्पाच्या इतर अनुषंगीक खर्चात समायोजीत करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

प्रस्ताव क्रमांक २१९/२०२१:- (प्रशासकीय प्रस्ताव दि.१६.०१.२०२१)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गट क्र.१३/४ मौजे शहानुरवाडी येथे मे.सिमर प्राईड व्हेंचर्स एल.एल.पी.तर्फे माय होम माय प्राईड हा प्रकल्प उभारण्यात येत आहे. शहानुरवाडी येथील अस्तित्वात असलेला पोदार शाळा ते मयुरबन कॉलनी हा विकास योजना रस्ता अतिशय खराब अवस्थेत होता. तसेच या नाल्यावर असलेला नळकांडी पुलीची उंची रस्त्याच्या पातळी पेक्षा खाली होती. रस्त्याच्या नाल्यावरील पुल मागील वर्षीच्या अतिवृष्टीमुळे वाहून गेला होता. त्यामुळे नागरीकांना व वाहतूकीस अडथळा निर्माण झाला होता. नागरीकांनी सदरील बाब महानगरपालिका प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली.

अतिवृष्टीत वाहून गेलेला पुल व खराब अवस्थेतील रस्त्याची शहर अभियंता यांनी त्यावेळी पाहणी केली होती. या पाहणी वेळी तत्कालीन मा.नगरसेविका श्रीमती स्मिता घोगरे, स्थानिक नागरीक व मे.सिमर प्राईड व्हेंचर्स एल.एल.पी.चे श्री.नितीन बगडिया उपस्थित होते. मे.सिमर प्राईड व्हेंचर्स एल.एल.पी. यांचे या परिसरात गृह प्रकल्पाची विकास कामे सुरु होती. महानगरपालिकेची आर्थीक स्थिती पाहता सदर ठिकाणच्या पुलाच्या बांधकामास व रस्त्याच्या कामास तात्काळ निधी उपलब्ध होणे शक्य नसल्याने तसेच हा रस्ता सदर गृहप्रकल्पाच्या जवळून जाणारा रस्ता असल्यामुळे या रस्त्याचे कॉंक्रेटीकरण करणे व या ठिकाणी नाल्यावर आर.सी.सी.पुल बांधणे ही दोन्ही कामे मे.सिमर प्राईड व्हेंचर्स एल.एल.पी यांनी प्रथम स्वखर्चाने करावीत अशी विनंती शहर अभियंता यांनी संबंधीतास केली होती.तसेच होणाऱ्या खर्चाचे समायोजन नगर रचना विभागास देय असलेल्या रकमेतून करता येईल असे ही मे.सिमर प्राईड व्हेंचर्स एल.एल.पी.यांना अवगत करण्यात आले होते.

आला महानगरपालिकेच्या विनंती वरून मे.सिमर प्राईड व्हेंचर्स एल.एल.पी.यांनी उक्त नमुद कामे पूर्ण केली असल्याचे कळवून या दोन्ही कामांसाठी सुमारे र.रु.८५.०० लक्ष खर्च झालेला असल्याचे नमुद करून सदर खर्च माय होम माय प्राईड शहानुरवाडी किंवा माय वर्ल्ड माय प्राईड गट नं.७०८/पी चिकलठाणा या मे.सिमर प्राईड व्हेंचर्स एल.एल.पी.च्या प्रकल्पाच्या बेटरमेंट,

लेबरसेस, प्रिमियम स्वरुपात लागणाऱ्या खर्चात अथवा मालमत्ता करात वळती/समायोजीत करावा अशी मागणी केली आहे.

मे.सिमर प्राईड व्हेंचर्स एल.एल.पी.यांनी उक्त दोन्ही कामाची खालील प्रमाणे अंदाजपत्रके सादर केलेली आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | पोद्दार शाळा ते मयुरबन कॉलनी कडे जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे | र.रु.४०,३१,०६६/- |
| २. | नाल्यावर आर.सी.सी.पुल बांधणे | र.रु.४६,७४,३२८/- |
| | एकुण अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | र.रु.८७,०५,३९४/- |

काम पुर्णत्वानंतर झालेल्या कामाची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आली असून या ठिकाणी पोद्दार शाळा ते मयुरबन कॉलनीकडे जाणाऱ्या ५० फुट रुंद विकास योजना रस्त्याचे कॉंक्रीटीकरणाचे काम पुर्ण झालेले आहे. तसेच या ठिकाणी असलेल्या नाल्यावर आर.सी.सी.पुल बांधलेला असल्याचे दिसून आले.

करीता उक्त पुर्ण केलेली कामे व सादर केलेली अंदाजपत्रके, पुलाचे डिझाईन व ड्रॉईंगची तांत्रिकदृष्ट्या तपासणी तसेच केलेल्या कामाची गुणवत्ता तपासणी, झालेल्या खर्चाची पडताळणी त्रयस्थ यंत्रणे मार्फत म्हणजेच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांच्या मार्फत करून घेण्यात येईल.

करीता (१) पोद्दार शाळा ते मयुरबन कॉलनी कडे जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे, (२) नाल्यावर आर.सी.सी.पुल बांधणे या दोन्ही कामांचे अंदाजपत्रक रु.८७.०५ लक्ष ला कार्योत्तर मान्यता प्राप्त होणे. तसेच सदर खर्च मे.सिमर प्राईड व्हेंचर्स एल.एल.पी. यांच्या माय होम माय प्राईड शहानुरवाडी किंवा माय वर्ल्ड माय प्राईड गट नं.७०८/पी चिकलठाणा या मे.सिमर प्राईड व्हेंचर्स एल.एल.पी. यांच्या अन्य प्रकल्पांच्या बेटरमेंट चार्जेस, लेबरसेस, प्रिमीयम स्वरुपात लागणाऱ्या खर्चात अथवा मालमत्ता करात वळती/समायोजीत करण्याच्या मान्यतेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक २१९/२०२१:-**

प्रस्तावात सविस्तर दर्शविल्याप्रमाणे, पोद्दार शाळा ते मयुरबन कॉलनी कडे जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे आणि नाल्यावर आर.सी.सी.पुल बांधणे या दोन्ही कामांचे अंदाजपत्रके, पुलाचे डिझाइन व ड्रॉईंगची तांत्रिकदृष्ट्या तपासणी तसेच केलेल्या कामाची गुणवत्ता तपासणी, झालेल्या खर्चाची पडताळणी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद या त्रयस्थ संस्थेमार्फत करून घेण्यात तसेच या दोन्ही कामांचे अंदाजपत्रक रु.८७.०५ लक्ष ला कार्योत्तर मान्यता देण्यात येते. तसेच सदर खर्च मे.सिमर प्राईड व्हेंचर्स एल.एल.पी.यांच्या माय होम माय प्राईड शहानुरवाडी किंवा माय वर्ल्ड माय प्राईड गट नं.७०८/ पी चिकलठाणा या मे.सिमर प्राईड व्हेंचर्स एल.एल.पी.यांच्या अन्य प्रकल्पांच्या बेटरमेंट चार्जेस, लेबरसेस, प्रिमीयम स्वरुपात लागणाऱ्या खर्चात अथवा मालमत्ता करात वळती/ समायोजीत करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>प्रस्ताव क्रमांक २२०/२०२१:-</u> (प्रशासकीय प्रस्ताव दि.१८.११-२०२१)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेतील सध्याच्या १०० दललि योजनेवर नवीन फारोळा पंपगृह असून तेथे ६७० अ.श.क्षमतेचे सन-१९९१ मध्ये सहा व सन २००६ मध्ये दोन असे एकुण आठ व्ही.टी.पंप बसविण्यात आलेले असून, त्यापैकी पाच पंप सतत २४ तास चालविण्यात येतात व तीन पंप स्टँडबाय ठेवण्यात आलेले आहेत. सदरील पंप ६७० अ.श.व्हि.टी. CNE 24x4 Stage, Mather & Platt कंपनी, पुणे यांच्या बनावटीचे आहेत. सन-१९९१ मधील पंप ३० वर्षांपासून तसेच सन-२००६ मधील पंप १४ वर्षांपासून कार्यरत असल्याने पंपाच्या बाऊल असेंब्ली मधील Impeller, Pump Shaft, Impeller Distance Piece Bearing Bush, Neck Ring, Suction Bell Mouth इ.घर्षणाने खराब होतात. तसेच सी.आय.कास्टींग बनावटीचे केसींग आणि डिफ्युजर सतत पाण्यात असल्याने गंजुन खराब होतात.

करीता, नवीन फारोळा पंपगृह येथील ६७० अ.श.व्हि.टी. पंपासाठी बाऊल असेंब्लीचा पुरवठा करणे या कामासाठी ई-निविदेद्वारे निविदा मागविण्यात आल्या असता, प्रथम वेळेस एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त तीन निविदाधारक व त्यांनी भरलेले दर खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | प्राप्त निविदा दर | |
|---|---|---|---|
| १. | मे.तिरुपती ईलेक्ट्रिकल्स सेल्स ॲण्ड सर्विसेस, औरंगाबाद | ३५,५१,८५६/- | अंदाजपत्रक दरा पेक्षा ०.५०% ने कमी. |
| २. | मे.श्री.ईलेक्ट्रिकल्स ॲण्ड रेफ्रिजीरेशन, औरंगाबाद | ३६,५८,९४७/- | अंदाजपत्रक दरा पेक्षा २.५०% ने जास्त. |
| ३. | मे.लक्ष्मी इंजिनीअरींग, औरंगाबाद | ३८,०१,७३५/- | अंदाजपत्रक दरा पेक्षा ६.५०% ने जास्त. |

वरीलप्रमाणे, तुलनात्मकदृष्ट्या मे.तिरुपती ईलेक्ट्रिकल्स सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांचे दर कमी असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०% कमी आहेत. करीता, मे.तिरुपती ईलेक्ट्रिकल्स सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांच्या कमी दराच्या निविदेस मान्यता देणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

<u>ठराव क्रमांक २२०/२०२१:-</u>

प्रस्तात दर्शविल्याप्रमाणे, नवीन फारोळा पंपगृह येथील ६७० अ.श.व्हि.टी.पंपासाठी बाऊल असेंब्लीचा पुरवठा करणे या कामासाठी मे.तिरुपती ईलेक्ट्रिकल्स सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०% ने कमीच्या म्हणजेच एकुण रु.रु.३५,५१,८५६/- च्या निविदेस मान्यता देण्यात येते. प्रस्तावीत कामासाठी पुढील वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>प्रस्ताव क्रमांक २२१/२०२१:-</u> (प्रशासकीय प्रस्ताव दि.१८.११.२०२१)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेचे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयामध्ये मातीच्या अतिप्राचीन व अतिदुर्मिळ श्रेणीच्या इतिहासकालीन पुराणवस्तु जतन करून ठेवलेल्या आहेत. औरंगाबाद शहराला पर्यटन स्थळाचा वारसा लाभलेला आहे. त्यामध्ये जगप्रसिध्द अजिंठा लेणी, वेरुळ लेणी, बिबिका मकबरा, पानचक्की इ.पर्यटन स्थळे पाहण्यासाठी जगभरातील पर्यटक सहली, पर्यटनासाठी येत असतात. सदर पर्यटक महानगरपालिकेच्या श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयास भेटी देऊन पाहणी करतात. तथापि, सदर वस्तुसंग्रहालयात नौखंडा प्रांगणात पावसाच्या पाण्याची गळती लागल्यामुळे संग्रहालयातील विविध

ऐतिहासिक वस्तुंचे नुकसान होत आहे. तसेच संग्रहालयामध्ये वाळवी मोठ्या प्रमाणात लागल्यामुळे वस्तुंचे नुकसान होत आहे. सदर दुरुस्ती व इतर किरकोळ दुरुस्ती व रंगकामे करणे अत्यंत आवश्यक आहे.

त्यानुसार सदर संग्रहालयाची पाहणी करुन वास्तुविशारद मे.स्थापती आर्किटेक यांच्यामार्फत आवश्यक त्या दुरुस्तीचे काम सविस्तर अंदाजपत्रक खालीलप्रमाणे करण्यात आलेले आहे.

| | |
|---|---|
| पार्ट - ए (वाळवी आणि गळती दुरुस्ती) | - र.रु.०६,००,९००/- |
| पार्ट - बी इतर दुरुस्ती | - र.रु.४२,९७,७००/- |
| | ------------------- |
| | एकुण र.रु.४९,९८,६००/- |

वरील दोन्ही अंदाजपत्रके सार्वजनिक बांधकाम विभागाच्या/महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या सन २०१९-२० च्या एसएसआर नुसार तयार करण्यात आलेले असुन एकत्रित र.रु.४९,९८,६००/- इतकेचे अंदाजपत्रकास वरील पार्ट ए व बी च्या स्वतंत्र निविदा काढण्याच्या अधिन राहून तांत्रिक व प्रशासकीय मान्यता झालेली आहे.

प्रस्तावीत कामाचा खर्च मनपा अर्थसंकल्प सन २०२१-२२ च्या आर्थीक वर्षाच्या अर्थसंकल्पात महसुली खर्च अ-अंदाजपत्रक श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय या लेखाशिर्ष अंतर्गत वार्ड क्र.०४ नवीन कामांच्या यादीत पान क्र.B-63 अ.क्र.२९ नुसार र.रु ५०.०० लक्ष मधुन करण्यात येणार आहे.

तसेच सदर कामासाठी वास्तुविशारद मे.स्थापती आर्किटेक्ट यांच्या मार्फत अंदाजपत्रक तयार करुन घेण्यात आले व अंदाजपत्रक रक्कमेच्या 2.00% व G.S.T. दराने फिस अदा करण्याचे प्रस्तावीत करण्यात येत आहे.

त्यानुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.४९,९८,६००/- चा प्रस्ताव व वास्तुविशारद यांना एकुण प्रकल्प किंमतीच्या २.००% व G.S.T.सह दराने शुल्क देणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक २२१/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयातील गळती बंद करणे व इतर दुरुस्ती करणे बाबत या कामासाठीचे वास्तुविशारद मे.स्थापती आर्किटेक्ट यांच्या मार्फत तयार करण्यात आलेले अंदापत्रक र.रु.४९,९८,६००/- च्या प्रस्तावास व वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना एकूण प्रकल्प किंमतीच्या २.००% व G.S.T. सह दराने शुल्क देणेबाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. नैधानिक कार्यवाही व्हावी.

(प्रशासकीय प्रस्ताव दि.१८.११.२०२१)

**प्रस्ताव क्रमांक २२२/२०२१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासनाने बंधनकारक केलेल्या सुधारणांपैकी औरंगाबाद महानगरपालिकेस उपभोक्ता शुल्क आकारणीचा निर्णय सर्वसाधारण सभा दि.२१.०२.२०१५ ठराव क्रमांक ७४६ व दि.२३.०३.२०१५ ठराव क्र.७८९ नुसार निवासी वापरासाठी उपभोक्ता शुल्क वार्षिक रु.१००/- व निवासेतर, व्यावसायिक वापरासाठी रु.५००/- अंमलबजावणी चालू आहे. मालमत्ता कराच्या बिलाच्या आकारणी करुन सर्वसाधारण सभा ठराव क्र.५६६, दि.११.०५.२०१८ अनुसार घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ घनकचरा उत्पादकांकडून उपभोक्ता शुल्क आकारणेस व दरास मान्यता प्राप्त आहे. त्यानुषंगाने सदरच्या शुल्काची वसुली करण्यासाठी सर्वसाधारण सभा ठराव क्र.९२४

प्रशासक यांचा कार्यकाळ
प्रस्ताव व ठराव
दि ३०.०१.२०२१ ते दि 31 . 3 .२०२२

दि.१२.०२.२०१९ अनुसार सेवाभावी संस्था (NGO) नेमणे बाबत निर्णय झाला आहे. तथापि, या कामी नेमावयाच्या संस्थेबाबत प्रसिध्द केलेल्या निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने घनकचरा व्यवस्थापन नियमानुसार उपभोक्ता शुल्काची वसुली अद्याप सुरु झाली नाही.

घनकचरा व्यवस्थापनाच्या कामाचा दर्जा सुधारण्यासाठी निर्धारित केलेले उपभोक्ता शुल्क वसुली करण्यासाठी सदरचे दर मालमत्तेच्या प्रकारानुसार वसुल करण्यासाठी सध्या चालू असलेल्या पध्दतीनुसार मालमत्ता कराच्या आकारणीत समाविष्ट करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येतो. जेणे करुन प्रतिदिन ऐवजी प्रतिवर्ष एकाच वेळी आकरणी व वसुली केल्याने कचरा निर्माण करणाऱ्या आस्थापना आणि महानगरपालिकेस सोयीचे जाईल. महानगरपालिकेच्या कामात सुसुत्रता येईल आणि घनकचरा व्यवस्थापनेच्या कामात स्त्रोत उपलब्ध जाईल.

याकरीता पुढील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येते. मालमत्ता कराच्या आकारणीमध्ये सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.७४६ दि.२१.०२.२०१५ आणि ठराव क्र.७८९ दि.२३.०३.२०१५ नुसार उपभोक्ता शुल्काची आकारणी बंद करण्यात येऊन ठराव क्रमांक ५६६ दि.११.०७.२०१८ नुसार निर्धारित करण्यात आलेले दर आकारण्याचे प्रस्तावीत करण्यात येत आहे. त्यानुसार निवासी भागातुन प्रतिदिन प्रति घर रु.०१/- व्यावसायीक भागातुन प्रतिदिन प्रति दुकान रु.०२/ आणि हॉटेल्स, मोठे व्यावसायीक खाजगी आस्थापनांकडुन निर्माण होणाऱ्या कचऱ्याच्या प्रमाणात प्रतिदिन रु.१०/- ते रु.१००/- प्रमाणे उपभोक्ता कर आकारण्यात येईल. त्यानुसार पुढील प्रमाणे उपभोक्ता शुल्काची आकरणी प्रस्तावीत करण्यात येते. सदरची अमलबजावणी आर्थिक वर्ष २०२२-२३ पासून करावी.

| अ.क्र. | घर/दुकान/आस्थापना | उपभोक्ता कर प्रति वर्ष रुपये |
|---|---|---|
| १. | निवासी | ३६५/- |
| २. | व्यवसायिक दुकाने, अनिवासी मालमत्ता, सरकारी मालमत्ता | ७३०/- |
| ३. | हॉटेल्स, रेस्टॉरंट, बियर बार इत्यादी | ३६५०/- |
| ४. | लॉजींग बोर्डींग/मोठे हॉटेल्स | ७,३००/- |

उपरोक्त प्रमाणे सुधारीत प्रशासकीय प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक २२२/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासनाने बंधनकारक केलेल्या सुधारणांपैकी औरंगाबाद महानगरपालिकेस उपभोक्ता शुल्क आकारणीचा व त्याअनुषंगाने सदरच्या शुल्काची वसुली करण्यासाठी सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार सेवाभावी संस्था (NGO) नेमणे बाबत निर्णय झाला होता. तथापी या कामी नेमावयाच्या संस्थेबाबत प्रसिध्द केलेल्या निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने घनकचरा व्यवस्थापन नियमानुसार उपभोक्ता शुल्काची वसुली अद्याप सुरु झालेली नसल्याने सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.७४६ दि.२१.०२.२०१५ आणि ठराव क्र.७८९ दि.२३.०३.२०१५ नुसार उपभोक्ता शुल्काची आकारणी आर्थिक वर्ष २०२२-२३ पासुन बंद करण्यास मान्यता देण्यात येते.

उपरोक्त प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.५६६ दि.११.०७.२०१८ नुसार निर्धारित करण्यात आलेले उपभोक्ता शुल्काचे सुधारित दरानुसार आकारण्यास मान्यता देण्यात येते. त्या नुसार निवासी भागातुन प्रतिदिन प्रतिघर रु.०१/- व्यावसायीक भागातुन प्रतिदिन प्रतिदुकान रु.०२ आणि हॉटेल्स, मोठे व्यावसायीक खाजगी आस्थापनाकडुन निर्माण होणाऱ्या कचऱ्याच्या प्रमाणात प्रतिदिन रु.१०/- ते रु.१००/- प्रमाणे उपभोक्ता शुल्काची आकारणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

मालमत्ता कर वसुल करताना त्यासोबत सुधारीत दरानुसार खाली नमुद केल्याप्रमाणे उपभोक्ता शुल्क आकारणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. घनकचरा व्यवस्थापनाच्या कामाचा दर्जा सुधारण्यासाठी निर्धारीत केलेले उपभोक्ता शुल्क वसुली करण्यासाठी सदरचे दर मालमत्तेच्या प्रकारानुसार वसुल करण्यासाठी सध्या चालू असलेल्या पध्दतीनुसार मालमत्ता कराच्या आकारणीत समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात येते.

| अ.क्र. | घर/दुकान/आस्थापना | उपभोक्ता कर प्रति वर्ष रुपये |
|---|---|---|
| १. | निवासी | ३६५/- |
| २. | व्यावसायिक दुकाने, अनिवासी मालमत्ता, सरकारी मालमत्ता | ७३०/- |
| ३. | हॉटेल्स, रेस्टॉरंट, बिगर बार इत्यादी | ३६५०/- |
| ४. | लॉजींग बोर्डींग/मोठे हॉटेल्स | ७,३००/- |

उपभोक्ता प्रकारानुसार घनकचऱ्यासाठी उपभोक्ता शुल्क (user charges) आकारण्याच्या कारवाहीस मान्यता देण्यात येते. सदर ठरावाची अंमलबजावणी आर्थिक वर्ष २०२२-२३ पासुन करावी. नैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक २२३/२०२१:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.२२.११.२०२१)

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, मोहल्ला भाग्यनगर येथिल हॉटेल देवगिरी प्रा.लि. रेखांकनाअंतर्गत डांबरीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०२०-२१ च्या दरसुची DSR नुसार तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र.रु.३४,९८,३३१/- यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदरील कामाचा खर्च अर्थसंकल्प सन २०२०-२१ मधील मंजुर रेखांकनात विविध विकास कामे या लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध असलेल्या रक्कमे मधुन प्रस्तावित करण्यात आला आहे.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक र.रु.३४,९८,३३१/- मंजुरीचा प्रस्ताव मा.प्रशासक महोदय यांच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक २२३/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला भाग्यनगर येथिल हॉटेल देवगिरी प्रा.लि. रेखांकनाअंतर्गत डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.३४,९८,३३१/- अंदाजपत्रकास सर्वानुमते मजुरी देण्यात येते नैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक २२४/२०२१:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.२२.११.२०२१)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिक्षण विभागात घड्याळी तासिका तत्वावरील तात्पुरत्या स्वरुपातील खालील माध्यमिक शिक्षकांना सन २०२१-२२ च्या शैक्षणिक सत्रात दि.१५.०६.२०२१ (दिवाळीच्या सुट्टया वगळून) ते दि.३०.०४.२०२२ पर्यंत दर २९ दिवसांनी तांत्रिक खंड देऊन नियुक्ती देण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे नाव | घड्याळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांचे नाव | शैक्षणिक पात्रता | अध्यापनाचे विषय | एक महिन्याच्या कमाल तासिका | प्रति तास |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मा.वि.बेगमपुरा | श्रीमती इंगळे आम्रपाली शेषराव | एम.ए.बी.एड., बी.एल.टी.ई.टी. | मराठी व सामाजिक शास्त्र | ७२ तास | १८०/- |
| २. | मा.वि.अशोक | श्री.गणेश दिलारा देवळे | एम.ए.बी.एड. | मराठी, | ७२ तास | १८०/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नगर | | | इतिहास, भुगोल | | |
| ३. | मा.वि.अशोक नगर | श्रीमती अनुराधा श्रीराम मोकासे | बी.एस्सी.बी.एड. | विज्ञान, हिंदी | ७२ तास | १८०/- |
| ४. | मा.वि.अशोकनगर | श्रीमती मधुश्री श्रीकांत देवकाते | एम.एस्सी.बी.एड. | गणित, इंग्रजी व इतर | ७२ तास | १८०/- |
| ५. | मा.वि.सिल्कमिल कॉलनी | श्रीमती मोमीन फरहाना आरीफोद्दीन | एम.ए.बी.एड. | इंग्रजी | ७२ तास | १८०/- |
| ६. | मा.वि.सिल्कमिल कॉलनी | श्री.मोह.इरफान शेख मन्सुर | बी.एस्सी.बी.एड. | गणित | ७२ तास | १८०/ |
| ७. | मा.वि.सिल्कमिल कॉलनी | श्रीमती आस्मा बेगम मो.ख्वाजा | बी.एस्सी.बी.एड. | विज्ञान | ७२ तास | १८०/- |
| ८. | मा.वि.किराडपुरा न.१ | श्रीमती मोमीन अलमास मुस्तफा | बी.ए.बी.एड.एम.ए.बी.एड. | मराठी व इतिहास | ७२ तास | १८०/- |
| ९. | मा.वि.नारेगाव उर्दु | श्री.कादरी स.शहा मुबश्शीर उल हक | बी.एस्सी.बी.एड. | विज्ञान, गणित | ७२ तास | १८०/- |
| १०. | मा वि नारेगाव उर्दु | श्रीमती आफरीन बेगम शेख हनीफ | बी.एस्सी.बी.एड. | भुगोल | ७२ तास | १८०/- |
| ११. | मा.वि.नारेगाव उर्दु | श्रीमती सबा नौशीन अलीम अहेमद | बी.ए.बी.एड. | इंग्रजी इतिहास | ७२ तास | १८०/- |
| १२. | मा.वि.शहाबाजार उर्दु | श्रीमती सय्यद आलेमा सय्यद मुमताज | एम.एस्सी.बी.एड | विज्ञान भुगोल | ७२ तास | १८०/- |
| १३. | मा.वि. शहाबाजार उर्दु | श्रीमती अल्मास निखत अझहर शेख | बी.ए.बी.एड. | इंग्रजी भुगोल | ७२ तास | १८०/- |
| १४. | मा.वि. यशोधरा उर्दु | सैय्यद जफर सैय्यद अफसर | एम.ए.बी.एड. | इंग्रजी इतिहास | ७२ तास | १८०/- |
| १५. | मा.वि. यशोधरा उर्दु | श्रीमती फातेमा जोहरा नीलवी मोहम्मद जकी | बी.एस्सी.बी.एड. | गणित विज्ञान | ७२ तास | १८०/- |

वरीलप्रमाणे, कमाल ७२ तास प्रति माह तासांची मर्यादा ठरवुन देण्यात येत आहे. त्यापेक्षा कोणत्याही घड्याळी तासिका तत्वारील माध्यमिक शिक्षकांचे जास्तीचे मानधन अदा केले जाणार नाही. याची जबाबदारी संबंधीत मुख्याध्यापक यांची राहील. याशिवाय शिक्षकांनी काही अतिरिक्त तास घेतल्यास त्याची स्वतंत्र नोंद मुख्यध्यापक हे ठेवतील व तशी शिक्षणाधिकारी यांची मान्यता घेतल्यानंतरच मानधन अदा करण्यात येईल.

वरील कर्मचाऱ्यांना सन २०२१-२२ च्या शैक्षणिक वर्षातील दि.१५.०६.२०२१ (दिवाळीच्या सुट्ट्या वगळून) ते दि.३०.०४.२०२२ पर्यंत नियुक्ती देण्या बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

<u>ठराव क्रमांक २२४/२०२१:-</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिक्षण विभागात अपरोक्त नमुद माध्यमिक विद्यालयातील व प्रस्तावातील अ.क्र.०१ ते १३ घड्याळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांना कमाल तासांची ठरवून दिलेल्या मर्यादेप्रमाणे तसेच त्यापेक्षा कोणत्याही घड्याळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांचे

जास्तीचे मानधन अदा न करणे, याची जबाबदारी संबंधीत मुख्याध्यापक यांची राहील या शिवाय शिक्षकांनी काही अतिरिक्त तास घेतल्यास त्याची स्वतंत्र नोंद मुख्याध्यापक हे ठेवतील व तशी शिक्षणाधिकारी यांची मान्यता घेतल्यानंतरच मानधन अदा करण्यासह वरील एकुण १३ कर्मचाऱ्यांना सन २०२१-२२ च्या शैक्षणिक वर्षातील दि.१५.०६.२०२१ (दिवाळीच्या सुट्ट्या वगळून) ते दि.३०.०४.२०२२ पर्यंतची दर्जाळी तासिका तत्वावर माध्यमिक शिक्षकांना सेवा करण्यासाठी नियुक्ती देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>प्रस्ताव क्रमांक २२५/२०२१:-</u> (प्रशासकीय प्रस्ताव दि.२५.११.२०२१)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या अर्थसंकल्प सन २०२१-२२ अंतर्गत कार्यकारी अभियंता विभाग, उप अभियंता कार्यालय-०६ करीता सन २०२१-२२ च्या मुळ अर्थसंकल्पात महसुली खर्च अ अंदाजपत्रक पृष्ठ क्र. Ward-06-ABS-2 अ.क्र.११ नुसार लेखाशिर्ष महानगरपालिका सर्व शाळा दवाखाने व इमारती देखभाल दुरुस्ती कामे अंतर्गत र.रु.९५.०० लक्ष तसेच भांडवली खर्च अ अंदाजपत्रक अ.क्र.१० स्मशानभुमी विकास अंतर्गत र.रु.१५.०० लक्षाची रकमेची तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

झोन क्र.०६ अंतर्गत एकूण १४ वॉर्ड असून जलनि:स्सारण कामासाठी ठेवलेली आर्थिक तरतुद ही आतापर्यंतच्या ड्रेनेजची आवश्यक असलेल्या कामासाठी वापरण्यात आली आहे. त्यामुळे झोन क्र.०६ करीता जलनि:स्सारण देखभाल दुरुस्तीसाठी तरतुद शिल्लक राहिलेली नाही. करीता, खाली दर्शविल्याप्रमाणे र.रु.३०.०० लक्ष ही रक्कम झोन क्र.६ मधील विविध ठिकाणी जलनि:स्सारण वाहिन्या देखभाल दुरुस्ती कामासाठी वळती करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

| अ.क्र. | लेखाशिर्षक | वळती करावयाचे लेखाशिर्षक व रक्कम |
|---|---|---|
| १. | महानगरपालिका सर्व शाळा दवाखाने व इमारती देखभाल दुरुस्ती कामे (महसुली खर्च अ) Ward-06-ABS-2 अ.क्र.११ नुसार तरतुद ९५.०० लक्ष | जलनि:स्सारण देखभाल दुरुस्ती र.रु. ३०.०० लक्ष |
| २. | स्मशानभुमी देखभाल दुरुस्ती (भांडवली खर्च अ अंदाजपत्रक) अ.क्र.१० नुसार तरतुद रु.१५.०० लक्ष | |

<u>ठराव क्रमांक २२५/२०२१:-</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प सन २०२१-२२ लेखाशिर्षा मधील उपरोक्त प्रमाणे र.रु.३०.०० लक्ष ही झोन क्र.०६ मधील देखभाल दुरुस्ती जलनि:स्सारण या लेखाशिर्ष अंतर्गत कामांसाठी वळती करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>प्रस्ताव क्रमांक २२६/२०२१:-</u> (प्रशासकीय प्रस्ताव दि.३०.११.२०२१)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा पशुसंवर्धन विभागाअंतर्गत कार्यान्वीत असलेले पशुवधगृह पडेगाव कत्तलखाना मोठी जनावरा करीता (म्हैस, रेडा व वगार) लहान जनावराकरीता शहरबाजार कत्तलखाना (शेळी, मेंढी, बोकड) व्यवस्थापन खर्चामध्ये झालेली वाढ व या योजनेतून मिळणारे उत्पन्न विचारात घेता व या विभागास देण्यात आलेले वसुलीचे आर्थीक उद्दिष्ट लक्षात घेता प्रस्तावित अधिकृत कत्तलखाना व्यतिरिक्त इतर ठिकाणी जनावरे कत्तल केल्यास आकस्मीत खर्च खालील प्रमाणे वसुल करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | जनावरांचा प्रकार | प्रस्तावित दर |
|---|---|---|
| १. | मोठी जनावरे (म्हैस, रेडा, वगार) | रु.८००/- |
| २. | लहान जनावरे (शेळी, मेंढी, बोकड) | रु.५००/- |
| ३. | उघड्यावर मांस विक्री दंड | रु.५००/- |

वरील प्रमाणे, प्रस्तावित दर मंजुर केल्यास मनपाचे आर्थिक उत्पन्न वाढण्यास मदत होईल. करीता, प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

ठराव क्रमांक २२६/२०२१:-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा पशुसंवर्धन विभागाअंतर्गत कार्यान्वीत असलेले पशुवधगृह पडेगाव कत्तलखाना मोठी जनावरा करीता (म्हैस, रेडा व वगार) लहान जनावराकरीता शहरबाजार कत्तलखाना (शेळी, मेंढी, बोकड) व्यवस्थापन खर्चामध्ये झालेली वाढ व या योजनेतुन मिळणारे उत्पन्न विचारात घेता विभागास देण्यात आलेले वसुलीचे आर्थीक उद्दिष्ट लक्षात घेता प्रस्तावित अधिकृत कत्तलखाना व्यतिरिक्त इतर ठिकाणी जनावरे कत्तल केल्यास आकस्मीत खर्च खालील प्रमाणे वसुल करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | जनावरांचा प्रकार | प्रस्तावित दर |
|---|---|---|
| ४. | मोठी जनावरे (म्हैस, रेडा, वगार) | रु.८००/- |
| ५. | लहान जनावरे (शेळी, मेंढी, बोकड) | रु.५००/- |
| ६. | उघड्यावर मांस विक्री दंड | रु.५००/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

प्रस्ताव क्रमांक २२७/२०२१:- (प्रशासकीय प्रस्ताव दि ३०.११.२०२१)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा पशुसंवर्धन विभागाअंतर्गत कार्यान्वीत असलेले औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील पाळीव श्वानांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम १२७ (२) (क) अंतर्गत वार्षिक श्वान परवाना (१ एप्रिल ते ३१ मार्च) द्वारे श्वान कर लावण्यात आलेला आहे. सध्याचे दर हे सन २००८-२००९ पासून आकारण्यात येत आहेत.

करीता खालील दर्शविल्याप्रमाणे श्वान परवाना व नुतनीकरण फी मध्ये दरवाढ प्रस्तावीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | श्वान परवाना तपशील | सद्यस्थित दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| १. | नवीन श्वान परवाना फी (वार्षिक) | ५००/- | ७५०/- |
| २. | श्वान परवाना फी नुतनीकरण (वार्षिक) | २५०/- (३१ मे पर्यंत) | ५००/- (३१ मे पर्यंत) |
| ३. | नुतनीकरण विलंब अतिरिक्त फी (वार्षिक) | ५००/- (३१ मे नंतर) | ७५०/- (३१ मे नंतर) |
| ४. | विना परवाना श्वान पकडून आणल्यास श्वान परवाना देऊन परत करण्याचे खर्च (परवाना फी अतिरीक्त राहील.) | ५००/- | ५००/- |

वरील दर्शविलेले प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

ठराव क्रमांक २२७/२०२१:-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा पशुसंवर्धन विभागाअंतर्गत कार्यान्वीत असलेले औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील पाळीव श्वानांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम

१२७ (२) (क) अंतर्गत वार्षिक श्वान परवाना (१ एप्रिल ते ३१ मार्च) द्वारे श्वान कर लावण्यात आलेला आहे. सध्याचे दर हे सन २००८-२००९ पासुन आकारण्यात येत आहेत.

करीता खालील दर्शविल्याप्रमाणे श्वान परवाना व नुतनीकरण फी मध्ये दरवाढ करण्यात येत आहे.

| अ.क्र. | श्वान परवाना तपशील | सद्यस्थित दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| १. | नवीन श्वान परवाना फी (वार्षिक) | ५००/- | ७५०/- |
| २. | श्वान परवाना फी नुतनीकरण (वार्षिक) | २५०/- (३१ मे पर्यंत) | ५००/- (३१ मे पर्यंत) |
| ३. | नुतनीकरण विलंब अतिरिक्त फी (वार्षिक) | ५००/- (३१ मे नंतर) | ७५०/- (३१ मे नंतर) |
| ४. | विना परवाना श्वान पकडून आणल्यास श्वान परवान्ना देऊन परत करण्याचे खर्च (परवाना फी अतिरीक्त राहील.) | ५००/- | ५००/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

**प्रस्ताव क्रमांक 228/2021:-**

**(प्रशासकीय प्रस्ताव दि.01.12.2021)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 127 पोटकलम (1) (अ) मधे महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांना मालमत्ताकर आकारणी करण्याच्या आणि कलम 128 मधे मालमत्ताकर वसुल करण्यासाठीच्या तरतुदी दिलेल्या आहेत. अधिनियमातील अनुसुची "ड" चे प्रकरण 8 (कराधान नियम) चे नियम 42 ते 47 मध्ये थकीत कराच्या वसुलीपोटी कसुरदराची मालमत्ता अटकावणी/जप्त करण्यासाठी अधिपत्र बजावण्याची व पुढील कार्यवाहीची तरतुद व प्रक्रिया नमुद आहे. परंतु महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 466 पोटकलम (1) चे खंड (ब) नुसार महानगरपालिकेस देणे असलेली रक्कम न भरल्याबद्दल जप्त केलेल्या स्थावर/जंगम मालमत्तेची विक्री ज्या रीतीने करता येईल ती नियमावली निश्चित करुन तिला मान्यता घेण्यात आलेली नाही. त्यामुळे विक्रीची प्रत्यक्ष कार्यवाही करतांना तांत्रीक अडचणी निर्माण होतात. त्यासाठी थकित मालमत्ताकरापोटी महानगरपालिकेतर्फे जप्त करण्यात आलेली स्थावर/जंगम मालमत्ता लिलावाद्वारे विक्री करण्यासाठी अवलंबिण्याची नियमावली पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहे.

उद्देश :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949चेकलम 466 (1) (ब),(2) तसेच कलम 128(4) आणि परिशिष्ट "ड" चे प्रकरण 8 मधील नियम क्र. 47 (5) अंतर्गत स्थावर/जंगम मालमत्ता लिलावाद्वारे विक्री करुन महापालिकेची महसूल थकबाकी वसूली करणे.

1. **संक्षिप्त नांव :**

या नियमांना **"औरंगाबाद महानगरपालिका द्वारा जप्त स्थावर/जंगम मालमत्ता विक्रीचे नियम 2021"** असे संबोधले जावे.

2. **व्याप्ती :**

हि नियमावली औरंगाबाद हद्दीतील स्थावर, जंगम मालमत्तांना (शासनाच्या मालकीच्या मालमत्ता वगळून) लागू असेल.

अ) अशा स्थावर मालमत्ता ज्यांच्यावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 128(1), 139 अन्वये बसविलेला मालमत्ता कर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या परिशिष्ट-ड प्रकरण 8 कराधान नियम अन्वये तरतूदीनुसार कारवाई करुनही अदत्त राहीला आहे.

ब) अशा मालमत्ता ज्यांच्या बाबत एखाद्या व्यक्तीची मालकी आहे अथवा अशा मालमत्ता ज्या एखाद्या व्यक्तीच्या कब्जात आहेत अथवा अशा मालमत्ता ज्यामध्ये एखाद्या व्यक्तीचे कोणत्याही प्रकारचे स्वारस्य/ हितसंबंध आहेत आणि अशा व्यक्तीकडून महानगरपालिकेस अधिनियमाच्या तरतुदी अन्वये कोणतीही रक्कम येणे आहे अथवा मनपा अधिनियमांतर्गत अन्य कोणतीही रक्कम येणे आहे.

3. **व्याख्या :**

विषयाशी अथवा मजकुराशी विसंगत नसेल तोवर,

(1) अधिनियम म्हणजे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी सुधारणा केलेला आणि अंमलात असलेला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम1949.

(2) आयुक्त म्हणजे, या नियमातील तरतूदी किंवा कायद्याच्या अनुसूचीतील नियम यानुसार आयुक्ताला असणारे अधिकार, क्षमता, कर्तव्ये किंवा त्याला बहाल केलेले अधिकार आयुक्ताने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 69 (1) अंतर्गत ज्याला दिले आहेत, असा कोणताही महापालिका अधिकारी.

(3) लिलाव नोंदवही म्हणजे ज्यांच्याद्वारे लिलाव विक्री पार पाडणार आहे अशा सक्षम अधिकाऱ्याच्या कार्यालयात परिरक्षित अशी नोंदवही ज्यामध्ये जाहिर लिलावाच्या संपूर्ण प्रक्रियेच्या कार्यवाहीची सक्षम अधिकारी नोंद घेतील.

(4) बोलीदार म्हणजे लिलावात भाग घेणारी अशी कोणतीही व्यक्ती, कार्यालय अथवा तत्कालीन कायद्याअंतर्गत नोंदणीकृत अथवा स्थापित "संस्था" होय. असे बोलीदार प्रत्यक्ष हजर राहून अथवा आपल्या प्रतिनिधीद्वारे अथवा आयुक्तांनी विहित केलेल्या पध्दतीने मोहरबंद लिफाफ्याद्वारे अथवा 'Online' पध्दतीने देखील बोली सादर करुन लिलावात भाग घेऊ शकतील. पुढे असे की, बोलीदाराचे प्रतिनिधीत्व करणारी व्यक्ती ही मुळ बोलीदाराकडून प्राप्त अधिकार पत्राच्या आधारे बोली लावू शकेल.

(5) बोली म्हणजे संभाव्य लिलावाच्या नियत वेळेत सक्षम अधिका-यांच्या कार्यालयात आणि परवानगीने पुकारलेली बोली होय. अशी बोली महानगरपालिका आयुक्तांनी ठरविलेल्या विहीत पध्दतीने आणि नमुन्यात मोहोरबंद लिफाफ्याद्वारे (प्रचलित पध्दत अथवा ई निविदा) सादर करण्याजोगे असेल.

(6) सक्षम प्राधिकारी म्हणजे महानगरपालिका आयुक्त अथवा त्यांनी प्रदान केलेले त्यांचे अधिकार, कर्तव्य आणि कार्ये पार पाडण्यासाठी नियुक्त केलेला अन्य महानगरपालिका अधिकारी.

(7) जाहिर नोटीस म्हणजे आयुक्तांनी मालमत्तेच्या संभाव्य लिलावाच्या संदर्भात वृत्तपत्रातून छापील जाहिरातीद्वारे अथवा इलेक्ट्रॉनीक माध्यमाद्वारे अथवा अन्य तत्सम प्रकारे छापून प्रसिध्द केलेली नोटीस.

(8) खरेदीदार म्हणजे लिलाव प्रक्रियेच्या परिणामाअंती यशस्वी बोलीदार म्हणून सक्षम प्राधिका-यांनी जाहिर केलेला उच्चतम बोलीदार होय ज्याने अशा लिलावाच्या अटींनुसार बोली रकमेची संपुर्ण रक्कम महानगरपालिकेच्या तिजोरीत/खात्यावर जमा केली आहे.

(9) राखीव बोली अथवा किंमत म्हणजे महानगरपालिका आयुक्तांनी निश्चित केलेली मालमत्तेच्या लिलावाद्वारे विक्रीच्या प्रयोजनार्थ असलेली मालमत्तेची किमान किंमत जी अदत्त रकमेपेक्षा कमी असणार नाही. यामध्ये अशा घटविलेल्या राखीव बोलीचाही समावेश होतो जेथे महानगरपालिका आयुक्त त्यांच्या अधिकारात योग्य आणि वाजवी पध्दतीने लिलावांतर्गत मालमत्तेची राखीव किंमत कमी करू शकतील.

(10) विक्री म्हणजे जाहिर लिलावाने केलेली विक्री होय ज्यामध्ये प्रत्यक्ष, बंद लिफाफ्याद्वारे अथवा इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे मागविलेल्या केलेल्या विक्रीचा समावेश असेल.

(11) अदत्त रक्कम म्हणजे अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी अन्वये / कलमांतर्गत वसूली योग्य असलेली परंतू वसूल न झालेली अशी कोणतीही रक्कम ज्यामध्ये मालमत्ता कर, दुरुस्ती उपकर, दंड, वसूली खर्च, भाडे आणि अधिनियमाच्या अंतर्गत वसूलीस पात्र असलेली परंतू वसूली न झालेली रक्कम होय.

(12) सदरच्या नियमांतर्गत देण्यात येणा-या सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट/नमुन्या प्रमाणे मिळकतधारकाच्या स्थावर, जंगम मालमत्तेची जप्ती, लिलाव, विक्रीच्या संदर्भातील कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

**टिप्पणी:-**

उपरोक्त पैकी कोणताही संज्ञेचा अर्थ हा अधिनियमातील अर्थाच्या विपरीत असेल अधिनियमातील संज्ञा प्रमाण समजण्यात यावी तसेच एखादी संज्ञा सदर विनियमात स्पष्ट होत नसेल तर तिचा अर्थ अधिनियमानुसार समजण्यात यावा.

4. **जाहीर लिलावाने विक्री जाहीर करण्याची नोटीस व जाहीर प्रकटन :**

अ) अदत्त मालमत्ता कराच्या वसूलीकरिता, सदर नियमावली महानगरपालिका आयुक्तांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील परिशिष्ट-ड चे प्रकरण 8 नियम 42 अन्वये मालमत्तांची अटकावणी/जप्ती केल्यानंतर मालमत्तेची जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्यासाठी लागू असेल.

ब) महानगरपालिका आयुक्तांनी कलम 69(1) अन्वये प्राधिकृत केलेला महानगरपालिका अधिकारी अधिनियमाच्या कलम 47 अन्वये स्थावर मालमत्ता अथवा तिचा भाग अटकावणी करता येण्याजोगी परिस्थिती असल्यास सदर भागाची जाहीर लिलावाद्वारे विक्री करू शकतो.

5. महानगरपालिका आयुक्त अथवा सक्षम प्राधिकारी ठरवतील त्यानुसार आणि तितक्या वेळा लिलावाची जाहीरसूचना अदत्त कराच्या वसुलीच्या प्रयोजनार्थ प्रसिध्द केली जाईल.

6. संभाव्य लिलावात विक्री करावयाची स्थावर मालमत्ता जेथे आहे जशी आहे या तत्वावर विकली जाईल. तसेच जाहीर सूचनेत निम्नलिखित बाबी उपलब्धतेनुसार स्पष्ट करण्यात येतील.

(1) मालमत्तेचा करनिर्धारण पुस्तकातील लेखा क्रमांक.

(2) नगरभूमापन क्रमांक, मालमत्तेच्या हद्दी आणि क्षेत्रफळ.

(3) ज्या अदत्त रकमेसाठी जाहिर लिलाव करणे आहे ती अदत्त रक्कम.

(4) अधिनियमाच्या कलम 47 अन्वये जप्त करण्यासाठी जे जप्ती अधिपत्र बजावण्यात येते त्यापुर्वी संबंधितास 21 दिवसांची नोटीस बजावण्यात यावी.

(5) अधिनियमाच्या कलम 42 अन्वये जप्त करण्यासाठी जे जप्ती अधिपत्र बजावण्यात येईल त्यामध्ये उपरोक्त 21 दिवसांच्या नोटीसचा क्रमांक आणि दिनांक.

(6) लिलावाचा दिवस, दिनांक आणि वेळ तसेच ज्या सक्षम प्राधिका-याच्या कार्यालयात लिलाव केला जाईल त्या कार्यालयाचा पत्ता.

(7) जर बंद लिफाफ्याद्वारे अथवा ऑनलाईन पध्दतीने बोली मागविण्यात येणार असेल तर अशा प्राधिका-याचे पदनाम कार्यालयाचा पत्ता आणि ज्या कालावधीत बंद लिफाफ्याद्वारे अथवा ऑनलाईन पध्दतीने बोली सादर करणे अपेक्षित आहे तो कालावधी.

(8) लिलावाच्या अटी आणि नियमावली उपलब्ध असलेल्या सक्षम प्राधिका-याचे नाव व कार्यालयाचा पत्ता.

(9) उपरोक्त जाहीर सूचना मालमत्तेच्या प्रवेशद्वारावर अथवा कोणत्याही दर्शनी भागावर चिकटविण्यात येईल. अशा जाहीर सूचनेची प्रत महानगरपालिकेच्या सक्षम प्राधिका-याच्या कार्यालयात दर्शनी भागात ठेवण्यात अथवा चिकटविण्यात येईल.

7. **जाहीर प्रकटन प्रसिध्द करण्याची पध्दत :**

(अ)प्रत्येक जाहीर प्रकटन प्रसिद्ध करण्यासाठी कसूरदारास अशा मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे हस्तांतरण करण्यास किंवा तिच्यावर भार निर्माण करण्यास किंवा भारापासून कोणताही लाभ मिळवण्यास मनाई करणा-या आदेशाद्वारे ती जप्त करण्यात आली पाहिजे.

(ब) उपरोक्त नियमांनुसार लिलावापूर्वी २१ दिवसांपेक्षा कमी नाही इतक्या कालावधीची प्रथम दिर्घ जाहीर सूचना (नोटीस) संबंधीतांना देण्यात येईल. तद्नंतर जाहीर प्रकटन प्रसिध्द केल्यानंतर 15 दिवसांचा कालावधी पूर्ण केल्याशिवाय कोणत्याही मालमत्तेची विक्री केली जाऊ नये.

(क) जिथे आयुक्त तसे निर्देश देईल तिथे असे प्रकटन, आयुक्ताला योग्य वाटेल अशा एक किंवा अधिक स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध करावेआणि सदर प्रकटनाचा खर्च हा वसूलीसाठीचा खर्च असेल.

(ड) जिथे प्रसिद्ध केलेली मालमत्ता ही स्वतंत्रपणे विक्री करण्यासाठी वेगवेगळ्या भागात विभागली असेल तिथे प्रत्येक भागासाठी वेगवेगळे जाहीर प्रकटन प्रसिद्ध करण्याची आवश्यकता नसेल.

८. लिलावाची पहिली नोटीस जाहीर केल्यानंतर खालील अटींची पूर्तता झाल्याखेरीज अदत्त रक्कमेचे अंशत:अधिदान मालमत्ता धारकाकडून स्विकारण्यात येणार नाही.

अ) जमा करण्यात येणारी रक्कम ही अदत्त रक्कमेच्या किमान ५०% इतकी असेल. (सदर रक्कमेचा भरणा Demand Draft, Cash, Pay Order, RTGS, Online इ. प्रकारात स्विकारला जाईल.)

ब) अशी रक्कम जमा करणारी वा कसूरदार व्यक्ती उर्वरीत ५०% रक्कम ३० दिवसांपेक्षा जास्त नाही अशा जास्तीत जास्त तीन समान हप्त्यात भरण्याबाबत आयुक्तांस वाटेल अशा उचित नमून्यात लेखी हमीपत्र सादर करीत असेल.

क) उपरोक्त (ब) मध्ये नमूद लेखी हमीपत्रानुसार हप्ता भरण्यास कसूर झाल्यास, अशा कोणत्याही शिल्लक अदत्त रकमेच्या वसूली करीता लिलाव प्रक्रिया अधिकची सूचना न देता सुरु राहील.

ड) प्रत्यक्ष लिलावाच्या नियोजीत वेळेपूर्वी, त्या वेळेपर्यंत संचित रकमेसह अदत्त रक्कम महानगरपालिकेकडे भरणा केल्यास आयुक्त सदर संभाव्य लिलाव थांबवतील. (सदर रकमेचा भरणा Demand Draft, Cash, Pay Order, RTGS, Online इ. प्रकारात स्विकारला जाईल.)

9. लिलावाने विक्री केलेल्या मालमत्तेचा मालकी हक्क शासनाच्या नियमांच्या अधिन असेल.

10. सर्व बोलीदारांनी बोली सुरु करण्यापूर्वी लिलावाच्या अटी, शर्ती आणि नियम वाचून समजून घेतले आहेत असेगृहीत धरले जाईल. तसेच विक्री योग्य मालमत्तेचे प्रत्यक्ष निरीक्षण बोलीदारांनी केले असून मालमत्तेच्या तपशीला बाबत खातरजमा करून घेतलेली आहे असे गृहीत धरले जाईल.

11. संभाव्य लिलाव विक्रीची प्रक्रिया नियोजित ठिकाणी नियोजित दिवशी सक्षम अधिका-यांसमोर तसेच प्रत्येक हजर बोलीदार यांच्या इतरेतील नियोजित वेळेस सुरु होईल.

12. **लिलावाची प्रक्रिया :**

(1)लिलावापूर्वीची प्रक्रिया:

सक्षम प्राधिकारी, प्रत्यक्ष बोली सुरु करण्यापूर्वी लिलाव नोंदवहीत पुढील तपशिल नोंदवतील.

अ) लिलावाची वेळ, दिनांक आणि वार

ब) लिलावाद्वारे विक्री करावयाच्या मालमत्तेचा करनिर्धारण लेखा क्रमांक आणि संपूर्ण पत्ता, नगर भूमापनक्रमांक, हद्दी, क्षेत्रफळ इ. अन्य तपशिल

क) प्रत्यक्ष लिलाव करण्याच्या वेळेपर्यंत संचित अदत्त रकमेसह एकूण अदत्त रक्कम.

ड) संभाव्य विक्रीकरिता राखीव बोली अथवा न्यूनतम राखीव बोली जी असेल ती रक्कम.
इ) लिलावार्थ नेमलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याचे नाव, पदनाम.
फ) लिलावाकरिता बोलीत भाग घेण्याकरीता प्रत्यक्ष हजर असलेले बोलीदार यांची नावे व पत्ते.
ग) उपरोक्त नुसार बोलीत भाग घेण्याकरीता प्रत्यक्ष हजर असलेले बोलीदार त्यांच्या स्वाक्षऱ्या लिलाव नोंद वहीत करतील.
ह) सक्षम प्राधिकारी अशा हजर बोलीदारांच्या विधिसंमत ओळखपत्राची मागणी करू शकतील.
ई) लिलावाच्या अटी आणि शर्ती हजर असलेले सक्षम अधिकारी प्रत्यक्ष लिलाव सुरु करण्यापूर्वी जाहीररित्या वाचतील.

(2) **लिलावाच्या दिवशीची प्रक्रिया :**

(1) लिलावाने विक्री प्रक्रीया पार पाडण्याकरीता किमान दोन बोलीदार हजर असणे आवश्यक असून सदर संख्या, व्यक्तीश: हजर राहणारे बोलीदार अथवा बंद लिफाफ्याद्वारे बोली लावणारे बोलीदार अथवा दोन्ही मिळून पूर्ण असल्यास सदर संख्या लिलावासाठी पुरेशी गणण्यात येईल. सदर अटीची पूर्तता न झाल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.तथापि नियम 12 (2) (2) मधील परिस्थिती उद्भवल्यास हि अट लागू असणार नाही.

(2) उपरोक्त (1) नुसार अटीचे पालन झाले नाही तर लिलावाची प्रक्रीया नव्याने सुरू करण्यात येईल. तथापि दोन पेक्षा कमी बोलीदार लिलावात भाग घेण्यास उपस्थित असल्याची स्पष्ट नोंद सक्षम अधिकारी लिलाव नोंद वहीत घेतील.

(3) सक्षम प्राधिकारी त्यांच्या कार्यालयात प्राप्त झालेल्या बोलींचे लिफाफे उघडतील. बोलीदारांनी लिलावात प्रत्यक्ष हजर राहून बोली लावल्याप्रमाणे अशा बोलींचे आणि बोलीदारांचे तपशिल लिलाव नोंदवहीत बोली रक्कमेच्या चढत्या क्रमाने नोंदवतील.

(4) लिलाव नोंदवहीत नोंदविलेल्या वरील रक्कमांपैकी उच्चतम रक्कम ही आतापर्यंतची उच्चतम बोली असल्याचे सक्षम अधिकारी जाहीर करतील आणि तदंतर प्रत्यक्ष हजर असलेल्या बोलीदारांना त्या उच्चतम रकमेपेक्षा अधिक रकमेची बोली लावण्याचे आवाहन करतील. तदंतर लावण्यात आलेल्या बोलींच्या रकमा व संबंधित बोलीदारांची नावे लिलाव नोंदवहीत चढत्या क्रमाने नोंद करण्यात येईल. अशाप्रकारे आलेली उच्चतम बोली तीन वेळा पुकारल्यानंतर आणखी बोली न आल्यास ती बोली उच्चतम म्हणून गणली जाईल.

(5) मोहोरबंद लिफाफ्याद्वारे लिलावात भाग घेतलेल्या बोलीदारांसहित सर्व बोलीदारांची नावे आणि बोलीच्या रकमा यांचे जाहीर वाचन करण्यात येईल. तसेच उच्चतम बोली रक्कम आणि उच्चतम बोलीदाराचे नाव यांचे जाहीर वाचन करण्यात येईल.

(6) मोहोरबंद लिफाफ्याद्वारे भाग घेतलेले बोलीदार आणि त्यानंतर प्रत्यक्ष बोली लावणारे बोलीदार यांच्यापैकी उच्चतम रकमेची बोली अंतिम बोली म्हणून गणली जाईल.

(7) उच्चतम बोलीदार आणि त्याने लावलेली बोली लिलावाच्या अंती जाहीर केली जाईल. अशा उच्चतम बोलीदारास यशस्वी बोलीदार आणि अंतिमत: अशा लिलावांतर्गत मालमत्तेचा खरेदीदार म्हणून सक्षम प्राधिकारी त्याच क्षणी घोषित करतील.

(8) तथापि अशा यशस्वी बोलीदार हा खरेदीची सर्व रक्कम महानगरपालिकेच्या तिजोरीत जमा केल्यानंतरच खरेदीदार असेल

(9) उक्त प्रमाणे घोषित यशस्वी बोलीदार हा बोली रकमेच्या 25 टक्के रक्कम त्वरीत महानगरपालिकेच्या तिजोरीत (खात्यावर) जमा करील आणि पोचपावतीची प्रत सक्षम प्राधिकाऱ्यास सादर करील. जर अशी 25 टक्के रक्कम जमा करण्यास असा यशस्वी बोलीदार असमर्थ ठरला तर, जो अन्यथा खरेदीदार म्हणून घोषीत केला असता, अशा बोलीदाराची बोली नाकारली जाईल. आणि अशा परिस्थितीत मालमत्तेचा लिलाव जारी ठेवण्यात येईल.त्यानंतर पुढे आयोजित केल्या जाणाऱ्या लिलावात सदर व्यक्तीला भाग घेण्यापासून बाद ठरवले जाईल.आणि अनामत रक्कम जप्त केली जाईल.

(10) एखाद्या अथवा अनेक बोलींच्या संदर्भात दोन अथवा अनेक बोलीदारामध्ये काही विवाद उत्पन्न झाला तर लिलावाला नव्याने आरंभ करून लिलाव पूर्ण करण्यात येईल

(11) उपरोक्त नियम 12 (2) (2) नुसार लिलाव रद्द करण्यात आल्यास अदत्त रकमेच्या वसुलीकरिता आयुक्त त्यांच्या अधिकारात घटत्या राखीव बोलीसह पुनर्लिलाव पुकारु शकतील. अशा कमी रकमेस "न्यूनतम राखीव बोली" संबोधिले जाईल.

(12) जेथे आयुक्त खरेदीदार असेल तेथे या नियमातील आवश्यक बाबींच्या पुर्ततेसाठी प्रक्रीया अडून राहणार नाही.

(13) उक्त पोट नियम (11) अन्वये लिलाव सुरु केल्यास अशा लिलावासाठी 7 दिवसांपेक्षा कमी नाही इतक्या कालावधीची जाहीर नोटीस/ सूचना स्थानिक वृत्तपत्रात आयुक्त जारी करतील.

(14) महानगरपालिका आयुक्त त्यांनी सामान्यत: किंवा विशेषत: अधिकार प्रदान केलेल्या त्यांच्या अधीनस्थ असलेल्या महानगरपालिका अधिकाऱ्यांकरवी लिलावात बोली लावू शकतील. तथापि,

अ) उपरोक्त नियम 12 (2) (2) च्या अटींची पूर्तता होण्याकरिता "व्याख्या 3(2)" मधील अधिकारी स्पर्धात्मक बोलीत भाग घेऊ शकेल.

ब) नियम 12 (2) (1), 12 (2) (2), 12(2) (10) अथवा 12 (2) (12) च्या पुर्ततेनंतर निर्माण झालेल्या परिस्थितीच्या परिणाम स्वरूप लिलाव निश्चित केला असता वर उल्लेख केल्यानुसार केवळ आयुक्त अथवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणताही बोलीदार हजर न राहील्यास :

क) उक्त नियम 12 (2) च्या पोट नियम (2) मध्ये नमूद नुसार परिस्थिती उद्भवल्यास आयुक्त अथवा त्यांचे प्रतिनिधी यांनी अदत्त रकमेएवढी बोली लावणे हे विधी संमत असेल आणि अशा परिस्थितीत आयुक्त ह्यांना 'उच्चतम बोलीदार' म्हणून घोषित केले जाईल.

ड) उपरोक्त नियम 12 (2) च्या नियम 14 (अ) अन्वये आयुक्तांना उच्चतम बोलीदार' म्हणून घोषित केल्यानंतर अदत्त रकमेचे अधिदान झाल्यानंतर अथवा अदत्त रकमेचे समायोजन महानगरपालिकेच्या उचित लेखाशिर्षात झाल्यानंतर महानगरपालिकेस खरेदीदार म्हणून घोषित केले जाईल. सदर प्रक्रीया कमीत कमी कालावधीत पूर्ण करण्यात येईल.

(इ) नियम 14 (अ) नुसार महानगरपालिका खरेदीदार ठरल्यास लिलाव नोंदवहीचा अभिलेख तसेच मालमत्तेसंबंधी मालकी हक्क, दावा, भाडे पट्टा, अथवा तत्सम स्वारस्य यांचे शासकिय अभिलेखात हस्तांतरण करण्याबाबतचे अन्य सर्व नियम योग्य त्या फेरफारांसह जसेच्या तसे लागू असतील.

(फ) लिलाव प्रक्रीया पार पाडताना लिलाव प्रक्रीयेचे चलचित्रीकरण केले जाईल आणि सदर चित्राफित आयुक्त खरेदीदारास विक्री प्रमाणपत्र प्रदान करेपर्यंत किंवा एक वर्षपर्यंत यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत जतन करण्यात येईल.

**(3) लिलावानंतर मालमत्ता हस्तांतरणाची प्रक्रिया :**

(अ) लिलाव विक्रिच्या निकालाची नोंद लिलाव नोंदवहीत करण्यात येईल. त्यामध्ये लिलाव केलेल्या मालमत्तेचा तपशील, विक्रिची किंमत, खरेदीदाराचे नाव, खरेदीदाराने त्वरीत भरलेली रक्कम आणि शिल्लक रक्कम इत्यादीची नोंद घेतली जाईल. खरेदीदार स्वत:चे विधीसंमत ओळखपत्र सादर करुन नोंदवहीत पूर्ण नाव, पूर्ण पत्ता तसेच अन्य वर्णन नमूद करील आणि स्वाक्षरी करील. अशा पत्त्यावर बजावलेली कोणतीही नोटीस ही विधीवत बजावलेली नोटीस आहे असे समजण्यात येईल.

(ब) अन्य बोलीदारांच्या वतीने खरेदी करणारा प्रतिनिधी, स्वत:चे विधीसंमत ओळखपत्र सादर करेल. तसेच लिलाव नोंदवहीत स्वत:चे तसेच ज्यांचे प्रतिनिधीत्व तो करत आहे त्यांचे पूर्ण नाव, पूर्ण पत्ता आणि अन्य वर्णन नमूद करील आणि स्वाक्षरी करील. अशा प्रकारे नोंदविलेल्या कोणत्याही पत्त्यावर बजावलेली कोणतीही नोटीस ही विधीवत बजावलेली नोटीस आहे असे समजण्यात येईल.

(क) लिलावानंतर शक्य तेवढ्या लवकर आयुक्त लिलावाचे परिणाम / निकाल प्रमाणित करतील आणि त्याद्वारे लिलावातील उच्चतम (यशस्वी) बोलीदारास मालमत्तेचे खरेदीदार म्हणून घोषित करतील.

(ड) यशस्वी बोलीदाराने संपूर्ण खरेदी रक्कम महानगरपालिकेकडे विहीत कालावधीत जमा केल्यानंतर आयुक्त अशा यशस्वी बोलीदारास अधिनियमाच्या खरेदी प्रमाणपत्रासंबंधीचे मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इत्यादीचा खर्च संबंधित खरेदीदार स्वत: सोसेल. लिलावात खरेदी केलेल्या मालमत्तेचा ताबा घेण्यासाठी (हस्तांतरणासाठी) संबंधीत खरेदीदार योग्य ती कार्यवाही स्वखर्चाने करेल. खरेदीखत मालमत्ता विभागामार्फत केले जाईल.

13. जर यशस्वी बोलीदार कामकाजाच्या तीन दिवसांच्या कालावधीत शिल्लक खरेदी रक्कम महानगरपालिकेस अधिदान करु शकला नाही तर सदर लिलाव अग्राह्य समजला जाईल. आणि अशा यशस्वी बोलीदाराने महानगरपालिकेस अधिदान केलेली अंशत: रक्कम जप्त केली जाईल व सदर रक्कम महानगरपालिकेची मालमत्ता गणण्यात येईल. उक्त तीन कामकाजाचे दिवस हे अधिनियमातील संबंधित तरतूदीनुसार गणले जातील.

14. **लिलाव प्रत्यक्ष ठरलेल्या दिवशी पार नाही पडला तर प्रक्रिया :**
पर्याप्त कारणास्तव आयुक्त अथवा सक्षम अधिकारी लिलाव पुढे ढकलू शकतील. जर लिलावाची जाहीर नोटीस/सूचना दिल्यानंतर लिलाव पुढे ढकलण्यात आला तर अशा लिलावाचा पुढील दिवस निश्चित करुन तो दिवस वृत्तपत्रातून जाहीर नोटीसद्वारे प्रसिध्द करण्यात येईल. परिणामी लिलावाकरिता पुन्हा नव्याने जाहिर नोटीस देण्याची आवश्यकता राहणार नाही.

15. **मालमत्तेची आधारभूत किंमत निश्चित करण्याची पध्दत :**
(अ) महानगरपालिका आयुक्त मालमत्तेची प्रत्यक्ष जागेवरील परिस्थिती, मालमत्ता कराची अदत्त रक्कम, मालमत्तेचा वापर तसेच मालमत्तेची खुल्या बाजारातील विक्रीयोग्य किंमत या सर्व बाबींचा आढावा घेऊन मालमत्तेची राखीव किंमत / घटती राखीव किंमत निश्चित करु शकतील. तसेच मालमत्तेची न्यूनतम किंमत ही शासनमान्य व्हॅल्यूअर यांनी निश्चित केलेल्या रकमेपेक्षा कमी असणार नाही.
(ब) मालमत्तेची लिलाव प्रक्रीयेकरीता येणारा खर्च यामध्ये जाहीर प्रकटनाचा खर्च, शासनमान्य व्हॅल्यूअर ला देण्यात येणारी रक्कम इत्यादी समाविष्ट करुन अदत्त रक्कमेसह वसूल करण्यात येईल.

16. **लिलावातून मिळणारी रक्कम समायोजित करण्याची पध्दत :**
खरेदीदाराने महानगरपालिकेकडे जमा केलेली रक्कम आयुक्त स्विकारतील आणि अशा कारणास्तव उचित प्रकारे परिरक्षित केलेल्या ठेव खात्यात (Deposit Account) जमा करतील. ज्या अदत्त रकमेच्या वसूलीकरिता संबंधित लिलाव करण्यात आला असेल त्या अदत्त रकमेपोटी आवश्यक तेवढी रक्कम या जमा रकमेतून शक्य तेवढ्या लवकर समायोजित करण्यात येईल. लिलावातून आलेल्या रकमेचे समायोजन व उर्वरित रक्कमेबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

17. **खरेदी प्रमाणपत्र :**
(अ) जेव्हा स्थावर/जंगम मालमत्ता विक्री परिपूर्ण झाली असेल तेव्हा खरेदीदाराने आवश्यक ते मुद्रांक वगैरे दस्तऐवज सादर केल्यानंतर विक्री झालेली मालमत्ता आणि विक्री समयी खरेदीदार म्हणून जाहीर केलेल्या व्यक्तीचे नाव नमूद करून प्रमाणपत्र दिले जाईल. सदर प्रमाणपत्रावर विक्री परिपूर्ण झाल्याची तारीख नमूद असेल.
(ब) खरेदीदार मालमत्तेचे सर्व दायित्व खरेदीदाराकडे असेल. तसेच महानगरपालिकेस लिलावाच्या, कराराच्या अटी आणि शर्तीची पूर्तता करतांना उद्भवणा-या सर्व प्रकारच्या कारवाई, सूट, दावे, खर्च (दायित्व), नुकसान, आरोप इत्यादीपासून महानगरपालिकेस सुरक्षित, नुकसानरहीत आणि क्षतीरहीत ठेवील.

18. **शासकीय मालमत्ता वगळून अन्य सर्व :**
औरंगाबाद महानगरपालिका वा तत्सम शासकीय मालकीच्या जमिनीवरील इमारतींच्या बाबतीत लिलाव करतांना केवळ इमारतीचे मालकी हक्क/ इमारती मधील स्वारस्य / अधिकार याचा लिलाव करण्यात येईल आणि जमिनीचा मालकी हक्क संबंधित प्राधिकरणांकडेच राहील. इमारतीच्या मालकी हक्काचे अधिकार, भाडेपट्टा हस्तांतरीत करून घेणे याचे दायीत्व संबंधीत खरेदीदाराचे राहील.

करीता मालमत्ताकराची वसुली प्रभावीपणे व मुदतीत होण्यासाठी तसेच महसुलाचे संरक्षण होण्यासाठी महानगरपालिकेतर्फे विहित प्रक्रिया पुर्ण करुन जप्त करण्यात येणा-या स्थावर/जंगम मालमत्तेची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 466 पोटकलम (1) चे खंड (ब) नुसार विक्री ज्या रीतीने करता येईल त्या उपरोक्त **औरंगाबाद महानगरपालिका द्वारा जप्त स्थावर/जंगम मालमत्ता विक्रीचे नियम 2021**च्या नियम **1** ते 18 ला त्यामधील पोटनियम व नमुना 01 ते 09 नमुन्यांसह मान्यता मिळण्यासाठी उपरोक्त प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

<u>ठराव 228/2021: -</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मालमत्ताकराची वसुली प्रभावीपणे व मुदतीत होण्यासाठी तसेच महसुलाचे संरक्षण होण्यासाठी महानगरपालिकेतर्फे विहित प्रक्रिया पुर्ण करुन जप्त करण्यात येणा-या स्थावर/जंगम मालमत्तेची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 466 पोटकलम (1) चे खंड (ब) नुसार विक्री ज्या रीतीने करता येईल त्या उपरोक्त **औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत जप्त स्थावर/ जंगम मालमत्ता विक्रीचे नियम 2021** च्या नियम 1 ते 18 ला त्यामधील त्यामधील पोटनियम व नमुना 01 ते 09 नमुन्यांसह मान्यता देण्यात येत आहे. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 229/2021:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.01.12.2021)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिकाअधिनियमाचे कलम 127 पोटकलम (1) (अ) मधे महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांना मालमत्ताकर आकारणी करण्याच्या तर कलम 128 मधे मालमत्ताकर वसुल करण्यासाठीच्या तरतुदी दिलेल्या आहेत. अधिनियमातील अनुसुची ड चे प्रकरण ८ (कराधान नियम) चे नियम 42 ते 47 मध्ये थकित कराच्या वसुलीपोटी कसुरदाराची मालमत्ता अटकावणी/जप्त करण्यासाठी अधिपत्र बजावण्याची व पुढील कार्यवाहीची तरतुद व प्रक्रिया नमुद आहे. अधिनियमाचे कलम 466 पोटकलम (1) चे खंड (ब)नुसार, थकीत करापोटी जप्त स्थावर मालमत्तांची विक्री ज्या रीतीने करता येईल ती रीत **औरंगाबाद महानगरपालिका द्वारा जप्त स्थावर मालमत्ता विक्रीचे नियम 2021** मध्ये नमुद असून त्यास स्थायी समिती ठराव क्रमांक:      दिनांक :       नुसार मान्यता देण्यातआलीआहे.

औरंगाबाद महानगरपालिकेत कर निर्धारक व संकलक हे करवसुली विभागाचे विभाग प्रमुख असुन सहाय्यकआयुक्त-झोन कार्यालय हे आपापल्या कार्यक्षेत्रात मालमत्ताकर वसुलीसाठी जबाबदार घटक आहेत. या अर्थी करवसुलीची प्रक्रीया प्रभावीपणे व गतीने पुर्ण करण्यासाठी अधिनियमात नमुद आयुक्तांचे काही अधिकार "कर निर्धारक व संकलक"आणि "सहाय्यकआयुक्त-झोनकार्यालय" यांना प्रदान करणे आवश्यक आहे.

**(अ) करनिर्धारक व संकलक यांना प्रदान करावयाचे अधिकार.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसुची "ड" मधील प्रकरण ८ (कराधान नियम) चे कलम 42 नुसार नमुना-"ह" मधील अधिपत्र तामील करण्याचे आयुक्तांचे अधिकार.

**(ब)सहाय्यकआयुक्त-झोनकार्यालययांना प्रदान करावयाचे अधिकार.**

१.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 128 मधील पोटकलम 1, 3, 4, 6 नुसारच्या सर्व प्रक्रीया पुर्ण करण्याचे आयुक्तांचे अधिकार.

२.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसुची "ड" मधील प्रकरण ८ (कराधान नियम) चे -

अ) नियम46 नुसार नमुना "आय" मधील नोटीस तामील करणे.

ब) नियम 47 (7) नुसार आयुक्ताच्या वतीने लिलावात सहभागी होऊन नाममात्र बोली बोलणे.

क) नियम 42 ते 48 व कलम 52 नुसारच्या सर्व प्रक्रीया पुर्ण करण्याचे आयुक्ताचे अधिकार.

ड) स्थावर मिळकतीचा जप्तीचा आदेश देणे.

इ) जप्त केलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठीची जाहीर नोटीस/प्रकटन देणे.

फ) मालमत्ता विक्रीची नोटीस देणे.

ग) खरेदी प्रमाणपत्र.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 69 पोटकलम 1 व 2 नुसार त्यात नमुद कलमे, पोटकलमे व खंड याखालील आयुक्तांचे अधिकार,कर्तव्ये किंवा कामे हो, आयुक्ताने मा.स्थायी समितीच्या मान्यतेने महानगरपालिका अधिकाऱ्यास प्रदान करण्याची तरतुद आहे. तसेचअधिनियमाचे कलम 466 पोटकलम (1) चे खंड (ब)नुसारऔरंगाबाद महानगरपालिका द्वारा जप्त स्थावर मालमत्ता विक्रीचे नियम 2021 मधील नमुद प्रक्रिया अवलंबिण्यासाठीचे आयुक्तांचे अधिकार "सहाय्यक आयुक्त-झोन कार्यालय" यांना प्रदान करण्यासाठी मा.स्थायी समितीची मान्यता घेणेची तरतुदआहे.

त्यानुसार महानगरपालिका आयुक्ताचे उपरोक्त 'अ' व 'ब'मध्ये दर्शविलेले अधिकार अनुक्रमे "कर निर्धारक व संकलक" यांना पुर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी, तर "सहाय्यकआयुक्त-झोन कार्यालय" यांना त्यांच्या नेमुन दिलेल्या कार्यक्षेत्राच्या मर्यादेपर्यंत वापरण्याचे अधिकार प्रदान करण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळण्यासाठी उपरोक्त प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

<u>ठराव 229/2021:-</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कर वसुलीची प्रक्रीया प्रभावीपणे व गतीने पुर्ण करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 69 पोटकलम 1 व 2 नुसार त्यात नमुद कलमे, पोटकलमे व खंड याखालील आयुक्तांचे अधिकार,कर्तव्ये किंवा कामे ही, आयुक्ताने मा.स्थायी समितीच्या मान्यतेने महानगरपालिका अधिकाऱ्यास प्रदान करण्याचे तरतुदी नुसार तसेच अधिनियमाचे कलम 466 पोटकलम (1) चे खंड(ब) नुसार तयार करण्यात आलेले" औरंगाबाद महानगरपालिकाद्वारा जप्त स्थावर मालमत्ता विक्रीचे नियम

2021 मधील नमुद प्रक्रिया अवलंबिण्यासाठीचे आयुक्तांचे अधिकार सहाय्यक आयुक्त-झोन कार्यालय यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येते.

प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे 'अ' व 'ब' मध्ये दर्शविलेले महानगरपालिका आयुक्तांचेअधिकार अनुक्रमे "कर निर्धारक व संकलक" यांना पुर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी, तर "सहाय्यक आयुक्त-झोन कार्यालय" यांना त्यांच्या नेमुन दिलेल्या कार्यक्षेत्राच्या मर्यादिपर्यंत वापरण्याचे अधिकार प्रदान करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 230/2021:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.02.12.2021)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नियोजित स्व.मा. बाळासाहेब ठाकरे स्मारक व स्मृतीवन उभारणेच्या जागेस संरक्षण भिंत बांधणे या कामाचे ठेकेदार मे.रत्नगुरु कन्स्ट्रक्शन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.21टक्के कमी दराने करुन घेणेस व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणे बाबत.

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | कार्यकारी अभियंता (इमारत व उद्यान) |
| 2. | कामाचे स्वरुप | नियोजित स्व.मा.बाळासाहेब ठाकरे स्मारक व स्मृतीवन उभारणेच्या जागेस संरक्षण भिंत बांधणे. |
| 3. | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे का असल्यास किती रक्कमेचे मान्यतेचा ठराव | मा.सर्वसाधारण ठराव क्र.101/2021 दि.15.03.2021 रु.रु.1,96,00,000/- |
| | त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले | रु.रु.1,64,59,971.39 |
| 4. | ज्या वृत्तपत्रात टेंडर्स जाहिरात देण्यात आली होती त्यांचे नावे व प्रसिध्द दिनांक | महा-ई टेंडर |
| 5. | अ)टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 13.10.2021 ते 25.10.2021 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 03.11.2021 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आलेत | आठ |

(त्यापैकी पात्र टेंडरदाराची माहिती खालील तक्त्यात द्यावी).

| अ.क्र. | ठेकेदाराची नावे | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्राका पेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1. | मे.रत्नगुरु कन्स्ट्रक्शन्स | 1,64,59,971.39 | 21.21 % टक्के कमी दराने |
| 2. | मे.मास्कर कन्स्ट्रक्शनी कंपनी | 1,64,59,971.39 | 19.87 % टक्के कमी दराने |
| 3. | मे.सहारा कन्स्ट्रक्शन्स | 1,64,59,971.39 | 18.00 % टक्के कमी दराने |
| 4. | मे.ईरा इन्फ्रास्ट्रक्चर्स | 1,64,59,971.39 | 17.00 % टक्के कमी दराने |
| 5. | श्री.अनिल पी.वाठोरे | 1,64,59,971.39 | 16.89 % टक्के कमी दराने |
| 6. | मे.समृध्दी कन्स्ट्रक्शन | 1,64,59,971.39 | 15.99 % टक्के कमी दराने |
| 7. | श्री.अतुल एस.निकम | 1,64,59,971.39 | 15.27 % टक्के कमी दराने |
| 8. | मे.डिझाईन फॅक्टरी इंडिया | 1,64,59,971.39 | 14.99 % टक्के कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे मान्यतेचा ठराव? | होय |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | होय |

| | | |
|---|---|---|
| | ज्या वृत्तपत्रात टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | होय |
| 8. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | शासन निर्णयानुसार |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 03.11.2021 |
| 9. | क) निविदेची कितवी वेळ होती? | दुसरी |
| | एकुण किती टेंडर्स आली? | आठ |
| 10. | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | होय |
| तरी विषयांकीत प्रकरणी आठ निविदा प्राप्त असुन यामध्ये प्रथम निम्न देकार मे.रत्नगुरु कन्स्ट्रक्शन यांनी 21.21% टक्के कमी दराने निविदा दाखल केली आहे. तरी मे.रत्नगुरु कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.21% कमी म्हणजेच टेंडर र.रु.1,29,68,811/- पर्यंत काम करून घेण्याच्या मान्यतेस्तव सादर. | | |

**ठराव 230/2021: -**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नियोजीत स्व.मा.बाळासाहेब ठाकरे स्मारक व स्मृतीवन उभारणेच्या जागेस संरक्षण भिंत बांधणे या कामासाठी प्राप्त कमी दराचे निविदा धारक/ठेकेदार मे.रत्नगुरु कन्स्ट्रक्शन यांच्या कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.21% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.1,29,68,811/- पर्यंत करून घेणेस व करार करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 231/2021:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.06.12.2021)

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, शासन निर्णय क.नियोजन विभाग क्र.एनयुएलएम/ 2021/प्र.क्र.4/नवि-24, मंत्रालय, मुंबई-32, दि.12.06.2017 अन्वये स्थानिक स्वराज्य संस्था आर्थिक दृष्ट्या स्वयंपुर्ण व सक्षम होण्यासाठी मालमत्ता कराची वसुली 90 टक्के होणे बंधनकारक आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेची मागील सन 2020-21 या आर्थिक वर्षासाठी मालमत्ता कराची मागणी रु.740 कोटी होती व उद्दिष्ट रु.468.62 कोटी ठेवण्यात आले होते. त्यापैकी रु.107.76 कोटी वसुली झाली आहे. मालमत्ता कर वसुली न होण्यामागे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा अन्वये लागू करण्यात आलेली शास्ती, न्यायालयीन प्रकरणे, मोठे थकबाकीदारांची संख्या व अपुरा कर्मचारी वर्ग असल्याचे दिसून येते.

सन 2021-22 या वर्षासाठी थकबाकी र.रु.743.32 कोटी असून त्यावर विलंब शुल्क रु.19.23 कोटी व अदत्त शास्ती रु 327.64 कोटी अशी एकूण रु.346.87 कोटी शास्तीची रक्कम आहे. तसेच चालू वर्षाची मागणी रु.135.22 कोटी आहे.

सर्व मिळकतीवरील संपूर्ण रक्कम थकबाकीसह दि.28.02.2022 पर्यंत एकरकमी भरल्यास कर भरण्याच्या दिनांकापर्यंत थकबाकीवर आकारण्यात आलेल्या 2 टक्के शास्ती/विलंब शुल्काच्या रक्कमेच्या 75 टक्के रकमेस माफी देणेबाबत आयुक्त, महानगरपालिका यांना अभय योजना जाहीर करण्यासाठी मान्यता मिळणे योग्य होईल. करीता, प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव 231/2021: -**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2021-22 या वर्षासाठी थकबाकी र.रु.743.32 कोटी असून त्यावर विलंब शुल्क रु.19.23 कोटी व अदत्त शास्ती रु.327.64 कोटी अशी एकूण रु.346.87 कोटी शास्तीची रक्कम आहे. तसेच चालू वर्षाची मागणी रु.135.22 कोटी आहे. थकबाकीची रक्कम प्रभावीपणे वसुल होणेकरीता नागरीकांना/मालमत्ताधारकांना प्रोत्साहन मिळावे म्हणुन सर्व मिळकतीवरील संपूर्ण रक्कम थकबाकीसह दि.28.02.2022 पर्यंत एक रकमी भरल्यास कर भरण्याच्या दिनांकापर्यंत थकबाकीवर आकरण्यात आलेल्या 2 टक्के शास्ती/विलंब शुल्काच्या रक्कमेच्या 75 टक्के रकमेस माफी देणेबाबत आयुक्त, महानगरपालिका यांना अभय योजना जाहीर करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 232/2021:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.07.12.2021)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रशासकीय ठराव क्र.149 दि.04.06.2021 नुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सद्यस्थितीत दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-3 संवर्गातील खालील कर्मचाऱ्यांना कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/831 दि.07.06.2021 अन्वये दि.01.06.2021 ते दि.27.11.2021 या कालावधीसाठी तात्पुरत्या नियुक्ती देण्यात आली होती.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांना नाव | पदनाम | कार्यरत विभाग |
|---|---|---|---|
| 1. | श्रीमती जयश्री जयवंतराव झाल्टे | संगणक ऑपरेटर | घरकुल कक्ष |
| 2. | श्री.अरुण रावजी बोडखे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग |
| 3. | श्री.सय्यद फरीदोद्दीन सय्यद गौस | वाहन चालक | यांत्रिकी विभाग |
| 4. | श्री.सतिश राम जाधव | वाहन चालक | यांत्रिकी विभाग |
| 5 | श्री.रविंद्र कौतिकराव पाटील | वाहन चालक | यांत्रिकी विभाग |

उक्त कर्मचाऱ्यांची नियुक्तीची मुदत ही दि.27.11.2021 रोजी संपणार आहे. त्यानुषंगाने सदर कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53(3) च्या परंतुकान्वये 02 दिवसांचा (सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून) तांत्रिक खंड देऊन 06 महिन्यांसाठी दि.01.12.2021 ते दि.29.05.2022 पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

ठराव 232/2021: -

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रशासकीय ठराव क्र.149 दि.04.06.2021 नुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सद्यस्थितीत दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-3 संवर्गातील खालील कर्मचाऱ्यांना कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/831 दि.07.06.2021 अन्वये दि.01.06.2021 ते दि.27.11.2021 या कालावधीसाठी तात्पुरत्या नियुक्ती देण्यात आली होती.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांना नाव | पदनाम | कार्यरत विभाग |
|---|---|---|---|
| 6. | श्रीमती जयश्री जयवंतराव झाल्टे | संगणक ऑपरेटर | घरकुल कक्ष |
| 7. | श्री.अरुण रावजी बोडखे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग |
| 8. | श्री.सय्यद फरीदोद्दीन सय्यद गौस | वाहन चालक | यांत्रिकी विभाग |
| 9. | श्री.सतिश राम जाधव | वाहन चालक | यांत्रिकी विभाग |
| 10 | श्री.रविंद्र कौतिकराव पाटील | वाहन चालक | यांत्रिकी विभाग |

उक्त कर्मचाऱ्यांची नियुक्तीची मुदत ही दि.27.11.2021 रोजी संपणार आहे. त्यानुषंगाने सदर कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53(3) च्या परंतुकान्वये 02 दिवसांचा (सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून) तांत्रिक खंड देऊन 06 महिन्यांसाठी दि.01.12.2021 ते दि.29.05.2022 पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्याबाबतचा प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

प्रस्ताव क्रमांक 233/2021:- (प्रशासकीय प्रस्ताव दि.09.12.2021)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील विविध स्मशानभुमी मध्ये लाकडाचा वापर करून मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात येतात. यासाठी लाकूड उपलब्ध करतांना मोठ्या प्रमाणात वृक्ष तोड होते. त्याचा पर्यावरणावर परिणाम होतो.

हवामानातील तीव्र बदलांना रोखण्यासाठी जागतीक पातळीवरील राबविण्यात येणाऱ्या "रेस टू झिरो" या अभियानाअंतर्गत औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रासह राज्यातील 43 प्रमुख शहरांचा समावेश करण्यात आलेला आहे. संयुक्त राष्ट्राच्या हवामान बदल तज्ञ समितीची COP-26 जागतीक हवामान बदल परिषद ग्लासगो येथे संपन्न झाली. रेस टू झिरो मध्ये सहभागी होणे हे हवामान बदला विरोधात जगाने सुरु केलेल्या लढ्यातील योगदान आहे. कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमी करणे तसेच मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यासाठी लाकडाचा वापर केल्यामुळे होणारा वृक्षतोड थांबविता यावी यासाठी लाकडा ऐवजी ब्रिकेट्स (Briquettes/गट्टू) चा वापर करण्याची बाब समोर आली.

ब्रिकेट्स तयार करतांना शेतकऱ्यांच्या शेतातील गव्हाचा भुसा, मक्याचे कणीस, कपाशीच्या फसाड्या इ.चा वापर होतो. सदर साहित्य ब्रिकेट्स तयार करण्यासाठी उत्पादकांतर्फे विकत घेतल्यामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा होतो. सदर साहित्य शेतकरी शेतात जाळून टाकतात. त्यामुळे प्रदुषण होते. ब्रिकेट्स वापरामुळे प्रदुषणारा आळा बरोबर त्याच ग्रामीण भागात रोजगार निर्मिती व्हावी या दृष्टीने कृषी अवशेषांपासून ब्रिकेट्स/पेलेट/कांडी कोळसा सयंत्र उभारण्यास शासन निर्णय क्र.अपाऊ-2011/प्र.क्र.120/उर्जा-7 उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-32 दि.26.09.2012 द्वारे मान्यता प्राप्त आहे.

या अनुषंगाने दि.21.01.2021 रोजी मृतदेहावर सिडको एन-6 स्मशानभूमीत प्रायोगीक स्वरुपात ब्रिकेट्स (Briquettes/गट्टू) चा वापर करुन अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. सदर प्रायोगीक वापरानंतर मोठ्या स्तरावर लाकडाऐवजी ब्रिकेट्स (Briquettes/गट्टू) चा वापर करण्याबाबी धोरणात्मक निर्णय

घेण्यासाठी गठीत केलेल्या समितीने औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील सर्व स्मशानभुमी मध्ये मृतदेहावर दहन संस्कारासाठी लाकडाऐवजी ब्रिकेट्स (Briquettes/गट्टू) चा वापर करण्यासाठी जा.क्र.मनपा/ श.अ./ 2021/25 दि.22.04.2021 अन्वये शिफारस केली आहे.

उक्त निर्णयानुसार ब्रिकेट्स (Briquettes/गट्टू) खरेदी करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या. प्राप्त दोन निविदापैकी मे.पंजाब रिनिव्हेबल एनर्जी सिस्टीम प्रा.लि. नवी मुंबई या निविदाकाराचे तांत्रिक निविदापात्र निविदा पात्र ठरले. तसेच संबंधीतांचे ब्रिकेट्सचे नमुने निविदेतील स्पेसिफिकेशन नुसार असल्याचा अहवाल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पर्यावरण विज्ञानविभागाचा अहवाल प्राप्त झाला आहे.

वरील प्रमाणे प्राप्त पुरवठादार मे.पंजाब रिनिव्हेबल एनर्जी सिस्टीम प्रा.लि. नवी मुंबई यांची ब्रिकेट्स नमुने संदर्भाने प्राप्त अहवाल विचारात घेऊन संबंधीतांचे वाणिज्यीक देकार (Commerical bid) देकार उघडण्यात आले. प्राप्त देकारानुसार मे.पंजाब रिनिव्हेबल एनर्जी सिस्टीम प्रा.लि. नवी मुंबई यांचे दर रु.7.84 कि.ग्रॅ. (सर्व करांसह) प्राप्त झाले आहे. प्रकरणी प्राप्त झालेल्या दराच्या अनुषंगाने वाटाघाटी केल्या असता, दरवाटाघाटी अंती दरपृथ:करणासह संबंधीतानी रु.7.75 प्रति कि.ग्रॅ. (सर्व करांसाह) या दराने ब्रिकेट्स चा पुरवठा करण्यास तयारी दर्शविली आहे.

निविदेतील अटी/शर्ती मधील अट क्र.17 (n) नुसार निविदाकाराचे मंजुर दर पहिल्या दोन वर्षाकरीता बंधन कारक राहतील. दर दोन वर्षांनी या मंजुर दरांना 10 टक्के वाढ अनुज्ञेय राहील. त्यानुसार पुढील पाच वर्षासाठी लागू होणारे दर खालील प्रमाणे राहतील.

| वर्ष | मंजुर दर-सर्वकरांसह (प्रति कि.ग्रॅ) | शेरा |
|---|---|---|
| पहिले | रु.7.75 | वाटाघाटी अंती अंतिम केलेले दर |
| दुसरे | रु.7.75 | वरीलप्रमाणे दर लागु |
| तिसरे | रु.8.53 | मंजुर निविदेतील 10 टक्के वाढ करून आलेले दर |
| चौथे | रु.8.53 | वरीलप्रमाणे तिसऱ्या वर्षाचे दर लागु |
| पाचवे | रु.9.30 | मंजुर निविदेत 20 टक्के वाढ करून आलेले दर. |

महानगरपालिकेतील मृत्यु नोंद रजिस्टर नुसार सन-2017 पासून प्रति वर्षी झालेल्या मृत्युची नोंद खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | मृतांची संख्या | दाहसंस्कार झालेले | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2017 | 7216 | 5556 | दाहसंस्कार झालेल्या प्रेतांची वर्षनिहाय प्रत्यक्ष नोंद आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडे उपलब्ध नाही. तथापि मार्च 2021 मध्ये प्रत्यक्ष संख्येनुसार साधारणत: 77 टक्के प्रेतांवर दाहसंस्कार करण्यात आलेले आहे. या आधारावर दाहसंस्कार झालेल्या प्रेतांची संख्या गृहीत धरण्यात आली आहे. |
| 2 | 2018 | 8224 | 6332 | |
| 3 | 2019 | 8352 | 6431 | |
| 4 | 2020 | 11165 | 8597 | |
| 5 | 2021 [illegible] | 12506 | 9629 | |

वरील प्रमाणे, दाहसंस्कार झालेल्या प्रेतांची संख्या विचारात घेता प्रती वर्षी 10,000 प्रेतांवर दाहसंस्कार होतील असे गृहीत धरून प्रत्येक प्रेतासाठी साधारणत: 300 कि.ग्रॅ.चा वापर होईल यानुसार मंजुर झालेल्या निविदा दरानुसार पाच वर्षासाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| वर्ष | प्रेतांची अंदाजे संख्या | दाहसंस्कारासाठी आवश्यक ब्रिकेट्स (प्रति प्रेत 300 कि.ग्रॅ.नुसार) | मंजुर दर सर्वकरांसह (प्रति कि.ग्रॅ.) | अंदाजे खर्च (रु.) |
|---|---|---|---|---|
| पहिले | 10000 | 3000000 | रु.7.75 | 23250000.00 |
| दुसरे | 10000 | 3000000 | रु.7.75 | 23250000.00 |
| तिसरे | 10000 | 3000000 | रु.8.53 | 25590000.00 |
| चौथे | 10000 | 3000000 | रु.8.53 | 25590000.00 |
| पाचवे | 10000 | 3000000 | रु.9.30 | 27900000.00 |
| पाच वर्षासाठी अंदाजे अपेक्षीत खर्च रु.12,55,80,000.00 | | | | |

संबंधीत पुरवठादार यांनी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील विविध स्मशानभुमी मध्ये असलेल्या लोखंडी पिंजऱ्यामध्ये ब्रिकेट्स वापरासाठी आवश्यक बदल (cage Modification) करण्याची बाब निविदेत समाविष्ट आहे. त्यानुसार संबंधीतांनी Cage Modifiacation ची कामे करणे अनिवार्य आहे.

सद्यस्थितीत ज्या प्रमाणे दाहसंस्कारासाठी लाकडाचा पुरवठा स्मशानजोगी यांच्या मार्फत करण्यात येतो व त्याची रक्कम मृतांचे नातेवाईक स्मशानजोगी यांना परस्पर करतात, त्याच धर्तीवर ब्रिकेट्सचा पुरवठा हा स्मशानभुमी मधील स्मशानजोगी यांच्याकडे करून महानगरपालिकेने मंजुर केलेल्या दरानुसार रक्कम संबंधीतांकडून पुरवठादार यांना देणे अपेक्षीत आहे. महानगरपालिका फक्त संबंधीत स्मशानजोगी यांना दाहसंस्कारासाठी ब्रिकेट्स उपलब्ध करून देण्यासाठी दराची निश्चित करून देत आहे. पुरवठादाराची नियुक्ती झाल्यानंतर पुढील संपुर्ण कार्यवाही आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्फत करण्यात येईल.

करीता, उक्त नमुद प्रमाणे मे.पंजाब रिनिव्हेबल एनर्जी सिस्टीम प्रा.लि. नवी मुंबई यांचे वाटाघाटीअंती मंजुरी झालेले दर रु.7.75 प्रति कि.ग्रॅ. सर्व करांसह आणि दर दोन वर्षांनी 10 टक्के दरवाढीच्या दराचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव 233/2021: -**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हवामानातील तीव्र बदलांना रोखण्यासाठी जागतीक पातळीवरील राबविण्यात येणाऱ्या रेस टु झिरो या अभियानांअंतर्गत औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रासह राज्यातील 43 प्रमुख शहरांचा समावेश करण्यात आलेला आहे संयुक्त राष्ट्राच्या हवामान बदल तज्ञ समितीची COP-26 जागतीक हवामान बदल परिषद ग्लासगो येथे संपन्न झाली. रेस टु झिरो मध्ये सहभागी होणे हे हवामान बदला विरोधात जगाने सुरु केलेल्या लढ्यातील योगदान आहे. कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमी करणे तसेच मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्यासाठी लाकडाचा वापर केल्यामुळे होणारा वृक्षतोड थांबविता यावी यासाठी लाकडाऐवजी ब्रिकेट्स (Briquettes/गट्टु) चा वापर करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात येतो. औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील सर्व स्मशानभुमी मध्ये अंत्यसंस्कारासाठी लाकडा ऐवजी ब्रिकेट्स (Briquettes/गट्टु) चा वापर करण्यासाठी निविदा क्रमांक 2021-AMCA-692964-2 ब्रिकेट्स खरेदी करण्यासाठी मागविलेल्या निविदेतील पात्र निविदाधारक मे.पंजाब रिनिव्हेबल एनर्जी सिस्टीम प्रा.लि.,नवी मुंबई यांच्या दरवाटाघाटी अंती निश्चित केलेल्या र.रु.7.75 प्रति कि.ग्रॅ.(सर्व करांसह) या दरास तसेच दर दोन वर्षांनी मंजुर दरात 10 टक्के वाढीस मान्यता देण्यात येते. महानगरपालिकेतील मृत्यु नोंद रजिस्टर नुसार प्रती वर्षी 10,000 प्रेतांवर दाहसंस्कार होतील असे गृहीत धरुन प्रेतासाठी साधारणतः 300 कि.ग्रॅ. ब्रिकेट्स चा वापर होईल यानुसार मंजुर झालेल्या निविदा दरानुसार पाच वर्षासाठी अपेक्षीत खर्च रु.12,55,80,000/- ला मान्यता देण्यात येते. सदर पुरवठादाराची नियुक्ती झाल्यानंतर पुढील संपुर्ण कार्यवाही आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत करण्यात यावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 234/2021:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.10.12.2021)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे नियम 79 (ब) अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे शहागंज येथील 50 ओट्यांचे फिश मार्केट खाजगी संस्थेस 15 वर्षाच्या कालावधीसाठी चालविण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता, तिसऱ्या वेळेरा 2 निविदा प्राप्त झाल्या आहेत. तुलनात्मक दृष्टिने महानगरपालिकेच्या दरानुसार मे.सेवा फिश ट्रेडिंग, बारी कॉलनी, औरंगाबाद यांची दर जास्त होते. त्यासाठी दि.11.11.2021 रोजी वाटाघाटीसाठी संबंधीत संस्थेस बोलाविण्यात आले. वाटाघाटी नंतरचे दर र.रु.4,50,000/- प्रमाणे दरवर्षी 10 टक्के नैसर्गिक भाडेवाढ करण्यासाठी संमती होऊन निर्णय झालेला आहे. उक्त निर्णयानुसार मे.सेवा फिश ट्रेडिंग, बारी कॉलनी, औरंगाबाद यांना प्रतिवर्षी र.रु.4,50,000/- दरवर्षी 10 टक्के नैसर्गिक भाडेवाढ करून भाडे तत्वावर देणेसाठी प्रशासकीय प्रस्ताव मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव 234/2021: -**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे नियम 79 (ब) अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे शहागंज येथील 50 ओट्यांचे फिश मार्केट खाजगी संस्थेस 15 वर्षाच्या कालावधीसाठी चालविण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता तिसऱ्या वेळेस 2 निविदा प्राप्त झाल्या आहेत. तुलनात्मक दृष्टिने महानगरपालिकेच्या दरानुसार मे.सेवा फिश ट्रेडिंग, बारी कॉलनी, औरंगाबाद यांचे दर जास्त होते.

त्यासाठी दि.11.11.2021 रोजी वाटाघाटी साठी संबंधीत संस्थेस बोलाविण्यात आले, वाटाघाटी नंतरचे दर र.रु.4,50,00/- प्रमाणे दरवर्षी 10 टक्के नैसगिक भाडेवाढ करण्यासाठी संमती होऊन निर्णय झालेला आहे. उक्त निर्णयानुसार मे.सेवा फिश ट्रेडिंग, बारी कॉलनी, औरंगाबाद यांना प्रतिवर्षी र.रु.4,50,000/- दरवर्षी 10 टक्के नैसर्गिक भाडेवाढ करून भाडे तत्वावर देणेसाठी प्रशासकीय मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 235/2021:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.10.12.2021)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे नियम 79 (ब) (क) अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे मोहल्ला नंदनवन कॉलनी येथील महानगरपालिकेची प्राथमिक शाळेची इमारत अध्यक्ष, छत्रपती श्री शाहू टेक्निकल इंस्टिट्यूट ॲण्ड कॉलेज, औरंगाबाद यांच्या संत विश्रामबाबा शाळेसाठी ठराव क्र.131 दि.20.01.11 अन्वये सदरील शाळेच्या इमारतीचे क्षेत्रफळ 379.12 चौ.मी.साठी प्रतिमाह भाडे र.रु.5000/- प्रमाणे भाडे आकारणी करून वार्षिक भाडे रु.60,000/-व इतर आकारणीच्या अटीस अधिन राहून भाडेतत्वावर देण्यात आली होती. त्याची करारनामा मुदत संपलेली असल्याने सदर शाळेमध्ये 90 टक्के मागासवर्गीय विद्यार्थी हे विना मुल्य शिक्षण घेत असल्याने उक्त इमारतीस वार्षिक भाडे र.रु.1,00,000/- व इतर कर वेगळे आकारणी करून तसेच दर तीन वर्षाला 10 टक्के नैसर्गिक भाडेवाढ करणेच्या अटीस अधीन राहून पुढील 10 वर्षाच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर देणेसाठीचा प्रस्ताव विचारार्थ तथा योग्य त्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव 235/2021: -**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे नियम 79 (ब) (क) अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे मोहल्ला नंदनवन कॉलनी येथील महानगरपालिकेची प्राथमिक शाळेची इमारत अध्यक्ष, छत्रपती श्री शाहू टेक्निकल इंस्टिट्युट ॲण्ड कॉलेज, औरंगाबाद यांच्या संत विश्रामबाबा शाळेसाठी ठराव क्र.131 दि.20.01.11 अन्वये सदरील शाळेच्या इमारतीचे क्षेत्रफळ 379.12 चौ.मी.साठी प्रतिमाह भाडे र.रु.5000/- प्रमाणे भाडे आकारणी करून वार्षिक भाडे रु.60,000/-व इतर आकारणीच्या अटीस अधिन राहून भाडेतत्वावर देण्यात आली होती. त्याची करारनामा मुदत संपलेली असल्याने सदर शाळेमध्ये 90 टक्के मागासवर्गीय विद्यार्थी हे विना मुल्य शिक्षण घेत असल्याने उक्त इमारतीस वार्षिक भाडे र.रु.1,00,000/- व इतर कर वेगळे आकारणी करून तसेच दर तीन वर्षाला 10 टक्के नैसर्गिक भाडेवाढ करणेच्या अटीस अधीन राहून पुढील 10 वर्षाच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर देणेसाठी मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 236/2021:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.10.12.2021)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे नियम 79 (ब) अन्वये हडको, एन-12 येथील टाटा स्टेडियम, सिडको कार्यालयाने सचिव मौलाना आझाद या संस्थेस दि.29.08.2005 रोजी वार्षिक भाडे आकारणी करून शैक्षणिक वापरासाठी दिलेले होते. परंतु सन-2006 मध्ये सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतर झालेले असल्याने व संस्थेची मुदत संपलेली असल्याने सचिव मौलाना आझाद या संस्थेने महानगरपालिकेकडे रितसर प्रस्ताव देऊन हडको, एन-12 येथील टाटा स्टेडियम पुढील 10 वर्षासाठी शैक्षणिक वापराकरीता भाडेतत्वावर देणेसाठी विनंती केली आहे.

त्यानुसार प्रशासकीय ठराव क्र.160/2021 दि.28.06.2021 अन्वये शैक्षणिक संस्थेस क्रिडांगण भाडेतत्वावर प्रतीमाह भाडे रु.1000/- प्रमाणे देणेसाठी ठराव पारित झालेला आहे. त्यानुसार सदर क्रिडांगणाचे क्षेत्रफळ 1.68 आर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी प्रतिमाह भाडे रु.1000/- प्रमाणे वार्षिक भाडे रु.12,000/- त्यावर 18 टक्के जी.एस.टी.रु.1460/- असे एकत्रित र.रु.14,160/- आकारणी पुढील 10 वर्षासाठी भाडेतत्वावर देणेसाठी प्रशासकीय प्रस्ताव मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव 236/2021: -**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे नियम 79 (ब) अन्वये हडको, एन-12 येथील टाटा स्टेडियम, सिडको कार्यालयाने सचिव मौलाना आझाद या संस्थेस दि.29.08.2005 रोजी वार्षिक भाडे आकारणी करून शैक्षणिक वापरासाठी दिलेले होते. परंतु सन-2006 मध्ये सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतर झालेले असल्याने व संस्थेची मुदत संपलेली असल्याने सचिव मौलाना आझाद या संस्थेने महानगरपालिकेकडे रितसर प्रस्ताव देऊन हडको, एन-12 येथील टाटा स्टेडियम पुढील 10 वर्षासाठी शैक्षणिक वापराकरीता भाडेतत्वावर देणेसाठी विनंती केली आहे.

त्यानुसार प्रशासकीय ठराव क्र.160/2021 दि.28.06.2021 अन्वये शैक्षणिक संस्थेस क्रिडांगण भाडेतत्वावर प्रतीमाह भाडे रु.1000/- प्रमाणे देणेसाठी ठराव पारित झालेला आहे. त्यानुसार सदर क्रिडांगणाचे क्षेत्रफळ 1.68 आर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी प्रतिमाह भाडे रु.1000/- प्रमाणे वार्षिक भाडे रु.12,000/- त्यावर 18 टक्के जी.एस.टी.रु.1460/- असे एकत्रित र.रु.14,160/- आकारणी पुढील 10 वर्षासाठी भाडेतत्वावर देणेसाठी मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 237/2021:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.10.12.2021)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे नियम 79 (ब) अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेच्या मंजुर रेखांकनातील श्रेयनगर येथील हनुमान मंदिरासमोरील सभागृह श्रेयनगर उत्कर्ष मंडळ या संस्थेस मा.स्थायी समिती सभा दि.16.01.2007 रोजी संपन्न झालेल्या सभेतील ठराव क्र.317 दि.20.03.2007 अन्वये प्रतीमाह भाडे रु.1000/- प्रमाणे भाडेतत्वावर देण्यात आले होते.

तसेच संस्थेची मुदत संपलेली असल्याने पुढील मुदतवाढ मिळण्यासाठी संस्थेने विनंती केली आहे. त्यास प्रशासकीय मान्यता झालेली असल्याने पुर्वीच्या करारनाम्यातील अटी शर्तीनुसार तीन वर्षांनी 15 टक्के नैसर्गिक भाडेवाढ करून वार्षिक भाडे र.रु.20,989/-, सेवा कर रु.5965/- त्यावर 18 टक्के जी.एस.टी. आकारणी करुन पुढील तीन वर्षांच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर देणेबाबत मान्यता झालेली असल्याने सदर सभागृह भाडेतत्वावर देणेसाठी प्रशासकीय प्रस्ताव मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव 237/2021: -**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे नियम 79 (ब) अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेच्या मंजुर रेखांकनातील श्रेयनगर येथील हनुमान मंदिरासमोरील सभागृह श्रेयनगर उत्कर्ष मंडळ या संस्थेस मा.स्थायी समिती सभा दि.16.01.2007 रोजी संपन्न झालेल्या सभेतील ठराव क्र.317 दि.20.03.2007 अन्वये प्रतीमाह भाडे रु.1000/- प्रमाणे भाडेतत्वावर देण्यात आले होते.

तसेच संस्थेची मुदत संपलेली असल्याने पुढील मुदतवाढ मिळण्यासाठी संस्थेने विनंती केली आहे. त्यास प्रशासकीय मान्यता झालेली असल्याने पुर्वीच्या करारनाम्यातील अटी शर्तीनुसार तीन वर्षांनी 15 टक्के नैसर्गिक भाडेवाढ करून वार्षिक भाडे र.रु.20,989/-, सेवा कर रु.5965/- त्यावर 18 टक्के जी.एस.टी. आकारणी करुन पुढील तीन वर्षांच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर देणेबाबत मान्यता झालेली असल्याने सदर सभागृह भाडेतत्वावर देणेसाठी मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 238/2021:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.13.12.2021)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे 53 (1) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन औरंगाबाद महानगरपालिकेकडे तांत्रिक संवर्गातील अधिकाऱ्यांची पदे रिक्त असून शहर अभियंता या पदावर पदोन्नतीने नेमणुक करण्यासाठी महानगरपालिकेत कार्यकारी अभियंता या संवर्गात एकही अधिकारी उपलब्ध नाही. तसेच औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामे/ महत्वाकांक्षी प्रकल्प पुर्ण करण्यासाठी अनुभवी अधिकाऱ्यांची उणीव भासु नये, यासाठी प्रशासकीय ठराव क्र.166 दि.30.06.2021 नुसार श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता (सेवानिवृत्त) यांना दि.01.07.2021 ते दि.31.12.2021 या सहा महिन्याच्या कालावधीसाठी शहर अभियंता या पदावर नेमणुक देण्यासाठी शासन मान्यतेच्या अधिन राहून कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/946 दि.30.06.2021 अन्वये नेमणुक देण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने जा.क्र./मनपा/आस्था-1/2021/947 दि.30.06.2021 च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असता, नगर विकास विभागाचे शासन निर्णय क्र.औमपा 2021/प्र.क्र.219/नवि-24, दि.02.09.2021 नुसार श्री.एस.डी.पानझडे, यांना महानगरपालिकेतील कामासाठी सेवानिवृत्तीनंतर सहा महिन्याच्या कालावधीसाठी शहर अभियंता या पदावर नेमणुक देण्याबाबत जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/947 दि.30.06.2021 अन्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. तथापि, दि.30.06.2021 च्या आदेशाची मुदत दि.31.12.2021 रोजी संपणार असून श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता यांच्या सेवेची कार्यालयास आवश्यकता आहे.

शहर अभियंता व कार्यकारी अभियंता या रिक्त पदांवर प्रतिनियुक्तीने अधिकारी पाठविणेबाबत शासनास दि.22.01.2021 व दि.06.05.2021 रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे.

महानगरपालिका अंतर्गत तांत्रिक विभाग हे कार्यान्वयन व अंमलबजावणी करणारा विभाग असून शहरातील विविध महत्वाच्या योजना, प्रकल्प राबविणे, विकासाची कामे करणे, नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण

करणे इ.ची जबाबदारी तांत्रिक संवर्गावर येऊन पडते. भारतीय राज्य घटनेतील अनुसुची 12 मध्ये नमुद स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कर्तव्यांपैकी बहुतांश कर्तव्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही तांत्रिक विभागाची आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे महत्वपुर्ण आणि महत्वाकांक्षी प्रकल्प पुर्ण करण्यासाठी सक्षम तांत्रिक अधिकारी असणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत कामे पार पाडण्याची जबाबदारी उपलब्ध तांत्रिक कर्मचाऱ्यावर अतिरिक्त स्वरुपात पदभार सोपवून काम करून घेण्यात येत आहे. पर्यायाने या अतिरिक्त पदभाराचा ताण संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांच्या वर निर्माण होत आहे. तांत्रिक बाबींच्या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत असलेल्या कामाचे स्वरुप पाहता उदा: भविष्यात औरंगाबाद शहरासाठी रु.1680 कोटीची वाढीव पाणी पुरवठा योजना यशस्वी पणे राबविण्यासाठी महापालिकेच्या आस्थापनेवरील जाणकार आणि अनुभवी तांत्रिक अधिकाऱ्यांची फळी अत्यंत आवश्यक आहे.

सध्या कार्यरत शहर अभियंता श्री.एस.डी.पानझडे, यांची कोव्हीड संबंधी करावयाच्या उपाय योजना/ सोयी सुविधा आदी साठी नोडल अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली असून नियुक्त झाल्यापासून ते आजपर्यंत काम करत आहेत.

कोव्हीड-19 या साथरोग विरोधी प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी तसेच विकास कामांचे/महत्वाकांक्षी प्रकल्प पुर्ण करण्यासाठी अनुभवी अधिकाऱ्यांची आवश्यकता आहे

शहर अभियंता या पदाची नेमणूक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम (४५) नुसार केल्या जाते. कलम ४५ (५) नुसार या कलमात विनिर्दिष्ट केलेल्या शहर अभियंता पदाची जागा रिकामी झाल्यास ज्या तारखेस ती रिकामी झाली आहे त्या तारखेपासून चार महिन्याच्या आत महानगरपालिकेने अथवा शासनाचे आदेश मिळाल्यापासून ३० दिवसाच्या आत महानगरपालिकेने त्या जागी दुसऱ्या व्यक्तीची नेमणूक केली पाहिजे अशी तरतुद आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण चार मधील पोट-कलम ४५(६) मध्ये पुढीलप्रमाणे तरतुद आहे. 'पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (५) अन्वये नेमणुकीची व्यवस्था होईपर्यंत,महानगरपालिकेस एखाद्या व्यक्तिची नेमणूक करुन ती जागा तात्पुरती भरता येईल आणि अशा रीतीने नेमणूक केलेल्या व्यक्तिला पोट-कलम (३) अन्वये त्या वेळी निश्चित केलेल्या कमाल मर्यादेहून अधिक नसेल इतके महानगरपालिकेस योग्य वाटेल असे मासिक वेतन व भत्ते मिळतील असा निदेश देता येईल:

परंतु, अशी कोणतीही नेमणूक, ज्या तारखेस ती जागा रिकामी झाली असेल त्या तारखेपासुन सहा महिन्यांहून अधिक मुदतीसाठी करता येणार नाही किंवा ती अशा तारखेपासून सहा महिने झाल्यानंतर करता येणार नाही. अशी तरतुद आहे'.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५४(२) मध्ये पुढीलप्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे. 'आधीच नगरपालिका सेवेत असलेल्या व्यक्तींमधून नेमणूक करण्याचे योजले असेल त्याव्यतिरिक्त किंवा नेमणूक तात्पुरत्या स्वरुपाची असून सहा महिन्यांपेक्षा अधिक काळासाठी नसेल तर, कर्मचारी निवड समितीने नियमांद्वारे विहित केलेल्या रीतीने कलम ५३, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या नेमणुकांव्यतिरिक्त व महानगरपालिका (राज्य) शासनाच्या पूर्वमंजुरीने आदेशाद्वारे याबाबत विनिर्दिष्ट करील अशा नेमणुकांव्यतिरिक्त नगरपालिका सेवेतील अन्य सर्व नेमणुकांसाठी उमेदवारांची निवड केली पाहिजे.'

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) मध्ये पुढीलप्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे. 'महानगरपालिकेचा जो अधिकारी सहायक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे. - मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्याची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित असेल'

परंतु, आयुक्ताला (महानगरपालिकेच्या सहायक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या) कर्जविषयक कामासाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी

नेमणुका सहा महिन्यांहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पूर्वमंजुरीने या अटीवर करता येईल की, आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणूक करताना त्याविषयी महानगरपालिकेस तात्काळ कळविले पाहिजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पूर्वमंजुरीवाचून अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.'

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५(१),४५(७),५३(१) व ५४(२) मध्ये उपरोक्त प्रमाणे तरतूद उपलब्ध आहे.

संबंधीतांना दरमहा सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरून) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल.

करीता. श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता, (सेवानिवृत्त) यांनाकोव्हीड संबंधी करावयाच्या उपाययोजना/सोयीसुविधा इ.साठी नोडल अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली असून कोव्हीड-19 ची संबंधी करावयाच्या उपाययोजना/सोयीसुविधा इ.साठी करणे तसेच महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकासकामे/ महत्वाकांक्षी प्रकल्प पुर्ण करण्यासाठी श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता (सेवानिवृत्त) यांना दि.01.01.2022 ते दि.30.06.2022 या 06 महिन्यांच्या कालावधीसाठी दि.30.06.2021 च्या आदेशात नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून शहर अभियंता या पदावर नेमणुक देण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव 238/2021: -</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहर अभियंता व कार्यकारी अभियंता या रिक्त पदांवर प्रतिनियुक्तीने अधिकारी पाठविण्याबाबत शासनास दि.22.01.2021 व दि.06.05.2021 रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे.

महानगरपालिका अंतर्गत तांत्रिक विभाग हा कार्यान्वयन व अंमलबजावणी करणारा विभाग असून शहरातील विविध महत्वाच्या योजना प्रकल्प राबविणे, विकासाची कामे करणे, नागरीकांच्या तक्रारींचे निरसण करणे इ.ची जबाबदारी तांत्रिक संवर्गावर येऊन पडते. भारतीय राज्य घटनेतील अनुसुची 12 मध्ये नमुद स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कर्तव्यांपैकी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही तांत्रिक विभागाची आहे.

प्रशासकीय ठराव क्र.166 दि.30.06.2021 नुसार श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता (सेवानिवृत्त) यांना दि.01.07.2021 ते दि.31.12.2021 या सहा महिन्याच्या कालावधीसाठी शहर अभियंता या पदावर नेमणुक देण्यासाठी शासन मान्यतेच्या अधिन राहून कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/946 दि.30.06.2021 अन्वये नेमणुक देण्यात आलेली आहे.

त्यानुषंगाने जा.क्र./मनपा/आस्था-1/2021/947 दि.30.06.2021 च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असता, नगर विकास विभागाचे शासन निर्णय क्र.औमपा/2021/प्र.क्र.219/नवि-24 दि.02.09.2021 श्री.एस.डी.पानझडे यांना महानगरपालिकेतील कामासाठी सेवानिवृत्तीनंतर सहा महिन्यांच्या कालावधीसाठी शहर अभियंता या पदावर नेमणुक देण्याबाबत जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/947 दि.30.06.2021 अन्वये शासनास सादर केलेला प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. तथापि, दि.30.06.2021 च्या आदेशाची मुदत दि.31.12.2021 रोजी संपणार असून श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता यांच्या सेवेची कार्यालयास आवश्यकता आहे.

करीता. श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता, (सेवानिवृत्त) यांनाकोव्हीड संबंधी करावयाच्या उपाययोजना/सोयीसुविधा इ.साठी नोडल अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली असून कोव्हीड-19 ची संबंधी करावयाच्या उपाययोजना/सोयीसुविधा इ.साठी करणे तसेच महानगरपालिक क्षेत्रातील विविध विकासकामे/महत्वाकांक्षी प्रकल्प पुर्ण करण्यासाठी श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता (सेवानिवृत्त) यांना दि.01.01.2022 ते दि.30.06.2022 या 06 महिन्यांच्या कालावधीसाठी दि.30.06.2021 च्या आदेशात नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहुन शहर अभियंता या पदावर नेमणुक देण्यासाठी शासन मान्यतेच्या अधिन राहुन मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 239/2021</u>:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.13.12.2021)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/704 दि.07.05.2021 अन्वये महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेसाठी पाणी पुरवठा प्रकल्पासाठी रु.1680.50 कोटीच्या योजनेस मंजुर केलेल्याप योजनेची

प्रभावी अंमलबजावणीसाठी स्थापन केलेल्या प्रकल्प व्यवस्थापन युनिट (PMU) मध्ये कार्यकारी अभियंता म्हणुन काम करण्यासाठी या विवक्षित कामाकरीता श्री.हेमंत आनंदा कोल्हे, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांची सेवा विहित अटी वशर्तीच्या अधिन राहून प्रथमत: 06 महिन्याच्या कालावधीकरीता करार पध्दतीने, सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरून) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रकमेची कमाल मासिक मर्यादा रु.40,000/- (रुपये चाळीस हजार) इतक्या मर्यादेत राहील. या अटीवर घेण्यात आलेली आहे.

तथापि, उक्त आदेशानुसार सदरची मुदत ही दि.02.11.2021 रोजी संपलेली असून सदरचे काम प्रगतीपथावर असून सदर कामासाठी श्री.हेमंत आनंदा कोल्हे, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांच्या सेवेची कार्यालयास आवश्यकता आहे.

करीता, श्री.हेमंत आनंदा कोल्हे, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांना दि.06.11.2021 पासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी दि.07.05.2021 च्या आदेशात नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून नेमणुक देण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

<u>ठराव 239/2021: -</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/704 दि.07.05.2021 अन्वये महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेसाठी पाणी पुरवठा प्रकल्पासाठी रु.1680.50 कोटीच्या योजनेस मंजुर केलेल्या योजनेची प्रभावी अंमलबजावणीसाठी स्थापन केलेल्या प्रकल्प व्यवस्थापन युनिट (PMU) मध्ये कार्यकारी अभियंता म्हणुन काम करण्यासाठी या विवक्षित कामाकरीता श्री.हेमंत आनंदा कोल्हे, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांची सेवा विहित अटी वशर्तीच्या अधिन राहून प्रथमत: 06 महिन्याच्या कालावधीकरीता करार पध्दतीने, सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरून) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रकमेची कमाल मासिक मर्यादा रु.40,000/- (रुपये चाळीस हजार) इतक्या मर्यादेत राहील. या अटीवर घेण्यात आलेली आहे.

तथापि, उक्त आदेशानुसार सदरची मुदत ही दि.02.11.2021 रोजी संपलेली असून सदरचे काम प्रगतीपथावर असून सदर कामासाठी श्री.हेमंत आनंदा कोल्हे, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांच्या सेवेची कार्यालयास आवश्यकता आहे.

करीता, श्री.हेमंत आनंदा कोल्हे, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांना दि.06.11.2021 पासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी दि.07.05.2021 च्या आदेशात नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून नेमणुक देण्याबाबत प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>प्रस्ताव क्रमांक 240/2021</u>:- **(प्रशासकीय प्रस्ताव दि.17.12.2021)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.संजय कचरु पवार, लेखाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांचे स्वत:च्या ह्रदयरोगावर (DM with Double Veesel Disease) सह्याद्री सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल, पुणे येथे उपचारापोटी र.रु.3,79,519/-(अक्षरी रु.तीन लाख एकोनऐंशी हजार पाचशे एकोनावीस फक्त) इतका खर्च झाला आहे.

महानगरपालिका वैद्यकीय परतावा विनियमामध्ये या आजाराचा आकस्मिक आजार म्हणुन समावेश करण्यात आलेला आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय दि.16.11.2011 मध्ये परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयते साठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयांच्या यादीमध्ये उक्त रुग्णालयाचे नाव समाविष्ट आहे.

संबंधीताच्या उक्त आजारपणावर उपचारासाठी रु.3,79,519/-एवढा वैद्यकीय खर्च झालेला आहे. त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.3,68,291/- एवढी असून सदर रकमेच्या 90% र.रु.3,31,461/- (अक्षरी रु.तीन लाख एकतीस हजार चारशे एकसष्ठ फक्त) पैकी 5% र.रु.18,975/- (अक्षरी अठरा हजार नऊशे

पंच्याहत्तर फक्त) (एकूण सादर केलेले देयक र.रु.3,79,519/- च्या 5% च्या प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरित र.रु.3,12,486/- (अक्षरी रु.तीन लाख बारा हजार चारशे शहाऐंशी फक्त) रक्कम देय आहे.

करीता, श्री.संजय कचरु पवार, लेखाधिकारी यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.3,68,291/- च्या 90% र.रु.3,31,461/- (अक्षरी रु.तीन लाख एकतीस हजार चारशे एकसष्ठ फक्त) या वैद्यकीय खर्चास मान्यतेबाबत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव 240/2021: -**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.संजय कचरु पवार, लेखाधिकारी यांना त्यांच्या आजारपणावर उपचारासाठी खर्च केलेल्या रकमेपैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.3,68,291/ च्या 90% र.रु.3,31,461/- (अक्षरी रु.तीन लाख एकतीस हजार चारशे एकसष्ठ फक्त) या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 241/2021:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.17.12.2021)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/आस्था-1/2020/934 दि.11.09.2020 अन्वये श्री.सुभाष मोटे, शाखा अभियंता (सेवानिवृत्त) यांना झोन क्र.6 कार्यालयाअंतर्गत् येणाऱ्या नवीन मालमत्तांना कर आकारणी, मालमत्ता कराबाबत आक्षेप प्रकरणे व मालमत्ता कर वसुली या विवक्षीत कामासाठी यांची सेवा 06 महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने, सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्ती पुर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेल्या एकूण निवृत्ती वेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रकमेची कमाल मासिक मर्यादा रु.40,000/- (रुपये चाळीस हजार) इतक्या मर्यादेत राहील या अटीवर घेण्यात आलेली आहे.

तथापि, उक्त आदेशानुसार सदरची मुदत ही दि.10.03.2021 रोजी संपल्याने व झोन कार्यालयात त्यांचे जागेवर कोणीही तांत्रिक कर्मचारी सद्यस्थितीत उपलब्ध नाही. तसेच झोन अधिकारी यांनी करनिर्धारक व संकलक यांचे मार्फत सादर केलेल्या अहवालानुसार श्री.सुभाष मोटे यांनी मालमत्ता करा संदर्भात सोपविण्यात आलेली कामे योग्य प्रकारे पार पाडली असून त्यांच्या सेवेची कार्यालयास आवश्यकता आहे. त्यामुळे त्यांना प्रशासकीय ठराव क्र.106 दि.23.03.2021 नुसार कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/486 दि.23.03.2021 अन्वये उक्त विवक्षित कामासाठी दि.11.09.2020 च्या आदेशातील अटी व शर्तीनुसार दि.12.03.2021 पासून पुढील 06 महिन्याच्या कालावधीसाठी करारी पध्दतीने नियुक्ती देण्यात आली होती. परंतु सदर मुदत दि.12.09.2021 रोजी संपलेली असल्याने व झोन अधिकारी यांनी अहवालानुसार श्री.सुभाष मोटे यांनी त्यांच्याकडे सोपविण्यात आलेली कामे योग्य प्रकारे पार पाडली असून या कालावधीत त्यांचे काम समाधानकारक राहीले आहे. तसेच कर निर्धारक व संकलक यांनी तांत्रिक कर्मचाऱ्यांची गरज असल्याने 06 महिन्यांसाठी मुदतवाढ देणेबाबत शिफारस केली आहे.

करीता, श्री.सुभाष मोटे, शाखा अभियंतास, (सेवानिवृत्त) यांना आदेश निर्गमनाच्या दिनांकापासून पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी दि.11.09.2020 च्या आदेशात नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव 241/2021: -**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/आस्था-1/2020/934 दि.11.09.2020 अन्वये श्री.सुभाष मोटे, शाखा अभियंता (सेवानिवृत्त) यांना झोन क्र.6 कार्यालयाअंतर्गत् येणाऱ्या नवीन मालमत्तांना कर आकारणी, मालमत्ता कराबाबत आक्षेप प्रकरणे व मालमत्ता कर वसुली या विवक्षीत कामासाठी यांची सेवा 06 महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने, सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्ती पुर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेल्या एकूण निवृत्ती वेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रकमेची कमाल मासिक मर्यादा रु.40,000/- (रुपये चाळीस हजार) इतक्या मर्यादेत राहील या अटीवर घेण्यात आलेली आहे.

तथापि, उक्त आदेशानुसार सदरची मुदत ही दि.10.03.2021 रोजी संपल्याने व झोन कार्यालयात त्यांचे जागेवर कोणीही तांत्रिक कर्मचारी सद्यस्थितीत उपलब्ध नाही. तसेच झोन अधिकारी यांनी करनिर्धारक व संकलक यांचे मार्फत सादर केलेल्या अहवालानुसार श्री.सुभाष मोटे यांनी मालमत्ता करासंदर्भात सोपविण्यात आलेली कामे योग्य प्रकारे पार पाडली असून त्यांच्या सेवेची कार्यालयास आवश्यकता आहे. त्यामुळे त्यांना

प्रशासकीय ठराव क्र.106 दि 23.03.2021 नुसार कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/486 दि.23.03.2021 अन्वये उक्त विवक्षित कामासाठी दि.11.09.2020 च्या आदेशातील अटी व शर्तीनुसार दि.12.03.2021 पासून पुढील 06 महिन्याच्या कालावधीसाठी करारी पध्दतीने नियुक्ती देण्यात आली होती. परंतु सदर मुदत दि.12.09.2021 रोजी संपलेली असल्याने व झोन अधिकारी यांनी अहवालानुसार श्री.सुभाष मोटे यांनी त्यांच्याकडे सोपविण्यात आलेली कामे योग्य प्रकारे पार पाडली असून या कालावधीत त्यांचे काम समाधानकारक राहीले आहे. तसेच कर निर्धारक व संकलक यांनी तांत्रिक कर्मचाऱ्यांची गरज असल्याने 06 महिन्यांसाठी मुदतवाढ देणेबाबत शिफारस केली आहे.

करीता, श्री.सुभाष मोटे, शाखा अभियंता, (सेवानिवृत्त) यांना आदेश निर्गमनाच्या दिनांकापासून पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी दि.11.09.2020 च्या आदेशात नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>प्रस्ताव क्रमांक 242/2021</u>:- (प्रशासकीय प्रस्ताव दि.22.12.2021)

प्रस्ताव सदर करण्यात येतो की, कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था/-1/2021/820 दि.03.06.2021 अन्वये श्री.सय्यद मुर्तुझा कादरी, कनिष्ठ अभियंता (सेवानिवृत्त) यांना झोन क्र.7 अंतर्गत शासन अनुदानातील प्रकल्पाचे तांत्रिक कामे करणे या विवक्षीत कामासाठी यांची सेवा 06 महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने, सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्ती पुर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेल्या एकूण निवृत्ती वेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रक्कमेची कमाल माहिस मर्यादा रु.40,000/- (रुपये चाळीस हजार फक्त) इतक्या मर्यादेत राहील या अटीवर घेण्यात आलेली आहे.

तथापि, उक्त आदेशानुसार सदरची मुदत ही दि.29.11.2021 रोजी संपलेली असून उपअभियंता झोन क्र.07 यांनी सद्यस्थितीत झोन क्र.07 विभगातील कामाचा व्याप बघता, श्री.सय्यद मुर्तुझा कादरी, कनिष्ठ अभियंता (सेवानिवृत्त) यांना झोन क्र.7 यांना पुढील 06 महिन्यांकरीता मुदतवाढ देण्याबाबत कळविले आहे.

करीता, श्री.सय्यद मुर्तुझा कादरी, कनिष्ठ अभियंता (सेवानिवृत्त) यांना दि.01.12.2021 पासून पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी दि.03.06.2021 च्या आदेशात नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

<u>ठराव 242/2021</u>: -

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था/-1/2021/820 दि.03.06.2021 अन्वये श्री.सय्यद मुर्तुझा कादरी, कनिष्ठ अभियंता (सेवानिवृत्त) यांना झोन क्र.7 अंतर्गत शासन अनुदानातील प्रकल्पाचे तांत्रिक कामे करणे या विवक्षीत कामासाठी यांची सेवा 06 महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने, सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्ती पुर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेल्या एकूण निवृत्ती वेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रक्कमेची कमाल मासिक मर्यादा रु.40,000/- (रुपये चाळीस हजार फक्त) इतक्या मर्यादेत राहील या अटीवर घेण्यात आलेली आहे.

तथापि, उक्त आदेशानुसार सदरची मुदत ही दि.29.11.2021 रोजी संपलेली असून उपअभियंता झोन क्र.07 यांनी सद्यस्थितीत झोन क्र.07 विभगातील कामाचा व्याप बघता, श्री.सय्यद मुर्तुझा कादरी, कनिष्ठ अभियंता (सेवानिवृत्त) यांना झोन क्र.7 यांना पुढील 06 महिन्यांकरीता मुदतवाढ देण्याबाबत कळविले आहे.
करीता, श्री.सय्यद मुर्तुझा कादरी, कनिष्ठ अभियंता (सेवानिवृत्त) यांना दि.01.12.2021 पासून पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी दि.03.06.2021 च्या आदेशात नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>प्रस्ताव क्रमांक 243/2021</u>: (प्रशासकीय प्रस्ताव दि.22.12.2021)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मौजे कटकट गेट ते पोलीस मेस ही रस्ता शासन मंजुर विकास योजना सन-2001 नुसार कटकटगेट वळण रस्त्यापर्यंत 18.00 मी.रुंद व कटकटगेट वळण रस्तयापासुन पोलीस मेस पर्यंत 30.00 मी.रुंद प्रस्तावीत आहे. कटकटगेट या ऐतिहासिक दरवाजाच्या बाजुने (दोन्ही बाजुने) वाहतूक सुरक्षित होण्याच्या दृष्टिने तत्कालीन आयुक्त महोदय यांनी कटकटगेटच्या दोन्ही बाजुने 9.00 मी.रुंद रस्ता (नॉन डी.पी.रोड) दि 29.08.2016 रोजीच्या सांक्षाकीत नकाशाप्रमाणे प्रस्तावीत केला. आजमितीस

कटकटगेटच्या दोन्ही बाजुने 9.00 मी.रुंद रस्ता अस्तित्वात असून कटकटगेटच्या भोवताली वाहतुक बेट तयार झालेले आहे.

कटकटगेट ते पोलीस मेस हा (A To B To C) विकास योजना रस्त्याच्या B-पॉईंटवर (भाग नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे) वळण असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूकीस अडथळा निर्माण होऊन रहदारीची कोंडी होते. वळणावर वाहकाच्या दृष्यमानतेस अडथळा निर्माण होऊन अपघात होतात.

करीता, प्रशासक महानगरपालिका औरंगाबाद यांच्या शासकीय अनुदानातून प्रगतीपथावर असलेल्या कॉंक्रीट रस्त्याची पाहणी वेळी (दि.27.04.2021) रोजी कटकटगेट परिसरातील 18.00 मी.रुंद रस्त्याच्या वळणावरील भुभाग हा इंग्रजीतील C आकारामध्ये डिझाईन करुन त्यास योग्य वळण देणे बाबत सुचित केले.

तदनुषंगाने महराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदलाची कार्यवाही करुन अधिसुचना राजपत्रात व वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर अधिसुचनेवर प्राप्त हरकत/सुचनेच्या अनुषंगाने सुनावणी., होऊन सुनावणी मध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार कटकटगेट ते पोलीस मेस या विकास रस्त्याची (कटकटगेट वळणाजवळील) रुंदी व आखणीमध्ये बदल करुन 18.00 मी.रुंदीच्या असलेल्या मंजुर विकास योजनेच्या भाग नकाशामध्ये दर्शविलेल्या A-पॉईंट (जेथे 9.00 मी.रुंद नॉन डी.पी.रस्ते एकत्रित येतात) पासून संपुर्ण रस्ता कटकटगेट ते पोलीस मेस पर्यंतचा 30.00 मी.रुंदीचा विकास योजना रस्ता म्हणुन प्रस्तावीत करणे बाबत फेरबदल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वयेची फेरबदलाची कार्यवाही करण्ये करीता मान्यतेस्तव सादर.

**ठराव 243/2021: -**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कटकटगेट ते पोलीस मेस या विकास योजना रस्त्याची (कटकटगेट वळणाजवळील) रुंदी व आखणीमध्ये बदल करून 18.00 मी.रुंदीचा असलेल्या मंजुर विकास योजनेच्या भाग नकाशामध्ये दर्शविलेल्या A-पॉईंट (जेथे 9.00 मी.रुंद नॉन डी.पी.रस्ते एकत्रित येतात) पासून संपूर्ण रस्ता कटकटगेट ते पोलीस मेस पर्यंतचा 30.00 मी.रुंदीचा विकास योजना रस्ता म्हणुन प्रस्तावीत करणे बाबत फेरबदल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वयेची फेरबदलाची कार्यवाही करण्येस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 244/2021:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.23.12.2021)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, यापुर्वी कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/आस्था-2/2021/1054 दि.25.05.2021 रोजीच्या आदेशान्वये दि.04.05.2021 ते दि.30.10.2021 पर्यंत 6 (सहा) महिन्याची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत मनपा आस्थापनेवरील वर्ग-4 संवर्गातील खालील कर्मचारी कार्यरत आहेत.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव (सर्व श्री./श्रीमती) | पदनाम | कार्यरत विभाग | ठराविक/ दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| 1. | चंद्रमणी समाधान गवई | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु.424/ |
| 2. | अप्सुब्र खॉं सांड खॉं | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु.424/- |
| 3. | विजय पंडीतराव गायकवाड | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु.424/- |
| 4. | शेख इम्रान शेख फजलोद्दीन | कक्ष सेवक | आरोग्य विभाग | रु.424/- |
| 5. | विजय लक्ष्मणराव देशपांडे | दै.वे.वॉचमन | भारत माता मंदिर (सांस्कृतीक विभाग) | रु.424/- |
| 6. | राजु चंद्रभान बढे | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.6 | रु.424/- |
| 7. | रमेश चंद्रय्या परके | दै.वे.वि.लाईनमन | विद्युत विभाग | रु.525/- |
| 8. | कांताबाई अंबादास पटेकर | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.8 | रु.424/- |

तसेच सातारा देवळाई ग्रामपंचायत येथून औरंगाबाद महापालिकेत समाविष्ठ करण्यात आलेले दैनिक वेतनावरील कर्मचारी

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव (सर्व श्री./श्रीमती) | पदनाम | कार्यरत विभाग | ठराविक/ दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| 9. | शेख सिराज शेख रसूल | पाणी पुरवठा मजुर | उपअभियंता पा.पु.6,7,8 | रु.424/- |
| 10 | सुरेश कैलास काळे | सफाई मजुर | प्रभाग क्र.8 | रु.424/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 11 | प्रकाश श्रीरंग चितळकर | सफाई मजुर | प्रभाग क्र.8 | रु.424/- |
| 12 | बाबासाहेब कारभारी सोनवणे | सफाई मजुर | प्रभाग क्र.8 | रु.424/- |
| 13 | नरेंद्र ओमप्रकाश घुसर | सफाई मजुर | प्रभाग क्र.8 | रु.424/- |
| 14 | रामभाऊ शंकर मामडे | स्मशानभुमी रक्षक | प्रभाग क्र.8 | रु.424/- |
| 15 | राहुल दादाराव शिनगारे | मजुर (आवक जावक विभाग) | प्रभाग क्र.8 | रु.424/- |
| 16 | भास्कर दादाभाऊ जाधव | सफाई मजुर | प्रभाग क्र.8 | रु.424/- |

सहाय्यक आयुक्त, झोन क्र.8 यांचे जा.क्र.मनपा/वॉर्ड क्र.08/2307/2021 दि.26.11.2021 च्या अहवालानुसार अनुक्रमांक-16 वरील श्री.भास्कर दादाभाऊ जाधव दै.वेतन सफाई मजुर, झोन क्र.08 हे दि.25.06.2021 रोजी पासून विनापरवानगी सतत गैरहजर असल्याबाबत कळविले आहे. त्यानुसार संबंधीत कर्मचारी झोन कार्यालयात रुजु होणेसाठी आल्यानंतर त्यांच्या मुदतवाढी बाबत विचार करण्यात येईल.

करीता, उपरोक्त प्रमाणे एकूण (15) दैनिक वेतनावरीनल कर्मचाऱ्यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.03.11.2021 ते दि.01.05.2022 पर्यंत 06 (सहा) महिन्याकरीता (म्हणजेच 180 दिवसांकरीता) मुदतवाढ देण्यासाठीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव 244/2021: -**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/आस्था-2/2021/1054 दि.25.05.2021 रोजीच्या आदेशान्वये दि.04.05.2021 ते दि.30.10.2021 पर्यंत 6 (सहा) महिन्याची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत मनपा आस्थापनेवरील वर्ग-4 संवर्गातील खालील कर्मचारी कार्यरत आहेत.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव (सर्व श्री./श्रीमती) | पदनाम | कार्यरत विभाग | ठराविक/ दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| 1. | चंद्रमणी समाधान गवई | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु.424/- |
| 2. | अय्युब खाँ सांडु खाँ | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु.424/- |
| 3. | विजय पंडीतराव गायकवाड | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु.424/- |
| 4. | शेख इम्रान शेख फजलोद्दीन | कक्ष सेवक | आरोग्य विभाग | रु.424/ |
| 5. | विजय लक्ष्मणराव देशपांडे | दै.वे.वॉचमन | भारत माता मंदिर (सांस्कृतीक विभाग) | रु.424/- |
| 6. | राजु चंद्रभान बढे | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.6 | रु.424/- |
| 7. | रमेश चंद्रय्या परके | दै.वे.वि.लाईनमन | विद्युत विभाग | रु.525/- |
| 8. | कांताबाई अंबादास पटेकर | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.8 | रु.424/- |

तसेच सातारा देवळाई ग्रामपंचायत येथून औरंगाबाद महापालिकेत समाविष्ठ करण्यात आलेले दैनिक वेतनावरीलन कर्मचारी

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव (सर्व श्री./श्रीमती) | पदनाम | कार्यरत विभाग | ठराविक/ दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| 9. | शेख सिराज शेख रसुल | पाणी पुरवठा मजुर | उपअभियंता पा.पु.6,7,8 | रु.424/- |
| 10 | सुरेश कैलास काळे | सफाई मजुर | प्रभाग क्र.8 | रु.424/- |
| 11 | प्रकाश श्रीरंग चितळकर | सफाई मजुर | प्रभाग क्र.8 | रु.424/- |
| 12 | बाबासाहेब कारभारी सोनवणे | सफाई मजुर | प्रभाग क्र.8 | रु.424/- |
| 13 | नरेंद्र ओमप्रकाश घुसर | सफाई मजुर | प्रभाग क्र.8 | रु.424/- |
| 14 | रामभाऊ शंकर मामडे | स्मशानभुमी रक्षक | प्रभाग क्र.8 | रु.424/- |
| 15 | राहुल दादाराव शिनगारे | मजुर (आवक जावक विभाग) | प्रभाग क्र.8 | रु.424/ |
| 16 | भास्कर दादाभाऊ जाधव | सफाई मजुर | प्रभाग क्र.8 | रु.424/- |

सहाय्यक आयुक्त, झोन क्र.8 यांचे जा.क्र.मनपा/वॉर्ड क्र.08/2307/2021 दि.26.11.2021 च्या अहवालानुसार अनुक्रमांक-16 वरील श्री.भास्कर दादाभाऊ जाधव दै.वेतन सफाई मजुर झोन क्र.08 हे दि.25.06.2021 रोजी पासून विनापरवानगी सतत गैरहजर असल्याबाबत कळविले आहे. त्यानुसार संबंधीत कर्मचारी झोन कार्यालयात रुजु होणेसाठी आल्यानंतर त्यांच्या मुदतवाढी बाबत विचार करण्यात येईल.

करीता, उपरोक्त प्रमाणे एकुण (15) दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.03.11.2021 ते दि.01.05.2022 पर्यंत 06 (सहा) महिन्याकरीता (म्हणजेच 180 दिवसांकरीता) मुदतवाढ देण्यासाठीचा विषयास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 245/2021:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.23.12.2021)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका मा.आयुक्त यांचे स्तरावर विविध विभागाच्या व विविध विषयाच्या अनुषंगाने प्रशासकीय बैठका घेतल्या जातात व सद्यस्थितीत अशा स्वरूपाच्या बैठका मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या दालनात घेतल्या जात आहेत. तथापि, बऱ्याच वेळी मा.आयुक्त यांचे दालन अधिकारी/कर्मचारी, लोक प्रतिनिधी यांची संख्या पाहता अपुरे पडते. त्यामुळे काही वेळा अशा स्वरुपाने प्रशासकीय बैठका घेण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र किंवा डॉ.मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्रातील सभागृहांचा वापर करण्यात येतो. परंतु, सदर बाब, बैठकीचे स्थळ इतर ठिकाणी असल्याने कालापव्यय होतो. तसेच या मध्ये कार्यालयीन कामकाजाचा वेळ वाया जातो.

यासाठी प्रशासनाने सद्यस्थितीत मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या दालनालगत असलेली जागा, ज्यामध्ये उपआयुक्त, अतिरिक्त आयुक्त व कर निर्धारक तथा संकलक यांची दालने आहे. त्या ठिकाणी उक्त परिच्छेदात नमुद उद्देशासाठी व प्रशाससकीय बैठका घेण्यासाठी बैठक हॉल बांधण्याचा निर्णय घेतला आहे. यास मा.सर्वसाधारण सभेने विषयक क्रमांक 101/2021 दि.10.05.2021 अन्वये मंजुरी प्रदान केली आहे. सदर मंजुरी नुसार या कामाचे निविदा रक्कम दरसुची सन 2019-20 नुसार रु.30,46,833/- तयार करण्यात येऊन ई-निविदा काढण्यात आली असता, दुसऱ्या वेळी श्री.एस.एम.कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 12.88% जास्त दराची निविदा प्राप्त झाली आहे.

या अनुषंगाने संबंधीत कंत्राटदार यांनी मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या समक्ष वाटाघाटी अंती सदरचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 12.88% जास्त दराऐवजी दर कमी करुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10% जास्त या दराने काम करण्यास लेखी संमती दर्शविली आहे या दराची दर सन 2020-21 च्या दरसुचीच्या दराप्रमाणे तुलना केली असता सादरील दर हे 0.70% कमी दराने येत आहे.

करीता, श्री.एस.एम.कन्स्ट्रक्शन, कंत्राटदार यांची वाटाघाटी अंती कमी केलेल्या दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10% जास्त दराची निविदा मा.स्थायी समितीच्या मंजुरी देणे बाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव 245/2021: -**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुख्य कार्यालयात बैठक घेण्यासाठी मिटींग हॉल तयार करणे या कामाची (दुसऱ्या वेळेस) प्राप्त निविदा वाटाघाटी अंती कंत्राटदार यांनी लेखी संमती दिल्यानुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10% जास्त दराने‍ची निविदेस मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 246/2021:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.24.12.2021)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 458 च्या पोट कलम (2) अन्वये औरंगाबाद महानगरपालिका पाणी पुरवठा आणि पाणीपट्टी उपविधी - 2011 तयार केले असून सदर उपविधीस दिनांक 05.02.2014 रोजी महाराष्ट्र शासनाने मान्यता प्रदान करुन दिनांक 14.03.2014 रोजी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये प्रसिध्द केले आहेत. हे उपविधी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रासाठी लागु झालेले आहेत.

उपविधीतील तरतुदीनुसार अनधिकृत नळजोडणी अधिकृत करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत यापुर्वी वेळोवेळी अभय योजना राबविण्यात आली होती. यापुर्वी अभय योजनेस मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. 676 दि.11.09.2018 अन्वये मान्यता प्रदान झाल्या नुसार कार्यवाही करण्यात आली होती.तथापि शहरामध्ये प्राप्त तक्रारी नुसार बऱ्याच ठिकाणी अनधिकृत नळ जोडण्या अस्तीत्वात असल्याचे निदर्शनास येते. या संदर्भाने पाणी पुरवठा विभागाकडे असलेल्या एक बाहास्त्रोत कनिष्ठ अभियंता व दोन मजुर यांचे पथकामार्फत सदरील नळजोडण्या खंडीत करुन कायदेशीर कार्यवाही करण्यात येते. सदर बाब लक्षात घेता, शहरामधील अनधिकृत नळजोडण्या अधिकृत केल्यास पाणी चोरी थांबून महानगरपालिकेच्या महसुलामध्ये वाढ होणार आहे. यासाठी अभय योजना लागु करणे महानगरपालिकेच्या हिताचे राहील.

अभय योजना महानगरपालिकेमार्फत सक्षमपणे राबविण्यासाठी मंजुर उपविधीच्या कलम 12.4 नुसार नियमीतीकरणासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही प्रस्तावीत करण्याची तरतुद आहे.

**12.4 नियमितीकरण :**

प्राधिकरण अथवा या संदर्भात अधिकृत कोणीही व्यक्ती प्रस्तुत नियम किंवा अधिनियमाद्वारे किंवा त्याअंतर्गत शिक्षेस पात्र कोणत्याही गुन्ह्याबाबत तडजोड करु शकतात.

12.4.1 जर एखादी जोडणी ही एकतर महापालिकेच्या जलवाहिनीतुन थेट मालकाच्या मालमत्तेत किंवा धारकाच्या मालमत्तेत किंवा महापालिकेची जलवाहिनी आणि अधिकृत ग्राहकाच्या मालमत्तेतील जोडणी दरम्यान पुर्णत: किंवा अंशत: विना मोबदला पाणी मिळवण्यासाठी घेतली असेल तर ती बेकायदेशिर जोडणी समजली जाईल आणि ती तात्काळ खंडीत केली जाईल. या उपविधींच्या मंजुरी पासुन तीन महिन्यांच्या आत स्वेच्छा प्रकटीकरण योजनेअंतर्गत परिशिष्ट 'क' मधील विहित दराने बेकायदेशीर जोडणी नियमितीकरण शुल्कासह नवीन जोडणीसाठी आवश्यक शुल्क भरुन सदर जोडणी नियमित करण्याची मुभा मालकाला किंवा धारकाला दिली जाईल.

12.4.2 सामुहिक जोडणी असणाऱ्या सामुहिक गृहयोजना किंवा अपार्टमेंटमध्ये घरगुती/ निवासी वापराकरीता कोणतीही वैयक्तिक बेकायदेशीर जोडणी आढळल्यास ती खंडीत केली जाईल आणि नियमितीकरणासाठी विचारात घेतली जाणार नाही आणि बेकायदेशीर जोडणी आढळलेल्या मालमत्तेचा मालक किंवा धारक याला परिशिष्ट 'क' मध्ये दिलेल्या विहित दरानुसार बेकायदेशीर पाणी वापराचे शुल्क भरावे लागेल. जर ते भरले गेले नाही तर ते अधिनियमाच्या तरतुदींप्रमाणे वसुल केले जाईल आणि खटला चालवण्यास पात्र असेल.

12.4.3 या उपविधींच्या मंजुरीच्या तीन महिन्यानंतर जर एखादी अवैध जोडणी आढळली तर ती तात्काळ खंडीत केली जाईल आणि अनाधिकृत ग्राहक असणाऱ्यामालमत्तेच्या मालक किंवा धारकाला, या उपविधींचा मंजुरी दिनांक अथवा जोडणी घेतलेली महापालिकेची जलवाहिनी कार्यान्वीत केल्याचा दिनांक या पैकी जो नंतरचा असेल तेव्हा पासून नियमितीकरणाच्या दिनांका पर्यंत / तारखे पर्यंत परिशिष्ट 'क' मधील विहित अवैध जोडणी नियमितीकरण शुल्क व अवैध पाणी वापराचे शुल्क भरुन आणि नव्या जोडणीसाठीचे आवश्यक शुल्क तसेच प्रति जोडणी रुपये 5000/- इतक्या दंडासह भरुन सदर अवैध जोडणी नियमित करुन घेण्यासाठी नोटीस बजावली जाईल.

12.4.4 जर या उपविधींच्या मंजुरीच्या तीन महिन्यांनतर एखाद्या गृहसमुहात किंवा अपार्टमेंटमध्ये निवासी वापरासाठीची अवैध जोडणी आढळली तर ती अवैध जोडणी तात्काळ खंडीत केली जाईल आणि अनाधिकृत ग्राहक असणाऱ्या त्या मालमत्तेच्या मालकाला किंवा धारकाला या उपविधींचा मंजुरी दिनांक अथवा जोडणी घेतलेली महानगरपालिकेची जलवाहिनी कार्यान्वीत केल्याचा दिनांक यापैकी जो नंतरचा असेल तेव्हापासून नियमितीकरणाच्या दिनांकापर्यंत परिशिष्ट 'क' मधील विहित दराने जोडणी खंडीत करण्याचे शुल्क आणि अवैध पाणी वापराचे शुल्क तसेच प्रति जोडणी रुपये 5000/- अतिरिक्त दंडासह भरावे लागेल. जर ते भरले गेले नाही तर ते अधिनियमाच्या तरतुदींप्रमाणे वसुल केले जाईल आणि खटला चालवण्यास पात्र असेल.

12.4.5 महानगरपालिकेने शोधलेली अवैध नळ जोडणी त्यासंदर्भातील नोटीस प्राप्त झाल्यापासून 30 दिवसांच्या आत नियमित करुन न घेतल्यास ती तात्काळ खंडीत केली जाईल आणि संबंधीत ग्राहक खटला चालवण्यास तसेच या उपविधींचा मंजुरी दिनांक अथवा जोडणी घेतलेली महानगरपालिकेची जलवाहिनी कार्यान्वीत केल्याचा दिनांक यापैकी जो नंतरचा असेल तेंव्हापासून जोडणी खंडीत करण्याच्या दिनांका पर्यंत परिशिष्ट 'क' मध्ये नमुद दराने अवैध पाणी वापर शुल्क भरण्यास पात्र असेल. जर ते भरले गेले नाही तर ते अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे वसूल केले जाईल आणि खटला चालवण्यास पात्र असेल.

उपविधीच्या परिशिष्ट क नुसार शुल्क आकारणी तपशील खालीलप्रमाणे आहे.

1. पाणी पुरवठा खंडीत करण्याचे शुल्क

| जोडणीचा व्यास | निवासी | व्यावसायीक |
|---|---|---|
| 1 1/2" पर्यंत | रुपये 500/- जोडणी | रुपये 1000/- जोडणी |
| 1 1/2" पेक्षा अधिक | रुपये 3000/- जोडणी | रुपये 5000/- जोडणी |

2. अवैध पाणी वापर शुल्क - रुपये 5000/- प्रती जोडणी

3. अवैध जोडणी नियमितीकरण शुल्क

| जोडणीचा व्यास | निवासी | व्यावसायीक |
|---|---|---|
| 1/2" | रुपये 1000/- जोडणी | रुपये 4000/- जोडणी |
| 3/4" | रुपये 2000/- जोडणी | रुपये 5000/- जोडणी |

| | | |
|---|---|---|
| 1" | रुपये 3000/- जोडणी | रुपये 6000/- जोडणी |
| 1 1/2" | रुपये 4000/- जोडणी | रुपये 8000/- जोडणी |
| 2" | रुपये 5000/- जोडणी | रुपये 10000/- जोडणी |

4. पुन: जोडणी शुल्क

| पाणी वापरचा प्रकार | कलम 12.5 अ | कलम 12.5 ब | कलम 12.5 क |
|---|---|---|---|
| निवासी | रुपये 500/- | रुपये 750/- | रुपये 1000/- |
| व्यावसायीक | रुपये 1500/- | रुपये 2250/- | रुपये 1000/- |

उपविधीच्या तरतुदीनुसार उपरोक्तप्रमाणे शुल्काची आकारणी करून मा. सर्वसाधारण सभेत ठराव पारीत झाल्यानंतर दि.............. ते दि.............. पर्यंत अभय योजना लागू करणे व या मुदतीनंतर शहरातील अनधिकृत नळजोडणी धारकांविरुध्द उपविधीतील तरतुदींनुसार कार्यवाही करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 246/2021:-**

प्रस्तावात, दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा व पाणीपट्टी उप विधीतील विहीत तरततुदींनुसार अनाधिकृत नळ जोडणी अधिकृत करण्याची अभय योजना महानगरपालिकेमार्फत मंजुर उप विधीच्या कलम 12.4 अंतर्गत नियमीतीरकरणासाठी उपविधीतील कलम 12.4.1,12.4.2,12.4.3,12.4.4 व 12.4.5 अंतर्गत असलेल्या तरतुदींनुसार अवैध पाणी वापर शुल्क करण्यास मान्यता देण्यात येते. उपविधीच्या परिशिष्ट क नुसार खालील प्रमाणे शुल्क आकारणी करीता देखील मान्यता देण्यात येते.

1. पाणी पुरवठा खंडीत करण्याचे शुल्क

| जोडणीचा व्यास | निवासी | व्यावसायीक |
|---|---|---|
| 1 1/2" पर्यंत | रुपये 500/- जोडणी | रुपये 1000/- जोडणी |
| 1 1/2" पेक्षा अधिक | रुपये 3000/- जोडणी | रुपये 5000/- जोडणी |

2. अवैध पाणी वापर शुल्क - रुपये 5000/- प्रती जोडणी

3. अवैध जोडणी नियमितीकरण शुल्क

| जोडणीचा व्यास | निवासी | व्यावसायीक |
|---|---|---|
| 1/2" | रुपये 1000/- जोडणी | रुपये 4000/- जोडणी |
| 3/4" | रुपये 2000/- जोडणी | रुपये 5000/- जोडणी |
| 1" | रुपये 3000/- जोडणी | रुपये 6000/- जोडणी |
| 1 1/2" | रुपये 4000/- जोडणी | रुपये 8000/- जोडणी |
| 2" | रुपये 5000/- जोडणी | रुपये 10000/- जोडणी |

4. पुन: जोडणी शुल्क

| पाणी वापरचा प्रकार | कलम 12.5 अ | कलम 12.5 ब | कलम 12.5 क |
|---|---|---|---|
| निवासी | रुपये 500/- | रुपये 750/- | रुपये 1000/- |
| व्यावसायीक | रुपये 1500/- | रुपये 2250/- | रुपये 1000/- |

करीता, उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे उपविधीच्या तरतुदीनुसार शुल्काची आकारणी करुन दि.01.01.2022 ते दि.15.03.2022 पर्यंत सदरील अभय योजना लागू करण्यास मान्यता देण्यात येते. या मुदतीनंतर शहरातील अनधिकृत नळ जोडणी धारकांविरुध्द उपविधीतील तरतुदींनुसार नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते पैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 247/2021:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.29.12.2021)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, हर्सुल घनकचरा प्रक्रिया केंद्र येथे 150 टन प्रति क्षमतेचे केंद्र उभारणीसाठी यंत्रसामुग्री पुरवठा करणे, उभारणे, चाचणी देणे व 05 वर्षाच्या कालावधीसाठी चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे.

संदर्भ:- टेंडर आय.डी.क्र.2021 AMCA-644674-1 सन 2021

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | घनकचरा व्यवस्थापन विभाग |
| 2. | कामाचे स्वरुप | हर्सुल घनकचरा प्रक्रिया केंद्र येथे 150 टन प्रति दिवस क्षमतेचे केंद्र उभारणीसाठी यंत्रसामुग्री पुरवठा करणे. |

| | | |
|---|---|---|
| | | उभारणे, चाचणी देणे व 05 वर्षाच्या कालावधीसाठी चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | होय एकत्रित डी.पी.आर.र.रु.148.79 कोटी, मान्यता दि.13.02.2020 |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | एजन्सीकडून देयकार दर स्वरुपात |
| 4. | ज्या वृत्तपत्रात टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | जिल्हा स्तरीय वर्तमानपत्र 01 मराठी, राज्य स्तरीय वर्तमानपत्र 02 मराठी, हिंदी 01, राष्ट्रीय स्तर वर्तमानपत्र इंग्रजी 02, हिंदी 01 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 05.02.2021 ते 16.03.2021 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 25.08.2021 |
| 6. | एकूण किती टेंडर्स आली? | 03 |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील प्रमाणे तक्त्यात द्यावी.)

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | प्राप्त टेंडर र.रु. (एकत्रित मशीनरी खरेदी व 05 वर्षे चालविणे देखभाल व दुरुस्ती) | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1. | मायो वेसल्स अॅण्ड मशिन्स प्रा.लि. | एकत्रित मशीनरी खरेदी – 3,69,00,000<br>देखभाल व दुरुस्ती – 13,30,00,000 | Fist Lowest |
| 2 | जनआधार सेवाभावी संस्था, लातूर | एकत्रित मशीनरी खरेदी – 3,82,00,000<br>देखभाल व दुरुस्ती - 13,62,00,000 | Second Lowest |
| 3. | गुरु रामदास कन्स्ट्रक्शन नांदेड | निविदेसाठी लागणारे कागदपत्रांची पुर्तता झाली नसल्याने Financial Bid उघडण्यात आली नाही. | निरंक |
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | | लागू नाही. |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | | यंत्रसामुग्री खरेदी-शासकीय अनुदान देखभाल दुरुस्ती-मनपा फंड |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | | होय |
| 9. | अ) सदरचे काम डिपॉझीटमधुन करण्यात येणार आहे काय? | | ---- |
| | ब) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर पान क्रमांक द्यावा. | | ---- |
| 10 | सोबत मान्य पुर्वगणनपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | | ---- |

विषयांकीत कामासाठी ठेकेदार मायो वेसल्स अॅण्ड मशीन्स प्रा.लि. यांनी बी-1 स्वरुपातील मो.हर्सुल घनकचरा प्रक्रिया केंद्र येथे 150 टन प्रति दिवस क्षमतेचे केंद्र उभारणीसाठी यंत्रसामुग्री पुरवठा करणे, उभारणे, चाचणी करणे व 05 वर्षाच्या कालावधीसाठी चालविणे व देखभाल दुरुस्ती करण्यासाठी र.रु.16,99,00,000/- (ज्यांची विभागणी मशीनरी किंमत रु.3,69,00,000/- 05 वर्षे देखभाल दुरुस्ती व चालविणे, 05X2,66,00,000 = रू.13,30,00,000/- या प्रमाणे एकत्रित रु.16,99,00,000/- रकमेची सर्वात

कमी दराची निविदा दाखल केली आहे.

संबंधीत एजन्सीला वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, वाटाघाटी मध्ये देयकार दरानुसारच्या रक्कमेत रक्कम कमी करण्यास असहमती दर्शविली आहे.

तरी, सदरील काम मायो वेसल्स ॲण्ड मशीन्स प्रा.लि.कंत्राटदार यांच्याकडून सर्वात कमी दराने म्हणजेच र.रु.16,99,00,000/- चे काम करुन घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

**<u>ठराव 247/2021: -</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हर्सुल घनकचरा प्रक्रिया केंद्र येथे 150 टन प्रति दिवस क्षमतेचे केंद्र उभारणीसाठी यंत्रसामुग्री पुरवठा करणे, उभारणे, चाचणी देणे व 05 वर्षाच्या कालावधीसाठी चालविणे व देखभाल व दुरुस्ती च्या कामासाठी मायो वेसल्स ॲण्ड मशीन्स प्रा.लि.यांना वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले असता, वाटाघाटी मध्ये देयकार दरानुसारच्या रक्कमेत रक्कम कमी करण्यास असहमती दर्शविली आहे.

त्यानुसार हर्सुल घनकचरा प्रक्रिया केंद्र येथे 150 टन प्रति दिवस क्षमतेचे केंद्र उभारणीसाठी यंत्रसामुग्री पुरवठा करणे, उभारणे, चाचणी देणे व 05 वर्षाच्या कालावधीसाठी चालविणे व देखभाल व दुरुस्ती च्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराने निविदाधारक कंत्राटदार मायो वेसल्स ॲण्ड मशीन्स प्रा.लि.यांना यांच्याकडून सर्वात कमी दराने म्हणजेच र.रु.16,99,00,000/- (ज्याची विभागणी मशीनरी किंमत रु.3,69,00,000/-, 05 वर्षे देखभाल दुरुस्ती व चालविणे, 05 x 2,66,00,000= रु.13,30,00,000/- या प्रमाणे एकत्रित रु.16,99,00,000/- चे काम करुन घेण्यास व करार करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 248/2021</u>:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.30.12.2021)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे नियम 79 (ब) अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेचे हडको, एन-12 येथील स्वामी विवेकानंद उद्यान, मजनुहिल उद्यान परिसरात बांधण्यात आलेले कारगील स्मारक ही वास्तु ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट या संस्थेस प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यासाठी मा.स्थायी समिती सभा विषय क्रमांक-18 दि.27.07.2012 अन्वये 10 वर्षाच्या कालावधी करीता वार्षिक भाडे रु.1,20,000/- प्रमाणे दरवर्षी वार्षीक भाडे रक्कमेत 10 टक्के भाडेवाढ नुसार भाडेतत्वावर देण्यात आले होते. त्याची मुदत दि.13.11.2021 रोजी संपत असल्याने संस्थेने पुढील 10 वर्षासाठी मुदतवाढ मिळणेसाठी विनंती केली आहे. त्यानुषंगाने वार्षिक भाडे र.रु.2,82,954/-, सेवा शुल्क रु.30,832/- त्यावर 18 टक्के जी.एस.टी. रु.50,932/- एवढी आकारणी करुन पुढील 10 वर्षासाठी वार्षिक भाडे रक्कमेत दरवर्षी नैसर्गिक 10 टक्के भाडेवाढ करून भाडेतत्वावर देणेसाठीचा प्रस्ताव विचारार्थ तथा योग्य त्या मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव 248/2021: -</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणेमहाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे नियम 79 (ब) अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेचे हडको, एन-12 येथील स्वामी विवेकानंद उद्यान, मजनुहिल उद्यान परिसरात बांधण्यात आलेले कारगील स्मारक ही वास्तु ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट या संस्थेस प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यासाठी मा.स्थायी समिती सभा विषय क्रमांक-18 दि.27.07.2012 अन्वये 10 वर्षाच्या कालावधी करीता वार्षिक भाडे रु.1,20,000/- प्रमाणे दरवर्षी वार्षीक भाडे रक्कमेत 10 टक्के भाडेवाढ नुसार भाडेतत्वावर देण्यात आले होते. त्याची मुदत दि.13.11.2021 रोजी संपत असल्याने संस्थेने पुढील 10 वर्षासाठी मुदतवाढ मिळणेसाठी विनंती केली आहे. त्यानुषंगाने वार्षिक भाडे र.रु.2,82,954/-, सेवा शुल्क रु.30,832/- त्यावर 18 टक्के जी.एस.टी रु.50,932/- एवढी आकारणी करुन पुढील 10 वर्षासाठी वार्षिक भाडे रक्कमेत दरवर्षी नैसर्गिक 10 टक्के भाडेवाढ करून भाडेतत्वावर देणेसाठीच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 249/2021</u>:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.30.12.2021)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद संचलित टाऊन हॉल कला दालन येथे दैनंदिन देखभाल व कलादालनाची कामे पार पाडण्याकरीता मानद क्युरेटर (काळजीवाहक) म्हणुन श्री.हंसराज नारायण बन्सवाल यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 54 (1) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीने गुणवत्तेनुसार दि.04.12.2007 रोजी नियुक्ती केलेली आहे. सदरील नियुक्तीचा

कालावधी संपल्यानंतर प्रशासकीय ठराव व मा.स्थायी समितीच्या मान्यतेने त्यांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यांना दि.03.06.2021 रोजी प्रशासकीय ठराव क्र.148/2021 च्या मान्यतेने व कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/सांस्कृतीक/92/2021 च्या आदेशान्वये रु.12,000/- दरमहा मानधन देऊन कार्यरत आहे. त्यांचे काम समाधानकारक असून ते मागील चौदा वर्षापासून मनपाच्या सेवेत आहे.

सद्यस्थितीत संबंधीताची मुदत दि.01.08.2021 रोजी संपलेली असून त्यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.04.08.2021 ते दि.03.07.2022 पर्यंत अकरा महिन्याकरीता दरमहा रु.12,000/- मानधन देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव 249/2021: -**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद संचलित टाऊनहॉल कलादालन येथे दैनंदिन देखभाल व कलादालनाची कामे पार पाडयाकरीता मानद क्युरेटर (काळजीवाहक) म्हणुन श्री.हंसराज नारायण बन्सवाल यांची मुदत दि.01.08.2021 रोजी संपलेली असल्याने त्यांना दोन दिवसांचा खंड देऊन दि.04.08.2021 ते दि.03.07.2022 पर्यंत अकरा महिन्यांकरीता दरमहा रु.12,000/- मानधन देऊन मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 250/2021:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.31.12.2021)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे नियम 79 (ब) अन्वये समर्थ नगर येथील व्यायामशाळेच्या भाडे आकारणी संबंधाने दि.30.11.2021 रोजी झालेल्या बैठकीमध्ये महानगरपालिका मालकीची समर्थनगर येथील पुर्वी जय बजरंग व्यायामशाळेस भाडेतत्वावर दिलेल्या जागेस संबंधाने नव्याने सिध्दशिर्घ गणकाप्रमाणे प्रती माह भाडे र.रु.7000/- प्रमाणे व इतर कर आकारणी नुसार सदरील व्यायामशाळेसाठी प्रती माह भाडे रु.7000/- प्रमाणे वार्षिक भाडे रु.84,000/- त्यावर 18 टक्के जीएसटी रु.15,120/- असे एकत्रित भाडे र.रु.99,120/- चा भरणा करुन प्रथम तीन वर्षासाठी भाडेतत्वावर देणेसाठी प्रशासकीय प्रस्ताव मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव 250/2021: -**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे नियम 79 (ब) अन्वये समर्थ नगर येथील व्यायामशाळेच्या भाडे आकारणी संबंधाने दि.30.11.2021 रोजी झालेल्या बैठकीमध्ये महानगरपालिका मालकीची समर्थनगर येथील पुर्वी जय बजरंग व्यायामशाळेस भाडेतत्वावर दिलेल्या जागेस संबंधाने नव्याने सिध्दशिर्घ गणकाप्रमाणे प्रती माह भाडे र.रु.7000/- प्रमाणे व इतर कर आकारणी नुसार सदरील व्यायामशाळेसाठी प्रती माह भाडे रु.7000/- प्रमाणे वार्षिक भाडे रु.84,000/- त्यावर 18 टक्के जी.एस.टी. रु.15,120/- असे एकत्रित भाडे र.रु.99,120/- चा भरणा करुन प्रथत तीन वर्षासाठी भाडेतत्वावर देणेसाठी मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 251/2021:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.31.12.2021)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेचा चिकलठाणा येथे दर शुक्रवारी आठवडी बाजार भरविण्यात येतो, सदरील बाजारासाठी मागविण्यात आलेल्या निविदेततीन निविदा प्राप्त झाल्या असून त्यात सर्वोच्च वार्षीक दर श्री.संतोष राजु कांबळे यांचे प्राप्त आहेत.

करीता, निविदेतील सर्वाधिक दर भरणारे श्री.संतोष राजु कांबळे यांना चिकलठाणा आठवडी बाजार प्रती वर्ष र.रु.7,30,184/- त्यावर 18 टक्के जीएसटी र.रु.1,31,433/- असे एकत्रित र.रु.8,61,617/- ने तीन वर्षासाठी ठेका देण्याच्या विचारार्थ तसेच मान्यतेस्तव सादर.

**ठराव 251/2021: -**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.संतोष राजु कांबळे वार्षिक उच्च दर र.रु.7,30,184/- त्यावर 18 टक्के जीएसटी र.रु.1,31,433/- असे एकत्रित र.रु.8,61,617/- आहे. उक्त दरास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 252/2021:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.31.12.2021)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या गाळ्यांसाठी निविदा मागविण्यात आल्या असता, उक्त निविदांमध्ये उच्च दराच्या निविदेचा तपशिल खालील प्रमाणे,. करीता. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 (ब) नुसार स्थायी समिती समोर खालील प्रस्ताव ठेवण्यात येतो.

| अ. क्र. | व्यापारी संकुलाचे नाव | गाळा क्र. | प्राप्त झालेल्या निविदा धारकांचे नाव | सर्वाधिक निविदा दर |
|---|---|---|---|---|
| 1. | एकनाथ नगर व्या.संकुल | 10 | शिवगंगा प्र फुल दाभाडे | रु.2,455/- |
| 2. | | 11 | रेणुकादारा नारायणराव धर्माधिकारी | रु.2,036/- |
| 3. | | 13 | द्वारकाबाई शांतीलाल बोर्डे | रु.1,604/- |
| 4. | | 15 | दिपक अप्पाराव म्हस्के | रु.2,232/- |
| 5. | लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व्या.संकुल | ए-28 | सय्यद सईदोद्दीन सय्यद बशीरोद्दीन | रु.3,513/- |
| 6. | | बी-28 | सय्यद सईदोद्दीन सय्यद बशीरोद्दीन | रु.3,423/- |
| 7. | | एस-6 | सय्यद सईदोद्दीन सय्यद बशीरोद्दीन | रु.1,705/- |
| 8. | न.भु.क्र.15302/12, नुपुर अपार्टमेंट लगत असलेले मनपा व्या.संकुल | ग्राऊंड फ्लोअर द.क्र.जु. दु.क्र.1 | शुभम लक्ष्मण साळवे | रु.6,366/- |
| 9. | जय टॉवर व्या.संकुल | द.क्र.13 | कुणाल ज्ञानेश्वर दहुळ | रु.5,107/- |
| 10. | नाथ सुपर मार्केट व्या.संकुल | दु.क्र.07 | सुरेखा किशोर थोरात | रु.1,56,248/- |

करीता, वरील प्रमाणे निविदेमध्ये प्राप्त उच्च दराच्या प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव 252/2021: -**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या गाळ्यांसाठी निविदा मागविण्यात आल्या असून प्रस्तावात नमुद असलेल्या उक्त निविदांमध्ये उच्च दराच्या निविदेच्या तपशिलासह मंजुरी देण्यात येते. प्रस्ताव मंजुर. वैधानिक कार्यवाही व्हावी

**प्रस्ताव क्रमांक 253/2021:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.31.12.2021)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील बुढ्ढीलेन परिसरात महानगरपालिकेची मिळकत असून सदर जागेचा न.भु.क्र.3208 असा आहे. सद्यस्थितीत इमारत नादुरुस्त झालेली असल्याने या इमारती लगत याच भुखंडातील मोकळ्या जागेचा वापर लग्न इतर खाजगी समारंभा करीता महानगरपालिकेकडून भाडेतत्वावर देऊन करण्यात येत आहे. याच अनुषंगाने सदर इमारतीचे पाडकाम करून या जागेचा पुर्नविकास करण्याची मागणी शहरातील प्रतिष्ठीत नागरीक, नाट्यकर्मी व स.नगरसेवक यांच्याकडुन करण्यात येत होती.

सदर बाब गृहीत धरुन मा.सर्वसाधारण सभेने विषय क्रमांक-1260 दि.19.12.2019 अन्वये अंदाजपत्रक र.रु.32,01,93,000/- यास मंजुरी प्रदान केली आहे. या प्रकल्पासाठी नियुक्त प्रकल्प सल्लागार यांनी चालू बांधकाम दरसुची सन 2019-20 नुसार अंदाजपत्रक सादर केले आहेत. त्यामध्ये अस्तित्वात असलेल्या इमारतीचे पाडकाम करणे स्थापत्य विषयक स्ट्रक्चरल कामे करणे, भुमजल्यावर वाहनांसाठी वाहनतळ तयार करणे, तळमजल्यावर दुकाने तयार करणे, अँकरशॉप तयार करणे, सुमारे 400 माणशी क्षमतेचे बँक्वेट हॉल/समारंभ हॉल तयार करणे, पहिल्या मजल्यावर 20 दुकाने तयार करणे, एक अँकर शॉप तयार करणे, प्रेक्षागृह (ऑडीटोरियम) तयार करणे, तर दुसऱ्या मजल्यावर ऑफीसेस तयार करणे, ऑडीटोरीयमचा मजला बांधकाम करणे, प्रत्येक मजल्यावर उद्वाहक (Lift) बसविणे, प्रत्येक मजल्यावर स्त्री व पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे बांधणे, तसेच रेस्टॉरंट सुविधा तयार करणे व या कामाअंतर्गत संपुर्ण इमारतीमध्ये उर्जा बचतीच्या अनुषंगाने विद्युतीकरण करणे, वातानुकूलीन यंत्रणा (Air condition) बसविणे, अग्निरोधक यंत्रणा उभारणे, प्लंबींग कामे करणे, पावसाच्या पाण्याचा फेरवापर करणेसाठी यंत्रणा उभारणे, लॅण्डस्केपींग करणे यासह ग्रीन बिल्डींगची संकल्पना राबविणे इ.कामांचा समावेश आहे.

यासर्व समाविष्ट उपांगासह कामाचे अंदाजपत्रक र.रु.32,01,93,000/- चे तयार करण्यात आले असून या कामाची ई-निविदा काढण्यात आली असता, एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या असून त्यांचा संक्षिप्त तपशील खालील नमुद प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) | Hi Tech Infra, Aurangabad | अं.पत्रकीय दरापेक्षा 14.11% जास्त दराने |
| 2) | Wonder Constructions | अं.पत्रकीय दरापेक्षा 16.51% जास्त दराने |
| 3) | Ellora Construction Pvt.Ltd. | अं.पत्रकीय दरापेक्षा 17.86% जास्त दराने |

उक्त पैकी सर्वात कमी दराची निविदा Hi Tech Infra,Aurangabad अं.पत्रकीय दरापेक्षा 14.11% जास्त दराने प्राप्त झालेली आहे याबाबत संबंधीत एजन्सीला दराच्या वाटाघाटी साठी बोलाविले असता, त्यांनी

सध्या सार्वजनिक बांधकाम विभागदरसुची सन 2021-22 लागू करण्यात आलेली असून या दरसुचीच्या तुलनेत त्यांनी निविदेतील भरणा केलेले दर योग्य आहेत. तसेच या निविदेत भाव वाढ कलम (Price Variation Clause) लागु करण्यात आलेले नाही. त्यामुळे दरसुचीतील वाढ आम्ही अंदाजीत स्वरुपाने गृहीत धरली आहे. असे असले तरी महानगरपालिकेच्या विनंतीनुसार दर कमी करून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.11% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीयच दरापेक्षा 11% जास्त या दराने कंत्राटदाराने काम करण्याची संमती दर्शविली असून व तसे लेखी पत्र त्यांनी सादर केले आहे.

तरी तुलनात्मक दृष्ट्या सर्वाधिक कमी दराची व दर निश्चिती समिती समोर उपस्थित होऊन वाटाघाटी अंती दर कमी करून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11% जास्त या दराने कंत्राटदार काम करण्यास तयार असल्याने निविदा दर अ.प.दरापेक्षा 11% जास्त दराने मंजुरी प्रदान करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव 253/2021: -**

प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे, या कामासाठी निविदा समितीपुढे वाटाघाटी अंती कंत्राटदाराने मान्य केलेल्या दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.11% जास्त दराने ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11% जास्त दराने निविदा मान्य करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी

**प्रस्ताव क्रमांक 254/2021:** (प्रशासकीय प्रस्ताव दि.31.12.202 )

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील चिकलठाणा औद्योगीक वसाहती मध्ये (Open Spece-10) मनपाच्या ताब्यातील सुमारे 11189 चौ.मी.पैकी MTDC यांना देण्यात आलेली जागा 27,362 चौमी वगेळता शिल्लक जागा 84,718 चौमी जागा मनपाच्या ताब्यात असून सद्यस्थिती या ठिकाणी क्रिकेटचे मैदान, खेळपट्टी विकसीत करण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त या ठिकाणी प्रशासकीय इमारत, बॅडमिंटन हॉल, प्रेक्षकांना बसण्यासाठी आरसीसी सिटींग व त्यावर पत्राचे छत, स्त्रियांसाठी व पुरुषांसाठी स्वच्छतागृह मागील बाजुस खेळांडूंना थांबण्यासाठी डॉर्मिटरी चे बांधकाम करण्यात आलेले आहे. तसेच या परिसरात उत्तर-पुर्व कोपऱ्यात स्विमिंगपुल व बेबी पुलाचे काम आत्ता नव्याने हाती घ्यावयाचे आहे.

औरंगाबाद शहरात येणारे पर्यटक, स्थानिक नागरीक हे शहर औद्योगीक व शैक्षणिक दृष्ट्या ही प्रगत असल्याने येथे विकासाचा वेग जास्त आहे. अशा परिस्थितीत नागरीकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणे अपेक्षीत असते. त्यास्तव या क्रिडांगणाचा चा व संकुलाचा सक्षम (Comprehensive) विकास करण्याचे योजीले आहे. यामध्ये क्रिकेट खेळासाठीची छत असलेली (Covered Parking) गोलाकार रितीने विकसीत करणे, स्विमिंग पुलांचे अर्धवट असलेले कामे पुर्ण करणे, खेळाडुंसाठी पॅव्हेलीयन तयार करणे, अंतर्गत खेळासाठी हॉल (Indoor Game) तयार करणे, ड्रेसिंग रुम तयार करणे, मल्टीपर्पज मैदान (Turf) तयार करणे, हॉकी खेळासाठी लॉंग टेनिससाठी, बास्केट बॉल, व्हॉली बॉल मैदान तयार करणे, इ.बाबींचा समावेश करण्यात येणार आहे.

त्यास्तव या मनपा गरवारे क्रिडा संकुलाचा सर्वांगीण (Comprehensive) विकास करण्यासाठी या विषयातील अनुभवी व तज्ञ वास्तुविशारद यांची या प्रकल्पासाठी, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणुक करण्याससाठी ई-निविदा काढणेस्तव प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार या कामासाठी निविदा तिसरी वेळ काढली असता, तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत त्यांची नावे व त्यांनी यासाठी भरलेला दर यांची संक्षिप्त माहिती पुढील नमुद प्रमाणे आहे.

1. अजय ठाकूर ॲण्ड असोसिएट्स - 1.64% दराने
2. ॲकोटेक कन्सलटन्ट प्रा.लि. - 1.94% दराने
3. ब्लॅक स्टोन कॉर्पोरेशन - 1.95% दराने

तुलनात्मक दृष्ट्या सर्वाधिक कमी दराची निविदा ही अजय ठाकूर ॲण्ड असोसिएट्स, औरंगाबाद यांच्या निविदेच्या प्रशासकीय प्रस्ताव प्रशासनाने मंजुर केला आहे. तरी उक्त मंजुर निविदेस मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेस्तवचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव 254/2021: -**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, (अ) अस्तित्वातील सुविधामध्ये दुरुस्ती करून श्रेणीवाढ (Renovation work) करणे, (ब) प्रस्तावित नवीन कामे करणे या कामासाठी सर्वात कमी दराची निविदा म्हणजेच एकुण प्रकल्प किमतीच्या 1.64% चा निविदाधारकाचा प्रस्तावास मंजुरी देण्यात येते तसेच या कामांच्या अनुषंगाने योग्य

तो निर्णय घेणे, त्यात बदल करणे यासाठीचे सर्व अधिकार मा.प्रशासक औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करण्यास मंजुरी प्रदान करण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 255/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.05.01.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील मोबाईल टॉवर कंपन्यांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केल्यामुळे मोठ्या प्रमाणात थकीत असलेला मालमत्ता कराची वसुली होत नव्हती.

मा.न्यायालयात दाखल असलेल्या प्रकरणांमध्ये मा.उच्च न्यायालयात मनपाच्या वतीने कायदेशीर बाजू मांडण्यासाठी ॲड.श्री.संभाजी टोपे यांची विधिज्ञ म्हणुन नेमणूक केलेली आहे. मा.उच्च न्यायालयात दाखल प्रकरणात मोबाईल टॉवर कंपन्यांकडुन रु.1,78,11,335/- इतकी रक्कम वसुल झाली असता, विशेष फी म्हणुन सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.102/2021 दि.17.03.2021 अन्वये मान्यता मिळाल्यानुसार प्रथमतः रु.5.00 लक्ष (रुपये पाच लक्ष) अदा करण्यास व उर्वरित फिस देण्याबाबत पुन्हा प्रस्तावीत करण्यास मंजुरी देण्यात आली होती.

मा.उच्च न्यायालयाचे माध्यमातून मोबाईल टॉवर कंपन्यांकडुन रु.4,17,31,303/- इतका मालमत्ता करापोटी मनपा फंडात जमा झाल्याची माहिती कर निर्धारक व संकलक विभागाकडून प्राप्त आहे. दि.17.03.2021 च्या ठरावानुसार ॲड.टोपे यांनी उर्वरित विशेष फिस ची मागणी केलेली आहे.

करीता, उर्वरित फिस देण्याबाबत पुन्हा प्रस्तावीत करण्यास मान्यता दिल्याप्रमाणे ॲड.श्री.संभाजी टोपे यांना मोबाईल टॉवर मालमत्ता कराचे मा.उच्च न्यायालयातील प्रकरणात उर्वरित फीस म्हणुन र.रु.5.00 लक्ष (पाच लक्ष फक्त रुपये) अदा करण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव 255/2022: -**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील मोबाईल टॉवर थकीत मालमत्ता कर वसुली प्रकरणी मा.उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका प्रकरणांमध्ये मनपाच्या वतीने कायदेशीर बाजू मांडण्यासाठी ॲड.श्री.संभाजी टोपे यांची विधिज्ञ म्हणुन नेमणूक केलेली असून मा.न्यायालयाचे माध्यमातून प्रथमतः रु.1,78,11,335/- वसूल झाले आहेत. ॲड.श्री.संभाजी टोपे यांना यापुर्वी विशेष फीस म्हणुन अंशतः पेमेंट अदा करण्यात आले आहे. मा.न्यायालयाच्या माध्यमातून रु.4,17,31,303/- (रुपये चार कोटी सतरा लक्ष एकतीस हजार तीनशे तीन फक्त) इतकी थकीत रक्कम मालमत्ता करापोटी वसुली झालेली आहे.

करीता, ॲड.श्री.संभाजी टोपे यांना रु.5.00 लक्ष (पाच लक्ष रूपये फक्त) उर्वरित विशेष फीस म्हणुन अदा करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 256/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.06.01.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत विविध कामे करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दि.02 एप्रिल 2018 रोजी र.रु.91.795 कोटीच्या प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे.

प्राप्त मंजुरीच्या अनुषंगाने घनकचरा प्रक्रिया केंद्र स्थापत्य व विकास कामे, मो.चिलकठाणा व मो.पडेगाव येथे 150 टन प्रति दिवस क्षमतेचे प्रक्रिया केंद्र उभारणीसाठी यंत्रसामुग्री पुरविणे, उभारणे चाचणी देणे व 05 वर्षाच्या कालावधीसाठी चालविणे तसेच देखभाल दुरुस्ती करणेसाठीच्या कामास सुरुवात करून मो.चिलकठाणा व मो.पडेगाव येथील कचरा प्रक्रिया केंद्र कार्यान्वीत करण्यात आले असून कचऱ्यावर प्रक्रिया सुरु आहे.

सदरील ठिकाणी प्रत्यक्ष कामे करीत असतांना बऱ्याच बाबींचा अंदाजपत्रकात समावेश नसल्याचे त्याचप्रमाणे परिमाण हे परिस्थितीनुसार जुळत नसल्याचे आढळून आले असल्याने कामे पुर्ण होण्याच्या दृष्टिने प्रत्यक्ष परिस्थिती नुसार अंदाजपत्रकात आवश्यक बाबी व परिमाण यानुसार सुधारणा करून र.रु.91.795 कोटी ऐवजी र.रू.148.790 कोटीचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी सादर केला होता.

सदरील प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र.1001 दि.22.02.2019 अन्वये मंजुरी दिलेली असून र.रु.148.790 कोटीच्या सुधारीत प्रकल्प अहवालास महाराष्ट्र शासनाने दि.13.02.2020 अन्वये मान्यता प्रदानप केली आहे.

तथापि, केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्या निर्देशानुसार साचलेल्या जुन्या कचऱ्यावर (Legacy Waste) Bio-Capping ऐवजी Bio-Mining करणे गरजेचे आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ औरंगाबाद यांनी दिलेल्या निर्देशानुसार घनकचरा प्रक्रिया केंद्रावरील लिचेटवर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करण्यासाठी लिचेट ट्रिटमेंट प्लांट उभारणे आवश्यक आहे व घनकचरा प्रक्रिया केंद्र येथे अग्निशमन उपकरणां

बसविणे, सॅनेटरी लॅंडफिलसाठी मो.पडेगाव येथील नियोजीत जमिनीचा Hard Strata असल्यामुळे तसेच Environmental Impact Assessment (EIA) यासाठीच्या तरतुदीत झालेली वाढ, बांधकाम साहित्य मलबापासून विटा तयार करणे या प्रकल्पासाठीच्या खर्चात बाजार भावात झालेली दरवाढ, मो.हर्सुल येथील उर्वरीत स्थापत्य कामासाठी महाराष्ट्र शासनाच्या नवीन दरसुची मध्ये भाववाढ झाल्याने तसेच अनुषंगीक कामे यामुळे अंदाजपत्रक रक्कमेत वाढ झाली आहे. त्यामुळे र.रु.148.790 कोटी ऐवजी र.रु.217.939 कोटीचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल शासन नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी सादर केला आहे.

करीता, घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया प्रकल्पाचा र.रु.217.939 कोटीचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्याकरीता मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव 256/2022: -**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्या निर्देशानुसार साचलेल्या जुन्या कचऱ्यावर (Legacy Waste) Bio-Capping ऐवजी Bio-Mining करणे गरजेचे आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ औरंगाबाद यांनी दिलेल्या निर्देशानुसार घनकचरा प्रक्रिया केंद्रावरील लिचेटवर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करण्यासाठी लिचेट ट्रिटमेंट प्लांट उभारणे आवश्यक आहे व घनकचरा प्रक्रिया केंद्र येथे अग्निशमन उपकरणे बसविणे, सॅनेटरी लॅंडफिलसाठी मो.पडेगाव येथील नियोजीत जमिनीचा Hard Strata असल्यामुळे तसेच Environmental Impact Assessment (EIA) यासाठीच्या तरतुदीत झालेली वाढ, बांधकाम साहित्य मलबापासून विटा तयार करणे या प्रकल्पासाठीच्या खर्चात बाजार भावात झालेली दरवाढ, मो.हर्सुल येथील उर्वरीत स्थापत्य कामासाठी महाराष्ट्र शासनाच्या नवीन दरसुची मध्ये भाववाढ झाल्याने तसेच अनुषंगीक कामे यामुळे अंदाजपत्रक रक्कमेत वाढ झाली आहे. त्यामुळे र.रु.148.790 कोटी ऐवजी र.रु.217.939 कोटीचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्याकरीता मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 257/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.07.01.2022)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 303 अन्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला कबाडीपुरा येथील व्यापारी संकुलाचे कॉलम नाल्यात असल्याने सुकर नाला प्रवाहाला अडथळा होऊन कचरा अडकत असल्याने व अतिवृष्टीमुळे नाल्यात पाणी प्रवाह सुरळीत होत नसल्याने नागरीकांच्या वस्तीसाठी अयोग्य किंवा आरोग्यास घातक किंवा अपायकारक होत आहे. सदरील इमारतीमधील अडथळा आणणारी दुकान क्र.05 व 06 हे कार्यकारी अभियंता यांच्या अहवालानुसार मिळकत/दुकाने इमारतीचा हा भाग पाडून टाकण्याबाबतचे अधिकार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 303 नुसार प्राप्त अधिकारात कार्यवाही करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.

कबाडीपुरा महानगरपालिका व्यापारी संकुलातील दुकान क्र.05 व 06 मुळे पाणी प्रवाहास अडथळा होत असून सदरील दुकाने पाडणे आहे. दुकान क्र.05 श्री.सरदार खान उस्मान खान यांना 30 वर्षासाठी भाडेपट्ट्याने सन2008 मध्ये व दुकान क्र.06 श्री.खिजरोद्दीन सिद्दीकी यांना 30 वर्षासाठी भाडेपट्ट्याने सन 2002 मध्ये देण्यात आलेले आहे.

संबंधीताचा 30 वर्षाचा भाडेपट्टा रद्द करून दुकान क्र.05 व 06 महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 303 नुसार कार्यवाही करून सक्तीने रिक्त करुन घेणे व सदरील इमारतीचा भाग म्हणुन दुकान क्र.05 व .06 पाडणेस्तव प्रसताव मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव 257/2022: -**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला कबाडीपुरा येथील व्यापारी संकुलाचे कॉलम नाल्यात असल्याने सुकर नाला प्रवाहाला अडथळा होऊन कचरा अडकत असल्याने व अतिवृष्टीमुळे नाल्यात पाणी प्रवाह सुरळीत होत नसल्याने नागरीकांच्या वस्तीसाठी अयोग्य किंवा आरोग्यास घातक किंवा अपायकारक होत आहे. सदरील इमारतीमधील अडथळा आणणारी दुकान क्र.05 व 06 हे कार्यकारी अभियंता यांच्या अहवालानुसार मिळकत/दुकाने इमारतीचा हा भाग पाडून टाकण्याबाबतचे अधिकार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 303 नुसार प्राप्त अधिकारात कार्यवाही करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.

कबाडीपुरा महानगरपालिका व्यापारी संकुलातील दुकान क्र.05 व 06 मुळे पाणी प्रवाहास अडथळा होत असून सदरील दुकाने पाडणे आहे. दुकान क्र.05 श्री.सरदार खान उस्मान खान यांना 30 वर्षासाठी भाडेपट्ट्याने सन2008 मध्ये व दुकान क्र.06 श्री.खिजरोद्दीन सिद्दीकी यांना 30 वर्षासाठी भाडेपट्ट्याने सन 2002 मध्ये देण्यात आलेले आहे.

संबंधीताचा 30 वर्षाचा भाडेपट्टा रद्द करून दुकान क्र.05 व 06 महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 303 नुसार कार्यवाही करून सक्तीने रिक्त करुन घेणे व सदरील इमारतीचा भाग म्हणुन दुकान क्र.05 व .06 पाडण्यासाठीच्या प्रशासकीय प्रस्तावात मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 258/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.07.01.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माता-मृत्यूदर व अर्भक मृत्यूदर कमी करणे हे आर.सी.एच.कार्यक्रमाचे महत्वाचे उद्दीष्ट आहे. माता – मृत्यूदर व अर्भक मृत्यूदर कमी करण्यासाठी प्रसूतीपुर्व,प्रसूती दरम्यान व प्रसूती पश्चात मोफत सेवा देणे, तसेच नवजात अर्भकाला जन्मल्यानंतर 30 दिवसापर्यंत आवश्यक त्या सर्व सेवा मोफत पुरवीण्यात आल्यास निश्चीतपणे मदत होईल.

राज्यामध्ये आरोग्य संस्थामध्ये प्रसूतीचे प्रमाण 92% टक्के आहे. तथापी या संस्थेतील प्रसूतीपैकी 40% ते 60% प्रसूती खाजगी रुग्णालयामध्ये होतात. तसेच शासकीय संस्थमधील प्रसूती होणाऱ्या मातांना औषधी विविध तपासण्या, प्रसंगी सिझेरियन इत्यादीसाठी लागणारी साहित्य बाहेरुन खरेदी करण्यासाठी तसेच मातेला संदर्भित केल्यानंतर आवश्यक त्या वाहनांची सोय करणे यासाठी संबंधीत नातेला किंवा त्यांच्या कुटूंबीयांना खर्च करावा लागतो. पैशा अभावी यामध्ये होणाऱ्या विलंबामुळे प्रसंगी माता-मृत्यु अथवा अर्भक मृत्यु होण्याची संभावना असते.

यासाठी केंद्र शासनाने निर्गमीत केलेल्या सुचनेनुसार राज्यामध्ये दि.26 सप्टेंबर-2011 च्या शासन निर्णयान्वये जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत (JSSK) माता व नवजात अर्भकांना सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये संपुर्ण मोफत सेवा पुरविण्यात येणार आहेत. यामध्ये अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, दारिद्य रेषेखालील, दारिद्य रेषेवरील तसेच प्रसूतीसाठीच्या कोणत्याही खेपेच्या गरोदर स्त्रीस व 30 दिवसांच्या आत नवजात अर्भकास सर्व प्रकारच्या आरोग्य विषयी सेवा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये मोफत देण्यात येणार आहेत.

वरील बाबींच्या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालय व आरोग्य केंद्रामध्ये गरोदर मातांच्या आवश्यक असलेल्या सर्व रक्तांच्या चाचण्या, औषधोपचार त्यांचे ओ.पी.डी.केस पेपर हे सर्व निःशुल्क होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे 30 दिवसांच्या आत नवजात अर्भकास मोफत आरोग्य सेवा देणे आवश्यक आहे. या बाबीवरील खर्च महानगरपालिकेच्या एन.यु.एच.एम. कार्यक्रमांतर्गत JSSK या शिर्षकामधून करता येईल.

**ठराव 258/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, माता-मृत्युदर व अर्भक मृत्युदर कमी करण्यासाठी प्रसुतीपुर्व, प्रसुती दरम्यान व प्रसुती पश्चात मोफत सेवा देणे, तसेच नवजात अर्भकाला जन्मल्यानंतर 30दिवसांपर्यंत आवश्यक त्या सर्व सेवा मोफत पुरविण्यात आल्यास निश्चीतपणे मदत होईल.

यासाठी केंद्र शासनाने निर्गमीत केलेल्या सुचनेनुसार राज्यामध्ये दि.26 सप्टेंबर-2011 च्या शासन निर्णयान्वये जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत (JSSK) माता व नवजात अर्भकांना सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये संपुर्ण मोफत सेवा पुरविण्यात येणार आहेत. यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, दारिद्रय रेषेखालील, दारिद्य रेषेवरील तसेच प्रसूतीसाठीच्या कोणत्याही खेपेच्या गरोदर स्त्रीस व 30 दिवसांच्या आत नवजात अर्भकास सर्व प्रकारच्या आरोग्य विषयी सेवा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये मोफत देण्यात येणार आहेत.

वरील बाबींच्या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालय व आरोग्य केंद्रामध्ये गरोदर मातांच्या आवश्यक असलेल्या सर्व रक्तांच्या चाचण्या, औषधोपचार त्यांचे ओ.पी.डी.केस पेपर हे सर्व निःशुल्क करण्यासाठी त्याचप्रमाणे 30 दिवसांच्या आत नवजात अर्भकास मोफत आरोग्य सेवा देण्यासाठी व या बाबीवरील खर्च महानगरपालिकेच्या एन.यु.एच.एम. कार्यक्रमांतर्गत JSSK या शिर्षकामधून करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 259/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.10.01.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.01 अंतर्गत पडेगाव येथील कत्तलखान्या जवळील जागेवर मृत प्राण्यांची विल्हेवाट लावण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन 22019-20 च्या SSR नुसार र.रु.66,11,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यास मा.प्रशासक महोदय यांनी दि.24.01.2020 अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच ठराव क्र.27, दि.12.08.2020 नुसार मान्यता प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाची नियमानुसार रितसर निविदा मागविण्यात आली असता, 01 निविदा प्राप्त झाली असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 02.13% कमी दराची निविदा मे.संतोष रुपचंद चव्हाण यांची प्राप्त झालेली आहे.

तरी, मे.संतोष रुपचंद चव्हाण यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 02.13% कमी दराची निविदेचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव 259/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पडेगाव येथील कत्तलखान्या जवळील जागेवर मृत प्राण्यांची विल्हेवाट लावण्याच्या कामासाठी प्राप्त झालेली निविदा मे.संतोष रुपचंद चव्हाण यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 02.13% कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 260/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.11.01.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, डॉ.संजय सिसोदे अध्यक्ष, सायकॉलॉजीस्ट सोसायटी महाराष्ट्र, औरंगाबाद यांनी औरंगाबाद महानगरपालिकेस पत्राद्वारे आपण व आपले सहाकारी कोव्हीड रुग्णांचा गरजेनुसार मोफत समुपदेशन करणे बाबत कळविले होते. त्या बाबत सविस्तर चर्चा झाली व त्यानुसार दि.24.05.2021 रोजी मा.प्रशासक यांनी मनोमित्र कक्षास तत्वतः मान्यता दिली आहे. मान्यतेनुसार कोरोना-19 विषाणु संसर्गजन्य आजारामुळे निर्माण झालेल्या आरोग्य विषयक समस्यांचा आपत्कालीन परिस्थिती निवारणासाठी कोव्हीड रुग्णांना मानसिक संतुलन व्यवस्थित राहण्याकरीता समुपदेशान करण्यासाठीऔरंगाबाद महानगरपालिकेतर्फे स्थापन करण्यात आलेल्या मनो-मित्र कक्षाकरीता कॉन्सीलर यांची नियुक्ती कंत्राटी पध्दतीने रु.20,000/- प्रति माह ठराविक वेतनावर नियुक्ती करण्यात आली होती. कोव्हीड-19 बाधित रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांना मानसिक आधाराची नितांत गरज असते. हे आतापर्यंत आलेल्या त्या फोन कॉल वरुन दिसुन येते. त्यामुळे उपरोक्त मनोमित्र कक्ष पुढे ही सुरु ठेवणे आवश्यक आहे. तसेच National Human Rights Commission यांनी Covid-19 मध्ये Mental Health बाबत सेवा उपलब्ध करुन देणे बाबत दि.31.05.2021 रोजी सुचित केले व अशी सेवा लोकांना देणे गरजेचे आहे त्यानुसार सनियंत्रण समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. उपरोक्त समिती मान्यता प्राप्त झाली आहे.

सदरील कक्षासाठी हेल्पलाईन नंबर मो.7030912109 देण्यात आला आहे. कक्षाचे काम स.08 ते संध्या 08 या वेळेत सुरु रहाते. यासाठी श्रीमती कल्पना मोटे या समन्वयक म्हणुन काम पाहतात व हेल्पलाईन वरील सर्व फोन घेणे, त्यांना ग्रुप वेळापत्रकानुसार समुपदेशकाकडून समुपदेश केले जाते.

शहरातील 25 ते 30 मानसशास्त्र व मनोचिकीत्सक समुपदेशाची मोफत सेवा देत आहेत आणि रुग्ण व समुपदेशक यांच्यात संवाद घडवून आणणे, उपरोक्त रुग्णासाठी पुढील उपाय योजना करणे, रुग्णांचा पाठपुरावा, अहवाल, दैनंदिन अहवाल, रेकॉर्ड ठेवणे इ.कामे समन्वयकाद्वारे केली जातात. करीता मनोमित्र कक्ष सुरु कालावधीमध्ये मोफत समुपदेशन करण्यात आले आहे. या हेल्पलाईन बाबत प्रसिध्दी माध्यमातून व्यापक सिध्दी देण्यात आली आहे. सर्व CCC/DCHC/DCH मधून कक्षाच्या माहितीचे भित्तीपत्रक लावण्यात आले आहे. त्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना खुप फायदा झाला आहे. कारण कोव्हीड-19 आजारामध्ये शारीरीक स्वास्थासोबत मानसिक स्वास्थही महत्वाचे आहे.

करीता, मनोमित्र कक्ष मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीनंतर पुढील तीन महिन्यासाठी सुरु करण्यात यावा. तसेच समन्वयक श्रीमती कल्पना मोटे यांना रु.20,000/- वेतन प्रतिमाह देणे व सदरील खर्च एस.डी.आर.एफ./जिल्हा नियोजन समिती अनुदानातून करणे. तसेच मनोमित्र कक्ष मान्यतेनंतर पुढील तीन महिन्याकरीता सुरु ठेवण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव 260/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कोरोना-19 विषाणु संसर्गजन्य आजारामुळे निर्माण झालेल्या आरोग्य विषयक समस्यांचा आपत्कालीन परिस्थिती निवारणासाठी कोव्हिड-19 रुग्णांना मानसिक संतुलन व्यवस्थित राहण्याकरीता समुपदेशन करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे स्थापन करण्यात आलेल्या मनोमित्र पुढील तीन महिने सुरु ठेवण्यास व कॉन्सीलर श्रीमती कल्पना मोटे यांना रु.20,000/- प्रतिमाह मानधन एस.डी.आर.एफ./जिल्हा नियोतन समिती अनुदानातून खर्च करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 261/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.11 .01 .2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,वॉर्ड अभियंता कार्यालय क्र.09 अंतर्गत येणाऱ्या एकुण 13 प्रभागासाठी ड्रेनेज लाईन देखभाल दुरूस्तीची कामे करण्यासाठी महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2021-21 अंतर्गत र.रु.60.00 लक्ष तरतुद राखुन देवण्यात आली आहे. सदरील तरतुद वर्षभरासाठी ड्रेनेज लाईन चोकअप चे काम करणे, अत्यावश्यक ठिकाणी ड्रेनेज लाईन बदलणे, मोडकळीस आलेले चेंबर बांधणे, धोकादायक ठिकाणी मेनहोल चेंबरवर एस. एफ.आर.सी. ढापे बसविणे इत्यादी कामांसाठी पुरेशी नाही.

सन 2021-2022 या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्र.E-83, अ.क्र.9 वर नाला सफाई खर्च वॉर्ड क्र.-09 या लेखाशिर्षतंर्गत रक्कम रु. 25.00 लक्षची तरतुद उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. झोन क्र. 09 कार्यक्षेत्रातील नाले सफाईची कामे ही कार्यालयीन मशीनरीव्दारे करुन घेण्यात आलेली असल्याने सदरील तरतुदीची बचत होत आहे.

करीता सन 2021-22 अर्थसंकल्पातील पृष्ठ क्र. E -83 अ.क्र.09 वरील लेखाशिर्ष नाला सफाई खर्च वॉर्ड-9 अन्वये राखुन ठेवलेली तरतुद र.रु.25.00 लक्ष पैकी र.रु. 20.00 लक्ष तरतुद झोन क्र. 09 अंतर्गत जलनि:सारण वाहिन्यांची देखभाल दुरुस्तीची कामे करणेसाठी वळती करण्या बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव 261/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे.सन 2021-22 अर्थसंकल्पातील पृष्ठ क्र. E-83 अ.क्र. 09 वरील लेखाशिर्ष नाला सफाई खर्च वॉर्ड -9 अन्वये राखुन ठेवलेली तरतुद र.रू.25.00 लक्ष पैकी र.रु.20.00 लक्ष तरतुद झोन क्र.09 अंतर्गत जलनि:सारण वाहिन्यांची देखभाल दुरुस्तीची कामे करणेसाठी वळती करणेच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते,वैधनिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 262/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.11 .01 .2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री. भगीरथ नारायण सुरडकर, सफई मजुर, वार्ड-फ विभाग, मनपा औरंगाबाद यांनी त्यांच्या स्वत:च्या आजारावर (Covid-19 Positive) या आजारावर ओरीयन सिटी केअर हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून यासाठी रक्कम रुपये 3,79,437/- (अक्षरी रु.तीन लक्ष एकोणऐंशी हजार चारशे सदोतीस रुपये) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी प्रत्यक्ष शिल्लक असलेली रक्कम रु. 3,62,439/- एवढी असून सदरील रक्कमेच्या 90 टक्के रक्कम रु.3,26,195/- (अक्षरी रु.तीन लक्ष सव्वीस हजार एकशे पंच्यान्नव रुपये) मधुन 5 टक्के रक्कम रु.18,971/- ( अक्षरी रु.अठरा हजार नऊशे एकाहात्तर रुपये फक्त)(एकुण सादर केलेले देयक रक्कम रू.3,79,437/- च्या 5 टक्के प्रमाणे) मनपा फंडात जमा करुन येणारी रक्कम रु.3,07,224/- मधुन संबंधिताने धनादेश क्र.384284 दि.05/04/2021 अन्वये रक्कम रु.1,50,000/- वजा जाता शिल्लक रक्कम रु.1,57,224/- (अक्षरी रु.एक लक्ष सत्तावन्न हजार दोनशे चोवीस फक्त) रक्कम देय आहे.

महानगरपालिका वैद्यकिय परतावा विनियमामध्ये Covid-19 Mild Moderate illness या शासनमान्य आजारामध्ये येतो. महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय दि.16/11/2011 पर्यंत मधील प्रसिध्द रुग्णालय यादीत सदरील रुग्णालयाचे नाव समाविष्ट असुन औरंगाबाद महानगरपालिकेच्या मा. सर्वसाधारण सभेच्या विषय क्र.65/2020 दि.10/12/2020 अन्वये सदरील आजारास वैद्यकीय परतावा देय आहे. तसेच सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

करिता श्री.भगीरथ नारायण सुरडकर, सफाई मजुर, वार्ड-फ विभाग, मनपा औरंगाबाद यांना अग्रिम रक्कमेच्या समायोजनासह प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या रु.1,57,224/-संबंधिताच्या वैद्कीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव 262/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्यानूसार श्री.भगीरथ नारायण सुरडकर, सफाईमजुर, वार्ड-फ विभाग, मनपा औरंगाबाद यांनी त्यांच्या स्वत:च्या आजारावर (Covid 19 positive) या आजारावर ओरीयन सिटी केअर हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार घेतलेला असुन अग्रिम रक्कमेच्या समायोजनासह संबंधितांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या रु.1,57,224/- संबंधिताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 263/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.12.01.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, देशामध्ये व राज्यामध्ये कोव्हीड-19 या विषाणुचा प्रादुर्भाव झाल्यामुळे Pandemic ची साथ संपुर्ण जग, देश व राज्यांमध्ये पसरली असून कोव्हीड-19 च्या रुग्णांची संख्या औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत सद्यस्थितीत झपाट्याने वाढत असल्यामुळे सदरील साथरोग नियंत्रित करण्याची आवश्यकता आहे.

औरंगाबाद शहरामधील कोव्हीड-19 विषाणु बाधीत रुग्णांची सद्यस्थितीत वाढणारी संख्या लक्षात घेऊन त्यावरील उपाय योजना करण्यासाठी औरंगाबाद शहरामधील कोव्हीड-19 रुग्ण शोधण्याकरीता आवश्यक असणाऱ्या व्ही.टी.एम. व रॅपिड अँटीजन किट खरेदी करण्यात आलेल्या आहेत.

67(3) सी अंतर्गत् VTM Kit खरेदी करीता जा.क्र.मनपा/आरोग्य/666/2021 दि.22.03.2021 नुसार M/s Atamaja Sales, Padegaon, Aurangabad यांना VTM Kit-1 Lakh पुरवठा करण्या करीता कार्यालयीन आदेश देण्यात आले होते. त्यानुसार विभागास प्राप्त झालेल्या VTM Kit चा व देयकाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| S.N. | Item | Qty | Bill No & Date | Amount |
|---|---|---|---|---|
| 1. | VTM Kit M/S Atmaja Sales Aurangabad | 15,000 | 272 Dt.26.03.2021 | 2,01,600=00 |
| 2. | VTM Kit M/S Atmaja Sales Aurangabad | 25,000 | 276 Dt.29.03.2021 | 3,36,000=00 |
| 3. | VTM Kit M/S Atmaja Sales Aurangabad | 50,000 | 289 Dt.30.03.2021 | 6,72,000=00 |
| 4. | VTM Kit M/S Atmaja Sales Aurangabad | 10,000 | 010 Dt.05.04.2021 | 1,34,400=00 |
| | | 1,00,000 Kits | Total | 13,44,000=00 |

67 (3) सी अंतर्गत Rapid Antigwn Test Kit खरेदीकरीता जा.क्र./मनपा/आरोग्य/767/2021 दि.31.01.2021 नुसार M/s Metil Diagnostics Private Limited, Vapi यांना Rapid Antigen Test Kit – 2,50,000 Tests पुरवठा करण्याकरीता कार्यालयीन आदेश देण्यात आले होते.त्यानुसार विभागास M/s Metil Diagnostics Private Limited, Vapi यांचे अधिकृत वितरक M/s Shradha Distributors, Mumbai यांच्या कडून प्राप्त झालेल्या Rapid Antigen Test चा व देयकाचा तपशील खालील प्रमाणे.

| S.N. | Item | Qty | Bill No & Date | Amount |
|---|---|---|---|---|
| 1. | Rapid Antigen Test Kit M/s Meril Diagnostics Private Limited, Vapi Supplied through authorized distributor M/s Shradha Distributors, Mumbai | 2,50,000 | T942 Dt.31.03.2021 | 1,40,30,000=00 |

VTM Kit खरेदीकरीता ई-निविदा दराबाबत वाटाघाटी पश्चात जा.क्र.मनपा/आरोग्य/2356/2021 दि.16.06.2021 नुसार VTM Kit - 1,00,000 Tests पुरवठा करण्याकरीता कार्यालयीन आदेश देण्यात आले होते. त्यानुसार विभागास प्राप्त झालेल्या VTM Kit चा व देयकाच तपशील खालील प्रमाणे.

| S.N. | Item | Qty | Bill No & Date | Amount |
|---|---|---|---|---|
| 1. | VTM Kit M/S Bhagawati FeedsPvt.Ltd | 20,000 | 239 Dt.22.06.2021 | 3,70,000=00 |
| 2. | VTM Kit M/S Bhagawati FeedaPvt.Ltd. | 26,500 | 264 Dt.01.07.2021 | 4,90,250=00 |
| 3. | VTM Kit M/S Bhagawati FeedsPvt.Ltd.d | 26,500 | 290 Dt.08.07.2021 | 4,90,250=00 |
| 4. | VTM Kit M/S Bhagawati FeedsPvt.Ltd. | 27,000 | 315 Dt.19.07.2021 | 4,99,500=00 |
| | | 1,00,000 Kits | Total | 18,50,000=00 |

Rapid Antigen Test Kit खरेदीकरीता शासन निर्णय दराने जा.क्र./मनपा/आरोग्य/2356A/ 2021 दि.16.06.2021 नुसार M/s SD Biosensor यांना Rapid Antigen Test Kit -2,00,000 Test पुरवठा

करण्याकरीता कार्यालयीन आदेश देण्यात आले होते. त्यानुसार विभागास प्राप्त झालेल्या Rapid Antigen Test Kit चा व देयकाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| S.N. | Item | Qty | Bill No & Date | Amount |
|---|---|---|---|---|
| 1. | Rapid Antigen Test Kit<br>M/S SD Biosensor, Gurugram | 2,00,000 | 4489<br>Dt.17.06.2021 | 1,68,00,000=00 |
| | | 2,00,000 | Total | 1,68,00,000=00 |

असे एकूण रु.3,40,24,000-00 च्या VTM Kit व Rapid Antigen Test Kits खरेदीस कार्योत्तर मान्यतेस्तव व राज्य आपत्ती नियोजन समिती मधून प्राप्त होणाऱ्या निधीमधून संबंधीत पुरवठाधारकांना देयके अदा करण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 263/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील कोव्हीड-19 विषाणु बाधित रुग्णांची सद्यस्थितीत वाढणारी संख्या लक्षात घेऊन त्यावरील उपाययोजना औरंगाबाद शहरामधील कोव्हीड-19 रुग्ण शोधण्याकरीता आवश्यक असणाऱ्या VTM Kit व Rapid Antigen Test Kits खरेदी करण्यात आलेल्या आहेत.

67(3)सी अंतर्गत VTM Kit खरेदीकरीता जा.क्र./मनपा/आरोग्य/666/2021 दि.22.03.2021 नुसार M/s Atharva Sales, Padegaon Aurangabad यांना VTM Kit 1 Lakh खरेदी र.रु.13,44,000/- यास

67(3) /सी अंतर्गत Rapid Antigen Tests Kits खरेदीकरीता जा.क्र./मनपा/आरोग्य/767/ 2021 दि.31.03.2021 नुसार M/s Meril Diagnostics Private Limited, Vapi यांना देण्यात आलेले कार्यादेशानुसार M/s Meril Diagnostics Private Limited, Vapi यांचे अधिकृत वितरक M/s Shraddha Distributors, Mumbai यांच्याकडून Rapid Antigen Tests Kits 2,25,000 Tests किट खरेदी र.रु.1,40,30,000/- यास

VTM Kit खरेदीकरीता ई-निविदा दराबाबत वाटाघाटी पश्चात जा.क्र./मनपा/आरोग्य/2356/2021 दि.16.06.2021 नुसार M/s Bhagawati Feeds Pvt Ltd यांच्याकडून VTM Kit - 1,00,000 Tests Kits खरेदी र.रु.18,50,000/- यास

Rapid Antigen Tests Kits खरेदीकरीता शासन निर्णय दराने जा.क्र./मनपा/आरोग्य/2356A/ 2021 दि.16.06.2021 नुसार M/s SD Biosensor, Gurugram यांच्याकडून Rapid Antigen Kits - 2,00,000 Tests खरेदी र.रु.1,68,00,000/- यास

याप्रमाणे उपरोक्त झालेल्या एकूण खर्च र.रु.3,40,24,000/- (अक्षरी तीन कोटी चाळीस लक्ष चोवीस हजार रुपये फक्त) यास रसिद जिल्हा नियोजन समिती/राज्य आपत्ती नियोजन समिती मधून प्राप्त होणाऱ्या निधीमधून संबंधीत पुरवठाधारकांना देयके अदा करीता कार्योत्तर मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 264/2022.-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.17.01.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.गोविंद छगन राठोड, वॉचमन, मालमत्ता विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांच्या स्वतःच्या (कोव्हीड 19) या आजारावर एम्स हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून यासाठी र.रु.2,70,297/- (दोन लक्ष सत्तर हजार दोनशे सत्त्यान्नव रु. मात्र) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी प्रत्यक्ष शिल्लक असलेली र.रु.2,55,529/- एवढी असून सदरील रक्कमेच्या 90 टक्के र.रु.2,29,976/- मधून 5 टक्के र.रु.13,514/- महानगरपालिका फंडात जमा करून उर्वरीत शिल्लक र.रु.2,16,462/- रक्कम संबंधीतास देय आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.वैखप-2011 प्र.क्र.333/11/राकावि-2 मंत्रालय, मुंबई-32 दि.16.11.2011 अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपूर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयाचे नाव समाविष्ट नाही. परंतु Covid 19 Mild to Moderate Illness या शासनमान्य आजारांमध्ये येतो. औरंगाबाद महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेच्या विषय क्र.65/2020 दि.10.12.2020 च्या ठरावानुसार उपरोक्त आजारावर वैद्यकीय परतावा देता येतो. तसेच उपरोक्त रुग्णालय DCH या प्रकारच्या Facility मध्ये मान्यता प्राप्त यादीत नमुद आहे.

करीता, श्री.गोविंद छगन रोठोड, वॉचमन, मालमत्ता विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांना वैद्यकीय खर्चासाठी अनुज्ञेय असलेली र.रु.2,16,462/-संबंधीतास देण्याची मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 264/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.गोविंद छगन रोठोड, वॉचमन, मालमत्ता विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांच्या स्वत:च्या (कोव्हीड-19) या आजारावर एम्स हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून अग्रिम रक्कमेच्या समायोजनासह संबंधीतास प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.2,16,462/- च्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 265/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि 17.01.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नं.भु.क्र.17850/4 व 17850/5, 17850/6 सिल्लेखाना येथील मिळकत विकास योजना नकाशानुसार आरक्षणाने बाधीत आहे. या क्षेत्राकरीता आरक्षण अंतर्गत बांधून देण्यात आलेल्या "जे" बिल्डिंग मधील स्टील फ्लोअर व दोन मजले बांधकाम क्षेत्र 665.46 चौ.मी. सिध्द शिर्घ गणकानुसार प्रती माह भाडे रु 2,22,263/- प्रमाणे आकारणी नुसार पोलीस आयुक्त कार्यालयाच्या महिला कक्ष (भरोसा) यांच्या कार्यालयास देणेसाठी ठराव क्र.14/2020 दि.05.05.2020 अन्वये मंजुर झाला आहे.

तथापि, सदर इमारतीचा दुसऱ्या मजल्यावर महानगरपालिकेचे वॉर्ड कार्यालय सुरु करण्यात आले असल्याने ठराव क्र.14/2020 मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे परिशिष्ठ ड महानगरपालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इ.कामकाज नियमामधील नियम 1 (र) नुसार फेरबदल करण्याचे प्रस्तावीत करण्यात आले आहे.

त्यानुसार पोलीस आयुक्त कार्यालयाच्या महिला कक्ष (भरोसा) यांच्या कार्यालयास स्टील पहिला मजला क्षेत्रफळ

313.02 चौ.मी.सार्वजनिक वापराच्या वाहनतळासह प्रती माह भाडे रु.1,12,504/- इतर कर वेगळे आकारून भाडेतत्वावर देणेसाठी प्रशासकीय प्रस्ताव मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव क्रमांक 265/2022:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नं.भु.क्र.17850/4 व 17850/5, 17850/6 सिल्लेखाना येथील मिळकत विकास योजना नकाशानुसार आरक्षणाने बाधीत आहे. या क्षेत्राकरीता आरक्षण अंतर्गत बांधून देण्यात आलेल्या "जे" बिल्डिंग मधील स्टील फ्लोअर व दोन मजले बांधकाम क्षेत्र 665.46 चौ.मी. सिध्द शिर्घ गणकानुसार प्रती माह भाडे रु.2,22,263/- प्रमाणे आकारणी नुसार पोलीस आयुक्त कार्यालयाच्या महिला कक्ष (भरोसा) यांच्या कार्यालयास देणेसाठी ठराव क्र.14/2020 दि.05.05.2020 अन्वये मंजुर झाला आहे.

तथापि, सदर इमारतीचा दुसऱ्या मजल्यावर महानगरपालिकेचे वॉर्ड कार्यालय सुरु करण्यात आले असल्याने ठराव क्र.14/2020 मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे परिशिष्ठ ड महानगरपालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इ.कामकाज नियमामधील नियम 1 (र) नुसार फेरबदल करण्याचे प्रस्तावीत करण्यात आले आहे.

त्यानुसार पोलीस आयुक्त कार्यालयाच्या महिला कक्ष (भरोसा) यांच्या कार्यालयास स्टील पहिला मजला क्षेत्रफळ 313.02 चौ.मी.सार्वजनिक वापराच्या वाहनतळासह प्रती माह भाडे रु.1,12,504/- इतर कर वेगळे आकारून भाडेतत्वावर देणेसाठी मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 266/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.17.01.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.106, कांचनवाडी अंतर्गत लिटल वुडज शाळेपासून नाथ व्हॅली पर्यंत जाणाऱ्या रस्त्याचे खडीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 दरसुची नुसार र.रु.24,92,532/- चे तयार करण्यात आलेले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.31.12.2017 अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. या कामासाठी विहीत पध्दतीचा अवलंब करून ई-निविदा प्रक्रिया द्वारे कंत्राटदाराची नियुक्ती झालेली असुन त्यानंतर सदर काम पुर्ण करण्यात आलेले आहे. प्रत्यक्ष झालेले काम व काम करतांना रोड क्रॉसींगसाठी आर.सी.सी. पाईप टाकणे आवश्यक असल्याने त्या कामाची अतिरिक्त बाब यासाठी या कामावर एकुण र.रु.26,75,000/- चा खर्च होतआहे. अर्थसंकल्पामध्ये रु.25लक्षची तरतुद असून उपलब्ध तरतुदीच्या मर्यादेत कंत्राटदारास देयक अदा करण्यात आलेले आहे. या कामासाठी आणखी रु.1,75,000/- ची तरतुद करणे व या खर्चास मान्यता देणेस्तव प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

करीता, या कामासाठी सुधारित रु.26,75,000/- चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 266/2022**.-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, या कामाचे मुळ अंदाजपत्रक रु.24,92,532/- एवढे असून प्रत्यक्ष झालेले काम व काम करताना रोड क्रॉसींगसाठी आर.सी.सी.पाईप टाकणे आवश्यक असल्याने त्या कामाची अतिरिक्त बाब यासाठी एकूण रु.26,75,000/- चा खर्च होत आहे. करीता या कामासाठी आणखी रु.1,75,000/- ची तरतुद करण्यात येत असून सुधारित रु.26,75,000/- च्या खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी

**प्रस्ताव क्रमांक 267/2022**:-

(प्रशासकीय प्रस्ताव दि.18.01.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.वैभव विजयराव बाकडे, अग्निशामक, महानगरपालिका औरंगाबाद यांनी स्वतःच्या आईच्या नावे श्रीमती. रेखा विजयराव बाकडे यांचा Total Knee Replacement Left Side & Right Side या आजारावर सुश्रुत इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्स, नागपुर येथे उपचारापोटी र.रु.4,99,287/- (अक्षरी चार लाख नव्यांन्नव हजार दोनशे ब्याऐंशी रुपये) इतका खर्च झाला आहे

महानगरपालिका वैद्यकीय परतावा विनियमामध्ये या आजाराचा आकस्मिक आजार म्हणुन समावेश करण्यात आलेला आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय दि.16,11,2011 मध्ये परिशिष्ट अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयांची यादीमध्ये उक्त रुग्णालयाचे नाव समाविष्ट आहे.

संबंधीताच्या उक्त आजारपणातर उपचारापोटी र.रु.4,99,287/- एवढा वैद्यकीय खर्च झालेला आहे. त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.4,65,293/- एवढी असून सादर रक्कमेच्या 90%र.रु.4,18,763/- (अक्षरी चार लाख अठरा हजार सातशे त्रेसष्ठ रुपये फक्त) पैकी 5%र.रु.24,964/- (अक्षरी चोवीस हजार नऊशे चौसष्ट रुपये फक्त) (एकूण सादर केलेले देयक र.रु.4,99,283/- च्या 5%प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरित र.रु.3,93,799/- (अक्षरी तीन लाख त्र्यांन्नऊ हजार सातशे नव्यांन्नव रुपये फक्त) रक्कम देय आहे.

करीता, श्री.वैभव विजयराव बाकडे, अग्निशामक, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.4,65,293/- च्या 90%र.रु.4,18,763/- (अक्षरी चार लाख अठरा हजार सातशे त्रेसष्ठ रुपये फक्त) या वैद्यकीय खर्चास मान्यतेबाबत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 267/2022**:-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.वैभव विजयराव बाकडे, अग्निशामक, महानगरपालिका औरंगाबाद यांना स्वतःच्या आईच्या उपचारासाठी खर्च केलेल्या रक्कमेपैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.4,65,293/- एवढी असून सदर रक्कमेच्या 90%र.रु.4,18,763/- (अक्षरी चार लाख अठरा हजार सातशे त्रेसष्ठ रुपये फक्त) या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी

**प्रस्ताव क्रमांक 268/2022**:-

(प्रशासकीय प्रस्ताव दि.19.01.2022)

मनपा प्रशासक, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीता आहेत की, नियोजन प्राधिकरणाच्या संपुर्ण क्षेत्राचा विचार होऊन विकास योजना प्रस्तावाचे नियोजन अधिक चांगल्या प्रकरे होण्याच्या अनुषंगाने विकास योजना सुधारित करतांना मुळ हद्द व वाढीव हद्द अशा भागाची एकत्रितरित्या विकास योजना तयार करणे बाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 154 अन्वये महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने दि.15.10.2018 रोजी निदेश दिलेले असून, यापुर्वी औरंगाबाद शहराची प्रसिध्द प्रारुप विकास योजना (वाढीव हद्द) बाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद यांनी दि.05.08.2016 रोजी निर्णय दिलेला आहे व सदरचे निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयाने दि 17.04.2020 रोजी कायम केलेले आहे. तसेच औरंगाबाद शहर मुळ हद्द व वाढीव हद्दीची विकास योजना एकत्रितरित्या तयार करणे बाबतचा उल्लेख मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशात आहे.

औरंगाबाद शहराच्या मुळ हद्दीची (ना विकास क्षेत्र वगळून) विकास योजना (भागशः) शासन नगर विकास विभागाची अधिसूचना TPS-3073/4958-WII Date 06 Jan. 1975 अन्वये मंजुर करण्यात आलेली असुन ती दि.06 जानेवारी 1975 पासुन अंमलात आलेली आहे. औरंगाबाद शहराच्या वाढीव हद्दीची विकास योजना (मुळ हद्दी अंतर्गत ना विकास क्षेत्रासह) शासन अधिसुचना UD-11/RPS/3088/454/CR-59/88/UD-12 Date 15 Oct.1991 अन्वये मंजुर करण्यात आलेली असून ती दि.15 Oct 1991 पासून

अंमलात आहे. सिडको (नवीन औरंगाबाद) अधिसुचित क्षेत्राची विकास योजना शासन नगर विकास विभागाची अधिसुचना क्रमांक TPS/3006/9/CR-1/2006/UD-30 Date 08 May 2001 अन्वये मंजुर करण्यात आलेली असून ती दि.17.08.2002 पासून अंमलात आलेली आहे. तसेच महानगरपालिका हद्दीतील मौजे सातारा (भागशः) व मौजे देवळाईचे भागशः क्षेत्र समाविष्ट असलेल्या औरंगाबाद झालर क्षेत्राची विकास योजना (भागशः) शासन नगर विकास विभागाची अधिसुचना TPS 3014/CR-150(B)/2014/UD-30 Date 08 Nov 2017 WITH CORRIGENDUM DATE 01 NOV 2018 अन्वये मंजुर करण्यात आलेली असून ती दि.01 Nov 2018 पासून अंमलात आलेली आहे.

त्याचप्रमाणे शासन नगर विकास विभागाची अधिसुचना AMC/102000/28/CR-13/2000/UD-24 DATE 26 MARCH 2007 अन्वये सिडकोची डि-नोटीफाईड क्षेत्र व शासन नगर विकास विभागाची अधिसुचना AMC/102000/28/CR-13/2000/UD-24 DATE 26 MARCH 2007 अन्वये शिवाजीनगर हा भाग महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्यात आला. त्यामुळे औरंगाबाद महानगरपालिका हद्दी अंतर्गत संपुर्ण क्षेत्राचा विचार करता, वरीलप्रमाणे मंजुर असलेल्या सर्व विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 38 अन्वये सुधारीत करणेसह महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या क्षेत्राची विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम 34 अन्वये तयार करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम 23 (1) अन्वये इरादा जाहिर करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 23 (2) नुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राचा हद्द दर्शविणारा व मा.आयुक्त यांनी स्वाक्षांकीत केलेला नकाशा, महानगरपालिकेच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरीकांच्या अवलोकनासाठी ठेवणे आवश्यक आहे.

विकास योजना तयार करण्याच्या महानगरपालिकेचा इरादा, महाराष्ट्र शासन राजपत्रात व स्थानिक मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात सुचनेद्वारे प्रसिध्द करणे आवश्यक आहे. सदरची सुचना, महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून 60 दिवसांचे कालावधीत प्राप्त होणाऱ्या नागरीकांच्या सुचना/हरकतींचा विचार, विकास योजना तयार करतांना करणे आवश्यक आहे.

औरंगाबाद शहराची एकत्रित विकास योजना तयार करणे करीता शासनाने नगर विकास विभागाचा निर्णय क्र.विघयो/3820/प्रुओआर-6/प्र.क्र.218/नवि-27 दि.02.08.2021 अन्वये उपसंचालक नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद या कार्यालयाची स्थापना केलेली आहे. त्यानुसार उपसंचालक नगर रचना, विकास योजना विशेष घटक औरंगाबाद मनपा औरंगाबाद यांनी सदरच्या कामाचा कार्यभार स्विकारलेला आहे. सबब विकास योजना क्षेत्राचे सर्व्हेक्षण करण्याकरीता त्याचा विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करून मनपाकडे सादर करण्याकरीता त्या क्षेत्राचे विकास योजनेचे प्रस्ताव तयार करण्याकरीता व त्या संबंधी इतर सर्व कामे करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशीक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 24 अन्वये उपसंचालक नगर रचना, विकास योजना विशेष घटक औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद यांनी "नगर रचना अधिकारी" म्हणुन नेमणूक करण्यासाठी मान्यता देणे आवश्यक असून "नगर रचना अधिकारी" यांच्या नेमणुकीस मा.सहसंचालक, नगर रचना औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांची पुर्व मंजुरी घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे व त्यांनी मंजुरी दिल्यानंतर नगर रचना अधिकारी यांच्या नियुक्तीचे औपचारिक आदेश मा.आयुक्त यांनी पारीत करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 21(2) मधील तरतुदींनुसार महानगरपालिकेची स्थापना झाल्यापासून तीन वर्षाच्या आत अथवा शासनाने वेळोवेळी वाढवून दिलेल्या मुदतीत प्रत्येक नियोजन प्राधिकरणाने त्यांचे हद्दीतील क्षेत्राची विकास योजना तयार करून राज्य शासनाकडे मंजुरीसाठ सादर करणे आवश्यक आहे. औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमध्ये शासन नगर विकास विभागाची अधिसुचना सिडको/एस.पी.(एन.टी.)29/(एन.टी.317(जीएम)/29(एसटी)/223 दि.24.02.2000 अन्वये सिडकोचे डि नोटीफाईड क्षेत्र व शासन नगर विकास विभागाची अधिसुचना AMC/102000/28/CR-13/2000/UD-24 DATE 26 MARCH 2007 अन्वये शिवाजीनगर हा भाग समाविष्ट करण्यात आलेला असून त्यानुसार उक्त क्षेत्रासाठी सदर तीन वर्षाची मुदत वर्ष 2010 मध्ये संपुष्टात आली आहे. या कालावधीत विकास योजना तयार करून ती प्रसिध्द करणे व पुढील कार्यवाही करून शासनास सादर करणे शक्य झाले नाही. तरी या कार्यवाहीसाठी लागणारा कालावधी विचारात घेता, अधिनियमाच्या कलम 21 (3) अन्वये वर्ष 2024 पर्यंत मुदतवाढ घेण्यास मंजुरी देणे आवश्यक आहे.

करीता.

अ) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 38 व 34 सह कलम 23 (1) अन्वये इरादा जाहीर करणे आवश्यक आहे.

ब) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 24 अन्वये उपसंचालक नगर रचना, विकास योजना विशेष घटक, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांनी नगर रचना अधिकारी म्हणून नेमणूक होणे आवश्यक आहे.

क) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 21 (3) नुसार नियोजन प्राधिकरणाच्या क्षेत्राधिकारात अतिरिक्त क्षेत्र समाविष्ट होऊन 3 वर्षापेक्षा जास्त कालवधीत संपुष्टात आलेला असल्यामुळे त्यास वर्ष 2024 पर्यंत मुदतवाढ घेणे आवश्यक आहे.

<u>ठराव क्रमांक 268/2022</u>:-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,

1) नियोजन प्राधिकरणाच्या संपुर्ण क्षेत्राचा विचार होऊन विकास योजना प्रस्तावाचे नियोजन अधिक चांगल्या प्रकारे होण्याच्या अनुषंगाने विकास योजना सुधारित करतांना मुळ हद्द व वाढीव हद्दी अशा भागाची एकत्रितरित्या विकास योजना तयार करणे बाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 154 अन्वये महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने दि.15.10.2018 रोजी निदेश दिलेले असून, यापुर्वी औरंगाबाद शहराची प्रसिध्द प्रारुप विकास योजना (वाढीव हद्द) बाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद यांनी दि.05.08.2016 रोजी निर्णय दिलेला आहे व सदरचे निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.17.04.2020 रोजी कायम केलेले आहे. तसेच औरंगाबाद शहर मुळ हद्द व वाढीव हद्दीची विकास योजना एकत्रितरित्या तयार करणे बाबतचा उल्लेख मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशात आहे.

औरंगाबाद शहराच्या मुळ हद्दीची (ना विकास क्षेत्र वगळून) विकास योजना (भागशः) शासन नगर विकास विभागाची अधिसूचना TPS-3073/4958-WII Date 06 Jan. 1975 अन्वये मंजुर करण्यात आलेली असुन ती दि.06 जानेवारी 1975 पासुन अंमलात आलेली आहे. औरंगाबाद शहराच्या वाढीव हद्दीची विकास योजना (मुळ हद्दी अंतर्गत ना विकास क्षेत्रासह) शासन अधिसुचना UD-TPS/3088/454/CR-59/88Ud-12) Date 15 Oct.1991 अन्वये मंजुर करण्यात आलेली असून ती दि.15 Oct 1991 पासून अंमलात आहे. सिडको (नवीन औरंगाबाद) अधिसुचित क्षेत्राची विकास योजना शासन नगर विकास विभागाची अधिसूचना क्र.TPS/3006/9/CR-1/2006/UD-30 Date 08 May 2001 अन्वये मंजुर करण्यात आलेली असून ती दि.17.08.2002 पासून अंमलात आलेली आहे. तसेच महानगरपालिका हद्दीतील मौजे सातारा (भागशः) व मौजे देवळाईचे भागशः क्षेत्र समाविष्ट असलेल्या औरंगाबाद झालर क्षेत्राची विकास योजना (भागशः) शासन नगर विकास विभागाची अधिसुचना TPS-3014/CR-159(B)/2014/UD-30 Date 08 Nov 2017 WITH CORRIGENDUM DATE 01 NOV 2018 अन्वये मंजुर करण्यात आलेली असून ती दि.01 Nov 2018 पासून अंमलात आलेली आहे.

त्यामुळे औरंगाबाद मनपा हद्दीअंतर्गत संपुर्ण क्षेत्राचा विचार करता, वरीलप्रमाणे मंजुर असलेल्या सर्व विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 38 अन्वये सुधारीत करणेसह महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या क्षेत्राची विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम 34 अन्वये तयार करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम 23 (1) अन्वये इरादा जाहिर करणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 38 व 34 सह कलम 23 (1) अन्वये औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत वरीलप्रमाणे संपुर्ण क्षेत्राकरीता विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी सदर ठरावान्वये मान्यता देण्यात येत आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 23 (2) नुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राचा हद्द दर्शविणारा व मा.आयुक्त यांनी साक्षांकीत केलेला नकाशा, महानगरपालिकेच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात यावा.

विकास योजना तयार करण्याचा महानगरपालिकेचा इरादा, महाराष्ट्र शासन राजपत्रात व स्थानिक मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात सुचनेद्वारे प्रसिध्द करण्यात यावा. सदरची सुचना, महाराष्ट्र शासन राजपत्रात

प्रसिध्द झाल्यापासून 60 दिवसांच्या कालावधीत प्राप्त होणाऱ्या नागरीकांच्या सुचना/हरकतींचा विचार, विकास योजना तयार करतांना करण्यात यावा.

2) औरंगाबाद शहराची एकत्रित विकास योजना तयार करणे करीता शासनाने नगर विकास विभागाचा निर्णय क्र.विकयो/3820/युओआर-6/प्र.क्र.218/नवि-27 दि.07.06.2021 अन्वये उपसंचालक नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद या कार्यालयाची स्थापना केलेली आहे. त्यानुसार उपसंचालक नगर रचना, विकास योजना विशेष घटक औरंगाबाद मनपा औरंगाबाद यांनी सदरच्या कामाचा कार्यभार स्विकारलेला आहे. सबब विकास योजना क्षेत्राचे सर्व्हेक्षण करण्याकरीता त्याचा विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करून मनपाकडे सादर करण्याकरीता त्या क्षेत्राचे विकास योजनेचे प्रस्ताव तयार करण्याकरीता व त्या संबंधी इतर सर्व कामे करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशीक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 24 अन्वये उपसंचालक नगर रचना, विकास योजना विशेष घटक औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद यांनी "नगर रचना अधिकारी" म्हणुन नेमणूक करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे. "नगर रचना अधिकारी" यांच्या नेमणुकीस मा.सहसंचालक, नगर रचना औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांची पुर्व मंजुरी घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे व त्यांनी मंजुरी दिल्यानंतर नगर रचना अधिकारी यांच्या नियुक्तीचे औपचारिक आदेश मा.आयुक्त यांनी पारीत करावे

3) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 21(2) मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेची स्थापना झाल्यापासून तीन वर्षाच्या आत अथवा शासनाने वेळोवेळी वाढवून दिलेल्या मुदतीत प्रत्येक नियोजन प्राधिकरणाने त्यांचे हद्दीतील क्षेत्राची विकास योजना तयार करून राज्य शासनाकडे मंजुरीस्तव सादर करणे आवश्यक आहे. औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमध्ये शासन नगर विकास विभागाची अधिसुचना सिडको/एस.पी.(एन.टी.)29/(एन.टी.)317(जीएम)/29(एसटी)/223 दि.24.02.2000 अन्वये सिडकोचे डि-नोटीफाईड क्षेत्र व शासन नगर विकास विभागाची अधिसुचना AMC/102000/28/CR-13/2000/UD-24 DATE 26 MARCH 2007 अन्वये शिवाजीनगर हा भाग समाविष्ट करण्यात आलेला असून त्यानुसार उक्त क्षेत्रासाठी सदर तीन वर्षाची मुदत वर्षे 2010 मध्ये संपुष्टात आली आहे. या कालावधीत विकास योजना तयार करून ती प्रसिध्द करणे व पुढील कार्यवाही करून शासनास सादर करणे शक्य झाले नाही तरी या कार्यवाहीसाठी लागणारा कालावधी विचारात घेता, अधिनियमाच्या कलम 21 (3) अन्वये वर्ष 2024 पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

विकास योजना तयार करण्याच्या कायदेशीर बाबींवर कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद यांना देण्यात येत आहेत. तद्संबंधी लागणाऱ्या सर्व खर्चास मंजुरी देण्यात येत आहे. करीता वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 269/2022**:

(प्रशासकीय प्रस्ताव दि.20.01.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील बांधकामासाठी ऑनलाईन बांधकाम परवानगी देणेसाठी बी.पी.एम.एस. या संगणकीय प्रणालीसाठी शासनाने तयार केलेल्या सॉफ्टवेअर (महा.आय.टी.द्वारे तयार केलेल्या) आधारे औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे दि. 20 ऑक्टोबर 2018 पासून (तेव्हाच्या ड महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली नुसार) राबविण्यात येत आहे.

शासनाच्या नगर विकास विभागाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता इतर महानगरपालिका, नगरपालिका, विशेष नियोजन प्राधिकरणे इत्यादींना शासन अधिसुचना दि.02.12.2020 नुसार एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) लागू केली आहे. या नियमावलीसाठीही शासनाने सॉफ्टवेअर तयार केले असून त्या आधारे विकास परवानगी प्रस्ताव स्विकारले जातात. बी.पी.एम. एस. प्रणाली लागू केल्याने दि.31.12.2021 पर्यंत ऑफलाईन प्रस्ताव स्विकारणे बाबत कळविण्यात आलेले होते. तद्नंतर सर्व प्रस्ताव ऑनलाईन स्वीकारणे बाबत सुचित करण्यात आलेले आहे. (क्रमांक.टिपीएस-1815/527/प्र.क्र.139/15/नवि-13 दि.09/12/2021)

वरील दोन्ही नियमावलीमध्ये बी.पी.एम.एस. प्रणालीद्वारे आता पर्यंत प्रस्ताव स्वीकारले जात होते. मात्र या दोन्ही प्रणालीत मोठ्या आकाराच्या बांधकाम परवानगी प्रस्तावांना अपलोड करणे त्रासदायक होत असल्याचा अनुभव आहे. ड वर्ग महानगरपालिका नियमावलीनुसार एकुण 2778 प्रस्ताव बी.पी.एम.एस. प्रणाली मार्फत दाखल करून घेण्यात आले त्यापैकी 1000.00 चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्राचे केवळ 19 प्रस्ताव यशस्वीपणे

अपलोड होऊ शकले. त्यातही केवळ 6 प्रस्ताव 100%बीनचुकपणे अपलोड होऊन त्यास मान्यता झाली सर्व प्रस्ताव ऑफलाईन पध्दतीने दाखल करून त्यांना मान्यता द्यावी लागली.

UDCPR- नियमावली लागू झाल्यानंतर बी.पी.एम.एस या संगणकीय प्रणालीमध्ये 1000.00 चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्र असलेले केवळ तीन प्रस्ताव दाखल होऊ शकले. त्यामध्ये एक प्रस्ताव नामंजुर व 02 प्रस्तावास त्रुटींची पुर्तता करणे कळविण्यात आलेले आहे. या प्रस्तावामध्ये अनेक अडचणी निर्माण होत असल्याने वास्तुविशारद यांनी विनंती करून एक प्रस्ताव ऑफ लाईन सादर केला व त्यास मंजुरीही मिळाली आहे. एकदरीतच एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) लागू झाल्यानंतर 1000.00 चौ.मी पेक्षा जास्त क्षेत्र असलेले प्रस्ताव बी.पी.एम.एस. या संगणकीय प्रणालीमध्ये दाखल होण्यास व मान्यता होण्यास अडचणी निर्माण होत आहेत. अद्यापि 1000.00 चौ.मी पेक्षा जास्त क्षेत्राचा एकही प्रस्ताव परिपूर्णपणे अपलोड न झाल्याने त्यास मान्यता प्राप्त झालेली नाही.

वास्तुविशारद, इंजिनिअर तसेच क्रेडाई यांच्या पदाधिकारी यांच्यामार्फत ऑनलाईन प्रस्ताव दाखल होत नसल्याने वेळोवेळी ऑफलाईन पध्दतीने प्रस्ताव स्वीकारणे बाबत विनंती करण्यात येत आहे.

ऑनलाईन पध्दतीने विकास परवानगी देण्याची प्रणाली हे सर्व नागरिकांना, वास्तुविशारद, इंजिनिअर व नियोजन प्राधिकरण यांना सुलभ कार्यपध्दती व जलद विनाविलंब विकास परवानगी अनुज्ञेय करण्याच्या दृष्टीने लागू करण्यात आलेली आहे. परंतु वास्तुविशारद व क्रेडाईचे पदाधिकारी यांनी या प्रणालीमध्ये मोठ्या क्षेत्राचे प्रस्ताव/विकास परवानगी अपलोड करण्यास अडचणींचा सामना करावा लागत असून, विकास परवाना मंजुरी पध्दत, वास्तुविशारद व नगर रचना विभाग या दोघांना सोईची व्हावी व केवळ संगणकीय प्रणालीत अपलोड होण्याच्या अडचणीमुळे शहर विकासात अडचण येऊ नये व महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊ नये यासाठी 1000.00 चौ.मी.पेक्षा जास्त क्षेत्राचे भुखंडाचे विकास परवानगी प्रस्ताव ऑफलाईन पध्दतीनेही स्विकारण्याचा पर्याय उपलब्ध करून देणे आवश्यक वाटते. अशी मागणी बांधकाम व्यावसायीकांच्या संघटनेने (क्रेडाई) व वास्तुविशारदांच्या संघटनेने केली आहे. ही बाब बघता विकास परवानगी प्रस्ताव मान्यता सर्व संबंधीतांना सोईची व सुटसुटीत होऊन त्यात कोणताही अडथळा येऊ नये यासाठी 1000.00 चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्राच्या भुखंडावरील विकास परवानगी प्रस्ताव ऑफलाईन पध्दतीनेही स्विकारण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यास मान्यता देणे योग्य वाटते त्यानुसार प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 269/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे शासनाने मान्य केलेल्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) चीअंमलबजावणी दि.02.12.2020 पासून सुरु केली आहे. त्याप्रमाणे बी.पी.एम.एस.या ऑनलाईन बांधकाम परवानगी प्रणालीचीही अंमलबजावणी औरंगाबाद महानगरपालिके मार्फत सुरु केली आहे.

मात्र शहरातील बांधकाम व्यावसायीक व वास्तुविशारद यांनी मोठ्या भुखंडावरील विकास परवानगी प्रस्ताव सदर प्रणालीत अपलोड करून पुढील कार्यवाही करणे अडचणीचे व जीकीरीचे होत असल्याने मोठ्या भुखंडासाठी ऑफलाईन पध्दतीचाही पर्याय उपलब्ध ठेवण्याची मागणी केली आहे. तसेच संगणकीय प्रणालीद्वारे मंजुर झालेल्या प्रस्तावांचा अभ्यास केल्यानंतर या मागणीत तथ्य असल्याचे आढळून येते. त्यामुळे 1000.00 चौ.मी.क्षेत्रावरील भुखंडासाठी ऑफलाईन पध्दतीने प्रस्ताव स्विकारण्याचा पर्याय दि.31 मार्च 2022 पर्यंत सुरु ठेवण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 270/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.21.01.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गुंठेवारी विकास अधिनियमात सुधारणा होऊन महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम (सुधारणा)-2021 हा अधिनियम लागू करण्यात आलेला आहे. या अधिनियमानुसार दि.31 डिसेंबर 2020 पर्यंतचा गुंठेवारी विकास नियमित करण्यासाठी गुंठेवारी कक्षाची स्थापना करण्यात आलेली असून सदरचे काम सुरु करण्यात आलेले आहे. सदरची योजना महत्वपुर्ण आणि महत्वाकांक्षी असून सदर योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी व कामे जलदगतीने होण्याकरीता अनुभवी व जाणकार अधिकाऱ्यांची आवश्यकता आहे.सध्या कार्यरत तांत्रिक अधिकाऱ्यांची संख्या अत्यंत कमी असून सदरील कामे पार पाडण्यासाठी उपलब्ध तांत्रिक अधिकाऱ्यांना अतिरिक्त कार्यभार सोपवून काम करून घेण्यात येत आहे. त्यामुळे संबंधीत अधिकाऱ्यांवर अतिरिक्त ताण निर्माण होत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53 (1) नुसार महानगरपालिकेच्या ज्या अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेला किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे- ज्या असे

अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित असेल.

परंतु, आयुक्ताला (महानगरपालिकेचा सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या) कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्वमंजुरीने या अटीवर करता येतील की, आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणूक करतांना त्याविषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्वमंजुरीवाचून अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीनकरण करता येणार नाही.

श्री.जयंत खरवडकर, नगर रचनाकार तथा प्र.उपसंचालक (नगररचना) (सेवानिवृत्त) यांची शैक्षणिक अर्हता डी.सी.ई., बी.टेक. (सिव्हील), ए.आय.ई.,एम.आय.सी.ई(आय.) एल.एल.बी. अशी आहे. त्यांनी गुंठेवारी अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विशेष प्रयत्न केलेले असून त्यानुसार महानगरपालिकेच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. तसेच विकास योजनेसाठी विशेष घटकाला सहाय्य करण्यासाठी श्री.जयंत खरवडकर यांना नगररचना विभागातील कामाचा अनुभव प्रभावी ठरेल.

तरी उपरोक्त सर्व परिस्थिती पाहता, श्री.जयंत खरवडकर, नगर रचनाकार तथा प्र.उपसंचालक (नगर रचना) (सेवानिवृत्त) हे दि.31.10.2021 रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त झाल्याने त्यांना महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम (सुधारणा)-2021 हा अधिनियमानुसार दि.31 डिसेंबर 2020 पर्यंतच्या गुंठेवारी विकास नियमित करण्यासाठी या विवक्षित कामासाठी विशेष कार्य अधिकारी म्हणुन 06 महिन्यांसाठी नेमणुक देणे आवश्यक आहे.

संबंधीतांना दरमहा सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरून) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रकमेची कमाल मासिक मर्यादा रु.40,000/- (रुपये चाळीस हजार फक्त) इतक्या मर्यादित राहील.

करीता, महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम (सुधारणा)-2021 हा अधिनियमानुसार दि.31 डिसेंबर 2020 पर्यंतच्या गुंठेवारी विकास नियमित करण्यासाठी या विवक्षीत कामासाठी विशेष कार्य अधिकारी म्हणुन श्री.जयंत खरवडकर, नगर रचनाकार(सेवानिवृत्त) यांना सेवा करार पध्दतीने 06 महिन्यांच्या कालावधीसाठी सेवा करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 270/2022</u>:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गुंठेवारी विकास अधिनियमात सुधारणा होऊन महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम (सुधारणा)-2021 हा अधिनियम लागू करण्यात आलेला आहे. या अधिनियमानुसार दि.31 डिसेंबर 2020 पर्यंतचा गुंठेवारी विकास नियमित करण्यासाठी गुंठेवारी कक्षाची स्थापना करण्यात आलेली असून सदरचे काम सुरु करण्यात आलेले आहे. सदरची योजना महत्वपुर्ण आणि महत्वाकांक्षी असून सदर योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी व कामे जलदगतीने होण्याकरीता अनुभवी व जाणकार अधिकाऱ्यांची आवश्यकता आहे.सध्या कार्यरत तांत्रिक अधिकाऱ्यांची संख्या अत्यंत कमी असून सदरील कामे पार पाडण्यासाठी उपलब्ध तांत्रिक अधिकाऱ्यांना अतिरिक्त कार्यभार सोपवून काम करून घेण्यात येत आहे. त्यामुळे संबंधीत अधिकाऱ्यांवर अतिरिक्त ताण निर्माण होत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53 (1) नुसार महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे.-मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित असेल.

परंतु, आयुक्ताला (महानगरपालिकेचा सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या) कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्वमंजुरीने या अटीवर करता येतील की, आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणूक करतांना त्याविषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्वमंजुरीवाचून अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीनकरण करता येणार नाही.

श्री.जयंत खरवडकर, नगर रचनाकार तथा प्र.उपसंचालक (नगररचना) (सेवानिवृत्त) यांची शैक्षणिक अर्हता डी.सी.ई., बी.टेक. (सिव्हील), ए.आय.ई.,एम.आय.सी.ई(आय.) एल.एल.बी. अशी आहे. त्यांनी गुंठेवारी

अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विशेष प्रयत्न केलेले असून त्यानुसार महानगरपालिकेच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. तसेच विकास योजनेसाठी विशेष घटकाला सहाय्य करण्यासाठी श्री.जयंत खरवडकर यांना नगररचना विभागातील कामाचा अनुभव प्रभावी ठरेल.

तरी उपरोक्त सर्व परिस्थिती पाहता, श्री.जयंत खरवडकर, नगर रचनाकार तथा प्र.उपसंचालक (नगर रचना) (सेवानिवृत्त) हे दि.31.10.2021 रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त झाल्याने त्यांना महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम (सुधारणा)-2021 हा अधिनियमानानुसार दि.31 डिसेंबर 2020 पर्यंतच्या गुंठेवारी विकास नियमित करण्यासाठी या विवक्षित कामासाठी विशेष कार्य अधिकारी म्हणून 06 महिन्यांसाठी नेमणुक देणे आवश्यक आहे.

संबंधीतांना त्यांच्या सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरून) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रकमेची कमाल मासिक मर्यादा रु.40,000/- (रुपये चाळीस हजार फक्त) इतक्या मर्यादित राहील.

करीता, महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम (सुधारणा)-2021 हा अधिनियमानुसार दि.31 डिसेंबर 2020 पर्यंतच्या गुंठेवारी विकास नियमित करण्यासाठी या विवक्षीत कामासाठी विशेष कार्य अधिकारी म्हणुन श्री.जयंत खरवडकर, नगर रचनाकार(सेवानिवृत्त) यांना सेवा करार पध्दतीने 06 महिन्यांच्या कालावधीसाठी सेवा करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबत मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 271/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.21.01.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, 15 वा वित्त आयोग निधी मधून 8.5 घ.मी.क्षमतेचे 03 नग टिप्पर्स प्रतिनग रु.28,75,000/- दराने खरेदी करण्यासाठी एकूण र.रु.86,25,000/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा विषय क्र 207 दि.13.10.2021 प्रमाणे मान्यता घेण्यात आली आहे.अंदाजपत्रकास मान्यता मिळाल्यानंतर जीईएम पोर्टलद्वारे जाहीर निविदा मागविण्यात आल्या असता खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्यावर आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | प्राप्त निविदा दर |
|---|---|---|
| 1. | मे.अशोक लिलॅन्ड लि. | 82,50,000/- |
| 2. | मे.टाटा मोटर्स लि. | 87,69,300/- |
| 3. | मे.यु.एस.एन्टरप्रायजेस | 1,11,00,000/- |

प्राप्त 03 निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे.अशोक लिलॅन्ड लि. यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा रु.3,75,000/- ने कमी आहे. त्यामुळे ही निविदा स्विकृत करणे योग्य होईल. करीता, मे.अशोक लिलॅन्ड लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची रु.82,50,000/- खर्चाची निविदा स्विकृत करणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 271/2022:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जीईएम पोर्टलद्वारे मागविण्यात आलेल्या जाहिर निविदेतील प्राप्त न्युनतम दराची मे.अशोक लिलॅन्ड लि. यांची रु.82,50,000/- खर्चाची निविदा स्विकृतीस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 272/2022.-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.28.01.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेचे गुलमंडी वाहनतळ असून सदर वाहनतळ निविदा पध्दतीने ठेकेतत्वावर देणेसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरील निविदेत चार निविदा प्राप्त झाल्या असून त्यात सर्वोच्च वार्षीक दर श्री.मोहन दुलीचंद गुरखुडे (र.रु.9,04,000/-) यांचे प्राप्त आहेत.

करीता निविदेत सर्वाधीक वार्षीक दर भरणारे श्री.मोहन दुलीचंद गुरखुडे र.रु.9,04,000/- त्यावर 18 टक्के जी.एस.टी.र.रु.1,62,720/- असे एकत्रित रु.10,66,720/- आहे. त्याप्रमाणे संबंधीतांकडून प्रतिमाह भाडे र.रु.88,893/- प्राप्त होतील. त्यानुषंगाने संबंधीतास तीन वर्षासाठी ठेका देणेच्या विचारार्थ शिफारस मान्यतेस्तव सादर

**ठराव क्रमांक 272/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.मोहन दुलीचंद गुरखुडे यांचे वार्षीक उच्च दर रु.9,04,000/- त्यावर 18 टक्के जी.एस.टी. र.रु.1,62,720/- असे एकत्रित रु.10,66,720/- आहे. त्याप्रमाणे संबंधीतांकडून प्रतिमाह भाडे र.रु.88,893/- प्राप्त होतील. उक्त दरास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 273/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.08.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, देशामध्ये व राज्यामध्ये कोव्हीड-19 या विषाणुचा प्रार्दुभाव झाल्यामुळे Pandemic ची साथ संपुर्ण जग, देश व राज्यामध्ये पसरली असून कोव्हीड-19 हा साथरोग नियंत्रित करण्याची आवश्यकता आहे. औरंगाबाद शहरातील कोव्हीड-19 विषाणु बाधीत रुग्णांची रुग्णस्थिती व त्यावरील उपाय योजना करण्याबाबत प्रस्ताव सादर करीत आहेत की, सन 2020-2021 या आर्थिक वर्षात कोव्हीड-19 प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी Inj Remdesiver 100 mg (SARS-Cov 2/Covid-19) कलम 67 (3) क अंतर्गत DMER RC च्या दरानुसार कार्यालयीन आदेश क्रमांक जा.क्र./मनपा/आरोग्य/2021/687 दि.23.03.2021 नुसार खरेदी करण्यात आलेली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पुरवठाधारकाचे नाव | वस्तुचे नाव | दर | संख्या | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|---|---|
| 1. | M/s Mylan Laboratories Ltd., Bangalore | Inj Remdesiver 100 mg | 595.00+ GST extra | 2000 | 11,90,000.00 |
| | | | Add GST 12% | | 1,42,800.00 |
| | | | | एकुण रक्कम रुपये | 13,32,800.00 |

सन 2020-2021 या आर्थिक वर्षासाठी कोव्हीड-19 प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी आरोग्य विभागाअंतर्गत लागणारी Inj Remdesiver 100 mg (SARS-Cov-2/Covid-19) व त्यासाठी लागणारी तरतुद रु.13,32,800/- (अक्षरी तेरा लक्ष बत्तीस हजार आठशे रुपये फक्त) एवढा खर्च करण्यात आलेला आहे.

तसेच कलम 67 (3) क अंतर्गत DMER RC च्या दरानुसार कार्यालयीन आदेश क्रमांक जा.क्र/मनपा/आरोग्य/2021/711 दि.26.03.2021 नुसार खरेदी करण्यात आलेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पुरवठाधारकाचे नाव | वस्तुचे नाव | दर | संख्या | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|---|---|
| 1. | M/s Mylan Laboratories Ltd., Bangalore | Inj Remdesiver 100 mg | 595.00+ GST extra | 8100 | 48,19,500.00 |
| | | | Add GST 12% | | 5,78,340.00 |
| | | | | एकुण रक्कम रुपये | 53,97,840.00 |

सन 2020-2021 या आर्थिक वर्षासाठी कोव्हीड-19 प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी आरोग्य विभागाअंतर्गत लागणारी Inj Remdesiver 100 mg (SARS-Cov-2/Covid-19) व त्यासाठी लागणारी तरतुद रु.53,97,840/- (अक्षरी त्रेपण्ण लक्ष सत्याण्णव हजार आठशे चाळीस रुपये फक्त) एवढा खर्च करण्यात आलेला आहे.

सदरील खर्च मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी कोव्हिड-19 प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी प्राप्त निधीतून भागविण्यात येणार आहे.

उपरोक्त खरेदी DMER RC च्या दरानुसार करण्यात आलेली आहे. त्यानुसार रु.13,32,800/- (अक्षरी तेरा लक्ष बत्तीस हजार आठशे रुपये फक्त) + 53,97,840/- (अक्षरी त्रेपण्ण लक्ष सत्याण्णव हजार आठशे चाळीस रुपये फक्त) असे एकूण रु.67,30,640/- (अक्षरी रुपये सदुसष्ठ लक्ष तीस हजार सहाशे चाळीस फक्त) एवढ्या खर्चास मा.सर्वसाधारण सभेच्या कार्योत्तर मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव क्रमांक 273/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2020-2021 या आर्थिक वर्षी कोव्हीड-19 प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी आरोग्य विभागाअंतर्गत लागणारे Inj Remdesiver 100mg, DMER RC च्या दरानुसार M/s mylan Laboratories Banglore यांच्याकडून एकूण 10,100 व्हायलसची खरेदी व झालेला खर्च एकूण रु.67,30,640/- (अक्षरी रुपये सदुसष्ठ लक्ष तीस हजार सहाशे चाळीस फक्त) यास कार्योत्तर मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 274/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.08.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन 2022-23 या एका आर्थिक वर्षासाठी प्राणी संग्रहालयात असलेल्या हिंस्त्र प्राण्यांना देण्यात येणारे खाद्य बीफ खरेदी करण्यासाठी ई-टेन्डरद्वारे निविदा मागवून दर निश्चित करावयाचे आहेत.

प्राणी संग्रहालयात असलेले हिंस्त्र प्राणी वाघ, पांढरे वाघ, बिबट, कोल्हे, उदमांजर आणि मगर या प्राण्यांना केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांचे मानकानुसार सध्या प्रतिदिनी 150 किलो बीफ खाद्य खरेदी करण्यात येत आहे. सध्याचे बीफ खरेदीचे दर रु.200/- प्रति किलो आहेत. या दरानुसार बीफ खाद्य खरेदी करण्यासाठी अंदाजे वार्षिक खर्च रु.93.90 लक्ष अपेक्षीत आहे. सदर खर्च हा प्राणी देखभाल या लेखाशिर्षातून करण्यात येणार आहे. प्राण्यांची संख्या कमी जास्त झाल्यास त्यानुसार बीफ खरेदीचे प्रमाण कमी जास्त करण्यात येते.

करीता सन 2022-2023 या एका आर्थिक वर्षासाठी प्राणी संग्रहालयात असलेल्या हिंस्त्र प्राण्यांना देण्यात येणारे खाद्य बीफ खरेदी करण्यासाठी लागणारी अंदाजपत्रकीय तरतुद रु.93.90 लक्ष मंजुरीसाठी मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर

**ठराव क्रमांक 274/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2022-23 या एका आर्थिक वर्षासाठी प्राणी संग्रहालयात असलेल्या हिंस्त्र प्राण्यांना देण्यात येणारे खाद्य बीफ खरेदी करण्यासाठी लागणारी अंदाजपत्रकीय तरतुद र.रु.93.90 लक्ष यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 275/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.08.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन 2022-23 या एका आर्थिक वर्षासाठी प्राणी संग्रहालयात असलेल्या प्राण्यांना देण्यात येणारे खाद्य खरेदी करण्यासाठी ई-टेन्डरद्वारे निविदा मागवून दर निश्चित करावयाचे आहेत.

प्राणी संग्रहालयात असलेल्या प्राण्यांना केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या मानकानुसार मासोळी, लुसन घास, हिरवा मका, शालु कडबा, पशुपक्षी खाद्य, भाजीपाला व किराणा हे खाद्य पदार्थ खरेदी करण्यात येत आहे. सन 2021-22 च्या मंजुर दरानुसार खाद्य खरेदी करण्यासाठी अंदाजे वार्षिक खर्च रु.31.39 लक्ष अपेक्षीत आहे. सन 2022-23 साठी होणारा खर्च हा प्राणी देखभाल या लेखाशीर्षातून करण्यात येणार आहे. प्राण्यांची संख्या कमी जास्त झाल्यास त्यानुसार खाद्य खरेदीचे प्रमाण कमी जास्त करण्यात येते.

करीता, सन 2022-23 या एका आर्थिक वर्षासाठी प्राणी संग्रहालयात असलेल्या प्राण्यांना देण्यात येणारे खाद्य खरेदी करण्यासाठी लागणारी अंदाजपत्रकीय तरतुद रु.31.39 लक्ष मंजुरीसाठी मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर

**ठराव क्रमांक 275/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2022-23 या एका आर्थिक वर्षासाठी प्राणी संग्रहालयात असलेल्या प्राण्यांना देण्यात येणारे खाद्य खरेदी करण्यासाठी लागणारी अंदाजपत्रकीय तरतुद रु.31.39 लक्ष यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी

**प्रस्ताव क्रमांक 276/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.08.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, ज्याअर्थी जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना (कोवीड-19) या विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषित केलेला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात, महाराष्ट्रातील शहरात वेगाने पसरत असल्याने निदर्शनास आले आहे. राज्य शासनाने कोरोना विषाणुचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदे 1897 दि.13.03.2020 पासून लागु करुन त्या बाबतची नियमावली तयार केली आहे. कोरोना बाधीत रुग्णांची संख्या औरंगाबाद मनपा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ असल्याचे निदर्शनास आल्याने त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणु संसर्गाचा अधिक वाढ होऊ न देता तात्काळ उपाय योजना आखणे आवश्यक आहे.

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील (कोव्हीड-19) या विषाणुमुळे मृत्यु पावलेले रुग्णांना रुग्णवाहिकेद्वारे हॉस्पीटल व इतर आरोग्य संस्थेतून मृतदेह आणणे व दहन/दफन विधी करण्यासाठी स्मशान भुमीत घेऊन जाण्याकरीता मे.पंचशील महिला बचतगटाची मा.प्रशासक मनपा औरंगाबाद यांचे दि.26.05.2020 च्या मान्यतेनुसार नियुक्ती करण्यात आली.

तसेच औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील (कोव्हीड-19) या विषाणुमुळे मृत्यु पावलेले मृतदेह रुग्णवाहिकेद्वारे हॉस्पीटल व इतर आरोग्य संस्थेतून आणणे व दहन/दफन अंत्यविधी करण्यासाठी स्मशान भुमीत व कब्रस्तानात घेऊन जाण्याकरीता खालील सेवा भावी संस्थांनी मोफत अंत्यसंस्कार करण्याची संमती दर्शविली आहे. मा.प्रशासक यांची मान्यतेनुसार मे.मोईन मस्तान सेवाभावी संस्था औरंगाबाद, मे.हजरत खाजा गरीब नवाज रह.सोसायटी सेवाभावी संस्था औरंगाबाद या संस्थेची नियुक्ती करण्यात आलेली.

औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत अंत्यविधी व दफनविधी करण्यासाठी मनपातर्फे साहित्य जसे, एकूण (05) PPE KIT, HAND GLVOES. SANITIZER, MASK, BOI WASTE POLY BAG असे साहित्य सेवाभावी संस्था यांना उपलब्ध करून देण्यात येईल

मे.पंचशिल महिला बचत गट औरंगाबाद यांना गाडी भाडे, मृतदेह नेणे, वाहन चालक खर्च, रुग्णवाहिकांचे खर्च यासाठी प्रति मृतदेह रु.2000/- (दोन हजार रुपये फक्त) इतके देयक अदा करावयाचे आहे. तसेच (कोव्हीड-19) या विषाणुंमुळे मृत्यु पावलेल्या रुग्णांना मोफत दहनाच्या अंत्यसंस्कारापोटी (लाकूड व इत्यादींच्या खर्चासाठी) प्रत्येक स्मशान जोगी यांन प्रति मृतदेह रु.2500/- (दोन हजार पाचशे रुपये फक्त) इतके देयक अदा करावयाचे आहे, सदरील अनुदान हे कोव्हीड 19 च्या शासनामार्फत प्राप्त अनुदानातून करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

माहे मे 2020 ते जुलै 2021 या कालावधीमध्ये मे पंचशिल महिला बचतगट औरंगाबाद यांच्यामार्फत एकूण 3084 मृतदेहाची अंत्यविधी करण्यात आलेले आहेत. या करीता रु.2000/- प्रमाणे 1243 मृतदेहाची अंत्यविधीचे देयक रु 24,86,000/- देयक कोव्हीड-19 च्या अनुदान अदा करण्यात आलेले आहे व 1841 मृतदेहाची अंत्यविधीचे देयक रु.36,82,000/- अदा करावयाचे आहे असे एकूण देयक रु.61,68,000/- खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव.

तसेच स्मशानजोगी यांच्या मार्फत माहे एप्रिल 2020 ते जुलै 2021 या कालावधीमध्ये एकूण 5156 कोव्हीड-19 मुळे मृत्यु पावलेल्या रुग्णांचा अंत्यसंस्कार केल्यास रु.2500/- प्रमाणे 1682 मृतदेहाची अंत्यविधीचे देयक रु.42,05,000/- कोव्हीड-19 च्या अनुदानातून अदा करण्यात आलेले आहे व 3474 मृतदेहाची अंत्यविधीचे देयक रु.86,85,000/- अदा करावयाचे आहे असे एकूण देयक रु.1,28,90,000/- खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव.

प्रस्तावीत नुसार कोव्हीड-19 मुळे मृत्यु पावलेल्या मृतदेहाचे अंत्यविधी झालेल्या एकूण र.रु 1,90,58,000/- खर्चास मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 276/2022</u>:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील (कोव्हीड-19) या विषाणुमुळे मृत्यु पावलेले रुग्णांचा रुग्णवाहिकेद्वारे हॉस्पीटल व इतर आरोग्य संस्थेतून मृतदेह आणणे व दहन/दफन अंत्यविधी करण्यासाठी स्मशान भुमीत घेऊन जाण्याकरीता मे.पंचशील महिला बचतगटाची मा.प्रशासक मनपा औरंगाबाद यांचे दि.26.05.2020 च्या मान्यतेनुसार नियुक्ती करण्यात आली. मे.पंचशिल महिला बचतगट औरंगाबाद यांना अंत्यविधी करण्यासाठी साहित्य जसे. एकूण (05) PPE KIT, HAND GLVOES, SANITIZER, MASK, BOI WASTE POLY BAG असे साहित्य दहन/दफन अंत्यसंस्कार करण्याकरीता उपलब्ध करून देणे तसेच गाडी भाडे, मृतदेह नेणे, वाहन चालक खर्च, रुग्णवाहिकांचे खर्च यासाठी प्रति मृतदेह रु.2000/- (दोन हजार रुपये फक्त) प्रमाणे व (कोव्हीड-19) या विषाणुंमुळे मृत्यु पावलेल्या रुग्णांना मोफत दहनाच्या अंत्यसंस्कारापोटी (लाकूड व इत्यादींच्या खर्चासाठी) प्रत्येक स्मशान जोगी यांन प्रति मृतदेह रु.2500/- (दोन हजार पाचशे रुपये फक्त) या प्रमाणे मे.पंचशिल महिला बचत गट यांच्यामार्फत माहे मे 2020 ते जुले 2021 या कालावधीमध्ये एकूण 3084 मृतदेहाची अंत्यविधी करण्यात आलेले आहे. या करीता रु.2000/- प्रमाणे रु 61,69,000/- देयक अदा करणे.

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील स्मशानजोगी यांच्या मार्फत माहे एप्रिल 2020 ते जुले 2021 या कालावधीमध्ये एकूण 5156 कोव्हीड-19 मुळे मृत्यु पावलेल्या रुग्णांचा अंत्यसंस्कार केल्यास रु.2500/- प्रमाणे एकूण रु.1,28,90,000/- देयक अदा करणे. असे एकूण कोव्हीड-19 मुळे मृत्यु पावलेल्या मृतदेहाचे अंत्यविधी झालेल्या एकूण र.रु.1,90,58,000/- खर्चाचे देयक कोव्हीड-19 करीता शासनामार्फत प्राप्त अनुदानातून करण्यासाठी कार्योत्तर मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 277/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.08.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, क्रांती चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या चौथाऱ्याची उंची वाढविण्याच्या कामाचे र.रु.1,84,53,572/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. मान्यतेअंती सदरील कामाचा कार्यादेश मे.गायत्री आर्किटेक्टस यांना अंदाजपत्रकीय दराने पारीत करण्यात आला आहे.

क्रांतीचौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविण्यासाठी चौथाऱ्याचे काम प्रगतीपथावर असून या ठिकाणी 21 फुट उंचीचा छत्रपती शिवाजी महाराज यांचा नवीन पुतळा बसविण्यात येणार आहे. पुतळ्याच्या प्रमाणानुसार चौथाऱ्याचे बांधकामाच्या आकारात, RCC Design मध्ये चौथाऱ्याभोवती लावावयाची क्लॅडींगमध्ये, चौथाऱ्यास अनुरुप लावावयाच्या विविध प्रकारच्या म्युरल्समध्ये, विद्युत व्यवस्था इ.मध्ये पुतळा समिती, वास्तुविशारद, शिवप्रेमी नागरीक व मान्यवरांनी प्रत्यक्ष पाहणी तसेच विषयांकीत प्रकरणी संपन्न झालेल्या बैठकीत सुचना केलेल्या आहेत. त्यानुसार काम करण्यासाठी सदरील कामाचे सुधारीत अंदाजपत्रक SSR 2021-22 दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून सदरील कामाची सुधारीत अं.प.र.रु.2,54,98,503/- इतकी असून यास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

**ठराव क्रमांक 277/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, र.रु.2,54,98,503/- चे सुधारीत अंदाजपत्रक तसेच सदरील काम या कामाचे मुळ कंत्राटदार मे.गायत्री आर्किटेक्टस यांच्या कडून मंजुर निविदा दर अंदाजपत्रकीय दराने करून घेणेच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 278/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.08.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहर व शहरालगत असणारी पर्यटनस्थळे, शैक्षणिक क्षेत्र, वाढते उद्योग क्षेत्र इ.मुळे शहरामध्ये वाहतूक वर्दळ वाढली असून यामुळे शहरामध्ये प्रदुषणाचे प्रमाण वाढले आहे. औरंगाबाद महानगरपालिकेचा समावेश Million Plus Cities मध्ये झालेला आहे.

पर्यावरणाच्या दृष्टिने औरंगाबाद शहरातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी 15 वा वित्त आयोग निधी अंतर्गत विविध प्रकल्प जसे की, घनकचरा व्यवस्थापन, शहरातील मुख्य चौकांमध्ये कारंजे उभारणे, शहरातील विविध मुख्य रस्त्यांवर दुभाजक बांधणे व झाडे लावणे, रोड स्विपींग मशिनद्वारे रस्त्यांची साफ सफाई करणे इ. प्रकल्प हाती घेण्यात येत आहेत.

शहरातील वाढती वाहतूक वर्दळ लक्षात घेता व त्यामुळे इंधनाचा अतिवापरामुळे होणारे वायु व ध्वनी प्रदुषण टाळण्यासाठी नॉन मोटराईज्ड परिवहन वापरणे हा एक आरोग्य वर्धक व प्रदुषण विरहित उत्तम पर्याय आहे. या करीता शहरातील मुख्य रस्त्यांलगत नागरिकांना सुलभतेने पायी चालणेकरीता व सायकल चालविणे करीता रस्त्यालगत स्वतंत्र पादचारी मार्ग व सायकल ट्रॅक असणे आवश्यक आहे. या अनुषंगाने खाम नदीलगतच्या परिसरामध्ये व क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन या रस्त्यालगगत दुतर्फा पादचारी मार्ग व सायकल ट्रॅक विकसीत करण्यात आलेले आहेत. तसेच शासन अनुदान अंतर्गत एकुण 23 रस्ते कॉंक्रीट व डांबरीकरणाद्वारे फुटपाथसह विकसीत करण्यात आले असून यापैकी खालील प्रमाणे काही मुख्य रस्त्यांलगत पादचारी मार्ग व सायकल ट्रॅक विकसीत करण्याचे नियोजन आहे.

| अ.क्र. | रस्त्यांची नावे |
|---|---|
| 1. | जिल्हाधिकारी कार्यालय चौक ते डॉ.सलिम अली सरोवर ते छत्रपती संभाजी महाराज चौक, टि.व्ही.सेंटर रस्ता. |
| 2. | वरद गणेश मंदिर ते लक्ष्मण चावडी मार्गे सावरकर चौक व सिल्लेखाना रस्ता. |
| 3. | जाफर गेट ते मोंढा नाका रस्ता. |
| 4. | पोलीस मेस ते कटकट गेट रस्ता. |
| 5. | मदनी चौक ते सेंट्रल नाका रस्ता. |
| 6. | राज हाईटस, एमजीएम ते एन-5 पाण्याची टाकी ते बाळासाहेब ठाकरे स्मृती उद्यान रस्ता. |
| 7. | एपीआय कॉर्नर, जालना रोड ते कलाग्राम, गरवारे स्टेडियम मार्गे प्रोझोन मॉल एपीआय कॉर्नर रस्ता. |
| 8. | ग्रीव्हस कॉटन ते जयभवानी चौक ते नारेगाव मार्गे अनिल केमिकल रस्ता. |
| 9. | चिकलठाणा/टोकवाडी ते जयभवानी चौक ते नारेगाव रस्ता. |
| 10 | दिपाली हॉटेल ते जयभवानी ते मुकुंदवाडी रेल्वेस्टेशन रस्ता. |

| | |
|---|---|
| 11. | अदालत चौक ते सेंट्रल एक्साईज ऑफिस रस्ता |
| 12. | जळगाव रोड ते अजंता अॅबेसेडर रस्ता. |
| 13. | अमरप्रीत हॉटेल (बाळासाहेब ठाकरे म्युरल चौक) ते एकता चौक रस्ता. |
| 14. | क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन रस्त्यालगत दुतर्फा विकसीत केलेला पादचारी मार्ग व सायकल ट्रॅक. |
| 15. | खामनदीच्या काठावर विकसीत केलेला पादचारी मार्ग व सायकल ट्रॅक. |

करीता उक्त नमुद यादीमधील मुख्य रस्त्याचे दुतर्फा खाम नदीच्या काठावर विकसीत केलेला पादचारी मार्ग व सायकल ट्रॅक, क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन या रस्त्याचे दुतर्फा पादचारी मार्ग व सायकल ट्रॅक नागरीकांच्या वापरा करीता घोषित करणे व नागरीकांना याची माहिती होणे करीता स्थानिक वृत्तपत्रे, विविध प्रसार माध्यमांद्वारे जाहीर सुचना प्रसिध्दीस देणे बाबत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे. सबब, याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

ठराव क्रमांक 278/2022:-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील वाढती वाहतूक वर्दळ लक्षात घेता व त्यामुळे इंधनाच्या अतिवापरामुळे होणारे वायु व ध्वनी प्रदुषण टाळण्यासाठी नॉन मोटराईज्ड परिवहन वापरणे हा एक आरोग्य वर्धक व प्रदुषण विरहित उत्तम पर्याय आहे. या करीता शहरातील मुख्य रस्त्यांलगत नागरिकांना सुलभतेने सायकल चालविणे करीता रस्त्यालगत स्वतंत्र पादचारी मार्ग व सायकल ट्रॅक असणे आवश्यक आहे.

तसेच औरंगाबाद शहर व शहरालगत असणारी पर्यटनस्थळे, शैक्षणिक क्षेत्र, वाढते उद्योग क्षेत्र इ.मुळे शहरामध्ये वाहतुक वर्दळी वाढली असल्यामुळे शहरामध्ये प्रदुषणाचे प्रमाण वाढले आहे. या अनुषंगाने पर्यावरणामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टिने व औरंगाबाद शहरातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रस्तावात नमुद प्रमाणे उपरोक्त यादीतील अ.क्र.1 ते 15 मधील रस्ते क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन रस्त्यालगत दुतर्फा विकसीत केलेला पादचारी मार्ग व सायकल ट्रॅक तसेच खामनदीच्या काठावर विकसीत केलेला पादचारी मार्ग व सायकल ट्रॅक नागरीकांच्या वापरकरीता घोषित करणे व तदनुषंगाने नागरीकांना माहिती होणे करीता स्थानिक वृत्तपत्रे, विविध प्रसार माध्यमांद्वारे जाहीर सुचना प्रसिध्दीस देण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

प्रस्ताव क्रमांक 279/2022:- (प्रशासकीय प्रस्ताव दि.09.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री अशोक बाबुराव आढवे, सफाई मजूर, झोन-1, मनपा औरंगाबाद यांनी त्यांच्या वडिलांच्या आजारावर (कर्करोग) या आजारावर कोठारीकेअर हॉस्पीटल व सिग्मा हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून यासाठी र.रु.2,11,316/- (अक्षरी दोन लक्ष अकरा हजार तीनशे सोळा रुपये फक्त) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी प्रत्यक्ष शिल्लक असलेली र.रु.1,59,405/- एवढी असून सदरील रक्कमेच्या 90 टक्के र.रु.1,43,464/- (अक्षरी एक लक्ष त्रेचाळीस हजार चारशे चौसष्ट रुपये फक्त) मधून 5 टक्के र.रु.10,565/- (अक्षरी दहा हजार पाचशे पासष्ट रुपये फक्त) (एकूण सादर केलेले देयक र.रु.2,11,316/- च्या 5 टक्के प्रमाणे) मनपा फंडात जमा करून येणारी शिल्लक र.रु.1,32,899/- मधून संबंधीताने धनादेश क्र.347904 दि.04.10.2018 अन्वये घेतलेली अग्रिम र.रु.1,50,000/- पैकी र.रु.54,228/- मनपा फंडात जमा केलेली असल्याने उर्वरित अग्रिम र.रु.95,772/- समायोजन बाकी असल्याने शिल्लक र.रु.1,32,899/- मधून र.रु.95,772/- वजा जाता शिल्लक र.रु.37,127/- (अक्षरी सदोतीस हजार एकशे सत्तावीस रुपये फक्त) रक्कम संबंधीतास देय आहे.

महानगरपालिका वैद्यकीय परताव विनियमामध्ये कर्करोग हा शासनमान्य आजारमध्ये येतो. महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय दि.16.11.2011 पर्यंत मधील प्रसिध्द रुग्णालय यादीत सदरील रुग्णालयाचे नाव समाविष्ट असल्याने प्रस्तावास पडताळणी करून वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी शिफारस केलेली आहे.

करीता, श्री.अशोक बाबुराव आढवे, सफाई मजुर, झोन-1, मनपा औरंगाबाद यांच्यावर एकुण वैद्यकीय खर्चाच्या रक्कमेपैकी अग्रिम रक्कमेच्या समायोजनासह प्रत्यक्ष देय असलेल्या र.रु.37,127/- संबंधीताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 279/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.अशोक बाबुराव आढवे, सफाई मजुर, झोन-1, मनपा औरंगाबाद यांच्यावर एकूण वैद्यकीय खर्चाच्या रक्कमेपैकी अग्रिम रक्कमेच्या समायोजनासह प्रत्यक्ष देय असलेल्या र.रु.37,127/- संबंधीताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 280/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.09.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-1/2021/1072 दि.03.06.2021 अन्वये श्री.अफसर सिद्दीकी, उपअभियंता (सेवानिवृत्त) यांना सातारा देवळाई येथील विविध विकास कामांचे DPR च्या कामासाठी व महानगरपालिकेच्या प्रलंबित प्रकल्पांचा मंत्रालयीन स्तरावर पाठपुरावा करून मंजुर करून घेणे या विवक्षित कामासाठी यांची सेवा 06 महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरून) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रक्कमेची कमाल मासिक मर्यादा रु.40,000/- (रुपये चाळीस हजार फक्त) इतक्या मर्यादित राहील, या अटीवर घेण्यात आलेली आहे.

तथापि, उक्त आदेशानुसार सदरची मुदत ही दि.02.02.2022 रोजी संपत असून उपअभियंता (जलनि:स्सारण) व शहर अभियंता यांनी सातारा-देवळाई Severage Project च्या मंजुरीसाठी तसेच मनपाच्या इतर शासन स्तरावरील बाबींच्या पाठपुराव्यासाठी पुढील 06 महिन्यांसाठी श्री.अफसर सिद्दीकी यांना मुदतवाढ मंजुर करण्यास हरकत नसल्याबाबत कळविले आहे.

करीता, श्री.अफसर सिद्दीकी, उपअभियंता (सेवानिवृत्त) यांना 02 दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.05.02.2022 पासून पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी दि.03.08.2021 च्या आदेशात नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 280/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-1/2021/1072 दि.03.06.2021 अन्वये श्री.अफसर सिद्दीकी, उपअभियंता (सेवानिवृत्त) यांना सातारा देवळाई येथील विविध विकास कामांचे DPR च्या कामासाठी व महानगरपालिकेच्या प्रलंबित प्रकल्पांचा मंत्रालयीन स्तरावर पाठपुरावा करून मंजुर करून घेणे या विवक्षित कामासाठी यांची सेवा 06 महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेल्या एकुण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरून) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रक्कमेची कमाल मासिक मर्यादा रु.40,000/- (रुपये चाळीस हजार) इतक्या मर्यादित राहील, या अटीवर घेण्यात आलेली आहे.

तथापि, उक्त आदेशानुसार सदरची मुदत ही दि.02.02.2022 रोजी संपत असून उपअभियंता (जलनि:स्सारण) व शहर अभियंता यांनी सातारा-देवळाई Severage Project च्या मंजुरीसाठी तसेच मनपाच्या इतर शासन स्तरावरील बाबींच्या पाठपुराव्यासाठी पुढील 06 महिन्यांसाठी श्री.अफसर सिद्दीकी यांना मुदतवाढ मंजुर करण्यास हरकत नसल्याबाबत कळविले आहे.

करीता, श्री.अफसर सिद्दीकी, उपअभियंता (सेवानिवृत्त) यांना 02 दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.05.02.2022 पासून पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी दि.03.08.2021 च्या आदेशात नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 281/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि 10.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्राथमिक सोयी सुविधांच्या विकास कामासाठी शासन निर्णय दिनांक ९ मार्च २०१५ अन्वये रु. २४.३३ कोटी निधी शासनाने उपलब्ध करून दिला होता.

सदर कामाच्या निविदा प्रकरणी झालेल्या अनियमिततेप्रकरणी श्री एस.डी.पानझडे, शहर अभियंता यांची विभागीय चौकशी मा.सह सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्फत करण्यात आली.

मा.सह सचिव, नगर विकास विभाग यांच्या चौकशी अहवालानुसार एकुण २० दोषारोपांपैकी १० दोषारोप सिध्द झाले नाहीत. उर्वरीत १० दोषारोपांपैकी ४ दोषारोप सिध्द झाले असून, ६ दोषारोप अंशत: सिध्द झाले आहेत. तसेच चौकशी अहवालानुसार रु.२४.३३ कोटींच्या रस्ते कामाच्या निविदा प्रकरणी महानगरपालिकेचे कोणतेही आर्थिक नुकसान झाले नसल्याचे दिसुन आले आहे.

सदर प्रकरणात सर्वसाधारण सभा दिनांक ०४.०२.२०२१ चा ठराव क्र.८५/२०२१ अन्वये श्री एस.डी.पानझडे यांचेवर ठपका ठेवण्याबाबत मान्यता देण्यात आली होती व त्या अनुषंगाने त्यांचेवर ठपका ठेवणारे आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/२०२१/२२१ दिनांक ०४.०२.२०२१ अन्वये पारीत करण्यात आले.

तथापी सदर प्रकरणी श्री एस.डी.पानझडे, शहर अभियंता यांना उपरोक्त प्रमाणे दिनांक ०४.०२.२०२१ चे आदेश पारीत करण्यापुर्वी चौकशी अहवालाची प्रत पुरवून त्यावर त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली नव्हती. त्यामुळे त्यांनी सदर आदेशाबाबत आक्षेप नोंदवून चौकशी अहवालामधील सिध्द झालेले ४ दोषारोप आणि अंशत: सिध्द झालेले ६ दोषारोप या बाबत चौकशी अधिकारी यांचे निष्कर्ष त्यांना मान्य नाहीत असे कळविले.

तद्नंतर प्रकरणी श्री पानझडे यांनी दिनांक २४.०३.२०२१ रोजी दिलेल्या अपील अर्जाचा अभ्यास करुन तसेच त्यांची समक्ष सुनावणी घेऊन प्रकरणात अहवाल सादर करण्यासाठी कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/ २०२१/१२३५ दिनांक ०१.०६.२०२१ अन्वये दोन सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीने दिनांक ०८.०२.२०२२ रोजी सादर केलेल्या अहवालामधील मुद्दा क्र.९ विचारात घेता श्री एस.डी.पानझडे यांना दिनांक ०९.०२.२०२२ रोजी सुनावणीची संधी देण्यात आली. त्यानुसार श्री एस.डी.पानझडे यांनी त्यांचे लेखी अभिवेदन/निवेदन विविध कागदपत्रांसह दिनांक ०९.०२.०२२ रोजी सुनावणी दरम्यान सादर केले.

करीता श्री एस.डी.पानझडे, शहर अभियंता यांनी सुनावणी दरम्यान सादर केलेले अभिवेदन/निवेदन व त्यात त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे, कागदपत्रे, खुलासे इ. तसेच चौकशी अधिकारी यांनी दिलेल्या चौकशी अहवालानुसार प्रस्तुत निविदा प्रकरणी महानगरपालिकेचे कोणतेही आर्थिक नुकसान झाले नसल्याची नमुद केलेली बाब विचारात घेता श्री एस.डी.पानझडे, शहर अभियंता यांचेवर ठपका ठेवणारे कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/२०२१/२२१ दिनांक ०४.०२.२०२१ हे रद्द करणेबाबत आणि संबंधीतास सदर विभागीय चौकशीतून दोषमुक्त करण्याची मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 281/2022:**

प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे मा.सह सचिव, नगर विकास विभाग यांच्या चौकशी अहवालानुसार रु. २४.३३ कोटीच्या प्राथमिक सोयी सुविधांच्या विकास कामाच्या निविदा प्रकरणी महानगरपालिकेचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही.

प्रकरणात श्री एस.डी.पानझडे यांचेवर ठेवण्यात आलेल्या २० दोषारोपांपैकी १० दोषारोप सिध्द झालेले नाहीत. उर्वरित १० दोषारोपांपैकी ४ दोषारोप सिध्द आणि ६ दोषारोप अंशत: सिध्द झाल्याने त्यांचेवर सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने ठपका ठेवणारे आदेश पारीत करण्यात आले होते.

तथापी उक्त चौकशी अहवाल आणि त्यांचेवर ठपका ठेवण्याचे दिनांक ०४.०२.२०२१ चे आदेशावर श्री एस.डी.पानझडे, शहर अभियंता यांनी आक्षेप घेतल्याने, त्यांना चौकशी अहवालावर त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली. त्यानुसार दिनांक ०९.०२.२०२२ रोजी त्यांची सुनावणी घेण्यात आली.

श्री एस.डी.पानझडे, शहर अभियंता यांनी सुनावणी दरम्यान सादर केलेले अभिवेदन/ निवेदन व त्यात त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे, कागदपत्रे, खुलासे इ. तसेच चौकशी अधिकारी यांनी दिलेल्या चौकशी अहवालानुसार प्रस्तुत निविदा प्रकरणी महानगरपालिकेचे कोणतेही आर्थिक नुकसान झाले नसल्याची नमुद केलेली बाब त्याच प्रमाणे कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/ आस्था-१/२०२१/१२३४ दिनांक ०१.०९.२०२१ अन्वये स्थापीत दोन सदस्यीय समितीने दिनांक ०८.०२.२०२२ रोजी सादर केलेल्या अहवालामधील मुद्दा क्र.१ विचारात घेऊन आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी श्री एस.डी.पानझडे यांचेवर ठपका ठेवणारे आदेश रद्द करणे बाबत आणि संबंधीतास सदर विभागीय चौकशीतून दोषमुक्त करणेबाबत सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येते.

त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ३१, अनुसूची 'ड' चे प्रकरण-२ मधील खंड 'ड' नुसार सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.८४/२०२१ दिनांक ०४.०२.२०२१ च्या ठरावात फेरबदल करून आयुक्त यांनी प्रस्तावीत केल्याप्रमाणे श्री एस.डी.पानझडे, शहर अभियंता यांचेवर ठपका ठेवणारे दिनांक ०४.०२.२०२१ चे आदेश रद्द करणेस आणि संबंधीतास सदर विभागीय चौकशीतून दोषमुक्त करणेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 282/2022.-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.10.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या जाफरगेट येथे दर रविवारी आठवडी बाजार भरविण्यात येतो. सदरील बाजारासाठी मागविण्यात आलेल्या निविदेत दोन निविदा प्राप्त झाल्या. त्यात सर्वोच्च प्रति बाजार दर श्री.संतोष राजु कांबळे (र.रु.32,000/-) यांचे प्राप्त आहेत.

करीता, निविदेत सर्वाधिक प्रतिबाजार दर भरणारे श्री.संतोष राजु कांबळे र.रु.32,000/- त्यावर 18 टक्के जीएसटी र.रु.5,760/- असे एकत्रित र.रु.37,760/- (सदोतीस हजार सातशे साठ रुपये फक्त) आहे. त्याप्रमाणे संबंधीताकडून वार्षिक दर जीएसटी सहित र.रु.19,63,520/- प्राप्त होतील. एक वर्षानंतर कोरोना परिस्थितीचा आढावा घेऊन प्रशासनाने दर वाढीबाबत कार्यवाही करण्याच्या अटीवर श्री.संतोष राजु कांबळे यांना जाफरगेट आठवडी बाजाराचा तीन वर्षासाठी ठेका देण्याच्या विचारार्थ तांवेनास सादर.

**ठराव क्रमांक 282/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.संतोष राजु कांबळे यांचे प्रतिबाजार दर र.रु.32,000/- त्यावर 18 टक्के जीएसटी र.रु.5,760/- असे एकत्रित र.रु.37,760/- (सदोतीस हजार सातशे साठ रुपये फक्त) आहे. त्याप्रमाणे संबंधीताकडून वार्षिक दर र.रु.19,63,520/- प्राप्त होईल. उक्त दरास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 283/2022.-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.10.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, देशामध्ये व राज्यामध्ये कोविड 19 या विषाणुचा प्रादुर्भाव झाल्यामुळे Pandemic ची साथ संपुर्ण जग, देश व राज्यामध्ये पसरली असुन कोविड 19 हा साथरोग नियंत्रित करण्याची आवश्यकता आहे.

औरंगाबाद शहरामधील कोविड 19 विषाणु बाधित रुग्णांची सद्यस्थिती व त्यावरील उपाय योजना करण्या बाबत प्रस्ताव सादर करीत आहेत की सन 2021-22 या आर्थिक वर्षात कोविड 19 प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी आरोग्य विभागाअंतर्गत मेल्ट्रॉन डी सी एच सीओपीडी खरेदी करीता पान क्रमांक 4 वरील परिच्छेद क्रमांक 12 नुसार दिनांक 26.03.2021 रोजी मा. आयुक्त महोदयानी मान्यता दिलेली आहे.

त्याअनुषंगाने महानगरपालिका अधिनियम कलम 67(3) क नुसार दि.26.03.2021 रोजी भां.का.AMC/Health/ 2021/712 दि.26.03.2021 नुसार पुरवठाधारक मे.Wellexly Health care Pvt.Ltd.Aurangbad याना कार्यादेश देण्यात आलेला आहे खरेदी केलेल्या औषधी व साहित्याचा तपशील खालील प्रमाणे

| S No. | Name of Drug | Pkg | Rate | Qty | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | In. Xone | 1 | 212 | 500 | 106000 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | Inj Pentaprazole 40 mg | 1 | 13 | 3000 | 39000 |
| 3 | Inj Enaxoparin 40 mg | 1 | 165 | 5000 | 825000 |
| 4 | Normal Saline 100 ml | 1 | 10 | 18000 | 180000 |
| 5 | O2 Masks NRBM | 1 | 85 | 3000 | 255000 |
| 6 | Cotton Bundle 500gm | 1 | 100 | 150 | 15000 |
| 7 | Flamigrip Fixatur | 1 | 15 | 10000 | 150000 |
| 8 | I.V.Set | 1 | 7 | 10000 | 70000 |
| 9 | Angiocath - 20 | 1 | 17 | 15000 | 255000 |
| 10 | Inj MePyl Prednisolone 40gm | 1 | 35 | 12000 | 420000 |
| 11 | Nasal Cannula | 1 | 26.8 | 5000 | 134000 |
| 12 | 10 CC syringe | 1 | 4.15 | 15000 | 62250 |
| 13 | Tab Ivermectin 12mg | 1 | 3.6 | 50000 | 180000 |
| 14 | Colchicine 0.5 mg | 1 | 3.9 | 6000 | 23400 |
| 15 | Inj Dexamethasone | 1 | 6.5 | 5000 | 32500 |
| 16 | Dispo Hand Gloves | 1 | 5 | 30000 | 150000 |
| 17 | Insulin Syringe | 1 | 8 | 1500 | 12000 |
| 18 | O2 Masks Normal | 1 | 35 | 1500 | 52500 |
| | | | | Total Amount | 3259298 |

सन 2021-22 या आर्थिक वर्षासाठी कोविड 19 प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी आरोग्य विभाग अंतर्गत मेल्ट्रॉन डी.सी.एच.सी.करीता औषधी खरेदी करीता महानगरपालिका अधिनियम कलम 67(3) क नुसार दि.26.03.2021 रोजी जा.क्र.AMC/Health/2021/712 दिनांक 26.03.2021 नुसार पुरवठाधारक मे. Wellexly Health care Pvt.Ltd. Aurangbad यांनी औषधी व साहित्याचा पुरवठा औषधी भांडारास दिनांक 26.03.2021 ते 07.04.2021 या कालावधीत केलेला आहे. सदरील खरेदी करण्यात आलेल्या औषधी व साहित्याची देयकाची एकुण र.रु.32,59,298/- (अक्षरी बत्तीसलक्ष एकोणसाठ हजार दोनशे अठ्ठयाण्णव रुपये फक्त) एवढा खर्च करण्यात येणार आहे.

सदरील कोविड 19 प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मा.जिल्हाधिकारी यांचे कडून प्राप्त एस.डी. आर.एफ. फंडातुन भागविण्यात येईल. उपलब्ध असलेल्या निधीतुन भागविण्यात येईल.करीता सदरील खर्चास मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर

**ठराव क्रमांक 283/2022**:-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2021-2022 या आर्थिक वर्षी **कोविड-19** प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी आरोग्य विभागाअंतर्गत मेल्ट्रॉन डी.सी.एच.सी.औषधी खरेदी करीता मा.जिल्हाधिकारी यांचे कडून प्राप्त एस.डी.आर.एफ.फंडातुन भागविण्यात येईल. त्यानुसार पुरवठाधारक मे. Wellexly Health care Pvt.Ltd. Aurangbad यानी औषधी व साहित्याचा पुरवठा औषधी भांडारास दिनांक 26.03.2021 ते 07.04.2021 या कालावधीत केलेला आहे. सदरील खरेदी करण्यात आलेल्या औषधी व साहित्याची देयकाची एकुण र.रु.32,59,298/- (अक्षरी बत्तीस लक्ष एकोणसाठ हजार दोनशे अठ्ठयाण्णव रुपये फक्त) एवढा खर्च करण्यात येणार आहे.

करीता सदरील औषधी व साहित्य खरेदी करणेच्या खर्चास मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 284/2022**. (प्रशासकीय प्रस्ताव दि.10.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासन अनुदान रक्कम रु १५२.५८ कोटी मधून एकूण २३ रस्त्यांचे व्हाईट टॉपिंग कॉक्रींट/डांबरीकरण करण्याच्या कामांना विविध कार्यान्वयन यंत्रणा निश्चित करून मंजुरी मिळालेली आहे. यानुसार कार्यान्वयन यंत्रणा औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत एकूण

०९ कामांना करीता बी-१ स्वरुपात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार निविदा मंजूरीअंती सर्व कामे अंतिम टप्प्यात आहेत.

औरंगाबाद महानगरपालिका या कार्यालयाच्या यंत्रणेमार्फत करण्यात येत असलेल्या भवानी पेट्रोल पंप एन-२, ते सी-सेक्टर मुख्य रस्ता ठाकरेनगर एन-२, सिडको रस्त्याचे कॉक्रीट रस्त्याचे काम मे.के.बी.पाथ्रीकर यांच्यामार्फत प्रगतीपथावर असून सदरील कामाची मंजूर निविदा, निविदा रक्कमेपेक्षा १४.९९ टक्के कमी दराची आहे

मा.केंद्रीय अर्थ राज्य मंत्री श्री.भागवत कराड यांनी दि.१६/११/२०२१ चे पत्र देऊन रक्कम रु.५०.५८ कोटीच्या शासन अनुदानातील प्रस्तावित ०९ रस्त्यांपैकी भवानी पेट्रोल पंप एन-२, ते सी सेक्टर मुख्य रस्ता ठाकरेनगर एन-२, सिडको या रस्त्याच्या कामात होणाऱ्या बचतीमधून भाग्यनगर येथील जिंतूरकर हॉस्पिटल ते अदालत रोड या रस्त्याचे व्हाईट टॉपिंग कॉक्रीट करण्याचे काम हाती घेण्यात यावे, अशी शिफारस केली आहे

या अनुषंगाने महानगरपालिकेतर्फे सदर प्रकल्पावर नियुक्त पीएमसी यश इनोव्हेटिव्ह सोल्युशन्स एल.एल.पी., औरंगाबाद यांनी सदर कामाचे Less & Excess Statement सादर केले असून भवानी पेट्रोल पंप ते एन-२ सी सेक्टर ठाकरेनगर या रस्त्याचे कामामध्ये रक्कम रु.२८,३३,०२१/- ऐवढ्या रक्कमेची बचत व सदरील कामाची मंजूर निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.९९ टक्के कमी दराची असून त्यामुळे रक्कम रु.२७,१२,९९०/- असे एकूण रक्कम रु.५५,४६,०११/- इतकी बचत होत आहे.

भवानी पेट्रोल पंप एन-२, ते सी-सेक्टर मुख्य रस्ता ठाकरेनगर एन-२, सिडको या रस्त्याच्या कामामधून होणाऱ्या बचतीच्या रक्कमेतून मुळ मंजूरीच्या व्यतिरिक्त भाग्यनगर येथील जिंतूरकर हॉस्पिटल ते अदालत रोड या रस्त्याचे काम करण्याचे नियोजन आहे. भाग्यनगर येथील जिंतूरकर हॉस्पिटल ते अदालत रोड हा रस्ता जुना डांबरी रस्ता असून अत्यंत खराब होऊन खड्डेमय झालेला आहे. सदरील रस्ता जालना रोडला (अदालत रोड) जोडणारा मुख्य वर्दळीचा रस्ता असून सदरील रस्त्याचा विकास करणे आवश्यक आहे. सदर रस्त्याचे काम मंजूर शासन अनुदान रक्कम रु.५०.५८ कोटी मधील भवानी पेट्रोल पंप एन-२, ते सी सेक्टर मुख्य रस्ता ठाकरेनगर एन-२, सिडको या रस्त्याच्या कामात होणाऱ्या संभाव्य बचतीमधून व कमी दराच्या निविदेमुळे होणाऱ्या बचतीच्या रक्कमेतून प्रस्तावित करण्यात येत आहे.

सदरील रस्त्याचे काम करीत असतांना मंजूर निविदा रक्कमेच्या आत काम करण्यात येणार असून यासाठी अतिरिक्त खर्च लागणार नाही. तथापि, दि.११/१२/२०२० च्या शासन निर्णयातील अट क्र.७ च्या अनुषंगाने शासनास अवगत करण्यात येईल. तसेच अट क्र. ८ (ड) मध्ये सदर प्रकल्पाकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी त्याच उद्दीष्टासाठी खर्च करण्यात येत आहे.

भवानी पेट्रोल पंप एन-२, ते सी-सेक्टर मुख्य रस्ता ठाकरेनगर एन-२, सिडको या रस्त्याच्या बचतीमधून करावयाच्या अतिरिक्त रस्त्याचे काम म्हणजेच भाग्यनगर येथील जिंतूरकर हॉस्पिटल ते अदालत रोडपर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपिंग कॉक्रीट करण्याचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.५१,७३,२६२/- हे सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे सन २०१९-२०२० च्या दरसुचीनुसार संबंधीत पीएमसी यश इनोव्हेटिव्ह सोल्युशन्स एल.एल.पी., औरंगाबाद यांच्या मार्फत तयार करुन घेण्यात आले असून सदरील काम मुळ कामाचे कंत्राटदार मे.के.बी.पाथ्रीकर यांच्या मार्फत मुळ मंजूर निविदा दरानुसार म्हणजेच १४.९९ टक्के कमी दराने करण्यास लेखी सहमती दिली आहे. सदर प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यास प्रत्यक्ष रस्त्याचे काम सुरु करुन अंतिम करणेचा कालावधी लक्षात घेता संबंधीत कंत्राटदारास दि.३१/०३/२०२२ पर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक राहील. तरी उक्तनुसार मुळ

कामाच्या संभाव्य बचतीमधून व कमी दराच्या निविदेमुळे होणा-या बचतीमधून करावयाच्या अतिरिक्त रस्ते कामाचे अंदाजपत्रकास मुदतवाढीसह प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 284/2022:-**

प्रस्तावात सादर केल्याप्रमाणे भवानी पेट्रोल पंप एन-२, ते सी-सेक्टर मुख्य रस्ता ठाकरेनगर एन-२, सिडको या रस्त्याच्या कामामधून होणा-या बचतीच्या रक्कमेतून मुळ मंजूरीच्या व्यतिरिक्त भाग्यनगर येथील जितुरकर हॉस्पिटल ते अदालत रोड या रस्त्याचे काम करण्याचे नियोजन आहे. भाग्यनगर येथील जितूरकर हॉस्पिटल ते अदालत रोड हा रस्ता जुना डांबरी रस्ता असून अत्यंत खराब होऊन खड्डेमय झालेला आहे. सदरील रस्ता जालना रोडला (अदालत रोड) जोडणारा मुख्य वर्दळीचा रस्ता असून सदरील रस्त्याचा विकास करणे आवश्यक आहे. सदर रस्त्याचे काम मंजूर शासन अनुदान रक्कम रु.१०.५८ कोटी मधील भवानी पेट्रोल पंप एन २, ते सी-सेक्टर मुख्य रस्ता ठाकरेनगर एन-२, सिडको या रस्त्याच्या कामात होणा-या संभाव्य बचतीमधून व कमी दराच्या निविदेमुळे होणा-या बचतीच्या रक्कमेतून प्रस्तावित करण्यात आला आहे.

भवानी पेट्रोल पंप एन-२, ते सी सेक्टर मुख्य रस्ता ठाकरेनगर एन-२, सिडको या रस्त्याच्या कामातून होणारी बचत व कमी दराची निविदा असल्यामुळे होणारी बचतमधून करावयाच्या जितुरकर हॉस्पिटल ते अदालत रोड पर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपिंग कॉक्रीट करण्याचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.११,७७,२६२/- यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत असून सदरील काम मुळ कामाचे कंत्राटदार मे.के.बी.पाथ्रीकर यांच्या मार्फत मुळ मंजूर निविदा दरानुसार म्हणजेच ५४.९९ टक्के कमी दराने दि.३१/०३/२०२२ पर्यंत मुदतवाढीसह करुन घेणेस मान्यता व अनुषंगाने शासनास कळविणेची पुढील कार्यवाही करणेस मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 285/2022**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.10.03.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत प्रजनन व बाल आरोग्य सेवा टप्पा-2 राबविण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा दिनांक 11.01.2007 विषय क्रं.655/4 नुसार मंजुरी देण्यात आलेली आहे. सदरील कार्यक्रम 2007 ते 2012 या कालावधीकरिता होता प्रकल्पाचा कालावधी संपल्यानंतर मानपातर्फे प्रकल्पाचा भार सोसण्यास व कार्यक्रम नियमित स्वरुपात राबविण्यास मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनुसार मंजुरी देण्यात आलेली आहे. मा.अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांचे पत्र जा.क्रं.राकुकका/अर्बनआरसीएच/कक्ष-17/20172-44/07 दिनांक 26.03.2007 प्रकल्प राबविण्यासाठी मंजुरी देण्यात आलेली आहे.

वाढती लोकसंख्या, मातामृत्यू व बालमृत्यू एकूण प्रजनन दर कमी करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. याचप्रमाणे गरोदर माता, बालके, किशोरवयीन मुले व मुली यांच्याकरिता विविध आरोग्य सेवा सुविधा देण्यासाठी निरनिराळे आरोग्य विषयक कार्यक्रम राबविले जातात. मा.स्थायी समिती सभा दिनांक 23/08/2021 विषय क्रमांक-190 अन्वये आरसीएच-2 अंतर्गत कार्यरत एकूण 26 वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना दिनांक 3.08.2021 ते 31.01.2022 या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरील मुदतवाढ दिनांक 31.01.2022 रोजी संपुष्टात येत आहे. खालील सर्व पदे नियमित स्वरुपात न देवल्यास आरोग्य सेवा विस्कळीत होईल, यामुळे सर्व पदांची आवश्यकता आहे. सध्या कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात येणाऱ्या ठराविक वेतनाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्रं. | नांव | पदनाम | ठराविक वेतन |
|---|---|---|---|
| 01 | डॉ.वैशाली मुदगलकर | महिला वैद्यकीय अधिकारी | रु.63000/- |
| 02 | श्रीमती आशा उघडे | स्टाफ नर्स | रु.21000/- |
| 03 | श्रीमती सुनिता गणपत नरवडे | स्टाफ नर्स | रु.21000/- |
| 04 | श्रीमती विद्या राजु शर्मा | स्टाफ नर्स | रु.21000/- |
| 05 | श्रीमती ज्योती रामचंद्र चाकूरकर | स्टाफ नर्स | रु.21000/- |
| 06 | श्रीमती मेरी पाळरे | स्टाफ नर्स | रु.21000/- |
| 07 | श्रीमती ज्योती चव्हाण | एएनएम | रु.18000/- |
| 08 | श्रीमती द्रौपदी डक | एएनएम | रु.18000/- |
| 09 | श्रीमती लक्ष्मी पाटील | एएनएम | रु.18000/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 10 | श्रीमती पिनाक्षी डोंगरे | एएनएम | रु.18000/- |
| 11 | श्रीमती रेखा नामपल्ले | एएनएम | रु.18000/- |
| 12 | श्रीमती शिला राठोड | एएनएम | रु.18000/- |
| 13 | श्रीमती सोनाली गायकवाड शिंदे | एएनएम | रु.18000/- |
| 14 | श्रीमती वर्षा जाधव | एएनएम | रु.18000/- |
| 15 | श्रीमती वर्षा महादू सोनवणे | एएनएम | रु.18000/- |
| 16 | श्रीमती सुनंदा नामदेव चव्हाण | एएनएम | रु.18000/- |
| 17 | श्रीमती सारिका मनोहर इंगळे | एएनएम | रु.18000/- |
| 18 | श्रीमती कविता दत्तात्रय | एएनएम | रु.18000/- |
| 19 | श्रीमती वैशाली चिंतामण बिऱ्हाडे | एएनएम | रु.18000/- |
| 20 | श्रीमती शिल्पा अरुण पवार | एएनएम | रु.18000/- |
| 21 | श्रीमती सादियाबेगम शेख सलीम | एएनएम | रु.18000/- |
| 22 | श्रीमती वर्षा हरिभाऊ फुटे | एएनएम | रु.18000/- |
| 23 | श्रीमती आरती एकनाथ शावनारे | एएनएम | रु.18000/- |
| 24 | श्रीमती अश्विनी रमेशराव परळकर | एएनएम | रु.18000/- |
| 25 | श्रीमती प्रियंका चंद्रकांत मगरे | एएनएम | रु.18000/- |
| 26 | श्रीमती अमिता जे.एकासारे | एएनएम | रु.18000/- |

सध्या कार्यरत 1 वैद्यकीय अधिकारी व 25 कर्मचारी यांना वेतनाकरिता रु.523000/- व वार्षिक खर्च रु.62,76,000/- अपेक्षित आहे. सदरील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनावरील खर्च मनपा अर्थसंकल्प माता व बाल संगोपन (आरसीएच) या घटकामध्ये करण्यात आलेली आहे. आरसीएच-2 अंतर्गत सध्या कार्यरत 1 अधिकारी व 25 कर्मचारी यांना प्रस्तावित केल्यानुसार 1 दिवसांचा तांत्रिक खंड देऊन म्हणजे दिनांक 02.02.2022 ते 31.07.2022 या कालावधिकरिता मुदतवाढ देण्यास व वेतनावरील खर्च मनपा फंडातून देण्यास प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे मान्यतेस्तव व मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 285/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत प्रजनन व बाल आरोग्य सेवा टप्पा-2 राबविण्यासाठी आरसीएच-2 अंतर्गत ठराविक वेतनावरील अ.क्र.1 ते 26 अधिकारी व कर्मचारी यांना 1 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दिनांक 02.02.2022 ते 31.07.2022 या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यास व प्रस्तावामध्ये दर्शविल्यानुसार एनएचएम नुसार ठराविक वेतन मनपा फंडातून वेतन करण्यास मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 286/2022:-</u>** (प्रशासकीय प्रस्ताव दि.11.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मयत कौतिक संपत सातपुते, मजूर, पाणी पुरवठा जायकवाडी (गी) विभाग, मनपा औरंगाबाद यांनी त्यांच्या स्वतःच्या Rheumatic heart Disease with Servere Mitral Stenosis with Moderate Aortic Regurgitation With CKD (on HD), Awating KT या आजारावर सेठ नंदलाल धुत हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून यासाठी र.रु.7,14,184/- (अक्षरी सात लक्ष चौदा हजार एकशे चौऱ्यांशी फक्त) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम वजा जाता अनुज्ञेय रक्कमेच्या 90 टक्के र.रु.4,64,848/- (अक्षरी चार लक्ष चौसष्ठ हजार आठशे अठ्ठेचाळीस रुपये फक्त) एवढी होत असून संबंधीताने धनादेश क्र.378362 दि.14.01.2021 अन्वये र.रु.1,50,000/- (अक्षरी दीड लक्ष रुपये फक्त) चे अग्रिम घेतलेले असून एकूण र.रु.7,14,184/- (अक्षरी सात लक्ष चौदा हजार एकशे चौऱ्यांशी रुपये फक्त) मधून 5 टक्के र.रु.35,709/- (अक्षरी पस्तीस हजार सातशे नऊ रुपये फक्त) मनपा फंडात जमा करून व अनुज्ञेय र.रु.4,64,848/- (अक्षरी चार लक्ष चौसष्ठ हजार आठशे अठ्ठेचाळीस रुपये फक्त) रक्कमेतून वजा करून येणारी र.रु.4,29,139/- (अक्षरी चार लक्ष एकोणतीस हजार एकशे एकोणचाळीस रुपये फक्त) एवढी होत असून सदर रक्कमेतून अग्रिम रक्कम रु.1,50,000/- (अक्षरी दिड लाख रुपये फक्त) वजा जाता उर्वरित रक्कम रु.2,79,139/- (अक्षरी दोन लक्ष एकोणऐंशी हजार एकशे एकोणचाळीस रुपये फक्त) संबंधीतास देय होत आहे.

महानगरपालिका वैद्यकीय परतावा विनियमामध्ये हृदयाची शस्त्रक्रिया आजार हा शासन मान्य गंभीर आजारामध्ये येतो असे एन एक्स-2 तरीत पॅरा 8 अन्वये आरोग्य विभागाने नमुद केले आहे. तथापि, सदरील कर्मचाऱ्यांची आर्थिक स्थिती विचारात घेता, त्यास हा खर्च झेपावणारा नसल्यामुळे तसेच त्याने प्रत्यक्षात खर्च केलेला असल्यामुळे मा.महासभेसअसलेल्या विशेषाधिकारात सदरील वैद्यकीय खर्च र.रु.7.00 लक्ष पेक्षा जास्त

असल्यामुळे सदरील परतावा मान्य करण्याचे अधिकार मा.स्थायी समिती यांचे अधिन असल्यामुळे परतावा खर्चास विशेष बाब म्हणुन मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 286/2022**:-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मयत कौतिक संपत सातपुते, मजूर, पाणी पुरवठा जायकवाडी (यां) विभाग, मनपा औरंगाबाद यांनी त्यांच्या स्वतःच्या Rheumatic heart Disease with Servere Mitral Stenosis with Moderate Aortic Regurgitation With CKD (on HD), Awating KT या आजारावर सेठ नंदलाल धुत हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून यासाठी र.रु.7,14,184/- (अक्षरी सात लक्ष चौदा हजार एकशे चौऱ्यांशी फक्त) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम वजा जाता अनुज्ञेय रक्कमेच्या 90 टक्के र.रु.4,64,848/- (अक्षरी चार लक्ष चौसष्ठ हजार आठशे अठ्ठेचाळीस रुपये फक्त) एवढी होत असून संबंधीताने धनादेश क्र.378362 दि.14.01.2021 अन्वये र.रु.1,50,000/- (अक्षरी दीड लक्ष रुपये फक्त) चे अग्रिम घेतलेले असून एकूण र.रु.7,14,184/- (अक्षरी सात लक्ष चौदा हजार एकशे चौऱ्यांशी रुपये फक्त) मधून 5 टक्के र.रु.35,709/- (अक्षरी पस्तीस हजार सातशे नऊ रुपये फक्त) मनपा फंडात जमा करून व अनुज्ञेय र.रु.4,64,848/- (अक्षरी चार लक्ष चौसष्ठ हजार आठशे अठ्ठेचाळीस रुपये फक्त) रक्कमेतून वजा करून येणारी र.रु.4,29,139/- (अक्षरी चार लक्ष एकोणतीस हजार एकशे एकोणचाळीस रुपये फक्त) एवढी होत असून सदर रक्कमेतून अग्रिम र.रु.1,50,000/- (अक्षरी दिड लाख रुपये फक्त) वजा जाता उर्वरित र.रु.2,79,139/- (अक्षरी दोन लाख एकोणऐंशी हजार एकशे एकोणचाळीस रुपये फक्त) संबंधीतास देय होत आहे.

सदरील कर्मचाऱ्याची आर्थिक स्थिती विचारात घेता, त्यांच्या कुटूंबास हा खर्च झेपावणारा नसल्यामुळे हे सेवा त्याने प्रत्यक्षात खर्च केलेला असल्यामुळे मा.महासभेस असलेल्या विशेषाधिकारात सदरील परतावा खर्च अग्रीम र.रु.1,50,000/- (अक्षरी दीड लक्ष फक्त) वजा जाता निव्वळ वैद्यकीय देयक परतावा खर्च र.रु.2,79,139/- ला विशेष बाब म्हणून अदा करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 287/2022**:- (प्रशासकीय प्रस्ताव दि.11.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती रत्नप्रभा सतिश बहाळकर, (मयत सहशिक्षिका) केंद्रीय प्राथमिक शाळा, सिडको एन-12 यांनी स्वतःच्या कोव्हीड-19 आजारपणावर सेठ नंदलाल धुत हॉस्पीटल येथे उपचार केला असून दरम्यान दि.29.07.2021 रोजी निधन झाले आहे, त्यासाठी रु.4,26,135/- (अक्षरी रुपये चार लक्ष सव्वीस हजार एकशे पस्तीस मात्र) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय शिल्लक र.रु.3,38,004/- असून सदर रक्कमेच्या 90%र.रु 3,04,203/- आहे. त्यापैकी 5%र.रु.21,306/ (एकूण दाखल केलेले देयके र.रु 4,26,135/- च्या 5%प्रमाणे) महानगरपालिका फंडात जमा करून उर्वरित निव्वळ देय र.रु 2,82,897/- (दोन लक्ष ब्याऐंशी हजार आठशे सत्त्याण्णव मात्र) देय आहे.

सदरील आजार (Covid-19 positive) शासनमान्य आजारामध्ये येत असून संबंधीतांनी उपचार केलेले रुग्णालय शासकीय रुग्णालयप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयांची अद्यावत यादी मधील प्रसिध्द रुग्णालय सदरील रुग्णालयाचे नाव समाविष्ट आहे, तसेच सदरच्या प्रस्तावास पडताळणी करून वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी शिफारस केलेली आहे.

शासन निर्णयामधील प्रतिपुर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजुरीचे अधिकाराबाबत महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम 1961 व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहून रु.1,00,000/- पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबंधीत विभागाच्या विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आले आहे. तसेच र.रु.1,00,000/- पेक्षा जास्त वैद्यकीय देयक रक्कमेस मंजुरीचे अधिकार आयुक्त यांना असून रु.2,00,000/- पेक्षा जास्त वैद्यकीय देयक रक्कमेस मा.स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

करीता, श्रीमती रत्नप्रभा सतिश बहाळकर, मयत सहशिक्षिका यांचे पती श्री.सतिश बहाळकर यांना वैद्यकीय खर्चास शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहून प्रत्यक्ष देय र.रु 2,82,897/- (दोन

लक्ष ब्याऐंशी हजार आठशे सत्त्यांनव मात्र) वैद्यकीय परतावा खर्च अदा करण्यास मा.स्थायी समिती सभेची मान्यता देण्या बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 287/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती रत्नप्रभा सतिश बहाळकर, (मयत सहशिक्षिका) केंद्रीय प्राथमिक शाळा, सिडको एन-12 यांनी स्वतःच्या पोस्ट कोव्हीड-19 आजारपणावर सेठ नंदलाल धुत हॉस्पीटल येथे उपचार केला असून संबंधीतास शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहून रक्कम वजा जाता प्रत्यक्ष अनुज्ञेय र.रु.2,82,897/- (दोन लक्ष ब्याऐंशी हजार आठशे सत्त्यांनव मात्र) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 288/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.11.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती आसिया सुलताना गुलाम मुस्तफा, सहशिक्षिका प्राथमिक शाळा, पैठणगेट, केंद्रीय प्राथमिक शाळा, इंदिरानगर बायजीपुरा यांनी स्वतःच्या पतीच्या (HT with coronary artery Desease एन्जिओप्लास्टी, एन्जिओग्राफी) या आजारपणावर सैफी हॉस्पीटल, मुंबई येथे उपचार केला असून सदर उपचारासाठी रु.4,84,447/- (अक्षरी रुपये चार लक्ष चौऱ्यांशी हजार चारशे सत्तेचाळीस मात्र) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय शिल्लक र.रु.4,63,871/- असून सदर रक्कमेच्या 90% र.रु.4,17,483/- आहे. त्यापैकी 5%र.रु.24,222/ (एकूण दाखल केलेले देयके र.रु.4,63, 871/- च्या 5%प्रमाणे) महानगरपालिका फंडात जमा करून उर्वरित निव्वळ देय र.रु.3,93,261/- (तीन लक्ष त्र्यान्नव हजार दोनशे एकसष्ठ मात्र) देय आहे.

सदरील (HT with coronary artery Desease एन्जिओप्लास्टी, एन्जिओग्राफी) उपचार केलेले रुग्णालय शासकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयांची अद्ययावत यादी मधील प्रसिध्द रुग्णालय यादीत सदरील रुग्णालयाचे नाव समाविष्ठ नाही.

त्यामुळे संबंधीतास शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहून रु.1,00,000/- मंजुर करण्यात येऊन 5%र.रु.5,000/- मनपा फंडात जमा करून उर्वरित देय र.रु.95,000/- अदा करण्यास आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी शिफारस केलेली आहे.

शासन निर्णयामधील प्रतिपुर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजुरीचे अधिकाराबाबत महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम 1961 व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहून रु.1,00,000/- पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबंधीत विभागाच्या विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आले आहे. तसेच र.रु.1,00,000/- पेक्षा जास्त वैद्यकीय देयक रक्कमेस मंजुरीचे अधिकार आयुक्त यांना असून रु.2,00,000/- पेक्षा जास्त वैद्यकीय देयक रक्कमेस मा.स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

करीता, श्रीमती आसिया सुलताना गुलाम मुस्तफा, सहशिक्षिका प्राथमिक शाळा, पैठणगेट, केंद्रीय प्राथमिक शाळा, इंदिरानगर बायजीपुरा यांना शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहून प्रत्यक्ष देय र.रु.95,000/- (अक्षरी पंच्च्यान्नव हजार रुपये मात्र) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 288/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती आसिया सुलताना गुलाम मुस्तफा, सहशिक्षिका प्राथमिक शाळा, पैठणगेट, केंद्रीय प्राथमिक शाळा, इंदिरानगर बायजीपुरा स्वतःच्या पतीच्या (HT with coronary artery Desease एन्जिओप्लास्टी, एन्जिओग्राफी) या आजारपणावर सैफी हॉस्पीटल, मुंबई येथे उपचार केला असून संबंधीतास शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहून रक्कम वजा जाता प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली निव्वळ र.रु.95,000/- (अक्षरी पंच्च्यान्नव हजार रुपये मात्र) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 289/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.11.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती फिरदोस शबाना तब्बस्सुम, सहशिक्षिका प्राथमिक शाळा, किराडपुरा नं.3, केंद्रीय प्राथमिक शाळा, किराडपुरा नं.1 यांनी स्वतःच्या (CABG SURGERY) या आजारपणावर एम.जी.एम मेडिकल कॉलेज ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्युट हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार केला असून सदर उपचारासाठी रु.2,11,451/- (अक्षरी रुपये दोन लक्ष अकरा हजार चारशे एकावन्न मात्र) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय शिल्लक र.रु.1,80,307/- असून सदर रक्कमेच्या 90 %र.रु.1,62,276/- आहे. त्यापैकी 5%र.रु.10,572/ (एकुण दाखल केलेले देयके र.रु.2,11,451/- च्या 5%प्रमाणे) महानगरपालिका फंडात जमा करून उर्वरित निव्वळ देय र.रु.1,51,704/- (अक्षरी एक लक्ष एकावन्न हजार सातशे चार मात्र) देय आहे.

संबंधीतांनी (Triple Vessel Disease हृदयाचे आजार) उपचार केलेले रुग्णालय शासकीय रुग्णालयप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेचतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयांची अद्यावत यादी मधील प्रसिध्द रुग्णालय यादीत सदरील रुग्णालयाचे नाव समाविष्ठ आहे. तसेच सदरच्या प्रस्तावास पडताळणी करून वैद्यकीय प्रतीपुर्ती साठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी शिफारस केलेली आहे.

शासन निर्णयामधील प्रतिपुर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजुरीचे अधिकाराबाबत महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम 1961 व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहून रु.1,00,000/- पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबंधीत विभागाच्या विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आले आहे. तसेच र.रु.1,00,000/- पेक्षा जास्त वैद्यकीय देयक रक्कमेस मंजुरीचे अधिकार आयुक्त यांना असून रु.2,00,000/- पेक्षा जास्त वैद्यकीय देयक रक्कमेस मा.स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

करीता, श्रीमती फिरदोस शबाना तब्बस्सुम, सहशिक्षिका प्राथमिक शाळा, किराडपुरा नं.3, केंद्रीय प्राथमिक शाळा, किराडपुरा नं.1 यांना शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहून प्रत्यक्ष देय र.रु.1,51,704/- (अक्षरी एक लक्ष एकावन्न हजार सातशे चार मात्र) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 289/2022:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती फिरदोस शबाना तब्बस्सुम, सहशिक्षिका प्राथमिक शाळा, किराडपुरा नं.3, केंद्रीय प्राथमिक शाळा, किराडपुरा नं.1 यांनी स्वतःच्या (Triple Vessel Disease या हृदयाचे आजार) या आजारपणावर एम.जी.एम. मेडिकल कॉलेज ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्युट हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार केला असून संबंधीतास शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहून रक्कम वजा जाता प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली निव्वळ र.रु.1,51,704/- (अक्षरी एक लक्ष एकावन्न हजार सातशे चार मात्र) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 290/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.14.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या डॉ.सलीम अली सरोवर परिसरात पाच द.ल.ली.क्षमतेचा सिवेज ट्रिटमेंट प्लांट बांधण्यात आलेला असून या सिवेज ट्रिटमेंट प्लांटची पुढील पाच वर्षाकरीता देखभाल व दुरुस्ती (Operation & Mainteinance) ची ई-निविदा तिसऱ्या वेळी प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा प्रसिध्दी अंती मे.ॲक्काटेक सोल्युशन्स प्रा.लि.यांची एकमेव निविदा प्राप्त झाली असून त्यांनी प्रती माह रु.7,50,000/- असा दर भरणा केला आहे.

सदर एजन्सीला दराच्या वाटाघाटीसाठी बोलविले असता, त्यांनी पुर्वी भरणा केलेला दर र.रु.7,50,000/- ऐवजी दर कमी करून र.रु.7,20,000/- प्रति माह या दराने काम करणे बाबत लेखी संमती दिली आहे. निविदेतील तरतुदीनुसार संबंधीताची निवड झाल्यानंतर त्यांनी गॅरंटी स्वरुपात एकूण निविदा भरणा केलेल्या रक्कमेच्या 5%म्हणजेच र.रु.21,60,000/- भरणा करणे आवश्यक आहे. सदर कामामध्ये या सिवेज ट्रिटमेंट प्लांटचे सर्व प्रकारचे स्थापत्य, विद्युत व यांत्रिकी व इतर

संलग्न कामे यांच्या देखभाल दुरुस्तीचा समावेश आहे. तसेच या कामामध्ये दररोज इनलेट व आऊटलेट च्या पाण्याचा नमुना घेणे त्याची तपासणी इन हाऊस लॅब मध्ये CPHEEO manual नुसार करणे, असे करीत असतांना मुळ निविदेतील ठरवून दिलेल्या परिमाणे नुसार STP Plant चे संचलन करणे, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व त्यापेक्षा उच्च दर्जाचे नियंत्रण मंडळ यांच्याकडून इनलेट व आऊटलेट पाण्याचा नमुना तपासणी करणे, परिसरातील इमारत, STP चा परिसर ज्यामध्ये अंतर्गत भागातील रस्ते, पाथ-वे, लॉन्स यांची देखभाल करणे व अनुषंगीक कामे करणे. सदर Plant च्या ठिकाणी एजन्सीमार्फत नियुक्त कामगारांचे अभिलेखे जतन करणे, STP मधून प्राप्त होणारा मैला/मऊ चिखल (Sludge) याची योग्य विल्हेवाट लावणे किंवा महानगरपालिकेस आवश्यकता असल्यास महानगरपालिका दर्शविल अशा ठिकाणी पुरविणे/टाकणे. सर्व मशिनरीचे लॉक बुक मेंटेन करणे, सर्व परिसराची सुरक्षा करण्यासाठी सुरक्षा रक्षक नेमणे इ.कामांचा समावेश आहे.

तरी उक्त नमुद प्रमाणे प्राप्त मे.ॲकाटेक सोल्युशन्स प्रा.लि.पुणे यांची प्राप्त झालेली ई-निविदा रु.7,50,000/- ऐवजी वाटाघाटी नंतर दर कमी करण्यास लेखी संमती दिल्यानुसार र.रु.7,20,000/- प्रतिमाह याप्रमाणे असलेली निविदा मान्य करणेस्तव तसेच या संपुर्ण कामासाठी दरवर्षी औरंगाबाद महानगरपालिका अर्थसंकल्पात कार्यादेश दिल्याच्या तारखेपासून मार्च-2022 अखेर पर्यंत आवश्यक असणारी आर्थीक तरतुद करणे तसेच पुढील प्रत्येक वर्षासाठी एकुण र.रु.86,40,000/- ची आर्थिक तरतुद करणे बाबत लेखा विभागास निर्देश देणे बाबतचा व निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 290/2022**:-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.सलीम अली सरोवर परिसरातील पाच द.ल.ली.क्षमतेचा सिवेज ट्रिटमेंट प्लांटची देखभाल दुरुस्ती करण्याबाबतची तिसऱ्या वेळी प्राप्त एकमेव निविदेतील दर रु.7,50,000/- ऐवजी एजन्सीने दर कमी करून लेखी दिल्यानुसार रु.7,20,000/- प्रतिमाह प्रमाणे असलेली निविदा या निविदेमध्ये निविदेतील अटी शर्ती नुसार करण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच या कामासाठी लागणारी आवश्यक आर्थिक तरतुद करण्यास लेखा विभागास अनुमती प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 291/2022**: (प्रशासकीय प्रस्ताव दि 14.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिक्षण विभागातंर्गत एकुण ८३ बालवाड्या मध्ये कार्यरत असलेल्या एकुण १३५ बालवाडी ताई व १२ बालवाडी सेविका यांना मा. स्थायी समिती मंजुर ठराव क्र.२०५/२०२१ दि.११.१०.२०२१ नुसार जा.क्र.मनपा/शिक्षण/७३९/२०२१.दि.१३.१०.२०२१ रोजीच्या आदेशान्वये दि.१४.१२.२०२१ पर्यंत नियुक्तीस तात्पुरती मुदतवाढ देण्यात आलेली होती.

सद्यस्थितीत खालील एकुण १३५ बालवाडी ताई व १२ बालवाडी सेविका त्यांच्या नावासमोर दाखविलेल्या शाळेत दि.१४.०६.२०२१ पासुन कार्यरत आहेत.

सदरील नियुक्तीस मा. स्थायी समितीची मान्यता मिळाल्यानंतर मुदतवाढ देण्यात येते. परंतु शासन निर्णय क्र. औमपा-2019/प्र.क्र.102/नवि-24 दि.01.08.2019 नुसार मा.आयुक्त यांना प्रशासक म्हणून पूर्ण अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे, त्यामुळे सदरील १३५ बालवाडी ताई व १२ बालवाडी सेविका त्यांच्या नावासमोर दाखविलेल्या शाळेत दि.१६.१२.२०२१ ते दि.३०.०४.२०२२ पर्यंत नियुक्तीस मुदतवाढ देण्यासाठी प्रस्ताव सादर.

| अ.क्र. | बालवाडीचे नाव | बालवाडी ताईचे नाव |
|---|---|---|
| केंद्र क्र. १ | | |

| | | |
|---|---|---|
| १. | के.प्रा.शा. बेगमपुरा | श्रीमती वाघ प्रभा वामनराव |
| २. | प्रा.शा. भावसिंगपुरा | श्रीमती मंगला फलके |
| ३. | के.प्रा.शा बेगमपुरा | श्रीमती मृनाली पंडीत |
| ४. | प्रा.शा.गरमपाणी बालवाडी | श्रीमती निलीमा कुलकर्णी |
| ५. | प्रा.शा. बडीगीरणी (उर्दु) | श्रीमती फरजाना बेगम शेख बशीर |
| ६. | प्रा.शा. भावसिंगपुरा | श्रीमती कल्पना धनबीज |
| ७. | प्रा.शा. भावसिंगपुरा | श्रीमती नंदा नलावडे |
| ८. | प्रा.शा. पडेगाव | श्रीमती जावळे निता डी. |
| ९. | प्रा.शा. पडेगाव | श्रीमती जगताप छाया यु. |
| १०. | पडेगाव कॉलनी | श्रीमती वाणी एस.डी. |
| ११. | पडेगाव कॉलनी | श्रीमती सिमा एकलेरे/बाराबोटे |
| १२. | प्रा.शा. मिटमिटा | श्रीमती ब्राम्हणकर गिता हिरालाल |
| १३. | प्रा.शा. मिटमिटा | श्रीमती भगत एस.डी |
| १४. | प्रा.शा. मिटमिटा | श्रीमती जाधव पी एस. |
| १५. | प्रा.शा. अरेफ कॉलनी | श्रीमती शाहीन बेगम (उर्दु) |
| १६. | आप्पावाडी बालवाडी | श्रीमती वंदना गायकवाड |
| केंद्र क्र. २ | | |
| १७. | प्रा.शा. ज्युबलीपार्क | श्रीमती उर्मिला भातावले |
| १८. | प्रा.शा. ज्युबलीपार्क (उर्दु) | श्रीमती हाश्मी तहुरा सय्यद मसुद |
| १९. | प्रा.शा. मंजुरपुरा | श्रीमती असफिया बेगम |
| २०. | प्रा.शा. बडीगिरणी | श्रीमती मथुरा जैस्वाल |
| २१. | प्रा.शा. जुनाबाजार (उर्दु) | श्रीमती शेख तरन्नुम |
| २२. | प्रा.शा. पोलिस हेडक्वार्टर | श्रीमती संगीता दादाराव देवरे/ जगताप |
| २३. | प्रा.शा. जुनाबाजार | श्रीमती दया पांगारकर |
| २४. | प्रा.शा. जुनाबाजार | श्रीमती संध्या मैद |
| २५. | प्रा.शा. नागेश्वरवाडी | श्रीमती शोभा घंटे |
| २६. | प्रा.शा. गरमपाणी | श्रीमती शिला काळे |
| २७. | प्रा.शा. वसंतभुवन | श्रीमती माधुरी बिडवई |
| केंद्र क्र.३ | | |
| २८. | प्रा.शा. किराडपुरा नं.१ | श्रीमती सोफिया बानो सै. अब्बास |
| २९. | प्रा.शा. किराडपुरा नं.१ | श्रीमती मेहरुन्नीसा बेगम |
| ३०. | प्रा.शा. किराडपुरा नं.१ | श्रीमती नुसरत बेगम मनसूर खान |
| ३१. | प्रा.शा. किराडपुरा नं.२ | श्रीमती एकबाल सीनी |
| ३२. | प्रा.शा. किराडपुरा नं.२ | श्रीमती रुबीना बेगम |

| | | |
|---|---|---|
| ३३. | प्रा.शा. किराडपुरा नं.३ | श्रीमती अफरोज जहाँ |
| ३४. | प्रा.शा. किराडपुरा नं.३ | श्रीमती सुनिता शेळके |
| ३५. | प्रा.शा. शाहबाजार | श्रीमती नाजेमा बेगम |
| ३६. | प्रा.शा. शाहबाजार | श्रीमती मुबीना आफरीन |
| ३७. | प्रा.शा. चेलीपुरा | श्रीमती कौसर बेगम |
| ३८. | प्रा.शा. यशोधरा कॉलनी मराठी | श्रीमती छाया राऊत |
| ३९. | प्रा.शा. यशोधरा कॉलनी मराठी | श्रीमती संगीता बोर्से |
| ४०. | प्रा.शा. यशोधरा कॉलनी उर्दु | श्रीमती सीमा यासमीन जबीन |
| ४१. | प्रा.शा. यशोधरा कॉलनी उर्दु | श्रीमती समीना परवीन |
| ४२. | प्रा.शा. यशोधरा कॉलनी मराठी | श्रीमती पुष्पा पंडितराव गायकवाड |
| | केंद्र क्र. ४ | |
| ४३. | के.प्रा.शा. सिडको एन-१२ | श्रीमती निधोतेकर सुवर्णा |
| ४४. | प्रा.शा. सिडको एन-११ | श्रीमती कुलकर्णी अजली नंदकिशोर |
| ४५. | प्रा.शा. सिडको एन-९ | श्रीमती पोतदार मंजुषा |
| ४६. | प्रा.शा. रोजाबाग | श्रीमती नुरजहाँ बेगम |
| ४७. | प्रा.शा. रोजाबाग (मराठी) | श्रीमती बुचेकर अनिता जनार्दन |
| ४८. | प्रा.शा. मिसारवाडी | श्रीमती मंगला जगन्नाथ काळे |
| ४९. | प्रा.शा. मिसारवाडी | श्रीमती स्वाती चंद्रशेखर बीडवई |
| ५०. | प्रा.शा. शताब्दीनगर | श्रीमती दुसाने अनिता सुधाकर |
| ५१. | प्रा.शा. शताब्दीनगर | श्रीमती शेळके सुशिला |
| ५२. | प्रा.शा. शताब्दीनगर | श्रीमती शेख हाजरा फातेमा |
| ५३. | प्रा.शा.गणेशकॉलनी | श्रीमती नाजिया नसरीन जहिरोद्दीन |
| | केंद्र क्र.५ | |
| ५४. | के.प्रा.शा. सिडको एन-७ | श्रीमती वंदना साळुबा सुरडकर |
| ५५. | के.प्रा.शा. सिडको एन-७ | श्रीमती पुष्पा आसाराम दाभाडे |
| ५६. | प्रा. व मा. नारेगाव (मराठी) | श्रीमती स्वाती भास्कर गोंड |
| ५७. | प्रा. व मा. नारेगाव (मराठी) | श्रीमती रत्नप्रभा पंढीतराव खैरनार |
| ५८. | प्रा. व मा. नारेगाव (मराठी) | श्रीमती शिला मनगटे |
| ५९. | प्रा. व मा. नारेगाव (मराठी) | श्रीमती सुरेखा भिमसेन दाभाडे |
| ६०. | प्रा.शा. नारेगाव (उर्दु) | श्रीमती परविन कौसर शेख बशिरोद्दीन |
| ६१. | प्रा.शा. नारेगाव प्रकल्प | श्रीमती सुरेखा मोतीलाल परभणकर |
| ६२. | प्रा.शा. अशोकनगर | श्रीमती ज्योती संपत जाधव |
| ६३. | प्रा.शा. अशोकनगर | श्रीमती माधुरी व्यकंट ताजने |
| ६४. | प्रा.शा. हिंजवाडी | श्रीमती अनिता शिवाजी साळवे |

| | | |
|---|---|---|
| ६५. | प्राशा. नारेगाव | श्रीमती शकीला बेगम शे. इब्राहीम |
| ६६. | आंबेडकरनगर बालवाडी | श्रीमती कुलकर्णी एस.के. |
| ६७. | आंबेडकरनगर बालवाडी | श्रीमती पंडीत पी.के. |
| ६८. | फुलेनगर बालवाडी | श्रीमती सदावर्ते एस.एन. |
| ६९. | आरतीनगर बालवाडी | श्रीमती सुनिता सुरेश साठे |
| ७०. | आरतीनगर बालवाडी | श्रीमती रंजिता दादाराव आठवले |
| ७१. | फुलेनगर बालवाडी | श्रीमती टोंबरे ए.व्ही. |
| ७२. | गौतमनगर बालवाडी | श्रीमती बि-हाडे एस.पी (नडीत) |
| ७३. | गौतमनगर बालवाडी | श्रीमती वंदना महाजन |
| ७४. | सिध्दार्थनगर बालवाडी | श्रीम्ती पवार डी.एस. |
| ७५. | काद्रीया कॉलनी बालवाडी | श्रीमती स्वाती संदिप काटे |
| ७६. | काद्रीया कॉलनी बालवाडी | श्रीमती गिता वसंतराव पवार |
| | केंद्र क्र.६ | |
| ७७. | के.प्रा.शा. मुकुंदवाडी | श्रीमती शेख रेहाना शेख शहानूर |
| ७८. | के.प्रा.शा. मुकुंदवाडी | श्रीमती मंदा विठ्ठलराव मिसाळ |
| ७९. | के.प्रा.शा. मुकुंदवाडी | श्रीमती संगिता केशवराव शिलवंत |
| ८०. | प्रा.शा. चिकलठाणा | श्रीमती सविता भिकन वाणी |
| ८१. | प्रा.शा. चिकलठाणा | श्रीमती नलिनी मगेश पाटील |
| ८२. | प्रा.शा. विश्रांतीनगर | श्रीमती प्रतिभा विठ्ठलराव भांटे |
| ८३. | प्रा.शा. विश्रांतीनगर | श्रीमती दुर्गा वसंतराव खराटे |
| ८४. | प्रा.शा. विठ्ठलनगर | श्रीमती मिना अनंतराव देशमुख |
| ८५. | प्रा.शा. विश्रांतीनगर | श्रीमती सुजाता विठ्ठलराव भांटे |
| ८६. | प्रा.शा. हनुमाननगर | श्रीमती निलीमा राजेश्वर कवठेकर |
| ८७. | प्रा.शा. संजयनगर | श्रीमती विद्या नेमीनाथ कानडे |
| ८८. | प्रा.शा. भारतनगर नं.२ | श्रीमती देशमुख माधुरी विठ्ठलराव |
| ८९. | संजयनगर प्रकल्प | श्रीमती आशा शेवगावकर |
| ९०. | संजयनगर प्रकल्प | श्रीमती मंगला नाडे |
| ९१. | प्रा.शा. गारखेडा (मराठी) | श्रीमती आशा घायतिलक |
| ९२. | प्रा.शा. विष्णुनगर | श्रीमती प्रमिला तायडे |
| ९३. | प्रा.शा. भारतनगर नं.१ | श्रीमती पिंगळे शकुंतला बाबुराव |
| ९४. | प्रा.शा. जवाहर कॉलनी | श्रीमती आशा केणेकर |
| | केंद्र क्र. ७ | |
| ९५. | प्रा.शा. प्रियदर्शनी इंदिरानगर नं. १ | श्रीमती रेखा घोटे |
| ९६. | प्रा.शा. प्रियदर्शनी इंदिरानगर नं. | श्रीमती मंजुषा अमेशचंद वादेकर |

प्रशासक यांचा कार्यकाळ
प्रस्ताव क्र. ...
दि ३०/०४/२०२१ ते दि 31.3 2022

| | | |
|---|---|---|
| | | |
| ९७. | बालवाडी देवळाई म्हाडा | श्रीमती कामिनी घोरपडे |
| ९८. | प्रा.शा. गारखेडा उर्दु | श्रीमती समीना तडवी |
| ९९. | के.प्रा.शा. प्रियदर्शनी इंदिरानगर | श्रीमती मीरा गणेश मोरे |
| १००. | प्रा.शा. एकनाथनगर | श्रीमती शेख फातमा परवीन |
| १०१. | प्रा.शा. एकनाथनगर | श्रीमती संगीता सुभाष सोनवणे |
| केंद्र क्र. ८ | | |
| १०२. | के.प्रा.शा. बन्सीलालनगर | श्रीमती शालुबाई कांबळे |
| १०३. | प्रा.शा. पदमपुरा | श्रीमती उज्वला किसन बसीले |
| १०४. | रमानगर बालवाडी | श्रीमती पानखेडे छाया |
| १०५. | प्रा.शा. शहानुरवाडी | श्रीमती अरुणा सुधीर नाईक |
| १०६. | प्रा.शा. समतानगर | श्रीमती सुरैय्या बानो |
| केंद्र क्र. ९ | | |
| १०७. | के.प्रा.शा. इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती कमल रावजी सोनवणे |
| १०८. | के.प्रा.शा. इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती छाया व्यंकटराव चापोलिकर |
| १०९. | प्रा.शा. जिन्सी (मराठी) | श्रीमती विमल बाबुराव काश्मर |
| ११०. | प्रा.शा. जिन्सी / रेंगटीपुरा | श्रीमती बशीर फातेमा |
| १११. | प्रा.शा. कैलासनगर | श्रीमती स्मिता सुरेश पुरी |
| ११२. | प्रा.शा. कैलासनगर | श्रीमती संगीता माणीकलाल शुक्ला |
| ११३. | प्रा.शा. कैलासनगर | श्रीमती सुनिता लिंबाजीराव कोल्हे |
| ११४. | प्रा.शा. रोहिदासपुरा | श्रीमती लक्ष्मी छगनराव बुरकुले |
| ११५. | प्रा.शा. खोकडपुरा | श्रीमती मंगला नारायण वाहुळे |
| ११६. | प्रा.शा. पैठणगेट (उर्दु) | श्रीमती शबाना बेगम शेख बाबर |
| ११७. | प्रा.शा. रामतानगर | श्रीमती नजनीन बानो अनिस खान |
| ११८. | प्रा.शा. नुतन कॉलनी | श्रीमती दिक्षीत संध्या |
| केंद्र क्र. १० | | |
| ११९. | के.प्रा.शा. हर्सुल गाव | श्रीमती चंद्रकला गणपत बकले |
| १२०. | के.प्रा.शा. हर्सुल गाव | श्रीमती पुनाबाई धारसिंग हरणे |
| १२१. | प्रकल्प फुलेनगर बालवाडी | श्रीमती रमा टेकचंद दुबे |
| १२२. | प्रा.शा. हर्सुल वसाहत | श्रीमती छाया छगन बकले |
| १२३. | प्रा.शा. हर्सुल वसाहत | श्रीमती सुर्यकला बालचंद पघलोरे |
| १२४. | प्रा.शा. सेंट्रल जेल | श्रीमती साधना नानजी पवार |
| १२५. | प्रा.शा. सेंट्रल जेल | श्रीमती सुरेखा कैलास काळे |
| १२६. | प्रा.शा. सेंट्रल जेल | श्रीमती जुफिशान जझा हबीब फैज बरोग |

| | | |
|---|---|---|
| १२७. | प्रकल्प फुलेनगर बालवाडी | श्रीमती महानंदा श्रीरंग काळे |
| १२८. | प्रा.शा. मुजफ्फरनगर | श्रीमती फरीदा बेगम शेख मुस्तफा |
| | केंद्र क्र. ११ | |
| १२९. | के.प्रा.शा. बनेवाडी राहुलनगर प्रकल्प | श्रीमती पहिरे के.एम. |
| १३०. | के.प्रा.शा. बनेवाडी | श्रीमती कुसुम रेशमा जाधव |
| १३१. | प्रा.शा. कांचनवाडी | श्रीमती संगिता मैंद |
| १३२. | प्रा.शा. विटखेडा | श्रीमती सविता त्र्यंबकराव शिरसाळे |
| १३३. | प्रा.शा. नक्षत्रवाडी | श्रीमती तामगाडगे निर्मला |
| १३४. | प्रा.शा. विटखेडा | श्रीमती गायकवाड कविता |
| १३५. | प्रा.शा. वाल्मी | श्रीमती जाधव लता कडूबा |

**बालवाडी सेविकांचे नाव**

| अ.क्र. | बालवाडीचे नाव | बालवाडी सेविकांचे नाव |
|---|---|---|
| १ | मनपा शाळा एकनाथनगर | श्रीमती बुरानबी सय्यद युसुफ |
| २ | मनपा शाळा संजयनगर (म) | श्रीमती शोभा तुळशीराम |
| ३ | मनपा शाळा संजयनगर (म) | श्रीमती अंबिका तुकाराम गायकवाड |
| ४ | भिमनगर भावसिंगपुरा | श्रीमती कुसुम अशोक अमृतकळे |
| ५ | मनपा शाळा बढीलेगिरणी | श्रीमती परीगाबाई दाभाडे |
| ६ | मनपा शाळा रोजाबाग (प्रकल्प) | श्रीमती अनिसा बेगम अजगर खां |
| ७ | मनपा शाळा प्रियदर्शनी इंदिरानगर नं.२ | श्रीमती मिनाबाई बालकिशन पठाडियाँ |
| ८ | मनपा शाळा संजयनगर (जिन्सी) | श्रीमती संगिता कर्नल |
| ९ | आंबेडकरनगर (फुलेनगर सिडको एन-१२) | श्रीमती लक्ष्मी सत्यविजय काळे |
| १० | मनपा शाळा नारेगाव | श्रीमती बेबी मदनलाल बांगरे |
| ११ | मनपा शाळा मुलींची उस्मानपुरा | श्रीमती बबीता इंगळे |
| १२ | मनपा शाळा शहानुरवाडी | श्रीमती कल्याणी सुनिल गायकवाड |

श्रीमती संगीता सुभाष सोनवणे बालवाडी ताई एकनाथनगर यांची स्वतंत्र संचिका प्रस्तावित होती. प्रकरण मान्य होऊन संबंधीतास जा.क्र/मनपा/शिक्षण/८१७/२०२१, दि.२४.११.२०२१ अन्वये बालवाडी ताईचे आदेश देण्यात आले होते. तथापी संबंधीताचे प्रकरण ह्या वेळेस सर्वासोबत सदर संचिकेत प्रस्तावित केले आहे.

करिता उपरोक्त १३५ बालवाडी ताई व १२ बालवाडी सेविका यांना सन २०२१-२२ च्या शैक्षणिक वर्षासाठी दि.१६.१२.२०२१ ते दि.३०.०४.२०२२ पर्यंत तात्पुरती नियुक्ती/मुदतवाढ देण्या बाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येतो.

**ठराव क्रमांक 291/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे १३५ बालवाडी ताई व १२ बालवाडी सेविका यांना सन २०२१-२२ च्या शैक्षणिक वर्षासाठी त्यांच्या नावासमोर दाखविलेल्या शाळेत दि.१६.१२.२०२१ ते दि.३०.०४.२०२२ पर्यंत तात्पुरती नियुक्ती/मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते.

**प्रस्ताव क्रमांक 292/2022:**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.10.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, हिमायत बाग परिसराच्या जवळील उध्दवराव पाटील विद्यालय ते गट क्र.108 भुमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनीकडे जाणारा रस्ता हा मोठ्या रहदारीचा रस्ता असून सदर रस्त्याचा वापर या भागातील वसाहतीमधील रहिवाशी दुसरा कोणताही सोयीचा पर्यायी रस्ता उपलब्ध नसल्याने दैनंदिन कामकाजासाठी वापरतात. परंतु हा रस्ता अर्धवट बांधलेला असून पुढे भुमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधीनीपर्यंत कच्चा (गाडीवाट) आहे. सदर रस्त्यावर इतर मोठ्या नागरी वसाहती आहेत. तसेच विविध शाळा, भुमी अभिलेख प्रबोधीनी इ. महत्वाची शासकीय कार्यालये आहेत. सदर कच्च्या रस्त्याचे मजबुतीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे.

त्यानुसार सदर रस्त्याच्या कामाचे सविस्तर अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2019-20 च्या एसएसआर नुसार तयार करण्यात आलेले असून र.रु.45,37,800/- इतकेचे अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता झालेली आहे.

त्यानुसार सदर रस्त्याच्या कामाचे सविस्तर अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2019-20 च्या एसएसआर नुसार तयार करण्यात आलेले असून र.रु.45,37,800/- इतकेचे अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता झालेली आहे.

प्रस्तावीत कामाचा खर्च मनपा अर्थसंकल्प सन 2021-22 च्या आर्थीक वर्षाच्या अर्थसंकल्प विकास योजनेअंतर्गत रस्ते मजबुतीकरण करणे व. लेखाशिर्ष अंतर्गत नवीन कामांच्या यादीत पान क्र.E-63 अ.क्र.2 नुसार उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करण्यात येणार आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 292/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हिमायत बाग परिसराच्या जवळील उध्दवराव पाटील विद्यालय ते गट क्र.108 भुमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनीकडे जाणारा रस्ता हा मोठ्या रहदारीचा रस्त्याची दुरुस्ती करणे बाबतचे तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र.रु.45,37,800/- च्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 293/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.15.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेस शासन निर्णयातील तरतुदीनुसार स्मार्ट सिटी अंतर्गत 25%रक्कम भरणा करणे आवश्यक आहे. औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन कंपनी लि.कडे रु.250.00 कोटी इतकी रक्कम भरणा करणे आवश्यक आहे. सदरील रक्कम महानगरपालिकेचे नियमीत महसुली उत्पन्न जसे की, मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुली ही गेल्या दोन वर्षापासून कोव्हीड-19 या संसर्गजन्य रोगाच्या प्रार्दुभावामुळे उध्दिष्टानुसार प्राप्त झालेला नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या हिश्यापोटीची रक्कम औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन कंपनी लि.या कार्यालयाकडे एकरकमी जमा करणे शक्य झालेले नाही. ज्यामुळे स्मार्ट सिटी अंतर्गत हाती घ्यावयाची कामे निधी अभावी ठरलेल्या कार्यक्रमानुसार पुर्ण विलंब होत आहे.

महानगरपालिकेकडे एकरकमी उपरोक्त नुसार हिस्सा जमा करण्यासाठी निधी उपलब्ध नाही. तसेच मासिक स्तरावर साधारणतः तीन ते चार कोटी रक्कम उपलब्ध करून देता येईल. तथापि, या मधून हिश्यापोटी रक्कम भरावयाचा प्रश्न मार्गी लागणार नाही.

उपरोक्त बाबी विचारात घेता व महानगरपालिकेच्या आर्थीक परिस्थिती लक्षात घेता प्रशासनाने औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि.कडे महानगरपालिकेच्या हिश्याची र.रु.250.00 कोटी भरणा करणे करीता राष्ट्रीयकृत बँकेकडून कर्ज स्वरूपात रु.250.00 कोटी कर्ज

घेणे बाबत एकुण 16 बँकेकडुन प्रस्ताव मागविले असतार, त्यापैकी सहा बँकांनी महानगरपालिकेस कर्ज देणे करीता सहमती दर्शविली असून त्यानुसार सर्वात कमी व्याजदर असलेले सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांचा प्रस्ताव असून रु.250.00 कोटीच्या कर्जासाठी 6.50%व्याजदर असून कर्ज परतफेडीचा कालावधी हा बारा वर्षाचा राहील त्यानुसार प्रतिमाह अंदाजीत रु.2.51 कोटी हप्ता राहणार आहे. प्रस्तावीत कर्जाकरीता महानगरपालिकेची मालमत्ता गहाण ठेवावी लागणार आहे. त्यानुषंगाने मालमत्ता विभागाने नियमानुसार कार्यवाही करणे आवश्यक राहील. सदरील कर्ज परतफेडी करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 112 नुसार कर्ज निवारण निधी स्थापन करण्यात येईल व त्या करीता स्वतंत्र बँक खाते उघडण्यात येऊन या मध्ये दरमाह परतफेडीच्या रक्कमेएवढी रक्कम जमा होईल यासाठी विशिष्ट महसुली स्त्रोत संलग्न करण्यात येईल.

सदरील कर्ज प्रकरणास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 109 अन्वये मा.सर्वसाधारण सभेची मान्यतेअंती सविस्तर प्रस्ताव शासनाकडे मान्यतेस्तव सादर करणे योग्य. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर

<u>ठराव क्रमांक 293/2022</u>:-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेस शासन निर्णयातील तरतुदीनुसार स्मार्ट सिटी अंतर्गत 25%रक्कम भरणा करणे आवश्यक असून औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन कंपनी लि.कडे रु.250.00 कोटी इतकी रक्कम भरणा करावयाची आहे. सदरील रक्कम महानगरपालिकेचे नियमीत महसुली उत्पन्न जसे की, मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुली ही गेल्या दोन वर्षापासून कोव्हीड-19 या संसर्गजन्य रोगाच्या प्रार्दुभावामुळे वसुलीवर परिणाम झाला असल्यामुळे महानगरपालिकेच्या हिस्यापोटीची रक्कम औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन कंपनी लि.या कार्यालयाकडे एकरकमी जमा करणे शक्य झालेले नाही. ज्यामुळे स्मार्ट सिटी अंतर्गत हाती घ्यावयाची कामे निधी अभावी ठरलेल्या कार्यक्रमानुसार पुर्ण विलंब होत आहे.

महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचा विचार करता प्रशासनाने औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन कंपनी लि कडे महानगरपालिकेच्या हिश्याची र.रु.250.00 कोटी भरणा करणे करीता राष्ट्रीयकृत बँककडून रु.250.00 कोटी कर्ज घेणे बाबत एकुण 16 बँकेकडुन प्रस्ताव मागविले असता, त्यापैकी सहा बँकांनी महानगरपालिकेस कर्ज देणे करीता सहमती दर्शविली असून त्यानुसार सर्वात कमी व्याजदर असलेले सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांचा प्रस्ताव असून रु.250.00 कोटीच्या कर्जासाठी 6.50%व्याजदर नमुद केलेला आहे. कर्ज परतफेडीचा कालावधी हा बारा वर्षाचा राहील त्यानुसार प्रतिमाह अंदाजीत रु.2.51 कोटी हप्ता राहणार आहे. सदरील हप्ता हा महानगरपालिकेच्या नियमीत महसुली उत्पन्नातून परतफेड करण्यात यावा व त्या करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 112 नुसार कर्ज निवारण निधी स्थापन करण्यात येईल व त्या करीता स्वतंत्र बँक खाते उघडण्यात येऊन या मध्ये दरमाह परतफेडीच्या रक्कमेएवढी रक्कम जमा होईल यासाठी विशिष्ट महसुली स्त्रोत संलग्न करावेत. प्रस्तावीत कर्जाकरीता महानगरपालिकेची मालमत्ता गहाण ठेवणे संदर्भात मालमत्ता विभागाने नियमानुसार कार्यवाही करावी.

सदरील र.रु.250.00 कोटी कर्ज सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांच्याकडून 6.50%व्याज दराने 12 वर्षाकरीता उभारणीस मान्यता देण्यात येते. तसेच सदरील कर्ज उभारणीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 109 अन्वये शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>प्रस्ताव क्रमांक 294/2022</u>:- (प्रशासकीय प्रस्ताव दि.15.02.2022)

मा.आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, श्री.मोहम्मद अख्तर अब्दुल अराद, लाईनमन, विद्युत विभाग, म.न.पा. औरंगाबाद यांनी त्यांच्या स्वत:च्या आजारावर (Covid-19 Pneumonia with HRCT) या आजारावर एच.एम.जी.हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून यासाठी र.रु.4,29,378/- (अक्षरी चार लक्ष एकोणतीस हजार तीनशे अठ्ठयाहत्तर रुपये फक्त) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.3,83,737/- एवढी असून सदरील रक्कमेच्या 90 टक्के र.रु.3,45,363/- (अक्षरी तीन लक्ष पंचेचाळीस हजार तीनशे त्रेसष्ट रुपये फक्त) मधून 5 टक्के र.रु.21,468/-(अक्षरी एकवीस हजार चारशे अडुसष्ट रुपये फक्त) (एकूण सादर केलेले देयक र.रु.4,29,378/- च्या 5 टक्के प्रमाणे) मनपा फंडात जमा करुन येणारी र.रु.3,23,895/- (अक्षरी तीन लक्ष तेवीस हजार आठशे पंच्याण्णव रुपये फक्त) रक्कम देय आहे.

महानगरपालिका वैद्यकीय परतावा विनियमामध्ये Covid-19 Mild to Moderate Illness या शासनमान्य आजारामध्ये येतो. महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय दि.16.11.2011 मधील प्रसिध्द रुग्णालय यादीत सदरील रुग्णालयाचे नाव समाविष्ट नाही परंतु, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेच्या विषय क्र.65/2020 दि.10.12.2020 च्या ठरावानुसार सदरील आजारास वैद्यकीय परतावा देय आहे. तसेच सदरच्या प्रस्तावास पडताळणी करून वैद्यकीय प्रतिपूर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केली आहे.

करीता, श्री.मोहम्मद अख्तर अब्दुल असद, लाईनमन, विद्युत विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या र.रु.3,23,895/- संबंधीताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 294/2022</u>:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.मोहम्मद अख्तर अब्दुल असद, लाईनमन, विद्युत विभाग, मनपा औरंगाबाद यांनी त्यांच्या स्वतःच्या आजारावर (Covid-19 Pneumonia with HRCT) या आजारावर एच.एम.जी.हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून नियमाप्रमाणे संबंधीतांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या र.रु.3,23,895/- वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 295/2022</u>:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.15.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा पशु संवर्धन विभागाअंतर्गत कार्यान्वीन असलेले महानगरपालिका मध्यवर्ती कोंडवाडा शुल्क वसुली इ.बाबत मागील नऊ वर्षापासून शुल्क वाढ करण्यात आलेली नाही. व्यवस्थापन खर्चामध्ये झालेली वाढ व या योजनेतून मिळणारे उत्पन्न विचारात घेता या विभागास आर्थिक उद्दिष्ट लक्षात घेता खालीलप्रमाणे दरवाढ करण्यात येते आहेत.

करीता, खालील दर्शविल्याप्रमाणे कोंडवाडा फी शुल्क वसुलीमध्ये दरवाढ प्रस्तावीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | जनावरांचा प्रकार | सध्याचे दर (प्रति दिवस) | प्रस्तावीत दर(प्रती दिवस) |
|---|---|---|---|
| 1. | म्हैस, रेडा, वगार, उंट | रु.250/- | रु.500/- |
| 2. | गाय, बैल | रु.200/- | रु.400/- |
| 3. | गोऱ्हा, कालवड, घोडा | रु.150/- | रु.300/- |
| 4. | बकरी, बोकड, पिल्लु | रु.100/- | रु.200/- |

वरील दर्शविलेले प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 295/2022</u>:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा पशु संवर्धन विभागाअंतर्गत कार्यान्वीन असलेले महानगरपालिका मध्यवर्ती कोंडवाडा शुल्क वसुली इ.बाबत मागील नऊ वर्षापासून शुल्क वाढ करण्यात आलेली नाही. व्यवस्थापन खर्चामध्ये झालेली वाढ व या योजनेतून मिळणारे उत्पन्न विचारात घेता या विभागास आर्थिक उद्दिष्ट लक्षात घेता खालीलप्रमाणे दरवाढ करण्यात येत आहेत.

करीता, खालील दर्शविल्याप्रमाणे कोंडवाडा फी शुल्क वसुलीमध्ये दरवाढ प्रस्तावीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | जनावरांचा प्रकार | सध्याचे दर (प्रति दिवस) | प्रस्तावीत दर(प्रती दिवस) |
|---|---|---|---|
| 1. | म्हैस, रेडा, वगार, उंट | रु.250/- | रु.500/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | गाय, बैल | रू.200/- | रू.400/- |
| 3. | गोऱ्हा, कालवड, घोडा | रू.150/- | रू.300/- |
| 4. | बकरी, बोकड, पिल्लु | रू.100/- | रू.200/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 296/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.15.02.2022)

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद सिडको येथे स्व.मा.बाळासाहेब ठाकरे स्मारक व स्मृतीवन उभारणे या कामास शासन निर्णय दि.09 मार्च 2020 नुसार र.रु.25.49 कोटीस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. त्यानुषंगाने निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात येऊन सदर काम कंत्राटदार मे.M/s MSL Jangid JV & M/s Design Factory India, यांना प्रदान करण्यात आले. त्यानुसार कामास प्रत्यक्षात सुरुवात होऊन म्युझीयम व स्टॅच्यु बिल्डींगचे काम प्रगतीपथावर आहे.

सदर प्रकल्पामध्ये मा.स्व.बाळासाहेब ठाकरे यांचा पुतळा ग्वालिअर स्टोनमध्ये तयार करण्याचे प्रस्तावीत होते. तथापि, पुतळा तयार करण्यासाठी येणाऱ्या अडचणी भविष्यात देखभाल इ.विचारात घेता मा.मुख्यमंत्री महोदय व शिल्पकार यांच्यासोबतच्या बैठकीत सदर पुतळा जी.आर.सी.(Glass Reinforced Concrete) मटेरियल मध्ये तयार करण्याचे ठरले.

जी.आर.सी.मटेरियल मधील पुतळ्याकरीता तसेच म्युझियम Experience फिल्म प्रोजेक्टर व मुळ प्रकल्पातील इतर वाढीव कामे करणे आवश्यक आहे. सदर वाढीव कामास व वाढीव खर्च शासन अनुदानातून करण्यास मा.पालकमंत्री श्री.सुभाष देसाई यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या दि.01.01.2022 रोजीच्या बैठकीमध्ये सर्वानुमते मान्यता यदेण्यात आली आहे. त्यानुषंगाने सदर कामाचे अंदाजपत्रक र.रु.9.70 कोटी इतके तयार करण्यात आलेले असून सदर कामासाठी आवश्यक असणारा खर्च हा शासन अनुदानातून प्रस्तावीत आहे.

करीता, सदरील कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करणे तसेच प्रस्तावीत कामासाठी शासन अनुदान मिळणेस्तव शासनाकडे प्रस्ताव सादर करणे या बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 296/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्व.मा.बाळासाहेब ठाकरे स्मारक व स्मृतीवन उभारणे या प्रकल्पामधील जी.आर.सी.मटेरियल मध्ये तयार करणे तसेच म्युझियम Experience फिल्म प्रोजेक्टर व मुळ प्रकल्पातील इतर वाढीव कामे शासकीय अनुदानामधून करण्याच्या कामाचे र.रु.9.70 कोटीचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता तसेच प्रस्तावीत कामासाठी अनुदान मिळणेस्तव शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यास मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 297/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.15.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 (क) प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत विविध इमारतीवर मोबाईल कंपन्यांनी मोबाईल टॉवर उभारले आहेत. अशा टॉवरला महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना कायद्याअंतर्गत मोबाईल टॉवर उभारण्याची परवानगी घेणे तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अंतर्गत मालमत्ता कर आकारणी व वसुली होणे आवश्यक असते. हे काम व्यावसायीक पध्दतीने करणे महानगरपालिकेच्या सध्या उपलब्ध यंत्रणेसाठी जिकरीचे काम ठरत आहे. परिणामी विविध तांत्रिक व कायदेशीर मुद्यामुळे मोबाईल टॉवर कंपन्या कडील महसुलाची मोठी रक्कम वसुल होत नसल्याचे दिसून येत आहे. मोबाईल टॉवर कंपन्याकडील महसुल वसुल होण्याच्या दृष्टिने औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत विहित करण्यात आलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून म.प्रा.न.र. कायद्याअंतर्गत टॉवर उभारण्याची परवानगी देण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अंतर्गत मालमत्ताकर आकारणीसाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता

करुन घेणे इ.साठी खाजगी अभिकर्ता नियुक्त करणे आवश्यक आहे. या बाबत मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.98/221 दि.02.03.2021 अन्वये खाजगी अभिकर्त्याची नियुक्ती करण्याची मान्यता दिलेली आहे.

संबंधीत अभिकर्त्याने महानगरपालिका हद्दीतील सध्या अस्तित्वात असलेल्या मोबाईल टॉवरचे सर्वेक्षण करून त्यांची कंपन्या, उभारणी दिनांक, टॉवरचे तांत्रिक वर्णन, उभारलेल्या जागेचे कायदेशीर कागदपत्रे तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना कायद्याअंतर्गत आवश्यक मुद्दे निहाय सविस्तर यादी तयार करणे व ती महानगरपालिकेस सादर करणे. प्रचलित पध्दतीने लागु असलेल्या दराने मोबाईल टॉवरची एकूण मालमत्ता कर मागणी निश्चित करणे. महानगरपालिका हद्दीत उभारल्या जाणाऱ्या मोबाईल टॉवरच्या परवानगी व कर आकरणी प्रस्तावाबाबत आवश्यक ती सर्व कायदेशीर कागदोपत्री प्रक्रिया पुर्ण करून घेण्याची कार्यवाही करण्याचे निविदेचे स्वरुप आहे.

तसेच महानगरपालिका हद्दीतील सध्या अस्तित्वात असलेल्या व भविष्यात उभारल्या जाणाऱ्या मोबाईल टॉवर वर लक्ष ठेवून त्यांच्या कडील मालमत्ता कर वसुली तसेच परवानगी नुतनीकरण इ.साठी महापालिकेस आवश्यक ते सहाय्य करणे, विना परवानगी अनाधिकृत रित्या उभारल्या जात असलेल्या मोबाईल टॉवर बाबत कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी अतिक्रमण विभागास आवश्यक ते कायदेशीर सहाय्य करणे, न्यायालयात बाजु मांडण्यासाठी आवश्यकतेनुसार कायदेशील सल्ला व कागदपत्रे पुरविणे या बाबी संबंधीत अभिकर्त्याने या जबाबदाऱ्या पार पाडावयाच्या आहेत.

सदर कामाची निविदा लागोपाठ तीन वेळेस प्रसिध्द केली असता, निविदा क्र.2021/मनपा औरंगाबाद 711609-3 दि.28.12.2021 अन्वये मे.व्हिजन सर्व्हिसेस पुणे यांची निविदा प्राप्त झाली असून त्यानुसार अभिकर्त्याने मोबाईल टॉवरच्या सर्वेक्षण, मालमत्ता कर वसुली आणि नगर रचना विभागाच्या परवानगी पोटी मिळणाऱ्या शुल्काच्या 21 टक्के रक्कम दराने मागणी केली होती. तथापि, या संबंधाने गठीत समितीने वाटाघाटी अंती पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे. महानगरपालिकेस उपरोक्त कामाकरीता मिळणाऱ्या रु.8.00 कोटी उत्पन्नापर्यंत तसेच सर्वेक्षणा करीता अभिकर्त्यास कोणतेही शुल्क अदा केले जाणार नाही. र.रु.8.00 कोटी ते र.रु.12.00 कोटी पर्यंतच्या वसुली/उत्पन्ना पोटी 16 टक्केदराने अभिकर्त्यास मोबदला अदायगी करण्याचे निश्चित केले आहे. तसेच र.रु12.00 कोटी पुढील उत्पन्नाच्या/वसुली रक्कमेच्या 19 टक्के दराने अभिकर्त्यास मोबदला अदायगी करण्याचे निश्चित केले आहे. वसुलीच्या संपुर्ण रक्कमेवर सरसकटपणे अभिकर्त्यास मोबदला अदायगी केल्यास महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होईल. तसेच अभिकर्त्यास जास्तीस जास्त वसुली प्रोत्साहन मिळावे या करीता मागील पाच वर्षाची मोबाईल टॉवर मालमत्ता कराच्या वसुलीची सरासरी र.रु.8.00 कोटी विचारात घेऊन रु.8.00 कोटी रक्कमेच्या वर अभिकर्त्यास मोबदला देणे बाबत घेण्यात आलेल्या निर्णयामुळे महानगरपालिकेची वसुली वाढण्यास मदत होईल.

ठराव क्रमांक 297/2022:-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मे.व्हिजन सर्व्हिसेस, पुणे या निविदाधारकास तथा अभिकर्त्यास उपरोक्त प्रमाणे वसुली व मोबाईल टॉवर परवानगी आणि निविदेत नमुद कामाकरीता मिळणाऱ्या उत्पन्नाच्या र.रु.0.00 कोटी ते र.रु.12.00 कोटी पर्यंत 16 टक्के दराने तसेच र.रु.12.00 कोटी वरील रक्कमेवर 19 टक्के दराने खाजगी अभिकर्त्यास रक्कम देणे करीता तसेच नियुक्तीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 (क) नुसार या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

प्रस्ताव क्रमांक 298/2022:- (प्रशासकीय प्रस्ताव दि.16.02.2022)

संदर्भ:- 1) कार्यालयीन आदेश क्र.जा.क्र./मनपा/मआ/स्वीस/2020/255 दि.09.07.2020, जा.क्र./मनपा/कनिवस/710/2015 दि.07.12.2015.
2) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13 दि.27.12.2016
3) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण 2715/प्र.क्र 100/13 दि.21.07.2018

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) नुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका आणि स्मार्ट सिटी विभागा मार्फत शहराचे ड्रोन सर्वे करण्यात आला आहे. याव्दारे शहरातील सर्व इमारतींची GIS MAPPING करण्यात आले आहे. तसेच याच प्रकल्पा अंतर्गत सर्वेक्षकांव्दारे प्रत्येक घरी जावून सर्वेक्षण करण्यात येत असून विहीत नमुन्यात मालमत्ता कराची व पाणीपट्टीची माहिती संकलनाची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे. याव्दारे संकलीत माहीतीनुसार जुन्या मालमत्ताधारकांनी सुधारीत बांधकाम केले असल्यास त्यास फेर आकारणी करणे व ज्या मालमत्तांना कर आकारणी करण्यात आलेली नाही अशा मालमत्तांना नविन कर आकारणी करण्यात येणार आहे. सदरचे काम मोठ्या प्रमाणात होणार असून महानगरपालिकेतील उपलब्ध मनुष्यबळ व वॉर्ड कार्यालयातील सहा.आयुक्त यांच्या कडील इतर सर्व कामाचा व्याप पाहता या तांत्रिक कामासाठी अनुभवी तज्ञ व्यक्तींची नेमणूक करणे आवश्यक आहे. जेणे करून प्राप्त होणाऱ्या माहितीनुसार कर निर्धारणाचे, आक्षेपांची प्रकरणे वेळेत निकाली निघतील आणि मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुली मध्ये वाढ होईल, पर्यायाने महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडेल तसेच स्मार्ट सिटी महानगरपालिके मार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण होऊन त्याचा फायदा महानगरपालिकेस होणार आहे.

महानगरपालिकेच्या वॉर्ड कार्यालयातील कर विषयक काम पाहणाऱ्या तांत्रिक/अतांत्रिक कर्मचाऱ्यांकडून सदरचे काम करून घेण्याचे प्रस्तावित आहे सर्वेक्षणानुसार प्राप्त करण्यात आलेल्या माहितीची छाननी करण्यात येणार आहे. प्राप्त माहितीनुसार व आवश्यकते नुसार प्रत्यक्ष स्थळपाहणी करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण ८ मधील नियम ८ ते २० नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. या करिता उपरोक्त संदर्भ (१) आदेशानुसार सहाय्यक आयुक्त वॉर्ड कार्यालय यांच्या कार्यकक्षेत येणारी प्रकरणे तपासून त्यांना योग्य ती कर आकारणी करण्याचे प्रस्तावित करण्यासाठी प्रत्येक वॉर्ड कार्यालयाकरीता (१) याप्रमाणे एकुण (९) "विशेष सहाय्यक कर अधिकारी" (कंत्राटी पध्दतीने) आणि उप आयुक्त (मालमत्ता कर) यांच्या कक्षेत येणारी प्रकरणे कराधान नियमानुसार तपासून कर आकारणी करण्याचे प्रस्तावित करण्या करीता (१) "विशेष उप कर अधिकारी" (कंत्राटी पध्दतीने) नियुक्त करण्याचे प्रस्तावित आहे. या करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (१) मध्ये नमुद केल्या प्रमाणे प्रथम सहा महिन्याकरिता संदर्भ (२) व (३) च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार कर विषयक बाबींमधील कामकाज करण्याचा अनुभव असणाऱ्या निवृत्त

अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याचे प्रस्तावित आहे. या करीता वस्तु आणि सेवा कर कार्यालय, आयकर विभाग कार्यालय, महानगरपालिका कर आकारणी विभाग कार्यालयातील अनुभवी सेवानिवृत्त इच्छुक अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याकरीता स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात देवून पात्रता, अनुभवा नुसार नेमणूक करण्याबाबत प्रस्तावित आहे.

सदरील प्रक्रीया उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयातील विहीत असलेल्या अटी शर्ती नुसार निवड प्रक्रीया राबविणे करीता पुढील प्रमाणे समिती गठीत करणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | आयुक्त तथा प्रशासक | अध्यक्ष |
| २ | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष |
| ३. | अतिरिक्त आयुक्त-१ | सदस्य |
| ४. | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | सदस्य |
| ५. | उप आयुक्त (मालमत्ता कर) | सचिव |

वरील प्रमाणे समितीस मंजूरी देवून शासन निर्णया प्रमाणे निवड प्रक्रीया राबवून महाराष्ट्र महानगरपालिका ५३ (१) व ५४ मधील विहित केल्या नुसार सहा महिने कालावधी साठी विशेष उपकर अधिकारी (१ पद) व विशेष सहाय्यक कर अधिकारी (९ पद) कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याचे आणि शासन निर्णया प्रमाणे निर्धारित होणाऱ्या मानधनाच्या खर्चाच्या मंजुरीसह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 298/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे संदर्भ (१) आदेशा नुसार सहाय्यक आयुक्त वॉर्ड कार्यालय यांच्या कार्यकक्षेत येणारी प्रकरणे तपासून त्यांना योग्य ती कर आकारणी करण्याचे प्रस्तावित करण्या साठी प्रत्येक वॉर्ड कार्यालयाकरीता (१) या प्रमाणे एकुण (९) "विशेष सहाय्यक कर अधिकारी" (कंत्राटी पध्दतीने) आणि उप आयुक्त (मालमत्ता कर) यांच्या कक्षेत येणारी प्रकरणे कराधान नियमानुसार तपासून कर आकारणी करण्याचे प्रस्तावित करण्या करीता (१) "विशेष उप कर अधिकारी" (कंत्राटी पध्दतीने) नियुक्त करण्याचे प्रस्तावित आहे. या करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (१) मध्ये नमुद केल्या प्रमाणे प्रथम सहा महिन्याकरिता संदर्भ (२) व (३) च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार कर विषयक बाबी मधील कामकाज करण्याचा अनुभव असणाऱ्या निवृत्त अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यास स्थायी समिती मंजुरी प्रदान करत आहे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

प्रशासक यांचा कार्यकाल
प्रशासकीय ठराव
दि.30.09.2021 ते दि 31.3.2022

**प्रस्ताव क्रमांक 299/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि 16.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 9149 चे नियम मालमत्तेचा विनियोग चे कलम 79 नगरपालिकेच्या मालमत्तेचा विनियोग करण्यासंबंधी तरतुदी चे कलम (क) महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता महानगरपालिकेच्या मंजुरीने पट्टयाने देता येईल, विकता येईल, भाड्याने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरीत करता येईल या नुसार आयुक्त, महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहे.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये महानगरपालिकेच्या मिळकतींवर, रस्ता, दुभाजकांमध्ये दुरसंचार जाळ्यांसाठी (Grid करीता) प्रस्ताव मोबाईल टॉवर कंपनीकडून प्राप्त होत आहेत. या संदर्भात महानगरपालिकेच्या इमारतींवर/जमिनींवर मोबाईल टॉवर/अँटीना, उपकरणे, डी.जी.सेट, बुस्टर बॅटरी व जमिनीवरील बेस स्टेशनच्या उभारणीसाठी धोरण मा.सर्वसाधरण सभेच्या मंजुरीने निश्चित करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय क्र.DIT065/CRI/2018, दि.17.02.2018 याप्रमाणे शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थाच्या मिळकतींवर टेलिकॉम इन्फ्रास्ट्रक्चरसाठी धोरण आखलेले असून त्यामधील तरतुदीनुसार महानगरपालिकेस कार्यवाही करता येईल. यामधील मुख्य तरतुदी पुढील प्रमाणे आहे.

अ) दुरसंचार टॉवर धारण

कोणत्याही विकास आराखड्यामधी (DP) किंवा प्रादेशिक आराखडा (RP) संबंधीत विकास नियंत्रण नियमावलीमध्ये (DCR) अंतर्गत जमीन वापराच्या तरतुदीनुसार आणि नगर विकास विभागाच्या इतर मार्गदर्शक तत्वांचे पाल करण्याच्या अधिन राहून, दुरसंचार सेल साईट (TCH)/बेस स्टेशन (BS)/मोबाईल टॉवर उभारण्यात यावे, यापुढे मोबाईल टॉवर म्हणुन संदर्भीत करण्यात येत आहे.

अ- विकास आराखडा (DP) किंवा प्रादेशिक आराखडा (RP) मध्ये नियोजीत सर्व जमिनी

ब- सर्व जमिनी ज्या कोणत्याही विकास आराखडा (DP) किंवा प्रादेशिक आराखडा (RP) मध्ये बांधण्या योग्य नसलेल्या आरक्षणांसाठी निर्धारित केल्या आहेत. अशा मोबाईल टॉवरची उभारणीसाठी जास्तीत जास्त अनुज्ञेय क्षेत्र आरक्षित जागेचा क्षेत्र फळाच्या 5 टक्के किंवा 100 चौ.मी.पेक्षा जास्त नसावे. या अटींच्या अधिन राहून जे कमी असेल ते आणि आरक्षित क्षेत्राच्या एक कोपऱ्यामध्ये स्थित असेल.

क- सर्व जमीनी ज्या मंजुर रेखांकनामध्ये मोकळ्या जागा/मनोरंजनाच्या खुल्या जागा/मनोरंजनाचे खुले मैदान म्हणुन नियोजीत केल्या आहेत, तथापि, सदरील मोबाईल टॉवरची उभारणीसाठी संबंधीत नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नाहरकत प्रमाणपत्र आवश्यक असेल किंवा अशा रेखांकनातील 70 टक्के कायदेशीर भोगवटाधारक/भुखंडधारक यांची नाहरकत असणे आवश्यक असेल. अशा मोबाईल टॉवरच्या उभारणी करीता कमाल अनुज्ञेय क्षेत्र आरक्षित जागेचा क्षेत्रफळाच्या 5 टक्के किंवा 100 टक्के चौ.मी.पेक्षा जास्त नसावे. या अटींच्या अधिन राहून जे कमी असेल ते आणि आरक्षित क्षेत्राच्या एक कोपऱ्यामध्ये स्थित असेल

ड- कोणत्याही विकास आराखडा (DP) किंवा प्रादेशिक आराखडा (RP) मध्ये बांधण्या योग्य सर्व आरक्षणे (शाळा/महाविद्यालये/रुग्णालये यांच्या इमारती वगळता) तेथे अशा मोबाईल टॉवरची उभारणीस छतावर परवानगी असेल, परंतु उक्त आरक्षणाच्या विकासानंतर.

ई- झोपडपट्टी भागात झोपडपट्टी क्षेत्रासाठी विद्यमान विकास नियंत्रण नियमानुसार आणि मोबाईल टॉवर्स उभारणयासाठी भारत सरकारच्या मार्गदर्शक तत्वांनुसार.

फ- राज्य सरकारच्या विभागांच्या मालकीच्या इमारती. शहरी आणि ग्रामिण स्थानिक संस्था, राज्य सरकारचे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आणि राज्य सरकारच्या इतर एजन्सी

ठाणे महानगरपालिका मध्ये महानगरपालिकेच्या मिळकतींवर मोबाईल टॉवर उभारणे करीता देण्यात येणाऱ्या जागेकरीता भाडे निश्चिती करण्यात आली आहे. या संबंधाने धोरण निश्चित झाले असून त्याच धर्तीवर प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

त्यानुसार सदर टॉवर/अँन्टीना, उपकरणे, डी.जी सेट, बुस्टर, बॅटरी व जमिनीवरील बेस स्टेशन उभारणी साठी मान्यता देणेबाबत खालील प्रमाणे प्रस्तावीत करण्यात येते.

1. एखाद्या कंपनीने अँन्टीना/टॉवर उभारणीचा प्रस्ताव सादर केल्यास शासनाच्या प्रचलीत धोरणानुसार परवानगी देता येईल.
2. प्रथम मागणी करणाऱ्या कंपनीस प्रथम परवानगी देण्यात येईल.
3. सदर प्रकरणी प्रशासनातर्फे प्रस्तावीत केलेल्या मोबाईल टॉवर करीता महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर भाड्याची आकारणी करणे व त्या प्रमाणे भाड्याची रक्कम निश्चित करणे असल्याने प्रस्तावीत करण्यात येते की, महानगरपालिकेतर्फे परवानगीच्या कालावधीकरीता प्रथम आर्थीक वर्षी प्रचलित शिघ्रशिर्ष गणक (Ready Reckoner Rate) नुसार जमिनीच्या 6 टक्के प्रतिवर्षी या प्रमाणे येणारे मासिक भाडे किंवा रु.10,000/- यापैकी जे जास्त असेल त्या प्रमाणे भाड्याची रक्कम आकारणी करण्यास तसेच बुस्टरसाठी प्रती माह रु.4000/- किंवा शिघ्रशिर्ष गणक (Ready Reckoner Rate) यापैकी जे जास्त असेल त्या प्रमाणे भाड्याची रक्कम आकारणी करण्यास व तद्नंतर येणाऱ्या परवानगीची नुतनीकरण करतांना निर्धारीत झालेल्या भाड्यावर वाढीव 10 टक्के भाडे रक्कम आकारणी करण्यास व यावर आकारण्यात येणारे GST व इतर सर्व शासकीय कर आकारणी करुन ती वसुली बाबत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.
4. या परवानगीची तसेच भाडे करारनाम्याची वैधता प्रथम पाच वर्षासाठी असेल तद्नंतर भाडे करारनामा नियमानुसार नुतनीकरणावर कार्यवाही करण्यात येईल.
5. एकाच ठिकाणी एकापेक्षा जास्त कंपनीने मागणी केल्यास जी कंपनी जास्त दर देईल त्या कंपनीस जागा देण्यात येईल.
6. महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमातील तरतुदीमध्ये मोबाईल टॉवर उभारण्या करीता प्राप्त अर्जान्वये दाखल होणाऱ्या प्रस्तावास/नगर रचना विभागाच्या नियमानुसार आवश्यक असणाऱ्या शुल्क भरणा करून नियमित तरतुदींनुसार देय असणाऱ्या मोबाईल टॉवर करीता महानगरपालिकेच्या मिळकतींवर भाडे आकारणी वरील प्रमाणे देय असेल.

करीता महानगरपालिका क्षेत्रामध्ये महानगरपालिकेच्या मिळकतींवर रस्ता, दुभाजकांमध्ये दुरसंचार जाळ्यांसाठी (Grid करीता) प्रस्ताव मोबाईल टॉवर कंपनीकडून प्राप्त होत आहेत. या संदर्भाने महानगरपालिकेच्या इमारतींवर/जमिनीवर मोबाईल टॉवर/अँन्टीना, उपकरणे, डी.जी.सेट, बुस्टर बॅटरी व जमिनीवरील बेस स्टेशनच्या उभारणीसाठी धोरण मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**<u>ठराव क्रमांक 299/2022</u>:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका क्षेत्रामध्ये महानगरपालिकेच्या मिळकतींवर रस्ता, दुभाजकांमध्ये दुरसंचार जाळ्यांसाठी (Grid करीता) प्रस्ताव मोबाईल टॉवर कंपनीकडून प्राप्त होत आहेत. या संदर्भाने महानगरपालिकेच्या इमारतींवर/जमिनीवर मोबाईल टॉवर/अँन्टीना, उपकरणे, डी.जी.सेट, बुस्टर बॅटरी व जमिनीवरील बेस स्टेशनच्या उभारणीसाठीच्या धोरणास सर्वसाधारण सभा मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>स्ताव क्रमांक 300/2022</u>:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.16.02.2022)

मा.प्रशासक यांनी प्रस्ताव सादर केला की, विद्युत विभागार्फत औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रामध्ये बी.ओ.टी.तत्वावर जुने पथदिवे बदलुन एल.ई.डी.पथदिवे बसविण्याचे प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले.

सदर प्रकल्पाच्या कामांअंतर्गत निघालेले जुने साहित्य ज्यामध्ये विविध प्रकारच्या फिटींग, पॅनल बोर्ड व जंक्शन बॉक्सचा समावेश असून त्यांचा लिलाव करण्यासाठी खुल्या बाजारामधून

दरपत्रक मागविण्यात आले. त्या आधारे सर्वात जास्त प्राप्त दरपत्रकानुसार सदर साहित्याचा लिलाव करणे करीता मुळ किंमत र.रु.64,56,000/- निश्चित करण्यात आली.

तद्‌नंतर सदर साहित्याचा लिलाव करण्यासाठी ई-निविदा प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या त्यानुसार एकुण 04 निविदा प्राप्त झाल्या असून त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाधारक | निविदा दर | |
|---|---|---|---|
| 1. | मे.प्रणम इंटरप्रायजेस, पुणे | 81,21,809/- | (25.80%सर्वात जास्त दराने) |
| 2. | लाला स्क्रॅप | 71,66,160/ | (11.00% जास्त दराने) |
| 3. | मे.अनग स्क्रॅप | 67,14,240/- | (04.00%जास्त दराने) |
| 4. | एम.ए.ट्रेडिंग | 52,21,612/- | (-19.12.%कमी दराने) |

प्राप्त निविदांपैकी मे.प्रणम इंटरीप्रायजेस, पुणे या निविदाधारकाने मुळ साहित्याच्या लिलावा साठी निश्चित करण्यात आलेल्या दरापेक्षा 25.80%सर्वात जास्त दराने र.रु 81,21,809/-ची निविदा दाखलकेली असून सदरचे दर लेखा विभागाने स्विकृत करून मा.स्थायी समितीच्या मान्यतेसाठी प्रस्तावीत केली आहे.

करीता, मे.प्रणम इंटरीप्रायजेस या एजन्सीने दाखल केलेल्या रु.81,21,809/-जास्तीचे दरास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव 300/2022:-**

प्रस्तावात नमुद केल्यानुसार जुन्या साहित्याचा खरेदीसाठी मे.प्रणम इंटरप्रायजेस या एजन्सीने दाखल केलेले दर रु.81,21,809/-सर्वात जास्तीचे दर असल्याने संबंधीताने दाखल केलेल्या दराने जुने साहित्य विक्री करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 301/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि. 16.02.2022)

विभाग प्रमुख तथा उप आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिध्दार्थ प्राणी संग्रहालयाची निर्मिती सन 1985 साली झाली त्यावेळी या ठिकाणी सर्व डांबरी रस्ते तयार करण्यात आलेले आहेत. प्राणी संग्रहालयात येणाऱ्या जडवाहनांमुळे अंतर्गत रस्त्यांवर बऱ्याच ठिकाणी खड्डे पडले आहेत. तेव्हापासून आजमितीपर्यंत या डांबरी रस्त्यांची देखभाल दुरुस्ती अथवा पुन:डांबरीकरण झालेले नाही. सेंट्रल झू ॲथॉरिटी, दिल्ली यांच्या कमिटीने या ठिकाणी पाहणी करून या रस्त्याचे मजबुतीकरण करणे बाबत सुचना केल्या आहेत.

सन 2019-20 या आर्थीक वर्षात सदरील कामासाठी असलेल्या तरतुदीतून लेखा विभागाने सां.बा.खात्याची दरसुची सन 2020-21 नुसार या प्रस्तावास तरतुद उपलब्ध करून दिली आहे. या सर्व समाविष्ट उपांगासह कामाचे अंदाजपत्रक र.रु.31.32 लक्षचे तयार करण्यात आले असून या कामाची ई-निविदा काढण्यात आली. निविदा उघडल्यानंतर सर्वात कमी निविदाधारक मे.एम.बी.इन्फ्रास्ट्रक्चर यांची निविदा अं.प.दरापेक्षा 18.86 टक्के कमी दराची आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

संदर्भ:-टेंडर Tender Id.2021_AMCA_718626_1

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | कार्यकारी अभियंता (उद्यान विभाग) |
| 2. | कामाचे स्वरुप | महानगरपालिकेच्या प्राणी संग्रहालयातील रस्त्यांचे पुर्न:डांबरीकरण करणे (फेरनिविदा) |
| 3. | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | सदरील प्रस्तावास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले | र.रु.41,82,000/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रात टेंडर्स जाहिरात देण्यात आली होती त्यांचे नावे व प्रसिध्द दिनांक | ई-निविदा सुचना पत्र दि.05.09.2021 ई-निविदा प्रसिध्दी प्रथम सुचना दि.06.09.2021 |
| 5. | अ)टेंडर्स स्विकारण्याचा दिनांक | 05.09.2021 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 22.09.2021 |

| | | |
|---|---|---|
| 6. | एकुण किती टेंडर्स आलेत | 2 (दोन) |

(त्यापैकी पात्र टेंडरदाराची माहिती खालील तक्त्यात द्यावी).

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्राका पेक्षा टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | मे.एम.बी.इन्फ्रास्ट्रक्चर | रु 31,82,000/- | अं.प.दरापेक्षा 18.86 %कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 2. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय. |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय. |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही. |
| 3. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | सदरील कामाचा खर्च मनपा अर्थसंकल्प 2019-20 प्राणी संग्रहालय विकास कामे |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे का? | लेखा विभागाने या कामी संचिकेत तरतुद उपलब्ध करून दिली आहे. |
| 4. | सदरचे काम डिपॉझिट मधून करण्यात येणार आहे का? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा केली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर पान क्रमांक द्यावा) | लागू नाही |
| 5. | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | लागू नाही. |

या विषयांकीत कामासाठी ठेकेदार मे.एम.बी.इन्फ्रास्ट्रक्चर यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.86%टक्के कमी दराने करून घेणेस्तव व करार करण्यास स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत प्रस्ताव सादर.

**ठराव 301/2021: -**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या प्राणी संग्रहालयातील रस्त्याचे पुर्न:डांबरीकरण करण्यासाठी मे.एम.बी.इन्फ्रास्ट्रक्चर यांच्या कडून सदरील काम अंदाजत्रकीय दरापेक्षा 18.86 टक्के कमी दराने करुन घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 302/2022.-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.16.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, डॉ.तलत काझी. वैद्यकीय अधिकारी, आरोग्य विभाग यांनी त्यांची आई श्रीमती रिजवाना अतिक काझी यांच्या आजारपणावर (Covid-19 Pneumonia) एम.जी.एम.हॉस्पीटल. औरंगाबाद येथे उपचारापोटी र रु 2,50,353/- (अक्षरी दोन लाख पन्नास हजार तीनशे त्रेपन्न रुपये फक्त) इतका खर्च झाला आहे.

महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय दि16.11.2011 मध्ये 'परिशिष्ट-अ' शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयाच्या यादीमध्ये उक्त रुग्णालयाचेनाव समाविष्ट नाही. परंतु Covid-19 Mild to Moderate illness या शासन मान्य आजारांमध्ये येतो. औरंगाबाद महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेच्या वि.क्र.65/2020 दि .10.12.2020 च्या अनुषंगाने झालेल्या ठरावानुसार सदर आजारास वैद्यकीय परतावा देता येतो. तसेच उक्त रुग्णालय DCH प्रकारच्या Facility मध्ये मान्यता प्राप्त यादीत नमुद आहे.

डॉ.तलत काझी यांनी त्याच्या आईच्या उक्त आजारपणावर रु.2,50,353/-/- एवढा वैद्यकीय खर्च झालेला आहे. त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.2,26,973/- एवढी असून सदर रक्कमेच्या 90%र.रु.2,04,275/- (अक्षरी दोन लाख चार हजार दोनशे पंच्याहत्तर रुपये फक्त) पैकी 5%र.रु.12,517/- (अक्षरी बारा हजार पाचशे सतरा रुपये फक्त) (एकुण सादर केलेले देयक र.रु.2,50,353/ च्या 5%प्रमाणे)

मनपा फंडात जमा करून उर्वरित र.रु 1,91,758/- (अक्षरी एक लाख एक्क्यान्नऊ हजार सातशे अठ्ठावन्न रुपये फक्त) रक्कम देय आहे.

करीता, डॉ.तलत काझी यांनी त्यांच्या आईच्या उक्त आजारपणावर खर्च केलेल्या वैद्यकीय देयकापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.2,26,973/- च्या 90%र.रु.2,04,275/- (अक्षरी दोन लाख चार हजार दोनशे पंच्याहत्तर रुपये फक्त) या वैद्यकीय खर्चास मान्यता देऊन सदर रक्कमेपैकी 5%र.रु.12,517/- (एकूण सादर केलेले देयक र.रु.2,50,353/- च्या 5%प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरित र.रु.1,91,758/- (अक्षरी एक लाख एक्क्यान्नऊ हजार सातशे अठ्ठावन्न रुपये फक्त) रक्कम संबंधीतास अदा करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव 302/2022</u>:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.तलत काझी, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य विभाग यांनी त्यांची आई श्रीमती रिजवाना अतिक काझी यांच्या आजारपणावर (Covid-19 Pneumonia) एम.जी.एम.हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचारापोटी र.रु.2,50,353/- (अक्षरी दोन लाख पन्नास हजार तीनशे त्रेपन्न रुपये फक्त) इतका खर्च झाला आहे.

महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय दि16.11.2011 मध्ये 'परिशिष्ट-अ' शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयाच्या यादीमध्ये उक्त रुग्णालयाचे नाव समाविष्ट नाही. परंतु Covid-19 Mild to Moderate illness या शासन मान्य आजारांमध्ये येतो. औरंगाबाद महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेच्या वि.क्र.65/2020 दि .10.12.2020 च्या अनुषंगाने झालेल्या ठरावानुसार सदर आजारास वैद्यकीय परतावा देता येतो. तसेच उक्त रुग्णायात DCH प्रकारच्या Facility मध्ये मान्यता प्राप्त यादीत नमुद आहे.

डॉ.तलत काझी यांनी त्यांच्या आईच्या उक्त आजारपणावर रु.2,50,353/-/- एवढा वैद्यकीय खर्च झालेला आहे. त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.2,26,973/- एवढी असून सदर रक्कमेच्या 90%र.रु.2,04,275/- (अक्षरी दोन लाख चार हजार दोनशे पंच्याहत्तर रुपये फक्त) पैकी 5%र.रु.12,517/- (अक्षरी बारा हजार पाचशे सतरा रुपये फक्त) (एकूण सादर केलेले देयक र.रु.2,50,353/- च्या 5%प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरित र.रु.1,91,758/- (अक्षरी एक लाख एक्क्यान्नऊ हजार सातशे अठ्ठावन्न रुपये फक्त) रक्कम देय आहे.

करीता, डॉ.तलत काझी यांनी त्यांच्या आईच्या उक्त आजारपणावर खर्च केलेल्या वैद्यकीय देयकापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.2,26,973/- च्या 90%र.रु.2,04,275/- (अक्षरी दोन लाख चार हजार दोनशे पंच्याहत्तर रुपये फक्त) या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. तसेच सदर र.रु.2,04,275/- रक्कमेपैकी 5%र.रु.12,517/- (एकूण सादर केलेले देयक र.रु.2,50,353/- च्या 5%प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरित र.रु.1,91,758/- (अक्षरी एक लाख एक्क्यान्नऊ हजार सातशे अठ्ठावन्न रुपये फक्त) रक्कम संबंधीतास अदा करण्याबाबत मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 303/2022</u>:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.17.02.2022)

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, सन २०२२-२०२३ या वित्तीय वर्षासाठी महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करांचे दर व मर्यादा महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९९ अन्वये महानगरपालिकेने स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेऊन फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेला निश्चित करणे आवश्यक आहे.

सन २०२२-२०२३ मध्ये कर आकारणी करणेसाठी पूर्वीप्रमाणेच खालील निवासी, निवासेत्तर, व्यावसायीक व औद्योगीक, शैक्षणिक संस्था, भारत सरकारच्या मिळकती, मोबाईल टॉवर्स असे नमुद करण्यात आलेले आहे ते पुढील प्रमाणे,

०१. <u>निवासी</u> :- राहते घर-माहिती तंत्रज्ञान उद्योगासाठी असलेल्या इमारती. (महाराष्ट्र शासनाचे औद्योगीक धोरण परिपत्रक क्र.शासन निर्णय आयटीपी-०३/सीआर-३९११/आयएनडी-५, दिनांक

१२-७-२००३ अन्वये माहिती व माहिती तंत्रज्ञान यासाठी मिळकतीचा वापर असणाऱ्या त्यांच्या करात सवलत देणेसाठी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, महाराष्ट्र शासन यांचे नोंदणीकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.) धर्मादाय संस्था, स्वयंसेवी संस्था, सेवाभावी संस्था.

०२. <u>निवासेत्तर</u> :- वकीलाचे कार्यालये, कर सल्लागारांचे खाजगी कार्यालये, शैक्षणिक संस्थेशी संलग्न असलेली वसतीगृहे, स्वतंत्र वसतीगृहे.

०३. <u>व्यावसायीक</u> :- पेट्रोलपंप व त्यास संलग्न असलेली खुली जागा, व्यावसायीक दराने खुल्या जागेचे दर वेगळे आकारले जाईल. हॉटेल्स, लॉन्स (लग्न, समारंभासाठी वापरात येणारे लॉन्स) व्यावसायीक वापरासाठी मोकळ्या जागा, मॉल्स, सर्व प्रकारची दुकाने व शासकीय कार्यालये, डॉक्टरांचे क्लिनीक, खाजगी हॉस्पीटल्स, कमर्शियल पे ॲड पार्कींगसाठी व्यावसायीक दराने कर आकारण्यात येईल. तसेच ज्या इमारती व्यावसायीक वापरासाठी भाड्याने दिल्या असतील अशा इमारतींना सुध्दा व्यावसायीक दराने कर आकारणी करण्यात येईल. <u>धार्मिक स्थळाच्या जागेवर जर व्यावसायीक वापर होत असेल तर त्यास व्यावसायीक दराने कर आकारणी करण्यात येईल.</u>

०४. <u>शैक्षणिक संस्था</u> :- अ) ज्या शैक्षणिक संस्था अनुदानित आहेत. अशा शैक्षणिक संस्थांना सामान्य कर ३०
टक्के व इतर कर निवासेतर दराने आकारण्यात येईल.
ब) ज्या शैक्षणिक संस्था विनाअनुदानित आहेत, इंजिनियरींग कॉलेज, मेडीकल कॉलेज अशा शैक्षणिक संस्थांना सामान्य कर ३७.५ टक्के व इतर कर निवासेतर दराने आकारण्यात येईल.

०५. <u>भारत सरकारच्या मिळकती</u> :- मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार भारत सरकार व त्यांच्या अंगीकृत असलेली कार्यालये व इतर मिळकती यांना वापरानुसार कर आकारणी करून त्यांना महानगरपालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या सुविधानुसार एकूण कराच्या ७५ टक्के, ५० टक्के व ३३.३३ टक्के रक्कम सेवा शुल्क म्हणून वसूल करण्यात येईल.

०६. <u>मोबाईल टॉवर्स</u> :- टॉवरसाठी भाड्याने घेतलेल्या इमारतीतील जागेचे प्रती माह भाडे नुसार किंवा भाडेपट्टा करारनामानुसार यापैकी जे जास्तीचे असेल त्याप्रमाणे कर आकारण्यात येईल. तसेच बी.एस.एन.एल. व इतर दूर संचार कंपनीचे स्वतःच्या जागेत मोबाईल टॉवर असल्यास अशा मोबाईल टॉवरला तळाचे क्षेत्रफळानुसार रु.९००/- प्रती चौ.मी. प्रती माह दरानुसार कर आकारणी करण्यात येईल. तसेच अनाधिकृत टॉवर्सला मालमत्ता कराची दुप्पट शास्ती लागु राहील

०७. <u>औद्योगीक</u> :- एम.आय.डी.सी., औद्योगीक क्षेत्र इत्यादी.
वरील संवर्गात मोडत असलेल्या मालमत्तेस सामान्य कराचा दर खालील प्रमाणे राहील.

०८. सामान्य करा बाबतचा तक्ता :-

| सामान्य कराचा प्रकार वापराप्रमाणे | सध्याचे सामान्य कराचे दर | प्रस्तावित सामान्य कराचे दर |
|---|---|---|
| १. निवासी (उपरोक्त प्रमाणे) | ३०% | ३०% |
| २. निवासेत्तर (उपरोक्त प्रमाणे) | ३७.५% | ३७.५% |
| ३. व्यावसायीक (उपरोक्त प्रमाणे) | ४५% | ४५% |
| ४. औद्योगीक (उपरोक्त प्रमाणे) | ३६% | ३६% |
| ५. अनुदानित शैक्षणिक संस्था | ३०% | ३०% |

| | | |
|---|---|---|
| ६. विना अनुदानित शैक्षणिक संस्था | २५.५% | ३७.५% |

09. <u>उपभोक्ता कर :-</u>

घनकचरा व्यवस्थापनाच्या कामाचा दर्जा सुधारण्यासाठी निर्धारित केलेले उपभोक्ता शुल्क वसुली करण्यासाठीचे दर मालमत्तेच्या प्रकारानुसार वसुल करण्यासाठी खालील प्रमाणे आहेत.

| उपभोक्ता कर | घर दुकान आस्थापना | उपभोक्ता कर प्रतिवर्ष रुपये |
|---|---|---|
| उपभोक्ता कर प्रती वर्ष | १. निवासी वापरासाठी | रु. ३६५/- प्रती वर्ष |
| | २. व्यावासियक दुकाने, अनिवासी मालमत्ता, सरकारी मालमत्ता | रु. ७३०/- प्रती वर्ष |
| उपभोक्ता कर प्रती वर्ष | ३. हॉटेल्स, रेस्टॉरंट, बिअर बारइत्यादी | रु. ३६५०/- प्रती वर्ष |
| | ४. लॉजींग बोर्डींग/मोठे हॉटेल्स | रु.७३००/- प्रती वर्ष |

१०. <u>नामांतर शुल्क :-</u>

खरेदी विक्री आधारे किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण केलेल्या दस्त / कागदपत्र आधारे नामांतर शुल्क कर योग्य मुल्यावर खालील प्रमाणे आकारण्यात येतील.

| निवासी व व्यावसायीक कर योग्य मुल्य | नामांतर शुल्क | |
|---|---|---|
| | (शहर, सिडको व औद्योगिक भागातील निवासी मिळकतींसाठी) | (शहर, सिडको भागातील व्यावसायीक मिळकतींसाठी) |
| रु. ०१ ते १०,०००/- | रु.१५००/- | रु.३०००/- |
| रु. १०,००१/- ते ५०,०००/- | रु.४५००/- | रु.९०००/- |
| रु.५०,००१/- ते पुढे | रु.९०००/- | रु.१८,०००/- |
| औद्योगिक वसाहतीतील व्यावसायीक मिळकतींसाठी | | |
| रु.०१ ते ५०,०००/- | | रु.१८,०००/- |
| रु.५०,००१ ते १,००,०००/- | | रु.३०,०००/- |
| रु.१,००,०००/- च्या पुढे | | रु.७५,०००/- |

११. <u>अदत्त रकमेवरील शास्ती :-</u>

चालु मागणीचे बिल प्राप्त झाल्यानंतर अशा बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रथम सहामाही देयकाची रक्कम ३० जुन पूर्वी व द्वितीय सहामाही देयकाची रक्कम ३१ डिसेंबर पूर्वी भरणे बंधनकारक आहे. जर कराची रक्कम भरण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने उपरोक्त प्रमाणे कराची रक्कम भरली नाही तर अशा अदत्त रकमेबद्दल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाने प्रकरण-८ कराधान नियम ४१ अन्वये प्रत्येक महिन्यासाठी कराच्या २ टक्के इतकी रक्कम शास्ती म्हणुन द्यावी लागेल.

११.१ <u>अवैध इमारतीवर शास्ती बसविणे :-</u> महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २६७ (अ) नुसार दि.०१-०४-२००८ पासुन अवैध इमारतीवर शास्ती आकारण्यात येते.

उक्त नियमान्वये कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरीत्या बांधकाम करील किंवा पुर्नर बांधकाम करील, तो अशा अवैध बांधकामाच्या बाबतीत, त्याच्याविरुध्द दाखल करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाधा न आणता, ते बांधकाम जोपर्यंत अवैध

बांधकाम म्हणून राहील तोपर्यंत दरवर्षी, अशा इमारतीवर बसवण्याजोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुप्पट इतकी शास्ती भरण्यास पात्र असेल तथापी,

शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१५/प्र.क्र.३०५/नवि-२०, मंत्रालय मुंबई, दिनांक ११ जानेवारी २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनाधिकृत निवासी बांधकामासाठी शासनाने शास्तीची आकारणी खालील प्रमाणे करणे बाबत निर्देश दिलेले आहे.

| अ.क्र. | निवासी बांधकामाचे क्षेत्रफळ | आकारण्याच्या शास्तीचा दर |
|---|---|---|
| १. | ६०० चौ. फुटापर्यंतचे निवासी बांधकाम | शास्तीची आकारणी करण्यात येऊ नये |
| २. | ६०१ ते १००० चौ.फुटापर्यंतचे निवासी बांधकाम | प्रती वर्षी मालमत्ता कराच्या ५० टक्के दराने शास्ती आकारण्यात यावी. |
| ३. | १००१ चौ.फुटापुढील निवासी बांधकाम | प्रती वर्षी मालमत्ता कराच्या दुप्पट दराने शास्ती आकारण्यात यावी (सध्याच्या दराने) |

परंतु, असा कर व शास्ती बसविणे व ती गोळा करणे, यांचा असे अवैध बांधकाम किंवा पुनर्र बांधकाम, जे अस्तित्वात असेल त्या पर्यंतच्या कोणत्याही कालावधीसाठी ते अवैध बांधकाम किंवा पुनर्र बांधकाम नियमित झाले आहे असा अन्वयार्थ लावला जाणार नाही, मग असा कालावधी कितीही असो.

(२) पोट कलम (१) अन्वये देय असलेली शास्ती ही, जणू काही शास्तीची रक्कम ही अशा व्यक्तीकडून देय असलेली मालमत्ता कराची रक्कम असल्याप्रमाणे या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये निर्धारीत करण्यात येते. करिता सदर शासन निर्णय प्रमाणे अंमलबजावणी करण्यात येत आहे.

१२. विशेष सवलती:-

१२.१ पाच वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरणाऱ्यास वार्षिक कराच्या सामान्य करात एक वर्षाची सूट देण्यात येईल

१२.२ तीन वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरणाऱ्यास एक वर्षातील वार्षिक कराच्या सामान्य करात ५० टक्के सूट देण्यात येईल.

१२.३ जे मालमत्ताधारक चालु वर्षाचा खालील महिन्यात मालमत्ता कर भरणा करतील त्यांना सन २०२२-२३

करीता सामान्य करात पुढील प्रमाणे सूट देय राहील.

| | |
|---|---|
| एप्रिल | १०% |
| मे | ८% |
| जुन | ६% |

जुलै ते मार्च पर्यंतच्या कालावधीत चालु आर्थिक वर्षातील मागणीवर तसेच थकबाकीवर सूट देय राहणार नाही

१२.४. माजी सैनिकांना व स्वातंत्र्य सैनिकांना व त्यांच्या पत्नीच्या नांवे असलेल्या मिळकतीस मागील वर्षाप्रमाणेच सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात देखील निवासी वापर करीत असलेल्या केवळ एका मिळकतीस सामान्य करात १०० टक्के सूट दिली जाईल.

१२.५ जे मालमत्ताधारक आपल्या मिळकतीत सोलर सिस्टीम लावतील त्यांना सामान्य करात चालु वर्षात ५ टक्के सुट दहा वर्षापर्यंत कायम ठेवण्यात येईल.

१२.६ जे मालमत्ताधारक आपल्या मालमत्तेस रेन हार्वेस्टींग सिस्टीम (Rain Harvesting System) लागु करतील, अशा मालमत्ताधारकास सामान्य करात २५ टक्के सवलत दहा वर्षापर्यंत कायम ठेवण्यात येईल

प्रशासक यांचा कार्यकाळ
प्रस्ताव व ठराव
दि.30.09.2021 ते दि.31 3 .2022

१२.७ जे मिळकतधारक नेट बँकींग, क्रेडीट कार्ड, डेबीट कार्डव्दारे ऑन-लाईन मालमत्ता कराचा भरणा करतील त्यांना अशा मिळकतधारकांना चालु आर्थिक वर्षातील मालमत्ता कराच्या सामान्य करात ५ टक्के सूट देय राहील.

13. <u>कर आकारणी प्रणाली</u> :-

औरंगाबाद शहराचे वेगवेगळे भाग पाडुन त्याभागातील मिळकतीच्या/जागेचा मुल्यानुसार त्यांचे वाजवी भाडे आकारणी करण्यासाठी विचारात घेण्यात येते. अशा प्रकारचे भाग पाडुन मूल्यांकन हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुद्रांक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणका मधील निवासी जागांच्या किंमती विचारात घेवुन औरंगाबाद शहराचे खालील प्रमाणे भाग करणे योग्य होईल. यामुळे औरंगाबाद शहरातील वेगवेगळ्या भागातिल मुल्य (जागेचे) वेगवेगळे मिळवुन त्यानुसार मिळकतीचा स्तर (वर्गीकरण) ठरवुन त्यानुसार मालमत्ता कर आकारणीसाठी दर आकारणे योग्य राहील.

१३.१ सन २०१० चे महाराष्ट्र शासनाकडील सिध्द शिघ्र गणक (Ready Recknor) आधारे दिनांक ०१-०४-२०१० पासून औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील सर्व मिळकतीसाठी चार विभाग हे मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.९८५ दि २०-२-२०१० नुसार पुर्वी प्रमाणेच करण्यात आलेले होते. त्यानुसार सन २०१२ मध्ये देखील चार भाग करण्यात आले होते.

त्याअनुषगाने सन २०१६ साठी शिघ्र सिध्द गणकाचे दर शासनातर्फे प्रसिध्द झाल्याने सन २०१५ मधील सिध्द शिघ्र गणकातील दरानुसार अ, ब, क, व ड असे चार भाग होतात. खालील कोणत्या भागात कोणती मिळकत येते, हे तपासता येईल. तसेच दरवर्षी दर बदलले तरी कर आकारणीसाठी हे विभाग पुढील चार वर्षासाठी असेच ठेवण्यात येतील.

| अ.क्र. | विभाग | सन २०१२ च्या विभागानुसार मिळकतीचा सन २०१६-१७ पर्यंतचा प्रचलित दर प्रती चौ.मी. | सन २०१६ च्या विभागानुसार सन २०१७-१८ करीता प्रस्तावित मिळकतीचा दर प्रती चौ.मी. |
|---|---|---|---|
| १ | अ | रू.१७,०००/- पेक्षा जास्त असलेल्या सर्व मिळकती | रू.४५,०००/- पेक्षा जास्त असलेल्या सर्व मिळकती |
| २ | ब | रू.१३,००० ते रू.१६,९९९/- | रू.३४,९०० ते रू.४४,९९९/- |
| ३ | क | रू.११,००० ते रू.१२,९९९/- | रू.३१,७९९ ते रू.३४,८९९/- |
| ४ | ड | रू.८५०० ते रू.१०,९९९/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या सर्व मिळकती) | रू.२५,००० ते ३१,८००/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या सर्व मिळकती) |

वरील प्रस्तावित दर हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुद्रांक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणकामधील घेण्यात आलेले आहे. सदरील दर सन २०१९-२० साठी कायम ठेवण्यात यावेत.

१४. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये कर योग्य मुल्य निश्चित करणेकरीता खालील प्रमाणे वर्गीकरणानुसार व सिध्द शिघ्र गणकानुसार प्रती माह प्रती चौं.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे आहेत.

<u>निवासी इमारत</u>

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी छत | रू.११/- | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- |
| २ | गोल पत्र्याचे लाकडी छत | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- | रू.६/- |

प्रशासक यांचा कार्यालय
प्रस्ताव व ठराव
दि.३०.०९.२०२१ ते दि. ३१.३.२०२२

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.९/- | रू.८/- | रू.७/- | रू.५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.८/- | रू ३/- | रू.२/- | रू.१/- |

१४.१ सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी निवासी वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. कायम करण्यात यावे हे दर पुढील प्रमाणे

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१३.७५/- | रू.१२.५/- | रू.११.२५/- | रू.१०/ |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१२.५/- | रू.११.२५/- | रू.१०/- | रू.७.५/ |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.११.२५/- | रू.१०/- | रू.८.७५/- | रू.६.२५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१०/ | रू ३.७५/- | रू २.५/- | रू.१.२५/ |

<u>निवासेतर इमारत</u>

१४.२ (अ) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. आकारीत्यातील दर पुढील प्रमाणे

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२२/ | रू.२०/- | रू.१८/- | रू.१७/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१८/ | रू १६/- | रू.१४/- | रू.९/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१४/- | रू.१२/- | रू.७/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१३/- | रू ६/- | रू.३/- | रू.२/- |

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. कायम करण्यात यावे हे दर पुढील प्रमाणे

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२७.५/- | रू.२५/- | रू.२२.५/- | रू.१७.५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२२.५/- | रू.२०/- | रू.१७.५/- | रू.११.२५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू १८.७५/- | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.८.७५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१६.२५/- | रू.७.५/- | रू.३.७५/- | रू २.५/- |

<u>अनुदानीत शैक्षणिक संस्था</u>

१४.३ (ब) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. आकारीत्यातील दर सन २०१६-२० या आर्थिक वर्षासाठी अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. कायम करण्यात यावे हे दर पुढील प्रमाणे

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१४/- | रू १२/- | रू.११/ | रू.१०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१३/- | रू.११/ | रू.१०/- | रू.९/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१२/- | रू.१०/- | रू.९/ | रू.८/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.११/- | रू.९/- | रू.८/- | रू.७/- |

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतींच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी प्रस्तावित दर खालीलप्रमाणे —

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.१३.७५/- | रू.१२.५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१६.२५/- | रू.१३.७५/- | रू.१२.५/- | रू.११.२५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंगलोर टाईल्स | रू.१५/- | रू.१२.५/- | रू.११.२५/- | रू.१०/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१३.७५/- | रू.११.२५/- | रू.१०/- | रू.८.७५/- |

कायम विना अनुदानीत संस्था

१४४ (क) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी कायम विना अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. अस्तीत्वातील दर प्रती माह प्रती चौ.मी हे दर पुढील प्रमाणे

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१७/- | रू.१५/- | रू.१४/- | रू.१३/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१६/- | रू.१४/- | रू.१३/- | रू.१२/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंगलोर टाईल्स | रू.१५/- | रू.१३/- | रू.१२/- | रू.११/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१४/- | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- |

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी कायम विना अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालीलप्रमाणे --

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२१.२५/- | रू.१८.७५/- | रू.१७.५/- | रू.१६.२५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२०/- | रू.१७.५/- | रू.१६.२५/- | रू.१५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंगलोर टाईल्स | रू.१८.७५/- | रू.१६.२५/- | रू.१५/- | रू.१३.७५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.१३.७५/- | रू.१२.५/- |

व्यावसायीक इमारती

१४.५ सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी व्यावसायीक वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. अस्तीत्वातील हे दर पुढील प्रमाणे

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२८/- | रू.२६/- | रू.२४/ | रू.२२/ |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२४/- | रू.२२/- | रू.१९/- | रू.१७/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंगलोर टाईल्स | रू.२०/- | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१६/- | रू.१४/- | रू.१२/- | रू.१०/- |

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षांसाठी व्यावसायीक वापर असलेल्या इमारतींच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. साठी प्रस्तावित दर खालिलप्रमाणे -

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी छत | रू.३५/- | रू ३२.५/- | रू ३०/- | रू.२७.५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.३०/- | रू २७.५/- | रू.२३.७५/- | रू.२१.२५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंगलोर टाईल्स | रू.२५/- | रू २२.५/- | रू.२०/- | रू.१७.५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू २०/- | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.१२.५/- |

१४.६ <u>औद्योगिक क्षेत्रासाठी दर</u> :-

| अ.क्र. | बांधकामाचा वर्ग | सन २०२१-२२ साठी आस्तीत्वातील दर | सन २०२२-२३ साठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| | | चौ.मी. | चौ.मी. |
| १ | कारखाना कार्यालय (आर.सी.सी.) | १४.६४ | १८.३० |
| | पक्के बांधकाम (ॲ.सी.सी. शिटस्) | १० ३२ | १२.९ |
| | कारखाना कार्यशाळा (आर.सी.सी.) | ११.६२ | १४.५३ |
| | पक्के बांधकाम (ॲ.सी.सी. शिटस्) | ९.०४ | ११ ३० |
| २ | कारखाना परिसरातील कॅन्टीन | २४.०० | ३० |
| ३ | गोदाम (आर.सी.सी.) | ९ ६८ | १२.१ |
| | पक्के बांधकाम (ॲ.सी.सी.शिटस्) | ९.६८ | १२.१ |
| | अर्ध पक्के | ५ ८२ | ७.२८ |
| | कच्चे आणि विना छताचे | ३.२२ | ४.०३ |
| ४ | शेड | २.५८ | ३.२३ |
| ५ | सायकल स्टॅन्ड | ३.८६ | ४ ८३ |
| ६ | मशिनरी प्लॅन्ट (आर.सी.सी.) | ११.४० | १४.२५ |
| | पक्के बांधकाम (ॲ.सी.सी.शिटस्) | ८.८२ | ११.०३ |
| | अर्ध पक्के बांधकाम | ७ १० | ८.८८ |
| | कच्चे बांधकाम | ३.१० | ३.८८ |
| ७ | निवासी क्षेत्र (आर.सी.सी ) | १६.१४ | २०.१८ |
| | पक्के बांधकाम (ॲ.सी.सी.शिटस्) | १२.९२ | १६.१ |
| | अर्ध पक्के बांधकाम | ११.४० | १४.२५ |
| | कच्चे बांधकाम | ६.४४ | ८.०५ |
| ८ | मोकळी जागा | | |
| | कारखाना वापर | १२.०४ | १५.०५ |
| | रिकामे | ९ ०३ | ११ २९ |

१४.७ सन २०२१-२२ या आर्थिक वर्षांसाठी मंजुर रेखांकनातील मोकळया खाजगी भूखंडासाठी खुल्या जागेची कर आकारणी करीता प्रती माह प्रती चौ.मी. आस्तीत्वातील दर मंजूर रेखांकनातील मोकळया खाजगी भूखंडासाठी खुल्या जागेची आकारणी करीता हे दर पुढील प्रमाणे

प्रशासक यांचा कार्यकाळ
प्रस्ताव न.६०७
दि.३०.०५.2021 ते दि.१५ ३ 2022

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | केवळ मोकळ्या जागा / निवासी पार्कींग वखळ | रू.३.००/- | रू.२.५०/- | रू.२.००/- | रू.२/- |

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी मंजुर रेखांकनातील मोकळ्या खाजगी भूखंडासाठी खुल्या जागेची कर आकारणीसाठी खालील प्रमाणे —

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | केवळ मोकळया जागा / निवासी पार्कींग वखळ | रू.३.७५/- | रू.३.१३/- | रू.२.५/- | रू.२.५/- |

१४.८ सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर / व्यावसायीक इमारतीसमोरील असलेल्या मोकळ्या जागेसाठी कर आकारणी करीता प्रती महा प्रती चौ.मी. अस्तीत्वातील दर पुढील प्रमाणे

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| २ | विकसीत केलेले व्यापारी तत्वावर वापरात असलेल्या मोकळ्या जमीनी बिगर निवासी प्रकार, लॉन्स, पेट्रोल पंप, गार्डन रेस्टॉरन्ट, इत्यादी | रू.१२.५०/- | रू.१०.५०/- | रू.९.००/- | रू.७/- |

टिप :- मोकळ्या जागेची आकारणी करताना फक्त सामान्य कर आकारण्यात येईल.

सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षासाठी निवासेत्तर/ व्यावसायीक इमारतीसमोरील असलेल्या मोकळ्या जागेसाठी कर आकारणीसाठी खालीलप्रमाणे प्रस्तावित दर —

| अ.क्र | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| २ | विकसीत केलेले व्यापारी तत्वावर वापरात असलेल्या मोकळ्या जमीनी बिगर निवासी प्रकार, लॉन्स, पेट्रोल पंप, गार्डन रेस्टॉरन्ट, इत्यादी | रू.१५.६३/- | रू.१३.१३/- | रू.११.२५/- | रू.८.७५/- |

१५. मालमत्ता कर आकारणी करणेसाठी सन २०२१-२०२२ या वर्षाचे अस्तीत्वातील दर सन २०२२-२०२३ साठी कायम करण्यात यावे हे दर पुढील प्रमाणे :-

| अ क्र | कराचे नांव | कर योग्य मुल्य रूपये | सन २०२०-२१ चे अस्तीत्वातील दर सन २०२२-२३ साठी कायम करण्यात यावे | सन २०२२-२०२३ साठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| १ | सामान्य कर | १. निवासी वापरासाठी | ३० % | ३० % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | ३७.५% | ३७.५% |
| | | ३.व्यावसायीक वापरा साठी | ४५% | ४५% |
| | | ४ औद्योगिक वापर | ३६% | ३६% |
| | | ५.अनुदानित शैक्षणिक संस्था | ३०% | ३०% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ६.विना अनुदानित पी.संस्था | ३७.५% | ३७.५% |
| २ | साफसफाई कर | १. निवासी वापरासाठी | ३ % | ३ % |
| | | २. निवासेतर वापरासाठी | १० % | १० % |
| | | ३.व्यावसायीक वापरा साठी | १० % | १० % |
| | | ४ औद्योगिक वापरासाठी | १०% | १०% |
| ३ | वृक्षकर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | १ % | १ % |
| ४ | अग्निशमन कर | | १.५ % | १.५ % |
| ५ | मनपा शिक्षण कर | | २ % | २ % |
| ६ | पथकर | | २ % | २ % |
| ७ | जललाभ कर | | १.५ % | १.५ % |
| ८ | जलनि:सारण कर | | १.५ % | १.५ % |
| ९ | सिवरेज कर | १. निवासी वापरासाठी | १० % | १० % |
| | | २.निवासेत्तर व व्यावसायीक वापरासाठी | १५ % | १५ % |
| | | ३. औद्योगिक वापरासाठी | ५ % | ५ % |
| | | ४.औद्योगिक वसाहतीतील निवासी वापर | १० % | १० % |
| १० | उपभोक्ता कर प्रती वर्ष | १. निवासी वापरासाठी | रू.१००/- प्रती वर्ष | रु. ३६५/- प्रती वर्ष |
| | | २.व्यावासियक दुकाने, अनिवासी मालमत्ता, सरकारी मालमत्ता | रू.५००/- प्रती वर्ष | रु. ७३०/- प्रती वर्ष |
| १० | उपभोक्ता कर प्रती वर्ष | ३.हॉटेल्स, रेस्टॉरंट, बिअर बार इत्यादी | रू.५००/- प्रती वर्ष | रु. ३६५०/- प्रती वर्ष |
| | | ४.लॉजींग बोर्डीग/ मोठे हॉटेल्स | रू.५००/- प्रती वर्ष | रु.७३००/- प्रती वर्ष |

१६ <u>शासनाचे कर</u>:- तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठ्या निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे कर योग्य मूल्यावर आकारण्यात येईल

करिता, वरील प्रमाणे सन २०२२-२३ साठी मालमत्ता कर आकारणी व वसूलीचे दराचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

ठराव क्रमांक 303/2022:

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे सन २०२२-२०२३ या वित्तीय वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करांचे दर व मर्यादा महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९९ अन्वये महानगरपालिकेने सन २०२१-२२ या वर्षात कोव्हिड-१९ संसर्गाचा प्रादुर्भाव असल्यामुळे, तसेच

मालमत्ताधारकावर अधिकचा बोजा न वाढवता, दरामध्ये कोणतीही वाढ न करता सन २०२१-२२ या वर्षाचे दर कायम ठेवण्यात येत आहेत. सन २०२१-२२ मध्ये उपभोक्ता कराच्या दराचा बदल करण्याचा प्रस्ताव मंजुर करण्यात आलेला आहे, उपभोक्ता कराचे अंमलबजावणीचे दुरूस्तीसह प्रस्तावात दर्शविलेल्या प्रमाणे वसुली करण्यात येईल. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 304/2022</u>:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.22.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, संपुर्ण भारत देश ऑक्टोबर-2018 पर्यंत स्वच्छ करण्याच्या उद्देशाने दि.02 ऑक्टोबर 2014 पासून "स्वच्छ भारत अभियान" देशभरात राबविण्यात येत आहे. त्याच धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) प्रस्ताव सादरची अंमलबजावणी संदर्भाधीन दि.15 मे 2015 रोजीच्या शासन निर्णयान्वये संपुर्ण "मिशन मोड" पध्दतीने सुरु आहे. या अभियानांतर्गत शहरे "हागणदारी मुक्त" करणे व घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत "स्वच्छ" करणे या दोन प्रमुख बाबींचा समावेश आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी करुन राज्याचा नागरी भाग दि.01 ऑक्टोबर 2017 "हागणदारी मुक्त" घोषित करण्यात आले आहे. आता या अभियानांतर्गत घनकचरा व्यवस्थापनार्गत शहरे "शहरे स्वच्छ" करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तथापि, नागरी भागात व सार्वजनिक ठिकाणी काही प्रमाणात होत असलेल्या अस्वच्छतेमुळे नागरीकांकडून प्रतिकुल प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसुन येतात.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, शहरांना कचरा मुक्त होण्याकरीता एकुणच स्वच्छतेमध्ये क्रमाक्रमाने आणखी सुधारणा होण्यास्तव शहरांना तारांकीत मानांकन (Star Rating) देण्याबाबतची नियमावली (A protrocol for making citis Garbege Free) केंद्र शासनामार्फत तयार करण्यात आली आहे.

Water+ घोषित करणे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनातील एक घटक म्हणुन व स्वच्छ सर्वेक्षण 2022 करीता अनिवार्य आहे. यावरती शासनाकडून येणारे अनुदान अवलंबून आहे. त्याच प्रकारे स्वच्छ अभियान (नागरी) अंतर्गत कचरा विलगीकरणाची कार्यवाही न करणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षण मध्ये योग्य कामगिरी न करणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्राधान्याने देण्यात येणारी अनुदाने थांबविण्याबाबत नगर विकास विभागाने शासन निर्णय क्र.स्वमअ-2018/प्र.क्र.79/नवि-34 दि.29 जानेवारी 2018 द्वारे कळविलेले आहे.

त्या अनुषंगाने औरंगाबाद शहरात स्वच्छ अभियानाची सुरुवात 01 ऑक्टोबर 2017 पासून झाली आहे. दि.31 मार्च 2018 रोजी महाराष्ट्र व पर्यायाने औरंगाबाद शहर हागणदारीमुक्त म्हणुन घोषित करण्यात आली असून ठराव क्र.833 दि.29.12.2016 रोजी मा.सर्वसाधारण सभेने या बाबत मान्यता दिलेली आहे व ठराव क्र.684 दि.20.10.2018 रोजी मा.सर्वसाधारण सभेने शहर ODF+ व स्वच्छतेमध्ये 3 Star घोषित केले आहे. तसेच ठराव क्र.1244 दि.19.12.2019 अन्वये औरंगाबाद शहर ODF++ म्हणुन घोषित करण्यात आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार औरंगाबाद महानगरपालिका शहर "water+" साठी मानांकन व घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत शहरे स्वच्छते बाबत "पाच तारांकना" (5 Star) निश्चित केले असून त्या बाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर

**<u>ठराव क्रमांक 304/2022</u>:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उपरोक्त नुसार केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार औरंगाबाद महानगरपालिका शहर "water+" साठी मानांकन व घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत शहरे स्वच्छते बाबत "पाच तारांकना" (5 Star) निश्चित केले असून त्या बाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यासाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 305/2022</u>:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.23.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराची वाढती लोकसंख्या शैक्षणिक व औद्योगिक प्रगती, शहराचा विस्तार, शहराचा स्मार्ट सिटीमधील झालेला समावेश, शहरीकरण आणि पर्यटकांची गरज लक्षात घेऊन मराठवाड्यात प्रसिध्द असलेल्या सिध्दार्थ उद्यानात उपलब्ध जागेत स्वखर्चाने मुव्हेबल रबर वॉटर टँक मधील वॉटर बोट व इतर खेळणी उभारणेचा प्रकल्प पुढील 10 वर्ष कालावधीसाठी चालविण्यास उत्सुक असल्या बाबतचा प्रस्ताव तुळजाई एन्टरप्राईजेस यांनी दिला आहे. या प्रकल्पातील खेळण्यामुळे लहान मुले, मुली व सहलीसाठी उद्यानात येणारे शालेय विद्यार्थी यांच्या मनोरंजनासाठी उपयुक्त ठरणार आहे.

या प्रस्तावामुळे सिध्दार्थ उद्यानात येणाऱ्या मुलांचे व पालकांचे आकर्षण वाढण्यास मदत होईल. तसेच सदरील प्रकल्पामुळे मनपाच्या उत्पन्नात वाढ होणार आहे. उद्यानातील दक्षिण बाजुस गॅलरी सेंटर समोरील उपलब्ध असलेल्या खुल्या जागेत हा प्रकल्प कार्यान्वीत करणे शक्य आहे.

तुळजाई एन्टरप्राईजेस यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार 5 ते 12 वर्ष वयोगटातील मुलांच्या मनोरंजनासाठी मुव्हेबल रबर वॉटर टँक मधील वॉटर बोट व इतर खेळणी उभारणे, परीसराचे सुशोभिकरण करणे व हा परिसर कायम स्वच्छ ठेवून 10 वर्ष प्रकल्प चालविण्यासाठी रु.1.00 (रुपये एक लाख) च्या सुरक्षा अनामत रक्कमेचा भरणा करून घेऊन नियमानुसार लागणाऱ्या मुद्रांकावर करारनामा करून स्वखर्चाने प्रकल्पाची उभारणी करतील. या प्रस्तावासाठीअंदाजे 20X30 फुट आकाराची जागा अपेक्षित आहे.

सदरील प्रकल्प कार्यान्वीत झाल्यानंतर रु.50/- प्रति बालक अशी प्रवेश फी आकारणी करण्यात येईल. या माध्यमातून जमा होणाऱ्या रक्कमेचा हिशोब संबंधीत एजन्सीला दरमहा सादर करावा लागेल. प्रति महिन्याच्या उत्पन्नातून 25 टक्के रक्कम रॉयल्टी म्हणुन औरंगाबाद महानगरपालिका फंडात भरणा करावा लागेल. प्रतीवर्षी प्रवेश फी दरात व रॉयल्टीमध्ये 10 टक्के भाववाढ लागू असेल. सदर प्रकल्पाची मुदत करारनाम्यानुसार प्रकल्प कार्यान्वीत झाल्याच्या तारखेपासून 10 वर्षासाठी असेल. खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून सदर प्रकल्प राबविण्यात येईल.

**<u>अटी व शर्ती :-</u>**

1. सदरील प्रकल्पासाठी रु.1.00 लक्ष सुरक्षा अनामत (Security Deposit) रक्कमेचा भरणा करून कार्यादेश पुर्वी त्याची पावती सादर करावी लागेल.
2. नागरीक व लहान मुलांच्या मनोरंजनाकरीता हा प्रकल्प चालविण्यासाठी कालावधी हा येणाऱ्या दहा वर्षासाठी असेल. निश्चित केलेली प्रवेश फी व रॉयल्टीमध्ये प्रतीवर्षी 10 % नैसर्गिक भाववाढ लागू असेल
3. सदरील प्रकल्प कार्यान्वीत झाल्याच्या दिनांकापासून प्रवेश फी संबंधीचा दैनंदिन लेखाजोखा (हिशोब) ठेवावा लागेल व करारनाम्यानुसार मनपास रॉयल्टी भरावी लागेल.
4. मुव्हेबल रबर वॉटर टँक मधील वॉटर बोट व इतर खेळणीच्या प्रकल्पासाठी देण्यात आलेली जागा ही तात्पुरत्या स्वरुपात असून यावर आपला कोणताही हक्क राहणार नाही किंवा दावा करता येणार नाही.
5. प्रस्तावात मान्यता दिलेल्या मुव्हेबल रबर वॉटर टँक मधील वॉटर बोट व इतर खेळणी या व्यतिरीक्त कोणताही उपक्रम सुरु करता येणार नाही.
6. नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांकडून उद्यानाचे पावित्र्य जपले जाईल तसेच मनपाच्या मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याचे हमीपत्र द्यावे लागेल
7. सदरील जागेत कोणतेही पक्के बांधकाम करता येणार नाही. त्यासाठी महानगरपालिकेची पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.
8. या प्रकल्पामधील साहित्याची काही मोडतोड झाल्यास किंवा चोरी झाल्यास त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.
9. मुव्हेबल रबर वॉटर टँक मधील वॉटर बोट व इतर खेळणी उभारणीसाठी लागणारा विद्युत पुरवठ्याचा सेटअप, इलेक्ट्रीक फिटींग तसेच अंतर्गत रस्ते, लाईटस् याची सर्व व्यवस्था संबंधीत एजन्सीला करावी लागेल.
10. सदर प्रकल्प चालविण्यासाठी लागणारा सुरक्षा कर्मचारी वर्ग तसेच इतर कर्मचारी हा संबंधीत एजन्सीला ठेवावा लागेल.
11. सदर प्रकल्प सिध्दार्थ उद्यानाच्या दैनंदिन वेळेप्रमाणे किंवा वेळेनुसार चालविणे बंधनकारक राहील

12. सदर प्रकल्पामध्ये मनोरंजनासाठी आलेल्या लहान मुलांना खेळतांना काही इजा किंवा अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत एजन्सीची राहिल त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.
13. सदर प्रकल्प कार्यान्वीत झाल्यानंतर लगतच्या प्राणी संग्रहालयातील प्राण्यांना आवाजामुळे काही त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.
14. सदरील प्रकल्पात काही देखभाल दुरुस्त्या करणे झाल्यास स्वखर्चाने कराव्या लागतील.
15. शालेय सहली, शालेय विद्यार्थ्यांचा ग्रुप यांना प्रवेश दरात 25% सुट द्यावी लागेल.
16. या प्रकल्पातून मिळणाऱ्या प्रवेश फी मधून शासनाच्या नियमानुसार संबंधीत एजन्सीला मनोरंजन कर भरावा लागेल व दरवर्षी मनोरंजन कर भरल्याची पावती सादर करावी लागेल.
17. कोणत्याही कारणाने जसे नैसर्गिक आपत्ती अथवा अन्य आपतकालीन परिस्थितीमुळे सिध्दार्थ उद्यान बंद ठेवावे लागले त अशा कालावधीत सदरील प्रकल्प चालविता येणार नाही.
18. सदर जागेवरील खेळणी उपकरणे कोणत्याही तऱ्हेने हस्तांतरण करणे, पोटभाडेकरु ठेवणे, बक्षीस गहाणखत इ बाबी करता येणार नाहीत. या प्रकल्पात कुणास भागीदार घेता येणार नाही.
19. परिसर सुरक्षिततेच्या दृष्टिने महानगरपालिकेचे अधिकारी वेळोवेळी प्रकल्पाची पाहणी करतील. अशा पहाणीच्या वेळी अधिकाऱ्यास मज्जाव करता येणार नाही.
20. ठरल्यानुसार प्रवेश फी संबंधी प्रकल्पाच्या प्रवेशद्वारावर दरपत्रकाचा सुस्पष्ट व सर्वांना दिसेल असा फलक स्वखर्चाने लावावा लागेल.
21. प्रकल्प चालविण्यासाठी सर्व आवश्यक परवानगी काढण्याची जबाबदारी एजन्सी धारकाची राहील.
22. कोणत्याही प्रकारे नैसर्गिक आपत्ती अथवा इतर कोणत्याही कारणाने प्रकल्पाचे नुकसान झाल्यास औरंगाबाद महानगरपालिका त्यास जबाबदार राहणार नाही.
23. सदरील प्रकल्प बंद करणे असल्यास एजन्सी धारकाने 30 दिवस अगोदर पुर्व कल्पना देणे आवश्यक राहील. अन्यथा भरलेली सुरक्षा अनामत रक्कम परत मिळणार नाही.
24. प्रकल्पाचा करारनामा नियमानुसार योग्य त्या मुद्रांकावर स्वखर्चाने एजन्सीधारकाने करून देऊन नोंदणी प्रमाणपत्र, पॅन, जीएसटी इ.उद्यान विभागाकडे सादर करणे आवश्यक राहील.
25. वर नमुद केलेल्या कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाला तर करारनामा रद्द करण्याचे व सदर प्रकल्पातील उपकरणे उद्यानातून काढून घेण्याचे अधिकार मा.आयुक्त महोदय यांना असतील.

करीता वर नमुद नुसार मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरी मिळणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 305/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ उद्यानात उपलब्ध असलेल्या जागेत 5 ते 12 वर्ष वयोगटातील मुलांसाठी स्वखर्चाने मुव्हेबल रबर वॉटर टँक मधील वॉटर बोट व इतर खेळणी उभारणेचा प्रकल्प पुढील 10 वर्ष कालावधीसाठी चालविण्या संबंधी प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार तुळजाई एन्टरप्राइजेस यांना स्वखर्चाने प्रकल्प उभारणी करुन परिसराचे सौंदर्यीकरण करुन प्रकल्प कार्यान्वीत झाल्यानंतर प्रती बालक रु.50/- प्रवेश फी आकारणी करणे आणि प्रवेश फी मधून जमा होणाऱ्या रक्कमेतून 25% रक्कम दरमहा रॉयल्टी म्हणुन मनपाकडे जमा करणे यासह प्रस्तावात नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून 10 वर्ष कालावधी साठी तुळजाई एन्टरप्राइजेस यांच्याशी करारनामा करणे व प्रकल्प कार्यान्वीत करणेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 306/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.25.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सातारा येथे आरोग्य केंद्राकरीता श्री.दिपक प्रभाकर भिंगारदिवे यांच्या मालकीची इमारत क्षेत्रफळ 74.74 चौ.मी.भाडेतत्वावर घ्यावयाची आहे. मालमत्ता विभाग यांच्या रेडिरेकनर नुसार दराबाबत चर्चा झाल्यानुसार रु.18,544/-प्रतिमाह मासिक भाडे निश्चित करण्यात आलेले आहे. या व्यतिरिक्त प्रतिमाह लाईटबील मनपातर्फे अदा करावयाचे आहे. तसेच इतर सर्व प्रकारचे टॅक्स व पाणी व्यवस्था करण्याची जबाबदारी इमारत मालकाकडे राहील

प्रस्तावीत केल्याप्रमाणे श्री.दिपक प्रभाकर भिंगारदिवे, सातारा परिसर, औरंगाबाद यांच्या मालकीची बांधीव इमारत सातारा आरोग्य केंद्रासाठी औरंगाबाद महानगरपालिकेस लागेल तेवढ्या कालावधीसाठी

प्रतिमाह मासिक भाडे रु.18,544/- (अक्षरी रुपये अठरा हजार पाचशे चौरेचाळीस फक्त) घेण्याबाबत व दि.08.07.2019 रोजी संबंधीताने अर्ज सादर केल्यानुसार सदरील इमारतीचे विद्युत देयक मनपाने भरावे.

करीता, संबंधीत इमारत मालकासमवेत वरील अटी शर्तीच्या अधिन राहून रितसर करारनामा करुन घेण्याबाबत व सदरील इमारत भाडेतत्वावर घेऊन सातारा येथील आरोग्य केंद्र सदरील भाड्याच्या इमारतीमध्ये स्थलांतरीत करणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 306/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आरोग्य केंद्र साताराकरीता श्री.दिपक प्रभाकर भिंगारदिवे, सातारा परिसर, औरंगाबाद यांच्या मालकीची बांधीव इमारत सातारा आरोग्य केंद्रासाठी औरंगाबाद महानगरपालिकेस लागेल तेवढ्या कालावधीसाठी प्रतिमाह मासिक भाडे रु.18,544/- (अक्षरी रुपये अठरा हजार पाचशे चौरेचाळीस फक्त) घेण्याकरीता तसेच विद्युत देयक मनपाने अदा करणे व इतर सर्व प्रकारचे टॅक्स व पाणी व्यवस्था करण्याची जबाबदारी इमारत मालकाकडे राहील. इमारत आरोग्य केंद्रासाठी लागेल तेवढ्या कालावधीसाठी घेण्यासाठी व करारनामा करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 307/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.25.02.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात विविध मोबाईल कंपन्या/संस्थांमार्फत सर्व्हीस केबल टाकण्यासाठी रस्ता खोदकाम करण्यास परवानगी मागण्यात येते. त्यात वीज वितरण कंपनी, बी.एस.एन.एल., जीओ, भारती ऐअरटेल, वोडाफोड-आयडीया व इतर खाजगी व्यवसायीक परवानगीसाठी प्रस्ताव दाखल करीत असतात.

प्राप्त होणा-या प्रस्तावांची वार्ड अभियंता स्तरावर छाननी करुन प्रचलीत पध्दतीनुसार रस्ता दुरुस्तीसाठी येणारा खर्च शासनमान्य दरसुची प्रमाणे आकारण्यात येते. मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या अंतीम मंजुरीनुसार संबंधीतांकडून रस्ता दुरुस्ती शुल्क व निगराणी शुल्क आकारणी करुन, रक्कमेचा भरणा करुन घेऊन परवानगी अनुज्ञेय करण्यात येते.

औरंगाबाद महानगरपालिकेत सद्यस्थितीत बरेचसे व्हॉईट टॉपींग/कॉक्रीट रस्ते, डांबरी रस्ते विकसीत करण्यात आलेले आहे. तसेच अंतर्गत रस्त्यांवर पेव्हर ब्लॉक बसविण्यात आलेले आहेत. ही बाब विचारात घेऊन सन २०२१-२२ या वर्षात केबल टाकण्यास परवानगी देताना कॉक्रीट रस्ते दुरुस्तीचे प्रती रनिंग मिटर चे दर सन २०२१-२२ च्या एस.एस.आर.नुसार काढण्यात आले आहे. या दरानुसार केबल टाकण्यासाठी परवानगी देताना रस्ता दुरुस्ती शुल्क रुपये ३३८०/- आणि निगराणी शुल्क रुपये ३००/- प्रती रनिंग मिटर प्रमाणे दर आकारण्यात येतात. एच.डी.डी. पध्दतीने खोदकाम करण्यासाठी फक्त पिटस् साठी प्रचलीत दरानुसार रस्ता दुरुस्ती शुल्क आकारण्यात येते. तथापी हे शुल्क वाढविणे आवश्यक आहे. त्यामुळे यसबाबत इतर महानगरपालिकांमध्ये काय कार्यवाही केल्या जाते याची माहिती घेतली असता, विविध सेवा वाहिन्या टाकण्यासाठी देण्यात येणा-या परवानगीस अनुसरुन पुणे महानगरपालिकेचे रस्ते खोदकामाचे सुधारीत सन २०२१-२२ साठी दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | रस्त्याची पुर्नस्थापना | रु. १२,१९२.०० प्रती र.मी. |
| २. | पीट चे पुर्नस्थापना | रु. ६२६०.०० प्रती चौ.मी. |
| ३. | एच.डी.डी. पध्दतीने खोदकाम | रु. ४०००.०० प्रती र.मी. |

पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात सुधारीत दर लागु करताना विविध सेवा वाहिन्या जसे की, वीज वितरण कंपनी, बी.एस.एन.एल., जीओ, भारती एअरटेल, वोडाफोड-आयडीया व इतर खाजगी व्यवसायीक कंपन्या इ. व्यवसायीक स्वरुपात वापर करीत असल्यामुळे औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील कोणत्याही प्रकारच्या रस्त्यासाठी खालील प्रमाणे दर प्रस्तावीत करण्यात येत आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | १. | रस्त्याची पुर्नस्थापना | रु. १२,०००.०० प्रती र.मी. |
| | २. | पीट चे पुर्नस्थापना | रु. ६०००.०० प्रती चौ.मी. |

३. एच.डी.डी. पध्दतीने खोदकाम — रु. ४०००.०० प्रती र.मी.
४. निगराणी शुल्क — रु. १८००.०० प्रती र.मी.

(ख) या शिवाय व्यवसायाच्या वापरा व्यतिरिक्त इतर सरकारी कामासाठी भुमिगत केबल टाकावयाच्या असल्यास त्यासाठी शुल्क आकारणी खालील प्रमाणे राहील.

१. रस्त्याची पुर्नस्थापना — रु. १२,०००.०० प्रती र.मी.
२. निगराणी शुल्क — रु. १८००.०० प्रती र.मी.

उक्त नमुद केलेले दर पुढील तीन वर्षांच्या कालावधीसाठी अनुज्ञेय राहतील.

(क) औरंगाबाद शहरातील नागरीक निवासी वापरासाठी जलवाहिनी, जलनिःसारण वाहिनी, वीज जोडणी घेण्यासाठी रस्ता खोदण्याची परवानगी देताना प्रचलीत असलेल्या एस.एस.आर. (Current SSR) च्या दरानुसार व रस्त्याच्या प्रकारानुसार निर्धारीत केलेले शुल्क भरणा करुन घेऊन रस्ता खोदण्याची परवानगी अनुज्ञेय करता येईल.

प्रचलित पध्दतीनुसार संबंधीत कंपनीस/संस्थेस/व्यक्तिस परवानगी देताना मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मंजुरीनंतर उक्त प्रमाणे शुल्काचा भरणा करुन घेऊन खालील अटी/शर्तीचे अधीन राहुन परवानगी देय करता येईल.

अटी/शर्ती :

१. रस्ता खोदकाम करतांना वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी व आवश्यकतेनुसार पोलीस विभाग, वाहतुक शाखा यांची परवानगी प्राप्त करुन काम करावे.
२. खोदकाम करतांना जमिनीखालील व वरील महानगरपालिकेच्या तसेच नागरिकांच्या कोणत्याही सुविधेचे नुकसान होणार नाही याची खबरदारी घ्यावी. नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी संबंधीत कंपनीची राहील. तसेच नुकसान भरपाई करणेसाठी महानगरपालिकेच्या मागणीनुसार आवश्यक ती अतिरिक्त रक्कम त्वरीत भरणा करावी लागेल.
३. रस्ता खोदकामात निघालेली शिल्लक माती, पाणी व इतर साहित्य रस्त्यावर पसरणार नाही व त्यामुळे खोदकामा व्यतिरिक्त रस्ता खराब होणार नाही याची दक्षता घ्यावी.
४. खोदकाम झालेले ट्रेंचेस व्यवस्थीत भरुन घ्यावे व रस्ता पुर्ववत करावा. शिल्लक माती, दगड व इतर सर्व साहित्याची विल्हेवाट संबंधीत अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार योग्य ठिकाणी करावी.
५. प्रस्तावामधील लांबी अथवा प्रस्तावीत केबलचे स्थान/जागे मध्ये फरक झाल्यास अथवा त्यात वाढ झाल्यास कार्यालयास प्रथम सुचीत करावे व आवश्यक परवानगी नंतरच अतिरिक्त काम करावे.
६. प्रत्यक्ष जागेवर खोदकाम करतेवेळी महानगरपालिकेच्या अथवा इतर प्राधिकरणाच्या कोणत्याही विकास कामाचे नुकसान झाल्यास संबंधीत प्राधिकरणाच्या अथवा महानगरपालिकेच्या विकास कामांची दुरुस्ती संबंधीत कंपनीस/संस्थेस/व्यक्तिस स्वखर्चाने करुन देणे अथवा त्यासाठी संबंधीत विभागाने दुरुस्तीबाबत आकारणी केलेल्या रक्कमेचा भरणा करणे संबंधीत कंपनीस बंधनकारक राहील. जर कोणत्याही प्रकारच्या दुरुस्ती विषयक पुर्वमान्यतेची आवश्यकता असल्यास त्यासाठी लागणारे शुल्क संबंधीत विभागाकडे भरणा करुन ती प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत कंपनी/संस्था/व्यक्ति वर बंधनकारक राहील.
७. प्रत्यक्ष काम सुरु करणेपुर्वी सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालयाची आवश्यक परवानगी प्राप्त घेण्यात यावी.
८. शासनाकडुन प्राप्त होणारे या विषयीचे आदेश/निर्देश संबंधीत कंपनी/संस्था/व्यक्ति यांना बंधनकारक राहतील.

९. ऑप्टीकल फायबर केबल ही कायमस्वरुपी रस्त्याचे जागेवर (जमीनीत) राहणार असल्याने त्याबाबतचे वार्षीक भाडे भविष्यात महानगरपालिकने यानुषंगाने घेतलेल्या निर्णयानुसार हा आदेश निर्गमीत केलेल्या तारखेपासुन संबंधीत प्रस्तावधारक कंपनी/संस्थेस जमा करावे लागेल.

१०. सदरची परवानगी ही केवळ शहराचा विकास विचारात घेऊन देण्यात येत आहे. तथापी या विषयी महानगरपालिकेचे धोरण बदलल्यास त्यानुसार परवानगी विषयी पुनर्विचार करण्यात येईल.

११. औरंगाबाद महानगरपालिका प्राधिकरणास वरील अटीचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास वरील प्रमाणे देण्यात आलेली परवानगी रद्द करण्याचा अधिकार महानगरपालिका प्राधिकरणाकडे राहील. त्यास संबंधीत कंपनीची कोणतीही हरकत राहणार नाही.

१२. ज्या ठिकाणी रस्ता ओलांडयायाचा आहे, (Road Crossing) त्या ठिकाणी खोदकाम एच.डी.डी. (Horizontal directional drilling) पध्दतीने करण्यात यावे.

१३. भविष्यामध्ये सदर ठिकाणी महानगरपालिकेच्या विकासकामा दरम्यान खोदकाम करते वेळी अथवा अन्य कारणाने आपल्या कंपनीचे केबल नादुरुस्त झाल्यास कंपनीने स्वखर्चाने दुरुस्त करुन घ्यावे. त्याची जबाबदारी महानगरपालिका घेणार नाही.

१४. प्रत्यक्ष खोदकाम सुरु करणे पुर्वी महानगरपालिकेच्या ज्या विभागामध्ये काम सुरु करणार आहे, त्याबाबत पुर्व कल्पना त्या विभागाचे झोन/उप अभियंता, पाणी पुरवठा अभियंता यांना देण्यात यावी, नंतरच काम सुरु करण्यात यावे.

१५. व्यावसायीक वापराच्या खोदकामासाठी परवानगी देताना प्रती कि.मी. लांबीसाठी रुपये एक लक्ष रक्कमेची बँक गॅरंटी सादर करणे संबंधीतास बंधनकारक राहील.

१६. प्रत्यक्ष काम पुर्ण झाल्यानंतर कामाचे वर्कडन नकाशे कंपनीच्या सक्षम अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने या कार्यालयात सादर करावेत, अन्यथा संबंधीत कंपनीने त्यापोटी या कार्यालयाकडे जमा केलेली बँक गॅरंटी जप्त करण्यात येईल.

१७. संबंधीत कंपनीच्या प्राप्त प्रस्तावामध्ये औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील इतर कार्यालयाच्या अखत्यारीत रस्त्यांवर केबल टाकणे प्रस्तावीत असल्यास, त्या-त्या कार्यालयाची परवानगी त्यांनी परस्पर घेतल्याशिवाय त्या रस्त्यावर खोदकाम करु नये.

१८. ज्या ठिकाणी खोदकामाचे वेळी पेव्हर ब्लॉक काढणे अत्यावश्यक आहे, त्या ठिकाणचे पेव्हर ब्लॉक काम झाल्यानंतर पुन्हा सुस्थितीत बसविण्याची जबाबदारी कंपनीची राहील.

१९. ही परवानगी व्हॉईट टॉपिंग रस्त्यांवर खोदकाम करण्यासाठी ग्राह्य धरता नाही. व्हॉईट टॉपिंग रस्ते व इतर Road Crossing ची कामे करतांना उप/झोन अभियंता यांच्या प्रत्यक्ष उपस्थित मध्ये करावीत.

२०. परवानगीनुसार काम करते वेळी प्रत्यक्ष कामाच्या स्थळी कंपनीचे नांव, कामासंबंधी काही तक्रार नोंदवायाची असल्यास नागरिकांच्या माहितीस्तव संबंधीत जबाबदार अधिकारी, कर्मचारी यांचे नाव, भ्रमणध्वनी क्रमांक, मंजुरी आदेश क्रमांक व दिनांक, काम सुरु केल्याची तारीख व काम पुर्णत्वाची अपेक्षीत तारीख इत्यादी संपुर्ण मजकुर असलेला फलक लावण्यात यावा.

२१. प्रत्यक्ष खोदकाम सुरु करण्यापुर्वी संबंधीत झोन अभियंता यांना लेखी सुचीत करण्यात यावे. परवानगी मधील वरील अटी/शर्तीसह खोदकामाच्या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने Caution tapes, Baricates लावणे अनिवार्य करण्यात येते. रात्रीच्या वेळी खोदकाम झालेल्या Trenches ठिकाणी आवश्यक विद्युत व्यवस्था, Blinckers बसविण्याची व्यवस्था करण्यात यावी. तसेच Trench पुर्ववत होई पर्यंत Baricates काढण्यात येऊ नयेत. दरम्यान या खोदकामामुळे

काही अपघात झाल्यास अथवा कोणतीही हानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत कंपनीची राहील. महानगरपालिका कोणत्याही परिस्थितीमध्ये जबाबदार राहणार नाही.

२२. खोदकाम पावसाळा ऋतू मध्ये कोणतेही खोदकाम करु नये. तद्नंतर काम सुरु करण्यापुर्वी पुन:श्च संबंधीत वार्ड कार्यालयास अवगत करुनच काम सुरु करावे.

२३. प्रकरणी शासन धोरणानुसार जी.एस.टी. लागु असल्यास ती रक्कम परस्पर शासनाकडे जमा करण्याची जबाबदारी अर्जदार कंपनीवर राहील. या विषयी भविष्यात वाद निर्माण झाल्यास तो परस्पर कंपनीने सोडवावा. त्याकरीता औरंगाबाद महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

२४. शहरामधील घोषीत शांतता क्षेत्रामध्ये काम करतांना, शांतता क्षेत्राचे नियम पाळण्यात यावेत. तसेच खोदकामामुळे कोणत्याही स्वरुपाची नैसर्गिक हानी होणार नाही. तसेच वृक्षतोड होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

२५. सदर काम करतांना नागरिकांना त्रास होईल असे कोणतेही कृत्य करु नये. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत कंपनी/संस्था आणि व्यक्ति यांची राहील.

२६. करीता उक्त प्रमाणे रस्ता पुन:स्थापित करण्यासाठीचे शुल्क व निगराणी शुल्काची आकारणी करण्यास व निर्धारीत केलेल्या अटी/शर्तीच्या अधीन राहुन रस्ता खोदकामाची परवानगी अनुज्ञेय करण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 307/2022:-**

प्रस्तावात सविस्तर नमुद (अ), (ब) आणि (क) मधील विविध प्रयोजनार्थ विविध कंपनी/संस्था/व्यक्तिस रस्ता खोदकामासाठी परवानगी अनुज्ञेय करता करताना प्रस्तावीत केल्यानुसार (१) रस्त्याची पुर्नस्थापना (२) फीट चे पुर्नस्थापना (३) एच.डी.डी. पध्दतीने खोदकाम आणि (४) निगराणी शुल्क आकारणीच्या दरास तसेच नमुद विहीत अटी/शर्तीनुसार रस्ता खोदकामाची परवानगी अनुज्ञेय करण्यास मान्यता देण्यात येते. सदर दर पुढील तीन वर्षासाठी लागु राहतील. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 308/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.04.03.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नाविन्यपुर्ण योजनेतून शासकीय कला महाविद्यालय गेट (मीर आदिल दरवाजा) व त्या लगत किलेअर्क तटबंदीची दुरुस्ती व संवर्धन व एका बाजुला खुले व्यासपीठ (Open Stage) करणे बाबत प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव (जिल्हा नियोजन समिती), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यात आला होता. तथापि, यापुर्वी महानगरपालिकेस शहरातील ऐतिहासिक दरवाजांची, तटबंदीची दुरुस्ती व संवर्धन केल्याचा अनुभव असल्याने सदर काम सार्वजनिक बांधकाम विभागाऐवजी महानगरपालिका यंत्रणेमार्फत प्रस्ताव सादर करणे बाबत निर्देश होते.

त्यानुषंगाने विषयांकीत कामाचा प्रस्ताव तयार करुन मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव (जिल्हा नियोजन समिती), यांच्याकडे निधी प्राप्त होणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची तांत्रिक मान्यता प्राप्त असलेले अंदाजपत्रक जिल्हा नियोजन समितीकडे पाठविण्यात आले असता, त्यास मान्यता होऊन र.रु.2,25,69,731/- इतका निधी महानगरपालिकेस वितरीत करण्यात आलेला आहे.

त्यानुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.2,25,69,731/- चा प्रस्ताव व वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना एकुण प्रकल्प किमतीच्या 2% व GST सह दराने शुल्क देणे बाबतच्या सुधारित प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.172/2021 दि.26.07.2021अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार स्थापत्य कामाच्या र.रु.1,51,98,428/- इतक्या रक्कमेची ई-निविदा विभागामार्फत 3 वेळा निविदा मागविण्यात आली असता, निविदाधारक पात्र झाले नसल्याने निविदा अटी व शर्ती अंशत: शिथील करुन पुन्हा निविदा मागविण्यात आल्या असता, निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 02 निविदा दर भरुन प्राप्त झालेल्या आहे. निविदेतील कलम 3.7.4 नुसार QCBS आधारावर अंतिम गुणांकन करुन निविदा अंतिम करणे असल्याने संबंधीत निविदाधारकाकडून त्याबाबतचे सादरीकरण करण्यात आले. प्रसंगी मे.साईप्रेम कन्स्ट्रक्शन यांची उपस्थिती होती. तर दुसरे निविदाधारक मे.गजानन कन्स्ट्रक्शन हे गैरहजर असल्याने

निविदेसोबत सादर केलेल्या तांत्रिक कागदपत्राआधारे गुणांकन करण्यात आले असता, मे.साईप्रेम कन्स्ट्रक्शन यांना जास्त गुण मिळाले आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नाव | निविदेतील दाखल केलेले दर | देकार क्रम |
|---|---|---|---|
| 1. | मे.साईप्रेम कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | L1 |
| 2. | मे.गजराज कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.25% जास्त दराने | L2 |

तरी तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची निविदा L1 निविदाधारक मे.साईप्रेम कन्स्ट्रक्शन यांच्या प्राप्त झालेल्या निविदा दरास प्रशासक तथा आयुक्त यांनी मा.स्थायी समिती समोर सादर करणे बाबत शिफारस केलेली आहे.

त्यानुसार मे.साईप्रेम कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 308/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नाविन्यपुर्ण योजनेअंतर्गत किलेअर्क येथील मीर आदिल दरवाजा व तटबंदीची दुरुस्ती व संवर्धन करणे या कामासाठी सर्वात कमी निविदा दर म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची मे.साईप्रेम कन्स्ट्रक्शन यांच्या निविदा दराच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 309/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.07.03.2022)

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,सद्यस्थितीत वाढत्या वाहन संख्येमुळे व त्यामुळे होणाऱ्या प्रदूषणामुळे पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास होत आहे. या शिवाय पेट्रोल, डिझेल इत्यादी उत्पादनांचा भविष्यात होणाऱ्या तुटवडा तसेच त्यामुळे मोठ्या प्रमाणात होणाऱ्या प्रदूषणामुळे शासन स्तरावर इलेक्ट्रिक वाहनांकरिता प्रोत्साहन देण्यात येत आहे. ऑटोमोबाईल सेक्टरमध्येही मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रिक वाहनांची निर्मिती करणेत येतआहे.

डिझेल/पेट्रोलवर चालणाऱ्या वाहनांमुळे मोठ्या प्रमाणावर कार्बन उत्सर्जन होते. जगातील एकुण कार्बन उत्सर्जनात वाहतूक क्षेत्राचा मोठा वाटा आहे. त्यामुळे जागतीक स्तरावर कार्बन उत्सर्जन कमी करुन निव्वळ कार्बन उत्सर्जन शुन्यावर आणण्याची रेस टु झीरो मोहिम राबविण्यात येत असून, औरंगाबाद शहराचेही निव्वळ कार्बन उत्सर्जन 2050 पर्यंत शुन्यावर आणण्यासाठी मोहिम हाती घेण्यात आली आहे रेस टु झीरो मोहिमध्ये सामिल होणाऱ्या महाराष्ट्रातील पांच शहरांमध्ये औरंगाबादचा समावेश आहे. त्याचा भाग म्हणून औरंगाबाद शहरासाठी हवामान कृती आराखड्यासाठी वर्ल्ड रिसोर्स इन्टिट्युट (WRI) सोबत सामंजस्य करार केला आहे.

महाराष्ट्र शासनाने दि. 30 जुलै , 2021 च्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण 2021 ला मान्यता दिली असून , सदर धोरणाचे व्हिजन पुढील प्रमाणे आहे.

1.शाश्वत आणि प्रदूषणरहित वाहनांचा अंगीकार करणे.
2.राज्य इलेक्ट्रिक वाहनांच्या वापरात देशात अग्रेसर बनविणे.
3.राज्याचे अग्रेसर स्थान भारतातील वाहन उत्पादनात कायम राखणे.

सदर धोरणानुसार 2025 पर्यंत किमान 10% वाहने ही इलेक्ट्रिक वाहने असावी असे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. यामुळे एकुणच कार्बन उत्सर्जन कमी होऊन शहराची Carbon Footprint कमी होणार आहे. त्यामुळे शहराचे एकुण प्रदूषण कमी होऊन नागरिकांना आरोग्यदायी वातावरणाचा लाभ होणार आहे.

अशा प्रकारे मोठ्या प्रमाणावर इलेक्ट्रिक वाहने वापरात येणार असल्यामुळे व या वाहनांना भविष्यात सुरळीत वापरासाठी इलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशनची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता भासणार आहे. एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील (UDCPR) नियम क्रमांक. 4.4.2 (i) च्या तरतुदीच्या अनुषंगाने स्वतंत्र इमारतीच्या परिसरात Fuel Station / इलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशनचा वापर रहिवासी क्षेत्रात अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. त्यामुळे केवळ Fuel Station/ पेट्रोलपंपाच्या ठिकाणी इलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशन दिल्याने नागरिकांची गैरसोय होऊन अनावश्यक गर्दी होईल.

करीता नागरिक ज्या ठिकाणी राहत आहे त्या इमारतीमध्येच इलेक्ट्रिक चार्जिंगची सुविधा दिल्यास नागरिकांसाठी सोईचे होईल व पेट्रोलपंपावरील होणारी गर्दी टाळता येईल व नागरिकांची इलेक्ट्रिक वाहने खरेदी करणे कडील कल वाढेल.

वरील बाबी लक्षात घेता शहर प्रदूषणमुक्त करणे व नागरिकांना त्यांचे निवासाचे जागी व कामाच्या जागी तसेच मार्केटमध्ये चार्जिंगची सुविधा उपलब्ध होणे यासाठी विकासकांना/भूखंड मालकांना इलेक्ट्रिक

चार्जिंग स्टेशनची तरतुद करणे बंधनकारक करण्यासाठी बांधकाम परवानगी देतांनाच असे बंधन घालणे व पुढे नमुद केल्याप्रमाणे इलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशनची संख्या निश्चित करणे योग्य वाटते.

| अ.क्र | इमारतीचा वापर रहिवासी (सदनिका) वाणिज्य/औद्योगिक | चार्जिंग पॉईंटसची संख्या |
|---|---|---|
| 01. | रहिवासी वापर - 25 ते 50 सदनिका | एक |
| 02. | रहिवासी वापर – 50 पेक्षा जास्त प्रत्येक 25 सदनिकांसाठी | एक |
| 03. | पूर्ण वाणिज्य – बांधकाम क्षेत्र 300 ते 500 चौ.मी. | एक |
| 04 | पूर्ण वाणिज्य – बांधकाम क्षेत्र 500.00 चौ.मी. वरील प्रत्येक 250 चौ.मी.क्षेत्रा करीता | दोन |
| 05. | औद्योगिक वापर – प्रत्येक 500 चौ.मी. बांधकाम क्षेत्रासाठी | तीन |

बांधकाम परवानगी देतांना प्रमाणे इलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशनची तरतुद करुन भोगवटा प्रमाणपत्र देतांना ही तरतुद पुर्ण झाली तरच भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येईल. तसेच यापुर्वी बांधकाम परवानगी घेतलेल्या व दि.01 जानेवारी 2023 नंतर पुर्ण होणाऱ्या सर्व इमारतींनाही ही तरतुद लागु करणे योग्य राहील.

**ठराव क्रमांक 309/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरास प्रदुषण मुक्त वातावरण मिळावे म्हणुन तसेच महाराष्ट्र शासनाचे महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण-2021 च्या अंमलबजावणीचा भाग म्हणुन तसेचरेस टु झिरो या मोहिमेस औरंगाबाद शहराचा सहभाग असल्याने भविष्यात शहरात इलेक्ट्रिक वाहनाची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढण्याची शक्यता आहे. अशा प्रकारे इलेक्ट्रिक वाहने वापरणाऱ्याच्या संख्यात वाढ झाल्याने इलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशनची आवश्यकता ही वाढणार आहे. ही बाब लक्षात घेऊन सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येते. व या संदर्भात करावयाच्या पुढील सर्व कार्यवाहीचे अधिकार आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करण्यात येतात. करीता वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 310/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.10-03 2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रस्ताव सादर करण्यात येते की, सर्व आरोग्य केंद्रे रूग्णालया कडून आरोग्य केंद्रे रूग्णालयातील ओपीडी मधील रूग्णांना रूग्णसेवा देण्याकरीता आवश्यक औषधी व कन्झुमेबल इत्यादीची मागणी औषधी भांडाराला प्राप्त झाली आहे. औषधी व कन्झुमेबल खरेदी प्रस्ताव खालील प्रमाणे सादर.

| SN | Item | Approx.Qty | Remark |
|---|---|---|---|
| 1 | Tab Amlodipin 5mg | 4000 | |
| 2 | Tab Atenelol 50mg | 4000 | |
| 3 | Tab Amoxycillin 125mg DT | 40000 | |
| 4 | Tab B Complex (Therapetic) N F I | 150000 | |
| 5 | Tab Calcium Carbonate 1.25 + Vit D3 250 IU | 500000 | |
| 6 | Tab Chlorphenaramuine Maleate 4mg | 700000 | |
| 7 | Tab Ciprofloxacin 250mg | 80000 | |
| 8 | Tab Cefixim 200mg | 50000 | |
| 9 | Tab Dicyclomine 10mg | 50000 | |
| 10 | Tab Digoxin 0.25mg | 300 | |
| 11 | Tab Doxylamine Succinate | 15000 | |
| 12 | Tab Domperidone 10mg MD | 50000 | |
| 13 | Tab Diclofenac Na 50mg | 225000 | |
| 14 | Tab Diazepam 5mg | 200 | |
| 15 | Tab Etophyllin + Theophyllin SR | 4000 | |
| 16 | Tab Flucanazole 150mg | 4000 | |
| 17 | Tab Folic Acid 5mg | 100000 | |
| 18 | Tab Ibuprofen 400mg | 75000 | |
| 19 | Tab Iso sorbide di nitrate 5mg | 1500 | |
| 20 | Tab Iso sorbide di nitrate 10mg | 1500 | |

प्रशासक शाखा कार्यालय
प्रकीर्ण व उपाय
दि 30.05.202' से 239 3 2022

| | | | |
|---|---|---|---|
| 21 | Tab Isosuprine 10mg | 5000 | |
| 22 | Tab Metformin 500mg + Glimipride 1mg | 2000 | |
| 23 | Tab Metronidazole 400mg | 75000 | |
| 24 | Tab Methyl dopa 250mg | 1400 | |
| 25 | Tab Metaclopromide 10mg | 5000 | |
| 26 | Tab Misoprostol 200mcg | 3500 | |
| 27 | Tab Methyl Ergo Metrine | 5500 | |
| 28 | Tab Norfloxacin 400mg | 75000 | |
| 29 | Tab Nefidepin 5mg | 5000 | |
| 30 | Tab Oflaxacin 200mg | 30000 | |
| 31 | Tab Ondansetron 4mg | 35000 | |
| 32 | Tab Ranitidine + Domperidone | 50000 | |
| 33 | Tab Salbutamol 4mg | 4000 | |
| 34 | Tab Tramadol 50mg | 10000 | |
| 35 | Tab Thyroxin Na 50mcg | 1000 | |
| | **Syrups** | | |
| 36 | Syrup Antacid 170.ml Each 5 ml Contains Aluminium Hydroxide 250 mg + Magnesium Hydroxide 250 mg+ Dimethicone 50mg | 2000 | |
| 37 | Sy Ampicillin 125mg/5ml. 60ml | 200 | |
| 38 | Sy Amoxycillin 125 mg/5ml. 60ml Bottle | 8000 | |
| 39 | Sy Calcium with Phosphate 200ml | 5000 | |
| 40 | Cough Expectorant 100ml each 5ml contains Diphenhydramine hydrochloride 15 mg (ip) + Ammonium Chloride 150 mg (IP) + Ammonium Chloride 150 mg (IP)+ Sodium Citrate IP - 60MG + Menthol -1 | 125000 | |
| 41 | Sy Domperidon 30ml | 8000 | |
| 42 | Sy Ferrous Sulphate 20mg + Folic Acid 100mcg. 100ml | 1000 | |
| 43 | Sy Ibuprofen 100mg/5ml. 60ml | 2000 | |
| 44 | Sy Lactulouse solution containing Lactulose 667mg / ml (10g/15ml) | 100 | |
| 45 | Syrup Laxative 225ml Each 15ml contains . Liquid Paraffin 3075ml, Milk of Mgnesia 11.25ml | 500 | |
| 46 | Susp Metronidazole 50ml | 8000 | |
| 47 | Sy Promethazine 60ml | 1500 | |
| 48 | Sy Zinc sulphate or Gluconate 50ml | 5000 | |
| | **Capsules** | | |
| 49 | Cap Ampicillin 250mg | 10000 | |
| 50 | Cap Amoxycillin 250mg | 100000 | |
| 51 | Cap Omeprazole 20mg | 100000 | |
| 52 | Cap Rabiprazole 20 + Domperidone 30mg | 100000 | |
| | **Powders** | | |
| 53 | Dextrose Powder 100gm | 8000 | |
| | **Injections** | | |
| 54 | Inj Adrenaline 1mg/ml. 1ml Ampoule | 400 | |
| 55 | Inj Aminophyllin - 25mg/ml. 10ml Ampoule | 50 | |
| 56 | Inj Betamethasone 1ml Amp | 50 | |
| 57 | inj Calcium Gluconate 10mg 10ml Ampoule | 200 | |

प्रशासक पावा कार्यकाळ
प्रस्ताव व ठराव
दि 30.09.2021 ते दि 3 3 2022

| | | | |
|---|---|---|---|
| 58 | Inj Carboprost 250mcg 2ml | 215 | |
| 59 | Inj Dopamine 200mg /5ml Ampoule | 100 | |
| 60 | Inj Digoxin 0.5mg | 15 | |
| 61 | Inj Diclofenac Na 25mg/ml 3ml Amp | 2000 | |
| 62 | Inj Diazepam 2ml | 25 | |
| 63 | Inj Drotaverine HCL 40mg 2ml (Drotin) | 420 | |
| 64 | Inj Etophyllin + Theophyllin | 100 | |
| 65 | Inj Frusemide 10ml/ml 2ml Ampoule | 200 | |
| 66 | Inj Gentamycin 2ml | 350 | |
| 67 | Inj Hydrocortisone Sodium Succinate 100mg per vial | 500 | |
| 68 | Inj Metaclopromide 10mg/2ml Ampoule | 200 | |
| 69 | Inj Magenesium sulphate 50% w/v - 2ml i.e. Each ml contain 500mg magnesuim sulphate per ml | 200 | |
| 70 | Inj Methyl Ergometrine Amp | 1250 | |
| 71 | Inj Midozalom 5mg/ml 10ml vial | 200 | |
| 72 | Inj Ondansetron k4mg/2ml Ampoule | 700 | |
| 73 | Inj Oxytocin 1ml | 2500 | |
| 74 | Inj Pheniramine Maleate 22.75/ml 2ml Amp | 200 | |
| 75 | Inj Potassium Chloride 150mg/ml 10ml Amp | 200 | |
| 76 | Inj Ranitidine 2ml | 150 | |
| 77 | Inj Sodium Bi Carbonate 75mg/vial | 200 | |
| 78 | Inj Tranexamic Acid 5ml (Pause) | 50 | |
| 79 | Inj Vit K 3 1ml | 1100 | |
| 80 | Inj Valathamate Bromide 8mg Amp | 400 | |
| 81 | Inj Anti D Immunoglobulin Mono / Polyclonal | 10 | |
| | **I V Fluids** | | |
| 82 | I V Dextrose 5% 500ml | 1500 | |
| 83 | I V Dextrose 10% 500ml | 100 | |
| 84 | I V Dextrose 25% 100ml | 700 | |
| 85 | I V Dextrose with Normal Saline 500ml | 1000 | |
| 86 | I V Normal Saline 500ml | 2000 | |
| 87 | I V Metronidazole 100ml | 800 | |
| | **Nasal Drops** | | |
| 88 | Saline nasal drop 10ml | 3000 | |
| | **Eye Drops** | | |
| 89 | Ciprofloxacin 0.3% w/v Eye Drop (5ml.Vial) | 2000 | |
| | **Ear Drops** | | |
| 90 | Ear drops Paradichlorobenzene 2% + chlorbutanol 5% + benzocaine 2.7%+turpentine oil 15% 10ml | 2000 | |
| 91 | Ear drops Clotrimazole drops 10ml | 2000 | |
| | **Mouth Paint** | | |
| 92 | Mouth Paint Clotrimazole 1% w/v - 15 ml | 2000 | |
| | **Ointments / Creams / Gels** | | |
| 93 | Cream Clotrimazole 1% w/w 15 gm | 4000 | |
| 94 | Cream Miconazole 2% w/w 15 gm | 4000 | |
| 95 | Oint Povidone Iodine 5% w/w 15 gm | 6000 | |
| 96 | Cream Permethrine 5% w/w 30 gm | 2000 | |

| | | | |
|---|---|---|---|
| 97 | Cream Framycetin skin 1 % w/w 100 gm | 800 | |
| 98 | Cream Silver sulphadiazine 1% w/w 250 gm | 400 | |
| 99 | Gel Diclofenac 1% w/w, 30gm | 5000 | |
| | **Antiseptic Solutions, Disinfectants** | | |
| 100 | Solution Povidone-iodine 7.5% w/v 500ml | 100 | |
| 101 | Solution Hydrogen Peroxide 20 volume 6% w/v 500 ml | 100 | |
| 102 | Sol Sodium Hypochlorite 5000ml | 500 | |
| 103 | Surgical Spirit | 200 | |
| 104 | Glycerin 500 ml Glass Bottle | 50 | |
| 105 | Liquid Paraffin 500ml | 20 | |
| | **Dressing Materials** | | |
| 106 | Ab Cotton 500gm | 1000 | |
| 107 | Ab Gauze Cloth 90cm x 18 mtr | 1500 | |
| 108 | Bandage Cloth as per schedule F-II than 100cm x 20 mtr | 200 | |
| 109 | Rolled Cotton Bandage as per schedule F - II 7.5cm x 4mtr | 2000 | |
| 110 | Rolled Cotton Bandage as per schedule F - II 10cm x 4mtr | 2000 | |
| 111 | Adhesive tape Cloth Based Roll of 5cmx 4Mtr | 300 | |
| 112 | Sticking Micropore 2" x 5 mtr (Box of 6 Roll) | 200 | |
| | **Passaries** | | |
| 113 | Vaginal Pessaries Clotrimazole with applicator 100mg | 3000 | |
| | **Disposable Items** | | |
| 114 | Plastic Apron | 500 | |
| 115 | Spirit Swab | 100000 | |
| 116 | Cord Clamp disposable | 825 | |
| | **Gloves** | | |
| 117 | Surgical Gloves No 6.5 | 20000 | |
| 118 | Surgical Gloves No 7 | 20000 | |
| 119 | Surgical Gloves No 7.5 | 10000 | |
| 120 | Makintosh Double Colour Water Proof Rubber Width 90cm Roll of 12 Meter | 100 | |
| 121 | Mucus Sucker | 100 | |

उपरोक्त बाबींचे ई-निविदा पेक्षा कार्यालयात उपलब्ध नसुन त्याकरीता साधारण अंदाजे रक्कम रुपये 47,23,802/- (रुपये सत्तेचाळीस लक्ष तेवीस हजार आठशे दोन रुपये फक्त) खर्च अपेक्षित राहिल.

प्रस्तावित खरेदीचा खर्च सन 2021-2022 च्या अर्थ संकल्पामधील लेखाशिर्ष क 3 सार्वजनिक दवाखाने औषध खरेदी/साहित्य खरेदी पृष्ठ क्रमांक E - 31 सांकेतांक क्रमांक 62125320002 तरतुद रु 60 लक्ष.

या लेखाशिर्षातुन करणेबाबत प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

करीता उपरोक्त प्रस्तावित नुसार औषधी व कन्झुमेबल इत्यादींची खरेदी करणेसाठी अंदाजित अपेक्षित खर्च साधारण अंदाजे रक्कम रुपये 47,23,802/- (रुपये सत्तेचाळीस लक्ष तेवीस हजार आठशे दोन रुपये फक्त) करीता ई निविदा प्रक्रिया राबविणे करीता मा. स्थायी समितीच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव क्रमांक 310/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार औषधी व कन्झुमेबल इत्यादीची आवश्यक खरेदी करणेसाठी अंदाजित अपेक्षित खर्च रूपये 47,23,802/- (रूपये सत्तेचाळीस लक्ष तेविस हजार आठशे दोन रूपये फक्त) करीता ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व सदरील खर्च सार्वजनिक दवाखाने औषध खरेदी/साहित्य खरेदी, गृष्ठ क्रमांक E-31 सांकेतांक क्रमांक 0212S320002 यामधुन भागविण्या करीता मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 311/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि. 14.03.2022)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 79 (क) नुसार आयुक्त महानगरपालिका प्रस्ताव सादर करीता आहेत की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे संत एकनाथ रंगमंदिर, उस्मानपुरा याचे नुतनीकरण झाले असून ध्वनी प्रणाली, विद्युतीकरण, वातानुकूलीत व्यवस्था, आसन व्यवस्था इ. चे आधुनिकीकरण झाले आहे. या सर्व बाबी चे जतन,चालविणे, देखभाल दुरुस्ती स्वच्छता इ. करणे करीता महानगरपालिकेकडे कुशल मनुष्य बळ उपलब्ध नाही. या करीता सदरील रंगमंदिर, कॅन्टीन, वाहनतळ, विश्रामगृहाची काळजी घेण्यासाठी (Care Taker) या क्षेत्राची जाण असणाऱ्या व्यक्ती/संस्थेस ई-निविदेद्वारे संत एकनाथ रंगमंदिर संचलीत करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येतो. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 311/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे संत एकनाथ रंगमंदिर, उस्मानपुरा याचे नुतनीकरण झाले असून ध्वनी प्रणाली, विद्युतीकरण, वातानुकूलीत व्यवस्था, आसन व्यवस्था इ. चे आधुनिकीकरण झाले आहे. या सर्व बाबी चे जतन,चालविणे, देखभाल दुरुस्ती स्वच्छता इ. करणे करीता महानगरपालिकेकडे कुशल मनुष्य बळ उपलब्ध नाही. या करीता सदरील रंगमंदिर, कॅन्टीन, वाहनतळ, विश्रामगृहाची काळजी घेण्यासाठी (Care Taker) या क्षेत्राची जाण असणाऱ्या व्यक्ती/संस्थेद्वारे संत एकनाथ रंगमंदिर संचलीत करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 312/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.14.03.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो कि, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे संत एकनाथ रंगमंदिर, उस्मानपुरा याचे नुतनीकरण झाले असुन ध्वनी प्रणाली, विद्युतीकरण, वातानुकुलीत व्यवस्था, आसन व्यवस्था इ. चे आधुनीकीकरण झाले आहे. या सर्व बाबी चे जतन, चालवणे, देखभाल दुरुस्ती स्वच्छता इ. करणे करीता महानगरपालिकेकडे कुशल मनुष्य बळ उपलब्ध नाही. या करीता सदरील रंगमंदीर, कॅन्टीन, वाहनतळ, विश्रामगृहाची काळजी घेण्यासाठी (Care Taker) या क्षेत्राची जाण असणा-या व्यक्ती/संस्थेव्दारे संत एकनाथ रंगमंदीर संचलीत करणेचा ठराव क्र. दि. अन्वये मान्यता आहे. सदरील प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत महानगरपालिकेतर्फे सदरचे रंगमंदीर चालविण्या साठी अटी शर्ती, कार्यक्रमाचे दर आणि कार्यक्रम चालविण्याऱ्या व्यक्तिकरीता प्रस्ताव सादर करण्यात येतो.

**संत एकनाथ रंग मंदिर नियमावली.**

1. संत एकनाथ रंगमंदिर मध्ये एकूण 751 आसने आहेत. त्यातील आसनांची वर्गवारी पुढील प्रमाणे आहे. मुख्य प्रेक्षागृहात 517 व बाल्कनीत 234 आसने आहेत. मुख्य प्रेक्षागृहात रांग क्र.01 मधील दोन आसने परिनिरीक्षक मंडळ सदस्यांसाठी आणि रांग क्र.02 मधील आठ आसने व रांग क्र.03 मधील पाच आसने महानगरपालिकेसाठी कायमस्वरुपी राखीव ठेवण्यात येतील. कोणत्याही परिस्थितीत सदर राखीव आसनांची तिकीट विक्री करता येणार नाही.उर्वरीत 736 आसने तिकीटां करीता उपलब्ध राहतील.
2. महानगरपालिकेला प्रयोगासाठी रंगमंदिर राखीव ठेवण्याचा अधिकार राहिल. सदरचे रंगमंदिर वातानुकुलित आहे. परंतु विदयुतप्रवाह खंडित झाल्यास उपलब्धतेनुसार विदयुत जेनेत्राचे सहाय्याने इतर विदयुत व्यवस्था चालविली जाईल. परंतु वातानुकुलित व्यवस्था कार्यरत राहणार नाही. त्यासाठी भाडे रक्कमेमध्ये कोणतीही सवलत मिळणार नाही. तसेच विदयुत जेनेत्रासाठी लागणारे डिजेल आयोजक स्वखर्चाने उपलब्ध करुन देईल.

3. विद्युत देयकापोटी प्रति युनिट साठी रक्कम रु.16३/- अनामत रकमेतुन कपात करण्यात येईल.
4. रंगमंदिराची भाडे व अनामत रक्कम आकारणी पुढीलप्रमाणे राहील.

| कार्यक्रमाचा दर तक्ता | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | विवरण | भाडे रक्कम रु (एका सत्रा साठी) | अनामत रक्कम रु (एका सत्रासाठी) |
| 1. | नाटक | रु. 20,000/- | रु. 25,000/- |
| 2. | शालेय कार्यक्रम / बक्षीस वितरण | रु. 15,000/- | रु. 25,000/- |
| 3. | शास्त्रीय गायन/शास्त्रीय नृत्य/सभा संमेलने/परिषद/चित्रीकरण/जादुचे प्रयोग /सांस्कृतिक व इतर कार्यक्रमासाठी | रु. 25,000/- | रु. 25,000/- |
| 4. | रंगीत तालीम (शालेय कार्यक्रमासाठी) | रु. 5,000/- | रु. 10,000/- |
| 5. | लावणी | रु.30,000/- | रु. 50,000/- |
| | जी.एस.टी. 18 टक्के भाडे रकमेव्यतीरीक्त आकारण्यात येईल. | | |

शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी प्रयोग केल्यास रु.2,000/- दर जादा आकार पडेल.

5. विशिष्ठ कार्यक्रमास भाडे रकमेत सुट देण्याचा अधिकार मा.आयुक्त महानगरपालिका यांना राहिल.
6. लावणी, ऑर्केस्ट्रा, मनोरंजन स्नेहसंमेलने, मेळावे तसेच व्यवस्थापकांना वाटेल अशा कार्यक्रमास आयोजकाने प्रत्येक सत्रासाठी भाडे रक्कमेच्या 100 टक्के रक्कमेइतकी जादा अनामत रक्कम भरावी.
7. अनामत रक्कम भरली आहे म्हणुन आरक्षण देणे बंधनकारक असणार नाही. उपलब्धतेनुसार आरक्षण दिले जाईल. प्रयोगानंतर नुकसानीचा आढावा घेवून अनामत रक्कम परत केली जाईल. अनामत रकमेवर कुठल्याही प्रकारे व्याज मिळणार नाही. अनामत रक्कम 15 दिवसात मिळेल. अनामत रक्कमेची मागणी एक वर्ष न केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
8. रंगमंदिराचा वापर सकाळी 09 ते रात्री 12 वाजेपर्यंत करता येईल. या कालावधीत तीन प्रयोग खालील वेळेत होऊ शकतील.

| | |
|---|---|
| सकाळचा प्रयोग | 09 ते 01 |
| दुपारचा प्रयोग | 03 ते 07 |
| रात्रीचा प्रयोग | 08 ते 12 |

9. माईक सिस्टीम उपलब्ध करुन देण्यात येईल आणि ध्वनी प्रणाली महानगरपालिकेच्या कर्मचा-या मार्फत चालवली जाईल.
10. साधारणपणे प्रयोग सुरु होण्याच्या अर्धा तास आधी नाट्यमंदिर आयोजकास उपलब्ध होईल. ठरवून दिलेल्या वेळेत प्रयोग संपन्न करण्याची जबाबदारी आयोजकावर राहील. प्रयोग वेळेवर न संपविल्यास प्रयोग बंद करण्याचा अधिकार व्यवस्थापकास राहील. आरक्षीत केलेल्या वेळे व्यतिरीक्त एक तासापेक्षा जास्त वेळ प्रयोग चालल्यास प्रति तासासाठी रक्कम रु.3,000/- ची कपात अनामत रक्कमेतुन केली जाईल. प्रयोग दोन तासांनंतरही चालू असेल तर पुढीलसत्राचे भाडे रक्कम आयोजकास भरावी लागेल. पुढील सत्राचे आरक्षण असल्यास प्रयोग बंद करण्याचा अधिकार व्यवस्थाकास राहील. प्रयोग रात्री 12 वाजेपर्यंत संपन्न करण्याची जबाबदारी आयोजकावर राहील
11. रंगमंदिरात होणा-या प्रयोगामुळे कोणाचा हक्कभंग झाला किंवा कायदेशीर गुंतागुंत झाल्यास त्याची जबाबदारी आयोजकावर राहील.
12. प्रयोगाचे पुर्ण भाडे व अनामत रक्कम भरल्याशिवाय प्रयोगाची आगाऊ तिकीट विक्रीस परवानगी दिली जाणार नाही. प्रयोगापूर्वी चार दिवस आधी सकाळी 09 ते 12 व दुपारी 05 ते 08 आणि प्रयोगाच्या दिवशी पूर्ण दिवस तिकीट विक्री करता देण्यात येईल. तिकीट विक्रीसाठी आयोजक

जास्तीत जास्त दर रक्कम रु.1,000/- पर्यंत घेतील. त्यापेक्षा जास्त दर आकारणी करता येणार नाही. काम नियमानुसार सुरु आहे किंवा असे हे पाहण्याचा अधिकार व्यवस्थापकांना राहील. त्यांनी वेळोवेळी केलेल्या सुचना आयोजकास बंधनकारक राहील.

13. अर्जदारास भाडे व अनामत रक्कम आरक्षणाच्या वेळीच भरावे लागेल. जर व्यवस्थापनाने तारीख रद्द केली तर अनामत रक्कम परत करण्यात येईल. व्यवस्थापकाने दिलेली तारीख आपसात अदला बदल करता येणार नाही. अर्जदारास दुसरी तारीख/सत्र आरक्षण करणेसाठी वेगळे भाडे व अनामत रक्कम भरणा करावी लागेल.

14. अर्जदाराने आरक्षीत केलेली तारीख/सत्र काही कारणामुळे रद्द करावी लागल्यास किंवा बदलल्यास भाडे व अनामत रक्कमेचा खालीलप्रमाणे परतावा केला जाईल.

| अ.क्र. | आरक्षण रद्द करण्याचा कालावधी | परताव्याची रक्कम | |
|---|---|---|---|
| | | भाडे | अनामत |
| 1. | प्रयोगापुर्वी 60 दिवस अगोदर कळविल्यास | 90 टक्के | पूर्ण |
| 2. | प्रयोगापुर्वी 45 दिवस अगोदर कळविल्यास | 80 टक्के | पूर्ण |
| 3. | प्रयोगापुर्वी 30 दिवस अगोदर कळविल्यास | 70 टक्के | पूर्ण |
| 4. | प्रयोगापुर्वी 15 दिवस अगोदर कळविल्यास | 50 टक्के | पूर्ण |

प्रयोगाच्या दिनांकापासून 15 दिवसा पुर्वी प्रयोग रद्द झाल्याचे न कळविल्यास भाडे रक्कम पुर्ण कपात करण्यात येईल. कोणत्याही सबबींवर भाडे रक्कम परत मिळणार नाही व केवळ अनामत रक्कमेचा परतावा करण्यात येईल.

15. प्रयोगासंदर्भात सर्व श्रमिक कायदे व शासकिय नियमांचे पालन करण्याची जबाबदारी अर्जदारांवर राहील. प्रयोग सुरु होण्यापुर्वी पोलीस कार्यालयाचे नाहरकत व ध्वनिक्षेपन परवाना, भाडे व अनामत रक्कम भरणा केलेली पावती व इतर आवश्यक प्रमाणपत्रे व्यवस्थापकांना दाखविणे सक्तीचे आहे.

16. आयोजकास प्रयोगाचे कालावधीत रंगमंदिर, रंगपट, कलादालन (आरक्षण केल्यास) संबंधीत मार्ग वापरता येईल. प्रयोगाच्या वेळी संबंधीत व्यक्तीशिवाय इतर व्यक्तीस प्रवेश दिला जाणार नाही. प्रयोग कालावधीत मा.आयुक्त यांनी प्राधीकृत केलेला अधिकारी व व्यस्थापक यांना कोणत्याही भागास भेट देता येईल. यास आयोजकास प्रतिबंध करता येणार नाही.

17. प्रयोगाच्या वेळी गोंधळ होणार नाही याची खबरदारी आयोजक यांनी घ्यावी. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची जबाबदारी आयोजक यांची राहील. त्यामुळे मालमत्तेचे नुकसान झाल्यास नुकसान भरपाई साठी बाजार भाव प्रमाणे/महानरगपालिकाचे दर पत्रकातील दरासह 20 टक्के जादा रक्कम दंड स्वरुपात आकारण्यात येईल. सदर रक्कम अनामत रक्कमेतून कपात करण्यात येईल.

18. प्रयोग कालावधीत रंगपटात थुंकणे, धुम्रपान करणे किंवा आक्षेपार्ह वर्तन करण्यास मज्जाव राहील. अशा वर्तवणूक करणा-यांस र.रु.500/- प्रतीव्यक्ती प्रमाणे दर आकारण्यात येईल व संबंधीतास नाट्यमंदिराबाहेर काढण्याचा अधिकार व्यवस्थापकास राहील.

19. आयोजकाने कागदी कचरा होणारे चमकी, फटाके अथवा शोभेचे फटाके स्प्रे स्टेजवर व परिसरात उडवू नये. तसेच नाट्यगृह परिसरात बॅनर/पोस्टर/स्टीकर चिटकवून विद्रुपीकरण करु नये.

20. प्रत्येक कार्यक्रमाकरिता व्दारपाल व्यवस्था आयोजकास करावी लागेल.

21. आठ दिवसापेक्षा भाडे रकमेच्या व्यतिरिक्त इतर कुठलीही थकबाकी असल्यास पुढील आरक्षण दिले जाणार नाही.

22. शासनाने वेळोवेळी कोवीड-19 बाबत दिलेले आदेश/निर्देशाचे पालन आयोजकाने करणे बंधनकारक राहील.

23. वरील सर्व नियम व अटी आयोजकास बंधनकारक राहतील. उक्त अटी शर्तीचे पालन न झाल्यास अनामत रक्कमेतून रक्कम रु 5,000/- ची कपात करण्यात येईल.

प्रशासकीय प्रस्ताव कार्यालय
प्रस्ताव व ठराव
दि.30.04.2021 ते दि.31.3.2022

24. सदरच्या नियमांत भर टाकणे व बदल करणे साठी कोणतीही पूर्वसुचना न देता बदल करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना राहील.
करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 312/2022:-**

प्रस्तावा मध्ये दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे संत एकनाथ रंगमंदिर, उस्मानपुरा याचे नुतनीकरण झाले असुन, ध्वनी प्रणाली, विद्युतीकरण, वातानुकुलीत व्यवस्था, आसन व्यवस्था इ. चे आधुनीकीकरण झाले आहे. या सर्व बाबी चे जतन, चालवणे, देखभाल, दुरुस्ती स्वच्छता इ. करणे करीता महानगरपालिकेकडे कुशल मनुष्य बळ उपलब्ध नाही. या करीता सदरील रंगमंदीर, कॅन्टीन, वाहनतळ, विश्रामगृहाची काळजी घेण्यासाठी (Care Taker) या क्षेत्राची जाण असणा-या व्यक्ती/संस्थेव्दारे संत एकनाथ रंगमंदिर संचलीत करणेचा तरीच सदरील प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत महानगरपालिके तर्फे सदरचे रंगमंदीर चालवण्यासाठीचे दर पुढीलप्रमाणे प्रमाणे.

| अ.क्र. | विवरण | भाडे रक्कम रु (एका सत्रासाठी) | अनामत रक्कम रु (एका सत्रासाठी) |
|---|---|---|---|
| 1. | नाटक | रु. 20,000/- | रु. 25,000/- |
| 2. | शालेय कार्यक्रम /बक्षीस वितरण | रु. 15,000/- | रु. 25,000/- |
| 3. | शास्त्रीय गायन/शास्त्रीय नृत्य/सभा संमेलने/परिषद/चित्रीकरण/जादुचे प्रयोग/सांस्कृतिक व इतर कार्यक्रमा साठी | रु. 25,000/- | रु. 25,000/- |
| 4. | रंगीत तालीम (शालेय कार्यक्रमासाठी) | रु. 5,000/- | रु. 10,000/- |
| 5. | लावणी | रु.30,000/- | रु. 50,000/- |
| | जी.एस.टी. 18 टक्के भाडे रकमेव्यतीरीक्त आकारण्यात येईल. | | |

उपरोक्त दरास, अटी शर्ती, नियमावलीचा प्रस्तावप्रस्तावीत केल्या प्रमाणे मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 313/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.15.03.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत शहराला पाणी पुरवठा करणारी 700 मीमी व्यासाची मुख्य जलवाहीनी सन 1975 साली टाकण्यात आलेली आहे. यावेळी या जलवाहीनीवर विविध ठिकाणी जायकवाडी उद्भव ते फारोळा जलशुध्दीकरण केंद्र दरम्यान स्कावर व्हॉल्व व सेक्शनिंग व्हॉल्व बसविण्यात आलेले आहेत. जलवाहीनी टाकून 40 वर्षापेक्षा जास्त दिवस झालेले असल्याने अस्तित्वातील सेक्शनींग व्हॉल्व ना दुरुस्त आहेत. त्याचप्रमाणे स्कावर व्हॉल्व देखील जमीनीच्या खाली गेलेले आहेत. यामुळे जलवाहीनीची दुरुस्ती करताना सुमारे 20 ते 22 किमी अंतरासाठी जलवाहीनी रिकामी करावी लागते. यामुळे जलवाहीनीच्या देखभाल दुरुस्तीस वेळ लागतो. तसेच मोठ्या प्रमाणावर पाणी व्यय देखील होतो. या जलवाहीनीवर ठराविक अंतरावर सेक्शनींग व्हॉल्व बसविल्यास देखभाल दुरुस्तीसाठी लागणारा वेळ देखील कमी करता येवू शकते तसेच जलवाहीनी रिकामी करण्यासाठी होणारा पाणी व्यय व जलवाहीनी पुन्हा भरण्यासाठी लागणारा अतिरिक्त वेळ टाळता येवू शकते यासाठी अत्यंत आवश्यक ठिकाणी सेक्शनिंग व स्कावर व्हॉल्व बसविणे गरजेचे आहे.

मजिप्रा मंडळाच्या दरसुचितील दर व नामांकीत कंपन्याचे दर यात मोठी तफावत असल्यामुळे यापुर्वी घेतलेल्या सक्षम मान्यतेअंती सलग्नीत कंपन्यांकडून मागवी मागविलेल्या दरानुसार व मजिप्रा मंडळाच्या सन 2019 2020 च्या दरसुचिनुसार तयार करण्यात आलेले असून अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 49,43,902/-इतकी आहे. सदरील कामाचा खर्च 15 व्या वित्त आयोगातून पाणी पुरवठा विषयक सुधारणा करण्यासाठी प्राप्त निधितून प्रस्तावीत करण्यात

प्रशासक तथा कार्यकाळ
प्रस्ताव व ठराव
दि 30.09.2021 ते दि. 31_3_2022

आलेला आहे. सदरील अंदाजपत्रकास मा. सर्व साधारण सभा विषय क्र. 20/2021 अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

सदरील कामाची ई-निविदा कार्यवाही केली असता निविदा कार्यवाहीचा तपशील खालीलप्रमाणे

**संदर्भ** : टेंडर आय.डी.क्र. 2021_AMCA_746478_1

| अ.क्र. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग) |
|---|---|---|
| 1. | कामाचे स्वरुप / कामाचे नाव | औरंगाबाद पाणी पुरवठा योजना - 15 व्या वित्त आयोगातून करावयाची कामे - 700 मीमी व्यासाच्या मुख्य जलवाहिनीवर जायकवाडी उद्भव ते नक्षत्रवाडी साठवण टाकी पर्यंत विविध ठिकाणी 700 मीमी व्यासाचे व 300 मीमी व्यासाचे व्हॉल्व बसविणे. |
| 2 | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव. | होय. रु. 49,43,302/-मा. सर्व साधारण सभा विषय क्र. 20/2021 |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स/निविदा मागविण्यात आली. | रु. 43,15,296/ |
| 3. | ज्या वृत्तपत्रांत निविदेची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | "ई निविदा मार्फत" 13.12.2021 |
| 4. | अ) निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत | 29.12.2021 |
| | ब) निविदा उघडण्याचा दिनांक | 31.12.2021 |
| 5. | निविदा किती वेळेस मागविल्या? | एक वेळेस |
| 6. | एकुण किती निविदा आल्या? | दोन |
| 7. | निविदा प्राप्त दर | अं.प. दराने |

त्यापैकी पात्र निविदाधारकाची माहिती खालील प्रमाणे

| अ. क्र. | गुत्तेदारचे नाव व पत्ता | दाखल निविदा रक्कम | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 1. | तिरुपती इलेक्ट्रीकल सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस | 43,15,295/- | अं.प. दराने |

| | | |
|---|---|---|
| 8. | सर्वात कमी रक्कमेच्या निविदेची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या निविदेची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमूद करावीत. | नाही |
| 9. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते नमुद करावे. | 15 वे वित्त आयोगातून प्राप्त निधी |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 10. | सदरचे काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा केली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर पान क्रमांक द्यावा) | लागु नाही |

| | | |
|---|---|---|
| 11. | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषयपत्राचा नमुना जोडला आहे? | होय |

तरी विषयांकित काम तिरुपती इलेक्ट्रीकल सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांचेकडून मान्यतेनुसार अंदाजपत्रकीय दराने व रक्कम 43,15,295/- किंमतीची निविदा मान्यतेस्तव व करार करण्यास मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 313/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत औरंगाबाद पाणी पुरवठा योजना-15 व्या वित्त आयोगातून करावयाची कामे-700 मी.मी.व्यासाच्या मुख्य जलवाहीनीवर जायकवाडी उद्‌भव ते नक्षत्रवाडी साठवण टाकी पर्यंत विविध ठिकाणी 700 मी.मी.व्यासाचे व 300 मी.मी. व्यासाचे व्हॉल्व बसविणे. या कामाची तिरुपती इलेक्ट्रीकल सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांची अंदाजपत्रकीय दराची व रु.43,15,295/- खर्चाची निविदा मंजूर करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 314/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.15.03.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत असलेल्या 700 व 1219 मीमी व्यासाच्या जलवाहीन्यांवर जायकवाडी उद्‌भव ते नक्षत्रवाडी दरम्यान जलवाहीनीच्या सुरक्षितत्तेकरीता ठराविक अंतरावर एअर व्हॉल्व बसविण्यात आलेले आहेत. पैठण रस्त्यालगत मोठ्या प्रमाणावर नागरीकीकरण झाल्याने व बहुतांश ठिकाणी पाण्याची व्यवस्था नसल्याने या दोन्ही मुख्य जलवाहीन्यांवर असलेले अस्तित्वातील एअर व्हॉल्वला नागरीकांनी हानी पोहचवून नागरीकांनी गळती केलेले आहेत. सदरील एअर व्हॉल्वच्या दुरुस्तीकरीता प्रसंगी खंडणकाळ देखील घ्यावा लागतो. यामुळे वितरण प्रणालीत अडचण निर्माण होते. अस्तित्वातील एअर व्हॉल्व हे जुन्या पध्दतीचे असल्याने या एअर व्हॉल्वला हानी पोहचवणे सोपे आहे. सद्यस्थितीत बाजारात टॅपर प्रुफ एअर व्हॉल्व व ग्लॅन्डलेस स्लुस व्हॉल्व उपलब्ध आहेत. या एअर व्हॉल्व व स्लुस व्हॉल्वला हानी पोहचवता येत नाही. यामुळे अस्तित्वातील गळतीच्या ठिकाणी वरील व्हॉल्व बसविल्यास पाणी गळती कमी होवून जलवाहीनीची सुरक्षितता देखील राखू शकते. यासाठी अत्यंत आवश्यक ठिकाणी वर नमुद व्हॉल्व बसविणे गरजेचे आहे.

मजिप्रा मंडळाच्या दरसुचितील दर व नामांकीत कंपन्यांचे दर यात मोठी तफावत असल्यामुळे यापुर्वी घेतलेल्या सक्षम मान्यतेअंती उत्पादीत कंपन्यांकडून यापुर्वी मागविलेल्या दरानुसार तयार करण्यात आलेले असून अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 31,40,281/- इतकी आहे. सदरील कामाचा खर्च 15 व्या वित्त आयोगातून पाणी पुरवठा विषयक सुधारणा करण्यासाठी प्राप्त निधितून प्रस्तावीत करण्यात आलेला आहे. सदरील अंदाजपत्रकास मा. सर्व साधारण सभा विषय क्र. 207/2021 अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

सदरील कामाची ई-निविदा कार्यवाही केली असता निविदा कार्यवाहीचा तपशील खालीलप्रमाणे

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र. 2021_AMCA_746420_1

| अ.क्र. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग) |
|---|---|---|
| 1. | कामाचे स्वरुप/कामाचे नाव | औरंगाबाद पाणी पुरवठा योजना - 15 व्या वित्त आयोगातून करावयाची कामे - 700 व 1219 मीमी व्यासाच्या मुख्य उध्दरण वाहीनीवर जायकवाडी ते नक्षत्रवाडी साठवण टाकी पर्यंत विविध ठिकाणी टॅम्पर प्रुफ एअर व्हॉल्व व Non Rising (ग्लॅन्डलेस) स्लुस व्हॉल्व चा पुरवठा करणे |

प्रशासक यांचे कार्यालय
प्रस्ताव क्र.
दि 30.09.2021 ते दि 30 3 2022

| | | |
|---|---|---|
| 2 | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव. | होय, रु. 31,40,281/-मा सर्व साधारण सभा विषय क्र. 207/2021 |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स/ निविदा मागविण्यात आली. | रु. 26,61,255/- |
| 3. | ज्या वृत्तपत्रांत निविदेची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | "ई निविदा मार्फत" 13.12.2021 |
| 4. | अ) निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत | 29.12.2021 |
| | ब) निविदा उघडण्याचा दिनांक | 31.12.2021 |
| 5. | निविदा किती वेळेस मागविल्या? | एक वेळेस |
| 6. | एकुण किती निविदा आल्या? | दोन |
| 7. | निविदा प्राप्त दर | 0.238% कमी दराने |

त्यापैकी पात्र निविदाधारकाची माहिती खालील प्रमाणे

| अ.क्र. | गुत्तेदारचे नाव व पत्ता | दाखल निविदा रक्कम | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी /जास्त |
|---|---|---|---|
| 1. | तिरुपती इलेक्ट्रीकल सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस | 26,54,925/- | 0.238% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 8. | सर्वात कमी रक्कमेच्या निविदेची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या निविदेची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमुद करावीत. | नाही |
| 9. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते नमुद करावे. | 15 वे वित्त आयोगातून प्राप्त निधी |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 10. | सदरचे काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा केली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर पान क्रमांक द्यावा) | लागु नाही |
| 11. | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषयपत्राचा नमुना जोडला आहे? | होय |

तरी विषयांकित काम तिरुपती इलेक्ट्रीकल सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांचेकडून मान्यतेनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.238% कमी दराची व रक्कम 26,54,925/- किंमतीची निविदा मान्यतेसाठी व करार करण्यास मा.स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्रमांक 314/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत औरंगाबाद पाणी पुरवठा योजना-15 व्या वित्त आयोगातून करावयाची कामे-700 व 1219 मीमी व्यासाच्या मुख्य उध्दरण वाहीनीवर जायकवाडी ते नक्षत्रवाडी साठवण टाकी पर्यंत विविध ठिकाणी टॅम्पर प्रुफ एअर व्हॉल्व व Non Rising (स्पिंडलेस) स्लुस व्हॉल्व चा पुरवठा करणे या कामाची तिरुपती इलेक्ट्रीकल सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.238% कमी दराची व रक्कम 26,54,925/- खर्चाची निविदा मंजूर करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

प्रशासक यांचा कार्यवृत्त
प्रस्ताव क्र ३१५
दि ४०.०९.२०२१ ते दि ३१ ३ २०२२

**प्रस्ताव क्रमांक 315/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.15.03.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेअंतर्गत फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथे ५६ दललो व १०० दललो प्रतिदिन क्षमतेचे २ जलशुध्दीकरण केंद्र आहेत. ५६ दलली जलशुध्दीकरण केंद्रा अंतर्गत १० गाळणी हौद व १०० दलली जलशुध्दीकरण केंद्रा अंतर्गत १२ गाळणी हौद आहेत. या गाळणी हौदा अंतर्गत पाणी गाळण प्रक्रिया करण्यासाठी विशिष्ट वाळू व गिट्टीचा थर असतो. तसेच गाळण झालेले पाणी वाहून नेण्याकरीता नोझल व पाईप व्यवस्था आहे. दैनंदिन गाळणी हौद स्वच्छ करण्याच्या प्रक्रियेने वाळूच्या थराची उंची कमी होते. त्याचप्रमाणे नोझल देखील खराब होतात.

५६ दलली जलशुध्दीकरण केंद्राचे सन २००६ मध्ये रिग्रेडिएशन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे सन २०१८-१९ मध्ये १० सेमी ने वाळूच्या थरांची उंची वाढविण्यात आलेली आहे. १०० दलली जलशुध्दीकरण केंद्राच्या गाळणी हौदांचे सन १९९२ पासून रिग्रेडिएशन करण्यात आलेले नाही. गाळण प्रक्रिया सुरळीत रहावी व पाण्याची गुणवत्ता राखली जावी याकरीता नियमीतपणे वाळूच्या थराची उंची वाढविणे तसेच नादुरुस्त नोझल बदलणे गरजेचे आहे

कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र विकास औद्योगिक महामंडळाच्या सन २०१३-२०१४ च्या व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन २०१९-२०२० च्या दरसुचिनुसार तयार करण्यात आलेले असून अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ९८,८८,७३५/- इतकी आहे. सदरील कामाचा खर्च १५ व्या वित्त आयोगातून पाणी पुरवठा विषयक सुधारणा करण्यासाठी प्राप्त निधितून प्रस्तावीत करण्यात आलेला आहे. सदरील अंदाजपत्रकास मा. सर्व साधारण सभा विषय क्र २०७/२०२१ अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

सदरील कामाची ई-निविदा कार्यवाही केली असता निविदा कार्यवाहीचा तपशील खालीलप्रमाणे

**संदर्भ : टेंडर आय.डी.क्र. 2021_AMCA_746055_1**

| अ.क्र. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग) |
|---|---|---|
| 1. | कामाचे स्वरुप / कामाचे नाव | औरंगाबाद पाणी पुरवठा योजना - 15 व्या वित्त आयोगातून करावयाची कामे - फारोळा जलशुध्दी करण केंद्र येथील गाळणी हौदांचे रिग्रेडिएशन करणे. |
| 2. | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव. | होय, रु. 98,88,735/- मा. सर्व साधारण सभा विषय क्र. 207/2021 |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स /निविदा मागविण्यात आली. | रु. 88,29,229/- |
| 3. | ज्या वृत्तपत्रात निविदेची जाहिरात देण्यात आली होती त्याची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | "ई निविदा मार्फत" 13.12.2021 |
| 4. | अ) निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत | 04.01.2022 |
| | ब) निविदा उघडण्याचा दिनांक | 06.01.2022 |
| 5. | निविदा किती वेळेस मागविल्या? | एक वेळेस |
| 6. | एकुण किती निविदा आल्या? | दोन |
| 7. | निविदा प्राप्त ५२ | अ.प. दराने |

त्यापैकी मात्र निविदाधारकाची माहिती खालील प्रमाणे

| अ. क्र. | गुत्तेदाराचे नाव व पत्ता | दाखल निविदा रक्कम | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी/जास्त |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | नुर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | 88,29,228/- | अं.प.दराने |

| | | |
|---|---|---|
| 8. | सर्वात कमी रक्कमेच्या निविदेची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या निविदेची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमूद करावीत. | नाही |
| 9. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते नमुद करावे. | 15 वे वित्त आयोगातून प्राप्त निधी |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 10. | सदरचे काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा केली आहे काय? (डिपॉझिट रजिष्टर पान क्रमांक द्यावा) | लागु नाही |
| 11. | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषयपत्राचा नमुना जोडला आहे? | होय |

तरी विषयांकित काम नुर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचेकडून मान्यतेनुसार अंदाजपत्रकीय दराने र.88,29,228/- किंमतीची निविदा मान्यतेस्तव व करार करणेबाबत मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 315/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत औरंगाबाद पाणी पुरवठा योजना - १५ व्या वित्त आयोगातून करावयाची कामे-फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथील गाळणी हौदांचे रिमॉडिएशन करणे या कामाची नुर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांची अंदाजपत्रकीय दराची व र.रु.८८,२९,२२८/- खर्चाची निविदा मंजुर करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 316/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.15.03.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेअंतर्गत सद्यस्थितीत वितरण व्यवस्थेमध्ये असलेल्या जलकुंभांचे आयुमान हे जवळपास ४० ते ४२ वर्षे झालेले आहे. या जलकुंभांच्या वितरण व्यवस्थेमध्ये पाणी सोडण्यासाठी टाकलेले मुख्य व्हॉल्व जलकुंभाच्या उभारणीच्या वेळेस बसविण्यात आलेले आहेत. दैनंदिन वापरामुळे या व्हॉल्वची झिज होवून झडपांद्वारे पाणी व्यय होवून वितरणात जाते. यामुळे जलकुंभाचे १ ते १५ मी पातळी कमी होते. पर्यायाने पाण्याचा अपव्यय होतो. वेळोवेळी वितरण व्यवस्थेत झालेल्या बदलांमुळे बहुतांश जलकुंभांच्या ठिकाणी बायपास वितरण पध्दती गरजेनुसार तयार करण्यात आलेली आहेत. या झडपा देखील ना दुरुस्त असल्याने मुख्य जलवाहीनीतून वितरण नसतानाही पाणी निघून जाते. यासाठी टप्पा १ अंतर्गत जास्त वापरात असलेल्या जलकुंभांचे व्हॉल्व बदलणे गरजेचे आहे. या झडपांच्या देखभाल दुरुस्तीवर मोठ्या प्रमाणावर खर्च होतो. त्याचप्रमाणे झडप ना दुरुस्त झाल्यास वितरणात देखील विस्कळीतपणा येतो. मुख्य झडपा या उच्च प्रतीच्या व मानांकीत उत्पादीत कंपनीच्या असणे गरजेचे आहे.

मजिप्रा मंडळाच्या दरसुचिनील दर व नामांकीत कंपन्यांचे दर यात मोठी तफावत असल्यामुळे यापुर्वी घेतलेल्या सक्षम मान्यतेअंती उत्पादक कंपन्यांकडून यापूर्वी मागविलेल्या दरानुसार तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन २०१९-२०२० च्या दरसुचिनुसार तयार करण्यात आलेले असून अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १,३१,६२,८६०/- इतकी आहे. सदरील कामाचा खर्च १५ व्या वित्त आयोगातून पाणी पुरवठा विषयक सुधारणा करण्यासाठी प्राप्त निधितून प्रस्तावीत करण्यात आलेला आहे. सदरील अंदाजपत्रकास मा. सर्व साधारण सभा विषय क्र. २००/२०२१ अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

सदरील कामाची ई-निविदा कार्यवाही केली असता निविदा कार्यवाहीचा तपशील खालीलप्रमाणे

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र. 2021_AMCA_740426_2

| अ.क्र. | खात्याचे नाव | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग) |
|---|---|---|
| १. | कामाचे स्वरुप / कामाचे नाव | औरंगाबाद पाणी पुरवठा योजना - १५ व्या वित्त आयोगातून करावयाची कामे - वितरण प्रणाली अंतर्गत विविध जलकुंभांच्या झडपा बदलण्या करीता विविध व्यासाच्या व्हॉल्वचा पुरवठा घेणे. |
| २. | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव. | होय, रु. १,३१,६२,८६०/- मा. सर्व साधारण सभा विषय क्र. २०७/२०२१ |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स/निविदा मागविण्यात आली. | रु. १,३१,५४,९६५/- |
| ३. | ज्या वृत्तपत्रांत निविदेची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | "ई निविदा मार्फत" १३.१२.२०२१ |
| ४. | अ) निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत | ०४.०१.२०२२ |
| | ब) निविदा उघडण्याचा दिनांक | ०६.०१.२०२२ |
| ५. | निविदा किती वेळेस मागविल्या? | एक वेळेस |
| ६. | एकुण किती निविदा आल्या? | दोन |
| ७. | निविदा प्राप्त दर | ०.०३९% जास्त दराने |

त्यापैकी पात्र निविदाधारकाची माहिती खालील प्रमाणे

| अ.क्र. | गुत्तेदारचे नाव व पत्ता | दाखल निविदा रक्कम | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी /जास्त |
|---|---|---|---|
| १. | नुर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | १,३१,५९,३२४/- | ०.०३९% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ८. | सर्वात कमी रक्कमेच्या निविदेची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या निविदेची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमूद करावीत | होय, स्थानिक बाजार भाव |
| ९. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते नमुद करावे. | १५ वे वित्त आयोगातून प्राप्त निधी |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| १०. | सदरचे काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा केली आहे काय? (डिपॉझिट रजिष्टर पान क्रमांक द्यावा) | लागु नाही |
| ११. | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषयपत्राचा नमुना जोडला आहे? | होय |

तरी विषयांकित काम नुर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचेकडून मान्यतेनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०३९% जास्त दराची व रु.१,३१,५९,३२४/- किंमतीची निविदा मान्यतेस्तव व करार करण्यास मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 316/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत औरंगाबाद पाणी पुरवठा योजना १५ व्या वित्त आयोगातून करावयाची कामे-वितरण प्रणाली अंतर्गत विविध जलकुंभांच्या झडपा बदलण्याकरीता विविध व्यासाच्या व्हॉल्वचा पुरवठा घेणे. या कामाची नुर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०३९% जास्त दराची व रु.१,३१,५९,३२४/- खर्चाची निविदा मंजूर करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 317/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.15.03.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, 15 वा वित्त आयोग मधून फारोळा रिसायकलींग पंपगृह येथे नवीन 25 अ.श्व.क्षमतेचे दोन सबमर्सिबल मड पंप बसविणे व यशस्वीरित्या चाचणी देणे या कामासाठी एकूण र.रु.14,70,426/- च्या अंदापत्रकास मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.207 दि.13.10.2021 प्रमाणे मान्यता घेण्यात आली आहे. अंदाजपत्रकास मान्यता मिळाल्यानंतर ई-निविदा विभागामार्फत जाहीर ई-निविदा मागविण्यात आल्या असता खालील निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | प्राप्त निविदा दर |
|---|---|---|
| 1. | मे.श्री.ईलेक्ट्रिकल्स व रेफ्रिजरेशन, औरंगाबाद | 14,70,426/- |
| 2. | मे.तिरुपती ईलेक्ट्रिकल्स सेल्स अँण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद | 14,71,161/- |

प्राप्त 02 निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा मे.श्री.ईलेक्ट्रिकल्स व रेफ्रिजरेशन, औरंगाबाद यांची असून ती अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच र.रु.14,70,426/- ची आहे. त्यामुळे ही निविदा स्विकृत करणे योग्य होईल. करीता मे.श्री.ईलेक्ट्रिकल्स व रेफ्रिजरेशन, औरंगाबाद यांची अंदाजपत्रकीय दराने र.रु.14,70,426/- खर्चाची निविदा स्विकृत करणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 317/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ई-निविदा विभागामार्फत मागविण्यात आलेल्या जाहीर निविदेतील प्राप्त न्युनतम दराची मे.श्री.ईलेक्ट्रिकल्स व रेफ्रिजरेशन, औरंगाबाद यांची र.रु.14,70,426/- खर्चाची निविदा स्विकृतीस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 318/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.15.03.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, 15 वा वित्त आयोग मधून फारोळा पंपगृह येथील 56 दललली तीन पंपाचे रोटेटिंग असेंब्लीचा पुरवठा करणे, बसविणे, रेट्रोफिटिंग करणे, इंडक्शन मोटरचा पुरवठा करणे, यशस्वी रित्या चाचणी देणे या कामासाठी एकूण र.रु.2,24,64,472/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा विषय क्रमांक-207 दि.13.10.2021 प्रमाणे मान्यता घेण्यात आली आहे. अंदाजपत्रकास मान्यता मिळाल्या नंतर ई-निविदा विभागामार्फत जाहीर ई-निविदा मागविण्यात आल्या असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | प्राप्त निविदा दर |
|---|---|---|
| 1. | मे.तिरुपती ईलेक्ट्रिकल्स सेल्स अँण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद | 2,22,15,117/ |
| 2. | मे.लक्ष्मी इंजिनिअरिंग, लातूर | 2,30,26,084/- |
| 3. | मे.अलाईड ईलेक्ट्रो-मॅकेनिकल्स प्रा.लि.पुणे | 2,34,75,373/ |

प्राप्त 03 निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा मे.तिरुपती ईलेक्ट्रिकल्स सेल्स अँण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा र.रु.2,49,355/- ने कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.11% ने कमी आहे, त्यामुळे ही निविदा स्विकृत करणे योग्य होईल.

करीता, मे.तिरुपती ईलेक्ट्रिकल्स सेल्स अँण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांची अंदाजत्रकीय दरापेक्षा 1.11% ने कमी दराची र.रु.2,22,15,117/- खर्चाची निविदा स्विकृत करणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 318/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ई-निविदा विभागामार्फत मागविण्यात आलेल्या जाहीर निविदेतील प्राप्त न्युनतम दराची मे.तिरुपती ईलेक्ट्रिकल्स सेल्स अँण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांची अंदाजत्रकीय दरापेक्षा 1.11% ने कमी दराची र.रु.2,22,15,117/- खर्चाची निविदा स्विकृतीस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 319/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.16.03.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, 15 वा वित्त आयोग निधी मधून 04 नग बॅकहो लोडर्स प्रतिनग रु.36,70,000/- दराने खरेदी करण्यासाठी एकूण र.रु.1,46,80,000/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा विषय क्रमांक-207 दि.13.10.2021 प्रमाणे मान्यता घेण्यात आली आहे. अंदाजपत्रकास मान्यता मिळाल्यानंतर जीईएम पोर्टलद्वारे जाहीर निविदा मागविण्यात आल्या असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | उत्पादक कंपनी | प्राप्त निविदा दर |
|---|---|---|---|
| 1. | मे.रत्नप्रभा मोटर्स | जेसीबी इंडिया लि. | 1,35,40,000/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 2. | मे.टाटा हिताची कन्स्ट्रक्शन मशिनरी कंपनी प्रा.लि. | टाटा हिताची | 1,11,34,080/- |
| 3. | मे.शंकर इक्विपमेंटस लि. | टाटा हिताची | 1,39,96,800/- |

प्राप्त 03 निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा जेसीबी इंडिया लि.कंपनीच्या बॅकहो लोडर्ससाठी मे.रत्नप्रभा मोटर्स यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा रु.41,40,000/- ने कमी आहे. प्राप्त न्युनतम दराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असून नामांकीत कंपनीच्या उत्पादकाची असल्याने ही निविदा स्विकृत करणे योग्य होईल. करीता मे.रत्नप्रभा मोटर्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची रु.1,05,40,000/- खर्चाची निविदा स्विकृत करणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 319/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जीईएम पोर्टलद्वारे मागविण्यात आलेल्या जाहीर निविदेतील प्राप्त न्युनतम दराची मे.रत्नप्रभा मोटर्स यांची रु.1,05,40,000/- रकमेची निविदा स्विकृतीस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 320/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.16.03.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, 15 वा वित्त आयोग निधी मधून 02 नग Excavator 130-140 (पोकलेन 130-140) प्रतिनग रु.48,00,000/- दराने खरेदी करण्यासाठी एकूण र.रु.96,00,000/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा विषय क्रमांक-207 दि.13.10.2021 प्रमाणे मान्यता घेण्यात आली आहे. अंदाजपत्रकास मान्यता मिळाल्यानंतर जीईएम पोर्टलद्वारे जाहीर निविदा मागविण्यात आल्या असता, खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | उत्पादक कंपनी | प्राप्त निविदा दर |
|---|---|---|---|
| 1. | मे.रत्नप्रभा मोटर्स | जेसीबी इंडिया लि. | 73,48,000/- |
| 2. | मे.टाटा हिताची कन्स्ट्रक्शन मशिनरी कंपनी प्रा.लि. | टाटा हिताची | 81,58,194/- |
| 3. | मे.शंकर इक्विपमेंटस लि. | टाटा हिताची | 99,00,000/- |

प्राप्त 03 निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा जेसीबी इंडिया लि.कंपनीच्या Excavator 130-140 साठी मे.रत्नप्रभा मोटर्स यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा र.रु.22,52,000/- ने कमी आहे. प्राप्त न्युनतम दराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असून नामांकीत कंपनीच्या उत्पादकाची असल्याने ही निविदा स्विकृत करणे योग्य होईल. करीता मे.रत्नप्रभा मोटर्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची र.रु.73,48,000/- खर्चाची निविदा स्विकृत करणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 320/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जीईएम पोर्टलद्वारे मागविण्यात आलेल्या जाहीर निविदेतील प्राप्त न्युनतम दराची मे.रत्नप्रभा मोटर्स यांची र.रु.73,48,000/- रकमेची निविदा स्विकृतीस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 321/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.16.03.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, 15 वा वित्त आयोग निधी मधून 01 नग Excavator 20-30 (पोकलेन 20-30) प्रतिनग र.रु.23,04,000/- दराने खरेदी करण्यासाठीच्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा विषय क्रमांक-207 दि.13.10.2021 प्रमाणे मान्यता घेण्यात आली आहे. अंदाजपत्रकास मान्यता मिळाल्यानंतर जीईएम पोर्टलद्वारे जाहीर निविदा मागविण्यात आल्या असता, खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | उत्पादक कंपनी | प्राप्त निविदा दर |
|---|---|---|---|
| 1. | मे.रत्नप्रभा मोटर्स | जेसीबी इंडिया लि. | 18,19,000/- |
| 2. | मे.टाटा हिताची कन्स्ट्रक्शन मशिनरी कंपनी प्रा.लि. | टाटा हिताची | 20,35,683/- |
| 3. | मे.शंकर इक्विपमेंटस लि. | टाटा हिताची | 25,00,000/- |

प्राप्त 03 निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा जेसीबी इंडिया लि.कंपनीच्या Excavator 20-30 साठी मे.रत्नप्रभा मोटर्स यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा रु.4,85,000/- ने कमी आहे. प्राप्त न्युनतम दराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असून नामांकीत कंपनीच्या उत्पादकाची असल्याने ही निविदा स्विकृत करणे योग्य होईल. करीता मे.रत्नप्रभा मोटर्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची र.रु.18,19,000/- खर्चाची निविदा स्विकृत करणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 321/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जीईएम पोर्टलद्वारे मागविण्यात आलेल्या जाहीर निविदेतील प्राप्त न्युनतम दराची मे.रत्नप्रभा मोटर्स यांची रु.18,19,000/- रकमेची निविदा स्विकृतीस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 322/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.16.03.2022)

वाचा :- 1. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 खंड 1,3 व 4
2. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005
3. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण 2013/प्र.क्र.462/ भाग-2/आरोग्य-3 दि.28.12.2015.

प्रस्ताव सादर करण्यात येते की, ज्या अर्थी जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना (कोव्हीड-19) या विषाणूमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषित केलेला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात, महाराष्ट्रातील शहरात वेगाने पसरत असल्याचे निदर्शनास आले आहे. राज्य शासनाने कोरोना विषाणुचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदे 1897 दि.13 मार्च 2020 पासून लागू करुन त्या बाबतची नियमावली तयार केली आहे. कोरोना बाधित रुग्णांची संख्या औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणुच्या संसर्गात अधिक वाढ होऊ न देता तात्काळ उपाय योजना करणे आवश्यक आहे.

औरंगाबाद शहरात साथीच्या नियंत्रणासाठी व लढा देण्याकरीता कोव्हीड-19 एसआरडीसी मार्फत मेल्ट्रॉनची जागा डीसीएचसी म्हणुन उपलब्ध करून देण्यात आलेली होती. 350 खाटांचे मेल्ट्रॉन डीसीएचसी म्हणुन दि.11.06.2020 पासून कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. कोव्हीड 19 अंतर्गत दि.01.03.2022 ते दि.08.03.2022 रुग्ण संख्या तपशील खालील प्रमाणे आहे.

| दिनांक | पॉझीटीव्ह रुग्ण संख्या | बरे झालेले रुग्ण संख्या | मृत्यु संख्या | सक्रीय रुग्ण संख्या |
|---|---|---|---|---|
| 01.03.2022 | 5 | 16 | 1 | 173 |
| 02.03.2022 | 7 | 112 | 0 | 68 |
| 03.03.2022 | 16 | 13 | 0 | 71 |
| 04.03.2022 | 13 | 22 | 0 | 62 |
| 05.03.2022 | 4 | 9 | 0 | 57 |
| 06.03.2022 | 30 | 9 | 0 | 48 |
| 07.03.2022 | 2 | 8 | 0 | 42 |
| 08.03.2022 | 3 | 6 | 0 | 39 |

कोव्हीड-19 रुग्ण संख्या पाहता मेल्ट्रॉन हॉस्पीटल येथे ओपीडी सेवा, प्रसुती व कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया सेवा सुरु करण्याचे प्रस्तावीत करण्यात येत आहे. तसेच मेल्ट्रॉन हॉस्पीटल येथे सिटी स्कॅन व एक्स-रे-सोय उपलब्ध आहे. सदरील सेवा देखील नागरिकांना उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत. मेल्ट्रॉन हॉस्पीटल येथे खालील प्रमाणे सेवा उपलब्ध सर्वसामान्य नागरीकांना उपलब्ध करून द्यावयाच्या आहेत.

1. सर्वसाधारण बाह्यरुग्ण सेवा
2. कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया
3. सीटी स्कॅन सेवा
4. क्ष-किरण सेवा

संदर्भ क्र.3 महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2013/ प्र.क्र 462/ भाग-2/आरोग्य 3 दि.28.12.2015 अन्वये सिटी स्कॅन करीता शासकीय रुग्णालयामध्ये प्रपत्रामध्ये रकाना क्र.3 मध्ये नमुद केल्यानुसार रुग्ण शुल्क आकारणी करण्यात येते. (पृष्ठ क्र.14) महानगरपालिकेतर्फे आकारणी करावयाचे दर रकाना क्र.4 मध्ये नमुद आहे.

| अ.क्र. | रुग्णसेवा/सुविधा | शासनाचे रुग्ण सेवेकरीता मंजुर दर | मनपातर्फे प्रस्तावीत रुग्ण सेवेकरीता दर |
|---|---|---|---|
| 01 | 02 | 03 | 04 |
| 1. | सीटी स्कॅन ब्रेन प्लेन | रु.300/- | रु.700/- |
| 2. | सीटी स्कॅन इतर कुठलाही भाग प्लेन (एक भाग | रु.400/ | रु.700/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | एका वेळेस) (उदा.:चेस्ट, पी.एन.एस. ऑरबिट, टेम्पोरल बोन, नेक, ॲबडॉमिन पेलव्हीस, एच आरटी, हात/पाय इ.) | | |
| 3. | सीटी स्कॅन कॉन्ट्रॅक्टर स्टडी कुठल्याही भागाचा (एक अथवा अनेक) एका वेळेस | रु.100/- | रु.1000/- |
| 4. | सीटी स्कॅन हायर फंक्शन/स्पेशल स्टडी (बोन डेन्सिटोमिट्री/डेक्सास्कॅन/थ्रीडी स्कॅन/ॲन्जीओग्राफी/ब्रॉन्कोग्राफी/एन्टोक्लायसीस/कोलोनास्कोपी/डेंटल सीटी/ सीटी गायडेड बायोप्सी/ परफ्युजन स्टडी इ.) | रु.700/- | रु.1500/- |

- रेडीऑलॉजी (क्ष-किरण शास्त्र) (पृष्ठ क्र.12)

| अ.क्र. | रुग्णसेवा/सुविधा | शासनाचे रुग्ण सेवेकरीता मंजूर दर | मनपातर्फे प्रस्तावीत रुग्ण सेवेकरीता दर |
|---|---|---|---|
| 2 | एक्स-रे डिजीटल सीआरओडी (प्रति एक्स-रे शुट) | रु.75/ | रु.100/- |

सदरील प्रमाणे सेवा शुल्क आकारणी करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेची मान्यता व तसेच यापुढे नवीन सेवा उपलब्ध करुन दिल्यानंतर महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. : संकिर्ण 2013/प्र.क्र./462/भाग-2/आरोग्य-3 दि.28.12.2015 नुसार रुग्णास शुल्क आकारणी करावी लागेल.

कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया सुरु करण्यासाठी शस्त्रक्रिया गृह तयार करणे आवश्यक आहे. यासाठी खालील आवश्यक बाबी तातडीने करणे प्रस्तावीत आहे. वॉर्ड क्र.1 मधील एक कक्ष शस्त्रक्रिया गृह म्हणुन कार्यान्वीत करण्यासाठी खालील सिव्हील कामे करणे आवश्यक आहे.

1. वॉर्ड प्रवेशद्वाराला दरवाजा करणे आवश्यक आहे
2. शस्त्रक्रिया गृहासाठी ॲल्युमिनीअम ग्लास पार्टीशन व दरवाजा आवश्यक आहे.
3. हात धुण्यासाठी वॉश बेसीन, पाणी व ड्रेनेज व्यवस्था इ.सुविधा करणे आवश्यक आहे.
4. खिडक्यांना ॲक्रेलिक शिट लावून पुर्ण सीलबंद करणे आवश्यक आहे.
5. दोन टन क्षमतेचे 2 वातानुकूलित यंत्र बसविणे आवश्यक आहे.
6. विद्युत विषयक कामे व दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे सेवा व दर लागु करण्याच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 322/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कोव्हीड-19 चिकलठाणा एमआयडीसी मार्फत मेल्ट्रॉन येथे डीसीएचसी म्हणुन अधिगृहीत करण्यात आलेले होते. सध्याची रुग्ण संख्या पाहता सदरील ठिकाणी नागरीकांना सर्वसाधारण बाह्यरुग्ण सेवा, कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया, सीटी स्कॅन सेवा व क्ष-किरण सेवा सुरु करण्यास व मनपा प्रस्तावीत रुग्णसेवेचे दर लागू करण्यास व या व्यतिरिक्त नवीन सेवा देण्यास सुरुवात केल्यास प्रस्तावीत दर्शविण्यात शासन निर्णयानुसार दर आकारण्यास मान्यता देण्यात येते. तसेच कुटूंब कल्याण शस्त्रक्रियागृह कार्यान्वीत करण्यासाठी आवश्यक तो अंदाजपत्रकानुसार खर्च करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी

**प्रस्ताव क्रमांक 323/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.16.03.2022)

वाचा :-1. केंद्र शासनाची अधिसुचना क्र.एस.ओ 1357(इ) दि.08.04.2016 अन्वये घनकचरा व्यवस्थापन नियम-2016

2. शासन निर्णय क्र.स्वमअ/2017/प्र.क्र.256(1)/नवि-34 नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन दि.07 सप्टेंबर 2018

3. मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.566 दि.11.07.2018

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र शासनाची अधिसुचना क्र.एस.ओ.1357 (इ) दि.08.04.2016 अन्वये घनकचरा व्यवस्थापन नियम लागू केले आहेत. या नियमांची अंमलबजावणी शहरामध्ये प्रभावी पणे सुरु आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 च्या तरतुदीचे अनुपालन न करणाऱ्या व्यक्ती/संस्थांना दंड करण्याचे (Spot Fine) अधिकार महानगरपालिकेस शासन निर्णय क्र.स्वमअ-2017/प्र.क्र.256 (1) नवि-34 नगर

विकास विभाग, महाराष्ट्र शासन दि.07 सप्टेंबर 2018 अन्वये प्रदान करण्यात आले आहेत. त्यास मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.-566 दि.11.07.2018 अन्वये मंजुरी प्रदान केली असून मनपा कार्यक्षेत्रा मध्ये घनकचरा व्यवस्थापन नियम-2016 च्या तरतुदींचे पालन न करणाऱ्या व्यक्ती/व्यावसायीक/संस्थांकडून माहे ऑक्टोंबर-2018 पासून खालील प्रमाणे दंडनीय रक्कम वसुल करण्यात येत आहे.

(दंडाचे जोडपत्र)

| अ.क्र. | दंडाचा तपशील | दंडाची रक्कम |
|---|---|---|
| 1. | नागरीकांनी रस्ते/मार्गावर घाण करणे/रस्त्यावर कचरा टाकणे | 150/- |
| 2. | छोटे हॉटेल/दुकाने/संस्था यांनी रस्त्यावर कचरा टाकणे घाण करणे | 500/- |
| 3. | Bulk Garbage Generators यांनी रस्त्यावर कचरा टाकणे/घाण करणे | 5000/- |
| 4. | सार्वजनिक ठिकाणी थुंकणे | 100/ |
| 5. | उघड्यावर लघवी/लघुशंका करणे | 100/- |
| 6 | उघड्यावर शौच करणे | 500/- |

उपरोक्त प्रमाणे घनकचरा व्यवस्थापन नियम-2016 च्या तरतुदींचे पालन न करणाऱ्या 19373 व्यक्ती/व्यावसायीक/संस्थांकडून माहे 09 ऑक्टोंबर 2018 ते 22 फेब्रुवारी 2022 पर्यंत र.रु.77,19,550/- एवढा द्रव्यदंड वसुल करण्यात आला आहे.

तथापि, उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे दंडाची आकारणी करून सुध्दा शहरातील व्यक्ती/व्यावसायीक/संस्थांकडून शासन निर्णयाचे काटेकोरपणे पालन होत नसल्याचे दिसून आले आहे. करीता, वरील दंडाच्या रक्कमेमध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे वाढ करणे योग्य होईल.

| अ.क्र. | दंडाचा तपशील | दंडाची रक्कम |
|---|---|---|
| 1. | नागरीकांनी रस्ते/मार्गावर घाण करणे/रस्त्यावर कचरा टाकणे | 500/- |
| 2. | छोटे हॉटेल/दुकाने/संस्था यांनी रस्त्यावर कचरा टाकणे घाण करणे | 1000/- |
| 3. | Bulk Garbage Generators यांनी रस्त्यावर कचरा टाकणे/घाण करणे | 10,000/- |
| 4. | सार्वजनिक ठिकाणी थुंकणे | 5000/- |
| 5 | उघड्यावर लघवी/लघुशंका करणे | 1000/- |
| 6. | उघड्यावर शौच करणे | 2000/- |

करीता, घनकचरा व्यवस्थापन नियम-2016 च्या तरतुदींचे काटेकोरपणे पालन न करणाऱ्या व्यक्ती/व्यावसायीक/संस्थांकडून वाढीव दंड वसुल करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 323/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दंडाची आकारणी करून सुध्दा शहरातील व्यक्ती/ व्यावसायीक/ संस्थांकडून शासन निर्णयाचे काटेकोरपणे पालन होत नसल्याचे दिसून आले आहे. करीता वरील दंडाच्या रक्कमेमध्ये दर्शविल्याप्रमाणे वाढ करणे बाबत मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 324/2022:-</u>** (प्रशासकीय प्रस्ताव दि 16.03.2022)

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करीत आहेत की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 79-क नुसार महानगरपालिकेच्या मालकीची जंगम मालमत्ता विकता येईल. अशी तरतुद आहे. या तरतुदीनूसार महानगरपालिकेच्या मालकीचे हर्सुल फिल्टर बेड व महानगरपालिका इमारती मधील टप्पा क्र.3 च्या वाहनतळामधील विविध विभागामधून जमा झालेले भंगार व निरुपयोगी असलेले लोखंडी, लाकडी, इलेक्ट्रॉनिक इ. साहित्यांचा निविदा मागवून विक्री करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येतो.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73-क च्या तरतुदीनूसार या भंगार साहित्याची निविदा मागविण्यात आली असता, निविदेच्या अटी/शर्तीप्रमाणे दोन एजन्सी तांत्रिक बीडमध्ये पात्र ठरल्या आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नाव | निविदा दर |
|---|---|---|
| 1. | मे.न्यु इंडिया स्क्रॅप ट्रेडर्स | रु.59,99,996/- (अक्षरी एकोणसाठ लक्ष नव्याण्णव हजार नऊशे शहाण्णव रुपये फक्त) |
| 2. | मे.एस.ए.स्क्रॅप | रु.51,00,051/- (अक्षरी एकावन्न लक्ष एकावन्न रुपये फक्त) |

उक्त निविदेमध्ये उच्च दर देणाऱ्या एजन्सी मे. न्यु इंडिया स्क्रॅप ट्रेडर्स यांची निविदा आणि प्राप्त दर जी.एस.टी.सह रु.59,99,996/- (अक्षरी एकोनसाठ लक्ष नव्याणऊ हजार नऊशे शहाण्णऊ रुपये फक्त) प्रस्ताव मान्यतेस्तव सादर

**ठराव क्रमांक 324/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, निविदेमध्ये उच्च दर देणाऱ्या एजन्सी नामे मे. न्यु इंडिया स्क्रॅप ट्रेडर्स यांची निविदा आणि प्राप्त दर जी.एस.टी सह रु 59,99,996/- (अक्षरी एकोनसाठ लक्ष नव्याणऊ हजार नऊशे शहाण्णऊ रुपये फक्त) प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 325/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.17.03.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पुर्व मंजुर मा.सर्वसाधारण ठराव क्र.249 दि.09.02.2018 नुसार सातारा-देवळाई या मनपा हद्दीतील शासन अधिसुचना सन-2016 नुसार समाविष्ठ भागासाठी जलनि:स्सारण वाहिन्याचे जाळे तयार करणे, सिवेज पंपींग स्टेशन बांधणे व इतर संलग्न कामे करणे या कामासाठी जानेवारी-2019 मध्ये मा.संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय वरळी मुंबई-400030 यांना त्या वेळेस दरसुची नुसार रु.180.16 कोटीचा विस्तृत प्रकल्प अहवाल (Detail Project Report) सादर करण्यात आला होता. यासाठी शासन निर्णय संकीर्ण/2021/प्र.क्र./-24/नवि-16 दि.27 जुन 2012 मध्ये नमुद नुसार महानगरपालिका/ नगरपरिषदा यांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात नागरी सोई-सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य हे 80:20 या आकृतीबंध अनुदेय करण्यात आलेला आहे.

आता शासन नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांच्या सुचनेनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या औरंगाबाद परिक्षेत्राच्या दरसुची सन-2021-22 नुसार सुधारित प्रकल्प अहवाल रु.254.306 कोटीचा नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.यश इनोव्हेटीव्ह सोल्युशन LLP यांनी या कार्यालयास सादर केला आहे. या प्रकल्प अहवालास नोडल एजन्सी स्वरुपाने मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे.

नव्याने सादर प्रकल्प अहवालानुसार सध्याची या भागातील लोकसंख्या व लोकसंख्या वाढ गृहीत धरुन विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून यामध्ये 170 मी.मी. ते 1000 मी.मी.व्यासाचे पाईप टाकणे, सिवेज पंपींग स्टेशन बांधणे (6.3 द.ल.ली. व 0.6 द.ल.ली.) सुमारे 10000 मेनहोल चेंबर व 35000 मिळकती करीता इंस्पेक्शन चेंबर बांधणे अस्तित्वातील सोयी सुविधा आवश्यकतेनुसार स्थलांतरीत (Utility Shiftinhg), रस्ते ना- दुरुस्त झाल्यास त्यांची पुर्नबांधणी करणे, जेटिंग कम व्हॅक्युम मशीन खरेदी करणे व योजना पुर्ण झाल्यानंतर योजनेची प्रायोगिक तत्वावर (Trial Run) चाचणी घेणे इ.बाबींचा समावेश आहे. या भागातील जलनि:स्सारण वाहिनी टाकण्याचे काम पुर्ण झाल्यानंतर त्याची जोडणी औरंगाबाद शहर भुमीगत गटार योजने अंतर्गत पुर्वी टाकण्यात आलेल्या 1400 मी.मी.Sewer-k मल-जल वाहिनीला करण्यात येणार आहे. या जलनि:स्सारण वाहिनीद्वारे सातारा-देवळाई भागातील निर्मित होणार मल-जल गोलवाडी पंपींग स्टेशन मार्गे कांचनवाडी STP ला पोहचणार आहे. रुद्यस्थितीतील जलनि:स्सारण वाहिनी निर्मित होणारे मल-जल हे अस्तित्वातील जलनि:स्सारण वाहिनीची वहन करण्याची क्षमता असल्याने या भागासाठी वेगळा STP तुर्त बांधण्याची आवश्यकता नाही

दिनांक 27 जुलै 2012 च्या शासन निर्णयात नमुद प्रमाणे या योजनेसाठी मनपा (अ) हिस्स्याची 20 % र.रु.50.86 कोटींची आर्थीक तरतुद सन 2022 2023 च्या अर्थसंकल्पात केली जाणार आहे. तरी पुर्व पारीत ठराव क्रमांक-249 दि.09.02.2018 मधील नमुद पुर्व तरतुदी कायम ठेवण्या येऊन (ब) सुधारीत प्रकल्प अहवाल रु.254.306 कोटी यास मंजुरी देणे (क) तांत्रिक मान्यतेसाठीचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना अदा करावयाचये एकुण सेवा शुल्क (1%) र.रु.2,54,30,058/- पाच समान हफ्त्यात अदा करणे, यापैकी पुर्वीची प्रकल्प अहवाल किंमत रु.223.81 कोटी गृहीत धरण्यात आलेल्या रक्कमेपैकी अदा करण्यात आलेली र.रु.48.69 लक्ष यास कार्योत्तर मान्यता देणे व आता प्रकल्प किंमतीत वाढ झाल्याने अदा करण्यात आलेली पहिल्या हपत्याची रक्कमेतील फरकाची र.रु.2.17 लक्ष अदा करण्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबतचा व यासाठी भविष्यात या प्रकल्प अहवालच्या अनुषंगाने ती आवश्यक ती कार्यवाही करण्याचे योजनेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा.प्रशासक/आयुक्त यांना प्रदान करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 325/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, (अ) सुधारित प्रकल्प अहवाल रु.254.306 कोटी यास पुर्व मंजुरी ठराव क्रमांक-249 दि.09.02.2018 मधील नमुद तरतुदी कायम ठेवण्यात येऊन सातारा-देवळाई भागा करीताच्या सुधारित प्रकल्प अहवालास (ब) मनपाच्या हिश्याची 20% र.रु.50.86 कोटी आर्थिक वर्ष 2021-22 अर्थसंकल्पात आर्थिक तरतुद करण्याचे (क) तांत्रिक मान्यतेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास अदा करावयाचे त्यांचे तांत्रिक सेवा शुल्क, पाच समान हफ्त्यात अदा करण्यास व या पुर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना अदा करण्यात आलेली सेवा शुल्कातील पाच हफ्त्यापैकी अदा केलेले सेवा शुल्क व आता प्रकल्प किंमत वाढलेली असल्याने फरकाची रक्कम प्रथम हफ्ता म्हणुन अदा करण्यास कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येते. ही सर्व कार्यवाही करण्याचे व आवश्यकता भासल्यास योग्य ते बदल करण्याचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त यांना प्रदान करण्यास मंजुरी प्रदान करण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 326/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.22.03.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येते की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेअंतर्गत फारोळा येथे 100 व 56 दलली प्रतिदिन क्षमतेचे दोन जलशुध्दीकरण केंद्र असून या केंद्रातून दररोज 150 दलली पाण्यावर प्रक्रिया केली जाते. जलशुध्दीकरण प्रक्रियेत विविध टप्यांवर तुरटी ग्रेड-1, ब्लिचिंग पावडर ग्रेड-1 व क्लोरीनचा वापर केला जातो. पाणी गाळण प्रक्रियेनंतर पाण्याचे निर्जंतुकीकरण करुन पाणी पिण्या योग्य करण्यासाठी क्लोरीनचा वापर प्रि-क्लोरीनेशन व पोस्ट क्लोरीनेशनच्या स्वरुपात केला जातो. प्रि-क्लोरीनेशन करीता 1 पीपीएम व पोस्ट क्लोरीनेशन करीता 3 पीपीएम इतक्या मात्रेची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे नक्षत्रवाडी संतुलीत जलकुंभ येथे देखील 0.5 पीपीएम इतकी क्लोरीनची मात्रा रि-क्लोरीनेशनच्या स्वरुपात दिली जाते. दैनंदिन प्रक्रिया करण्यात येणारे पाणी परिमाण व आवश्यक मात्रा लक्षात घेता जलशुध्दीकरण केंद्राची क्लोरीनची वार्षिक मागणी 248 मे.टन इतकी आहे.

सदरील पुरवठ्याचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन 2019-20 च्या दरसुचितील साहित्य पुरवठ्यातील दरानुसार दर पृथःकरण करुन तयार करण्यात आले आहे. कामाची अंदाजपत्रकीय र.40,79,172/- इतकी असून सदरील पुरवठ्याचा खर्च पाणी पुरवठा रसायन खरेदी या लेखाशिर्षकातून प्रस्तावीत करण्यात आला आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभेने विषय क्र.184/2021 दि.11.08.2021 अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

सदरील कामाची ई-निविदा कार्यवाही केली असता निविदा कार्यवाहीचा तपशील खालीलप्रमाणे

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र. 2021_AMCA_714725_1

| अ.क्र. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग) |
|---|---|---|
| 1. | कामाचे स्वरुप / कामाचे नाव | औरंगाबाद पाणी पुरवठा योजना - फारोळा जलशुध्दीकरण केंद्रा करीता क्लोरीनचा पुरवठा करणे |
| 2. | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव. | होय, रु.40,79,172/-<br>मा. स्थायी समिती सभेने विषय क्र. 184/2021 |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स / निविदा मागविण्यात आली. | रु.34,96,450/- |
| 3. | ज्या वृत्तपत्रात निविदेची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | "ई निविदा मार्फत"<br>06.09.2021 |
| 4. | अ) निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत | 06.09.2021 |

| | | |
|---|---|---|
| | ब) निविदा उघडण्याचा दिनांक | 08.09.2021 |
| 5. | निविदा किती वेळेस मागविल्या? | एक वेळेस |
| 6. | एकुण किती निविदा आल्या? | दोन |
| 7. | निविदा प्राप्त दर | रु. 16,750 मे.टन |

त्यापैकी पात्र निविदाधारकाची माहिती खालील प्रमाणे

| अ.क्र. | गुत्तेदाराचे नाव व पत्ता | दाखल निविदा रक्कम | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी /जास्त |
|---|---|---|---|
| 1. | अॅक्वॉ मेक इंटरप्राइजेस, मुंबई | 41,20,500/- | सन 2021-22 च्या दरसुची पेक्षा 3.17% कमी |

| | | |
|---|---|---|
| 8. | सर्वात कमी रक्कमेच्या निविदेची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या निविदेची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमुद करावीत. | नाही |
| 9. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकाखाली पडणार आहे? ते नमुद करावे. | पाणी पुरवठा रसायन सामुग्री खरेदी |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 10. | सदरचे काम डिपॉझिट म्हणुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा केली आहे काय? (डिपॉझिट रजिष्टर पान क्रमांक द्यावा) | लागु नाही |
| 11. | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषयपत्राचा नमुना जोडला आहे? | होय |

तरी विषयांकित काम अॅक्वॉ मेक इंटरप्राइजेस, मुंबई यांचेकडून मान्यतेनुसार रु. 16,750/- प्रति मे. टन व रक्कम 41,20,500/- किंमतीची निविदा मान्यतेस्तव व करार करण्यास मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 326/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रस्तावीत औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत फारोळा जलशुध्दीकरण केंद्राकरीता क्लोरीनचा पुरवठा करणे या कामाची अॅक्वॉ मेक इंटरप्राइजेस, मुंबई यांचेकडून रु.16,750/- प्रति मे. टन व र.रु.41,20,500/- किंमतीची निविदा मंजुर करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 327/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.23.03.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,श्री.फैय्याज नुरखान शेख, सफाई मजुर, वॉर्ड क्र.09 मनपा औरंगाबाद यांनी पत्नीच्या नामे यास्मीन फैय्याज शेख यांच्या Obstructed Umbilical Hernia (तीव्र उदरवेदना) या आजारावर युनाईटेड सिग्मा हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून यासाठी रक्कम रुपये 2,80,826/- (अक्षरी रु. दोन लक्ष ऐंशी हजार आठशे सव्वीस रुपये) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी प्रत्यक्ष शिल्लक असलेली रक्कम रु. 2,19,258/- एवढी असून सदरील रक्कमेच्या 90 टक्के रक्कम रु.1,97,332/- (अक्षरी रु.एक लक्ष सत्यान्नव हजार तीनशे बत्तीस रुपये) वजा 5 टक्के रक्कम रु.14,041/- (अक्षरी रु.चौदा हजार एक्केचाळीस रुपये फक्त) (एकुण सादर केलेले देयक रक्कम रु.2,80,826/- च्या 5 टक्के प्रमाणे) मनपा फंडात जमा करुन येणारी रक्कम रु.1,83,291/- (अक्षरी रु. त्र्यांशी हजार एकशे सत्तावीस फक्त) रक्कम संबंधितास देय आहे.

महानगरपालिका वैद्यकिय परतावा विनियमामध्ये तीव्र उदरवेदना या शासनमान्य आजारामध्ये येतो. महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय दि.16/11/2021 पर्यंत मधील प्रसिध्द रुग्णालय

यादीत सदरील रुग्णलयाचे नाव समाविष्ट असल्याने प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

करिता श्री. फैय्याज नुरखान शेख, सफाई मजुर वॉर्ड क्र.9 मनपा औरंगाबाद यांनी त्यांच्या पत्नीच्या आजारावर खर्च केलेल्या रक्कमेपैकी प्रत्यक्ष देय असलेल्या रु.1,83,291/- वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 327/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री. फैय्याज नुरखान शेख सफाई मजुर, वॉर्ड क्र.9, मनपा औरंगाबाद यांनी त्यांच्या पत्नीच्या आजारावर खर्च केलेल्या रक्कमेपैकी प्रत्यक्ष देय असलेल्या रु.1,83,291/- वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 328//2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.24.03.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नविन वाहने खरेदी या लेखशिर्षातुन महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना कार्यालयीन कामी वापरासाठी 05 नग Tata Tigor EV XZ+ ई- कार खरेदी करण्यासाठी टाटा केपनीचे शहरातील अधिकृत वितरक मे. सतिष मोटर्स प्रा.लि. यांचेकडून प्रोफार्मा इनव्हाईस मागविण्यात आले असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| Sr.No | Model | Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 1. | Tata Tigor EV XZ+ (Ex Showroom Price) | 05 | 13,09,000/- | 65,45,000.00 |
| 2. | TCS 1% | 05 | 13,240/- | 66,200.00 |
| | | | **Total** | **66,11,200.00** |

ई-कार वाहने जीईम पोर्टलवर उपलब्ध नाहीत तसेच त्यांचे दरकरार देखील उपलब्ध नाहीत यास्तव उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र.संकीर्ण-2016/प्र.क्र.215/उद्योग-4 दि.24.08.2017 अन्वये कोणत्याही वाहनांचे दर करार DGS&D कडे उपलब्ध नसल्यास वाहन उत्पादक/वितरक याच्या दरपत्रका मार्फत रु.1.00 कोटी पर्यंत मोटर वाहने (कार) खरेदी करणे बाबत निर्देश आहेत.

करीता माहनगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना कार्यालयीन कामी वापरासाठी टाटा कंपनीचे शहरातील अधिकृत वितरक मे. सतिष मोटर्स प्रा.लि. यांचेकडून 05 नग Tata Tigor EV XZ+ ई-कार खरेदी करण्यासाठी येणारा खर्च एकुण र.रु.66,11,200/- व खरेदी होणाऱ्या वाहनांसाठी मे. युनायटेड इंडिया इन्श्युरन्स कंपनीकडून विमा उतरविण्यासाठीचा विमा प्रिमिअम खर्च र.रु.1,77,000/- च्या प्रस्ताव मा.स्थायी सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 328/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, टाटा कंपनीचे शहरातील अधिकृत वितरक मे.सतिष मोटर्स प्रा.लि. यांचेकडून 05 नग Tata Taigor EV XZ+ ई- कार खरेदी करण्यासाठी येणारा खर्च एकुण र.रु.66,11,200/- व खरेदी होणाऱ्या वाहनांसाठी मे. युनायटेड इंडिया इन्श्युरन्स कंपनीकडून विमा उतरविणेसाठीचा विमा प्रिमिअम खर्च र.रु.1,77,000/- साठीच्या खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 329/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.03.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 328 नुसार महानगरपालिका क्षेत्रातील बाजारामध्ये वाढ करण्याची तरतुद आहे. तसेच अशा ठिकाणी व्यापार किंवा धंदा करणाऱ्या व्यक्तिंच्या उपयोगासाठी योग्य वाटतील असे गाळे बांधण्याची तरतुद आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 332 नुसार महानगरपालिकेच्या बाजारातील माल विकण्याची जागा करीता भाडे आणि फी आकारणी करता येईल अशी तरतुद आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 332 (3) नुसार नगर पालिका बाजारातील गाळा दुकान किंवा उघाने माल विकण्याची जागा वापर करण्याचा विशेषाधिकार आयुक्तास उपयोगी वाटेल अशी जागा स्थायी समितीच्या मान्यतेने लिलावाने देता येईल. अथवा तिचा विनियोग करता येईल. अशी तरतुद आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील रेल्वेस्टेशन येथील उड्डाणपुलाखालील सौंदर्यीकरण करुन वाहनतळ व फुड प्लाझा विकसीत केला असून सदरील जागा वाहनतळ आणि फेरीवाल्यांकरीता वापर करण्यासाठी दि.09.09.2021रोजीच्या ठराव क्र.202/2021 अन्वये मे.शिवराज मल्टी सर्व्हिसेस या संस्थेस तीन वर्षासाठी देण्यात आली आहे.

प्रशासक यांचा कार्यालय
प्रस्ताव व ठराव
दि.30.09.2021 ते दि.31.3.2022

तथापि, या ठिकाणी वारंवार प्रयत्न करून देखील रेल्वेस्टेशन परिसरातील पथविक्रेते दररोज या जागेचा वापर करीत नाही. असे निदर्शनास आले आहे. या करीता उपरोक्त नमुद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलमानुसार रेल्वेस्टेशन उड्डाणपुला खाली विकसीत केलेल्या जागेत दर शनिवारी आठवडी बाजाराचा वापर करण्याची मान्यता देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 329/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 328 व 332 (2) नुसार रेल्वेस्टेशन येथील उड्डाणपुलाखाली दर शनिवारी आठवडी बाजार चालू करण्यासाठी मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 330/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.30.03.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन 2022-23 या एका आर्थीक वर्षासाठी प्राणी संग्रहालयात असलेल्या हिंस्त्र प्राण्यांना देण्यात येणारे खाद्य बीफ खरेदी करण्यासाठी ई-टेन्डरद्वारे निविदा मागविण्यात आल्या होत्या. यासाठी एकुण आठ कोरे निविदाची विक्री झाली असून आठ भरलेल्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नाव | दर प्रति किलो |
|---|---|---|
| 1. | गरिबावाज बीफ शॉप, औरंगाबाद | र.रु.255.00 |
| 2. | एफएसक्यु कलेक्शन, औरंगाबाद | र.रु.259.00 |
| 3. | मुनलाईट बीफ शॉप, औरंगाबाद | र.रु.265.00 |
| 4. | फ्रेश बीफ शॉप, औरंगाबाद | र.रु.249.00 |
| 5. | फैजल बफेलो शॉप, औरंगाबाद | र.रु.118.00 |
| 6. | सोहेल बफेलो मीट शॉप, औरंगाबाद | र.रु.235.00 |
| 7. | उबेद बफेलो मीट शॉप, औरंगाबाद | र.रु.260.00 |
| 8. | मोईनोद्दीन चिश्ती बीफ शॉप, औरंगाबाद | र.रु.240.00 |

तुलनात्मक दृष्टिने फैजल बफेलो शॉप, औरंगाबाद यांचे बीफ खरेदीचे निविदा दर रु.118.00 प्रति किलो हे सर्वात कमी आहेत. प्राणी संग्रहालयात असलेले हिंस्त्र असलेले प्राणी वाघ, पांढरे वाघ, बिबट, नगर, उदबिल्ला आणि कोल्हे या प्राण्यांना प्रतिदिनी एकूण 150 किलो बीफ खाद्य देण्यात येत आहे. यामध्ये प्राण्यांची संख्या कमी जास्त झाल्यास बीफ खरेदीचे प्रमाण कमी जास्त करण्यात येते. रु.118.00 प्रति किलो या दरानुसार वार्षिक एकूण खर्च रु.55,40,100.00 एवढा होणार आहे.

करीता, सन 2022-23 या एका आर्थीक वर्षासाठी प्राणी संग्रहालयातील हिंस्त्र प्राण्यांसाठी बीफ खरेदी चा प्रस्ताव मान्यतेसाठी विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 330/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2022-23 या एका आर्थीक वर्षासाठी प्राणी संग्रहालयातील हिंस्त्र प्राण्यांसाठी बीफ खरेदी साठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मक दृष्ट्या फैजल बफेलो मीट शॉप औरंगाबाद यांचे बीफ खरेदीचे निविदा दर र.रु.118.00 प्रति किलो या दरास व या दरानुसार होणारा वार्षिक खर्च रु.55,40,100.00 यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 331/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.30.03.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन 2022-23 एका वर्षासाठी प्राणीसंग्रहालयात असलेल्या प्राण्यांना देण्यात येणारे खाद्य खरेदी करण्यासाठी ई-टेन्डरद्वारे निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

1. मासोळी साठी एकुण तीन कोरे निविदाची विक्री झाली असून तीन भरलेल्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नाव | दर प्रति किलो |
|---|---|---|
| 1. | मुकेश लहुजी साबळे, औरंगाबाद. | र.रु.50.00 |
| 2. | यादगार फिश सेंटर, औरंगाबाद. | र.रु.55.00 |
| 3. | फ्रेश फिश शॉप, औरंगाबाद | र.रु.269.00 |

तुलनात्मक दृष्टिने मुकेश लहुजी साबळे, औरंगाबाद यांचे मासोळी करीता निविदा दर र.रु.50.00 प्रति किलो हे सर्वात कमी दर आहेत.

2. लुसर्न घास व हिरवा मका :- लुसर्न घास व हिरवा मक्यासाठी एकुण सहा कोरे निविदाची विक्री झाली असून सहा भरलेल्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ. क्र. | निविदाधारकाचे नाव | लुसर्न घास चे दर प्रति किलो | हिरवा मका दर प्रति किलो |
|---|---|---|---|
| 1. | संकेशा ईन्टरप्राईजेस, औरंगाबाद | रु.5.90 | रु.5.75 |
| 2. | पी एस आर सर्व्हिसेस, औरंगाबाद | रु.6.50 | रु.17.00 |
| 3. | मोमीन ईन्टप्राईजेस, औरंगाबाद | रु.5.90 | रु.6.49 |
| 4. | टापटन ईन्टप्राईजेस, औरंगाबाद | रु.7.95 | रु.7.80 |
| 5. | संतोष किराणा, औरंगाबाद | रु.5.75 | रु.5.75 |
| 6. | अलिम कड्बा, औरंगाबाद | रु.6.90 | रु.6.90 |

तुलनात्मक दृष्टिने संतोष किराणा औरंगाबाद यांचे निविदा दर लुसर्नघास साठी रु.5.75 प्रतिकिलो हे सर्वात कमी आहेत.तसेच हिरवा मका साठी संतोष किराणा औरंगाबाद व संकेशा इन्टरप्राईजेस, औरंगाबाद यांचे दर रु.5.75 प्रति किलो हे समान असुन सर्वात कमी आहेत.

3. शाळु बाटुक :- शाळु बाटुक साठी एकुण सहा कोरे निविदाची विक्री झाली असून सहा भरलेल्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नाव | शाळु बाटुक दर प्रति किलो |
|---|---|---|
| 1. | संकेशा ईन्टरप्राईजेस, औरंगाबाद | र.रु.13.45 |
| 2. | अलिम कडबा, औरंगाबाद | र.रु.11.45 |
| 3. | संतोष किराणा, औरंगाबाद | र.रु.19.90 |
| 4. | टापटन ईन्टप्राईजेस, औरंगाबाद | र.रु.15.10 |
| 5. | पंचशिल महिला बचतगट, औरंगाबाद | र.रु.13.75 |
| 6. | मोमीन ईन्टप्राईजेस, औरंगाबाद | र.रु 13.99 |

तुलनात्मक दृष्टिने, अलिम कडबा औरंगाबाद यांचे शाळु बाटुकसाठी निविदा दर रु.11.45 प्रति किलो हे सर्वात कमी दर आहेत.

4. **भाजीपाला व फळफळावळ :-** भाजीपाला व फळफळावळासाठी एकुण तीन कोरे निविदाची विक्री झाली असुन तीन भरलेल्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ. क्र. | खाद्य पदार्थाचे नाव | मोमीन इन्टरप्राईजेस | संतोष किराणा | लक्की फ्रुट ॲण्ड वेजीटेबल |
|---|---|---|---|---|
| 1. | केळी | रु.16.00 | रु.24.99 | रु.25.00 |
| 2. | टमाटे | रु.17.00 | रु.29.99 | रु.12.00 |
| 3. | खिरे | रु.25.00 | रु.29.99 | रु.20.00 |
| 4. | गाजर | रु.18.00 | रु 24.99 | रु.20.00 |
| 5. | कोबी | रु.18.00 | रु.29.11 | रु.12.00 |
| 6. | सफरचंद | रु.90.00 | रु.119.00 | रु.70.00 |
| 7. | कोथींबीर | रु.50.00 | रु.39.00 | रु.25.00 |
| 8. | चिकु | रु.40.00 | रु.39.99 | रु.35.00 |

तुलनात्मक दृष्टिने संतोष किराणा औरंगाबाद यांचे केळी व गाजरसाठी तर लक्की फ्रुट ॲण्ड व्हेजीटेबल यांचे टमाटे, खिरे, कोबी, सफरचंद, कोथींबीर व चिकुसाठी निविदा दर हे सर्वात कमी आहेत.

5. **किराणा पदार्थ** :- किराणा पदार्थ साठी एकुण तीन कोरे निविदाची विक्री झाली असुन तीन भरलेल्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | किराणा पदार्थाचे नाव | मोमीन इन्टरप्राईजेस | संतोष किराणा | टापटन इंटरप्राईजेस औरंगाबाद |
|---|---|---|---|---|
| 1. | शेंगदाणे | रु.105.00 | रु 112.00 | रु.130.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2. | ब्लिचींग पावडर 20 किलो | रु.1150.00 | रु.1590.00 | रु.1291.00 |
| 3. | चुना पावडर 20 किलो | रु.300.00 | रु.295.00 | रु.500.00 |

तुलनात्मक दृष्टिने मोमीन इन्टरप्राईजेस यांचे शेंगदाणे व ब्लीचींग पावडरसाठी तर संतोष किराणा यांचे चुना पावडर साठी निविदा दर हे सर्वात कमी आहेत.

6. पशुपक्षी खाद्य: पशुपक्षी खाद्यासाठी एकूण चार कोरे निविदाची विक्री झाली असून एकूण एजन्सी अपात्र ठरली असून तीन भरलेल्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | खाद्याचा तपशील | संकेषा ईन्टरप्राईजेस | मोमीन ईन्टरप्राईजेस | संतोष किराणा |
|---|---|---|---|---|
| 1. | पशुखाद्य | रु.15.25 | रु.18.49 | रु.20.00 |
| 2 | पक्षी खाद्य | रु.30.00 | रु.26.99 | रु.35.00 |

तुलनात्मक दृष्टिने संकेषा ईन्टरप्राईजेस यांचे पशुखाद्यासाठी तर मोमीन ईन्टरप्राईजेस यांचे पक्षी खाद्यासाठी निविदा दर हे सर्वात कमी आहेत.

करीता, सन 2022-23 या एका आर्थीक वर्षासाठी प्राणी संग्रहालयातील प्राण्यांसाठी खाद्य खरेदी प्रस्ताव मान्यतेसाठी विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर

**ठराव क्रमांक 331/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2022-23 या एका आर्थीक वर्षासाठी प्राणी संग्रहालयातील प्राण्यांसाठी मासोळी, लुसनघास, हिरवा मका, शाळु बाटुक, पशुपक्षी खाद्य, भाजीपाला, फळे व किराणा पदार्थ खरेदीसाठी प्राप्त झालेल्या निविदा मधील सर्वात कमी दरास व या दरानुसार होणारा वार्षिक खर्च अंदाजे रु.31,38,028.00 यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 332/2022:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.30.03.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती विद्या अनिल चौधरी, सहशिक्षिका, प्राथमिक शाळा, पदमपुरा, केंद्रिय प्राथमिक शाळा, बन्सीलाल नगर यांनी स्वतःच्या पतीच्या (कर्करोग) या आजारपणावर कमलनयन बजाज हॉस्पीटल येथे उपचार केला असून सदर उपचारासाठी रु.1,66,871/- (अक्षरी रु.एक लक्ष सहासष्ठ हजार आठशे एकाहत्तर मात्र) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय शिल्लक र.रु.82,993/- असून सदर रकमेच्या 90 टक्के र.रु.74,693/- आहे. त्यापैकी 5 टक्के र.रु.8,339/- (एकूण दाखल केलेले देयक र.रु.1,66,871/- च्या 5 टक्के प्रमाणे) महानगरपालिका फंडात जमा करुन उर्वरित निव्वळ देय र.रु.66,354/- (रुपये सहासष्ठ हजार तीनशे चौपन्न मात्र) देय आहे.

सदरील (कर्करोग) उपचार केलेले रुग्णालय शासकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतीपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयांची अद्यावत यादी दि.16.11.2011 पर्यंत मधील प्रसिध्द रुग्णालय यादीत सदरील रुग्णालयाचे नाव समाविष्ठ नाही.

शासन निर्णयामधील प्रतीपुर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजुरीचे अधिकाराबाबत महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम 1961 व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहून रु.1,00,000/- पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबंधीत विभागाच्या विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आले आहे. तसेच रु.1,00,000/- पेक्षा जास्त वैद्यकीय देयक रकमेस मंजुरीचे अधिकार आयुक्त यांना असून रु.2,00,000/- पेक्षा जास्त वैद्यकीय देयक रक्कमेस मा.स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

करीता, श्रीमती विद्या अनिल चौधरी, सहशिक्षिका, प्राथमिक शाळा, पदमपुरा, केंद्रिय प्राथमिक शाळा, बन्सीलाल नगर यांना शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहून प्रत्यक्ष देय र.रु.66,354/- (रुपये सहासष्ठ हजार तीनशे चौपन्न मात्र) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 332/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती विद्या अनिल चौधरी, सहशिक्षिका, प्राथमिक शाळा, पदमपुरा, केंद्रिय प्राथमिक शाळा, बन्सीलाल नगर यांनी स्वतःच्या पतीच्या (कर्करोग) या आजारपणावर कमलनयन बजाज हॉस्पीटल येथे उपचार केला असून संबंधीतास शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहून रक्कम वजा जाता प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली निव्वळ र.रु.66,354/- (रुपये सहासष्ठ हजार तीनशे चौपन्न मात्र) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 333/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.31.03.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नियोजीत स्व.मा.बाळासाहेब ठाकरे स्मारक व स्मृतीवन उभारणेच्या जागेस संरक्षण भींत बांधणे हे काम जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2021-22 मधील नावीन्यपुर्ण योजनेअंतर्गत अंदाजपत्रकीय र.रु.1.96 कोटी इतके मंजुर झालेले असून सदर काम कंत्राटदार मे.रत्नगुरु कन्स्ट्रक्शन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.21% कमी दराने सुरु आहे. सदर कामादरम्यान सुरक्षेच्या व सौंदर्यीकरणाच्या दृष्टिने काही अतिरिक्त बाबी कराव्या लागत आहेत. करीता सदर अतिरीक्त बाबींचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या एस.एस.आर. 2020-21 नुसार र.रु.32,84,778/-इतकेचे तयार करण्यात आले आहे. सदर अतिरिक्त बाबी कंत्राटदार हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 3 % कमी दराने करण्यास तयार आहेत. तसेच सदर अतिरिक्त बाबींच्या कामाची रक्कम ही मंजुर अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 10%पेक्षा जास्त होत असल्याने त्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता मिळणे आवश्यक आहे. त्या करीता प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव ठेवण्यात येत आहे.

तरी, अतिरीक्त बाबींचे अंदाजपत्रक र.रु.32,84,778/ इतके वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार प्रशासकीय मान्यतेस्तव व वाढीव काम मुळ कंत्राटदार मे.रत्नगुरु कन्स्ट्रक्शन यांच्या मार्फत अंदाजपत्रकीय दरापेक्षा 3% कमी दराने करुन घेण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 333/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नियोजीत स्व.मा.बाळासाहेब ठाकरे स्मारक व स्मृतीवन उभारणेच्या जागेस संरक्षण भींत बांधणे या कामासाठी अतिरीक्त बाबी र.रु.32,48,778/- इतकेस जे की मंजुर अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 10 % पेक्षा जास्त होत आहे. त्यास्तव मान्यतेसह अतिरीक्त बाबीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येऊन सदर काम मुळ कंत्राटदार मे.रत्नगुरु कन्स्ट्रक्शन यांच्या मार्फत 3% कमी दराने करुन घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 333/1-2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.31.03.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 103 व 104 नुसार सन 2021-2022 चे सुधारित व कलम 95 नुसार सन 2022-2023 चे जमा व खर्चाच्या मुळ अंदाजास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 96 व 100 नुसार अंतिम मान्यता देणे बाबतचा प्रस्ताव सादर.

**ठराव क्रमांक 333/1-2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जमा व खर्चाचे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तसेच अर्थसंकल्प महानगरपालिका फंडातून रु.200.00 कोटीच्या रस्त्यांची पुर्नबांधणी व मजबुतीकरण करण्याची नवीन कामांसाठी विशेष तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच प्रतिवार्ड रु.1.00 कोटीची महसुली व भांडवली कामासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अग्निशमन विभाग सक्षम बनविण्यासाठी या विभागाकरीता रु.53.00 कोटीची तरतुद केलेली आहे. या व्यतिरिक्त मागील वर्षातील कोव्हीड-19 च्या दुसऱ्या व तिसऱ्या लाटेच्या प्रभावामुळे जे प्रकल्प हाती घ्यावयाचे आहेत ते बांधा-वापरा व हस्तांतरीत करा (BOT) तत्वावर त्याच प्रमाणे इच्छुकांकडून अनामत रक्कमा घेऊन विकसीत करावयाचे वाणिज्यिक व्यापारी संकुले इ. बहुउद्देशीय व लोकाभिमुख प्रस्तावा जे नागरीकांचे हित लक्षात घेऊन प्रस्तावीत करण्यात आलेले आहेत. त्यासह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 103 व 104 नुसार सन 2021-22 चे सुधारित अंदाज जमा रु.1067 कोटी 38 लक्ष 58 हजार यामध्ये प्रारंभीची शिल्लक रु.101 कोटी 28 लक्ष 27 हजार यासह एकुण जमा रु.1168 कोटी 66 लक्ष 85 हजार आणि एकूण खर्च रु.1071 कोटी 93 लक्ष 86 हजार लक्षात घेता रु.96 कोटी 72 लक्ष 99 हजार शिल्लकीचे त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 95 नुसार सन 2022-2023 चे जमा व खर्चाचे मुळ अंदाज यामध्ये शासकीय अनुदानासह प्रारंभीची शिल्लक रु.130 कोटी 82 लक्ष 30 हजार व अपेक्षित जमा रु.1597 कोटी 33 लक्ष 50 हजार असे एकुण रु.1728 कोटी 15 लक्ष 80 हजार आणि अपेक्षीत रु.1726 कोटी 39 लक्ष 71 हजार विचारात घेता, रु.01 कोटी 76 लक्ष 09 हजार शिल्लकीचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 96 व 100 नुसार मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 334/2022:-**

(प्रशासकीय प्रस्ताव दि.31.03.2022)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ च्या कलम-३ मधील पोट क्रमांक (१) मध्ये (क) दिनांक ०१ जानेवारी, २००१ रोजी या मजकुराऐवजी दिनांक ३१ डिसेंबर २०२० रोजी हा मजकुर दाखल

करण्यात आला. (ख) दुसऱ्या परंतुकातील खंड (क) मध्ये दिनांक १ जानेवारी, २०११ नंतर या मजकुराऐवजी दिनांक ३१ डिसेंबर, २०२० दाखल करण्यात आले आहे. सदर अधिनियम दिनांक १२ मार्च २०२१ च्या राजपत्रानुसार अंमलात आला आहे. त्यानुसार प्रस्ताव क्रमांक १८१/२०२१, दिनांक ०६/०८/२०२१ अन्वये धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे अंमलबजावणी करण्यात येत आहे.

उदा.:- २० X ३० च्या भूखंडावरील तळमजल्याच्या बांधकामासाठी आकारणी :-

| अ. क्र. | शुल्क आकारणीचा प्रकार | दर (प्रती चौ.मी.) | क्षेत्र चौ.मी. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | छाननी शुल्क (बांधकाम क्षेत्रावर) | ४/- | ५५.७६ | २२३/ |
| ०२. | विकास आकार (भूखंड क्षेत्रावर) | १,१४०/- | ५५.७६ | ६३,५६६/- |
| ०३. | प्रशमन शुल्क | | | |
| | अ. जागेत सिमारा शुल्क<br>(भूखंड क्षेत्रावर वार्षीक मुल्यदर तक्त्यामधील दराच्या ०.५% दराने) किंवा ६०/- प्रती चौ.मी. यापैकी जो दर अधिक असेल तो दर | ६०/- | ५५.७६ | ३,३४६/- |
| | ब. शहर विकास निधी<br>(बांधकाम क्षेत्रावर वार्षीक मुल्यदर तक्त्यामधील दराच्या २% दराने)<br>अंदाजीत दर रु. ७,००० X २% = १४०/- | १४०/- | ५५.७६ | ७,८०६/ |
| | | | एकूण | ७४,९४२/- |

उक्त प्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येत आहे.

ज्या मिळकतीचे क्षेत्र १५०.०० चौ.मी. किंवा त्यापेक्षा कमी असेल अशा मिळकतीच्या निवासी वापरासाठी वरीलप्रमाणे येणाऱ्या रक्कमेच्या ५०% रक्कम आकारणी करण्यात येत आहे. त्यामध्ये वाणिज्य वापर असल्यास वाणिज्य वापरासाठी १००% रक्कम म्हणजेच आकारणीच्या (अनु.०३ ब) ची पूर्ण रक्कम आकारणी करण्यात येत आहे. तसेच ज्या मिळकतीचे क्षेत्र १५०.०० चौ.मी. पेक्षा जास्त असेल त्या भूखंड/मिळकतीसाठी वरील आकारणीतील रक्कम निवासी वापरासाठी १००% म्हणजेच पुर्ण रक्कम व त्यामध्ये वाणिज्य क्षेत्राचा समावेश असल्यास वाणिज्य क्षेत्रासाठी शुल्क आकारणी (अनु.क.०३-ब) च्या दुप्पट व उर्वरीत करीता १००% रक्कम आकारणी करण्यात येत आहे.

रेखांकन किंवा रेखांकनातील खुला भूखंड गुंठेवारी अंतर्गत नियमाधीन करणेसाठी वरील तक्त्या मधील अनु.०१ ते ०३ प्रमाणे शुल्काची आकारणी करण्यात येत आहे

II. नियमितीकरणासाठी एफ.एस.आय. मर्यादा :-

- नियमितीकरण हे केवळ अधिकृत बांधकामांना अनुज्ञेय असलेल्या F.S.I. मर्यादे प्रमाणेच F.S.I. मर्यादा १.१ पर्यंत करण्यात येते. यापेक्षा जास्त अतिरिक्त F.S.I.चे बांधकाम पेड F.S.I. नव्हे देय मर्यादेत नियमितीकरण नियमानुसार देय असेल, तेथे करण्यात येते.
- विकास नियंत्रण नियमावली UDCPR (Unified Development Control & Promotion Regulation) मधील तरतुदी नुसार ९.०० मीटर व त्यापेक्षा जास्त रुंदीच्या रस्त्यावर नियमित बांधकाम परवानगी देतांना मुळ देय F.S.I.चा वापर शोधक अधिमुल्य शुल्क (Premium) ची आकारणी करुन अतिरिक्त ५०% क्षेत्रफळ म्हणजेच ०.५० F.S.I. सेवाचे वाढीव बांधकाम देय करण्यात येते. तसेच ॲन्सलरी F.S.I. देण्यात येतो. त्याचप्रमाणे नियमितीकरणात F.S.I देय आहे.

* त्याच धर्तीवर गुंठेवारी विकास नियमितीकरण करतांना गुंठेवारी धारकाने प्रत्यक्षात केलेले बांधकाम म्हणजेच एकूण F.S.I. मर्यादेत नियमिती करण्यात येते. (मुळ देय F.S.I. १.१ अधिक ॲन्सलरी F.S.I ०.६ अधिक देय असल्यास प्रीमियम पेड F.S.I. ०.५ या F.S.I.पर्यंत नियमित करण्यात येत आहे.)
* त्यासाठी प्रिमीयमचा दर सुध्दा नियमित बांधकाम परवानगीसाठी आकारण्यात येणाऱ्या दरा इतका आकारण्यात येत आहे.
* परंतु अनधिकृत बांधकामांना प्रोत्साहन मिळू नये या करिता एकूण देय F.S.I. मर्यादे पेक्षा जास्तीचा गुंठेवारी विकास (बांधकाम) नियमित केला जाणार नाही व जास्तीचे बांधकाम निष्कासीत करण्यात येणार आहे.

III गुंठेवारी सुधारणा अधिनियम-२०२१ ची अंमलबजावणी करणेसाठी गुंठेवारी संचिका तयार करणे व त्याबाबत मंजुरी करीता प्रशासनास सहाय्यभूत होणे या कामासाठी विविध एजन्सीची Empanelment तयार करणे व या मधील आर्किटेक्ट, स्ट्रक्चरल अभियंते, सुपरवायझर यांना केलेल्या कामाबाबत पात्र गुंठेवारी प्रस्ताव दाखल केल्यानंतर गुंठेवारी धारकाने जमा केलेल्या रक्कमेच्या १०% रक्कम मानधन किंवा कामाचा मोबदला म्हणून पात्र संचिकांसाठी (१५०.००चौ.मी.पर्यंत भूखंड क्षेत्रफळ असलेल्या) गुंठेवारी संचिकांबाबत एजन्सीस देण्यात येईल. तसेच ज्या गुंठेवारी मिळकतीचे क्षेत्र १५०.०० चौ.मी.पेक्षा जास्त असेल अशा भूखंडाच्या बाबत एजन्सीसाठी मानधन/मोबदल्याची रक्कम ही पात्र गुंठेवारी मिळकतीच्या वसुल होणाऱ्या रक्कमेच्या ७% राहील तसेच वरील मानधनाची कमाल मर्यादा र.रु.५०,०००/- पर्यंत ठेवण्यात आली आहे.

वरील प्रमाणे I ते III मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे गुंठेवारी विकास नियमितीकरण करण्यासाठी धोरणात्मक निर्णयास देण्यात आलेल्या मान्यतेनुसार कार्यवाही करण्यात येत आहे. यामध्ये गुंठेवारी नियमितीकरण करण्यासाठी १५०.०० चौ.मी व त्यापेक्षा कमी क्षेत्राच्या भूखंडाकरीता ५०% सवलत देण्यात येत आहे. मात्र गुंठेवारी नियमितीकरणासाठी वारंवार मुदतवाढ देऊनही बऱ्याच जणांनी दि.३१.०३.२०२२ पर्यंत प्रस्ताव दाखल केले नाही. त्यामुळे यापुढे नियमितीकरणाचे प्रस्ताव लवकर दाखल करण्यासाठी नागरिकांनी उद्युक्त करण्यासाठी 'उशिरा प्रस्ताव देणाऱ्यांना कमी सवलत' हे धोरण राबविणे आवश्यक वाटते. दि.०६.०८.२०२१ रोजी मंजुर झालेल्या ठरावात उक्त तक्त्यातील अनु.३ वर प्रशमन शुल्क नमुद करण्यात आले आहे. परंतू सदर शुल्क प्रशमन शुल्क नसून विकास शुल्क आहे. करीता प्रशमन शुल्काच्या ऐवजी विकास शुल्क अशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. विकास शुल्काची आकारणी महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम १२४ च्या तरतुदीनुसार करण्यात येते. त्यानुसार विकास शुल्कामध्ये सवलत बंद करावी. त्यामुळे विकास शुल्क १००% भरणा करुन घेणे व विकास आकाराची रक्कम महानगरपालिकेच्या प्रचलित दरानुसार आकारुन विकास आकाराची सवलत दि.३०.०४.२०२२ नंतर प्रत्येक महिन्यानंतर १०% कमी करणे योग्य राहिल. सदर देण्यात येणारी सवलत केवळ विकास आकार यावर देण्यात येणार असून, जमीन विकास शुल्क व शहर विकास निधी याकरीता कोणतीही सवलत यापुढे देण्यात येणार नाही. तसेच दि.१२.१०.२०२१ च्या शासन आदेशान्वये अनधिकृत रेखांकनातील भूखंडाकरीता विकास शुल्क रक्कमेच्या तीन पट रक्कम प्रशमन शुल्क म्हणुन आकारण्याबाबत नमुद करण्यात आले आहे. त्यानुसार आता जमिन विकास शुल्काच्या तीन पट रक्कम आकारणे योग्य होईल. तसेच यापुर्वीच्या ठरावात एजन्सीला जी.एस.टी.ची रक्कम अदा करणे बाबत उल्लेख केलेला नाही. वास्तुविशारद यांनी जी.एस.टी.ची रक्कम अदा करणे बाबत विनंती केली आहे. त्यानुसार शासन निर्णयानुसार लागु असलेले जी.एस.टी.रक्कम एजन्सीस अदा करणे योग्य राहील.

करीता वरीलप्रमाणे नमुद करण्यात आल्यानुसार गुंठेवारी नियमितीकरणा करीता शुल्क आकारणे व वास्तुविशारद यांना देण्यात येणाऱ्या मानधनाच्या रक्कमेमध्ये जी.एस.टी.चा समावेश करणेच्या धोरणात्मक निर्णयाचे मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला आहे.

**<u>ठराव क्रमांक 334/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम २००१ मधील सुधारणा २०२१ ची अंमलबजावणी करणेसाठी व इतर बाबींसाठी वरीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात आल्यानुसार सिव्हर आकार विकास शुल्काची आकारणी करणे तसेच वास्तुविशारद यांना देण्यात येणाऱ्या मानधनामध्ये जी.एस.टी.शुल्काचा समावेश करण्याच्या धोरणात्मक निर्णयास मान्यता देण्यात येते. पुढील वैधानिक कार्यवाही करण्यात यावी.

**महापालिका सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

**प्रशासक**
महानगरपालिका औरंगाबाद